# दासबोध प्रबोध

(भावार्थासह)



श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा) पाठ्यपुस्तक तिसरे



शिवथरघळीतील मूर्ती - श्री सुंदरमठातील दासबोध लेखन


**दासबोध प्रबोध (भावार्थासह)**

श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन (पत्रद्वारा)
पाठ्यपुस्तक तिसरे -

**एकत्रित आवृत्ती २ री :**
१३ फेब्रुवारी २०१५
दासनवमी

**मूल्य ६० रूपये**

**प्रकाशक :**

**अध्यक्ष श्री. दिलीप कोठारी**
श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन (श्री.दा.अ.)
श्रीसमर्थ हौसिंग सोसायटी, धन्वंतरी
सभागृहामागे, पटवर्धन बाग, एरंडवणे,

**मुद्रक :**

**के. जोशी आणि कंपनी**
सदाशिव पेठ, भिकारदास मारुती मंदिराजवळ,
पुणे-४११०३० फोन :२४४७१४०९,२४४८२७४८
Email: kjoshipress@gmail.com


## अभ्यासार्थींना सूचना -

१) ज्यांनी 'दासबोध परिचय' हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे त्यांनीच या पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय आरंभापासून सोडवावेत.

२) आपल्या पूर्वीच्या समीक्षकांकडेच स्वाध्याय पाठवावेत. ते समीक्षक निवृत्त झाले असतील तर अध्यक्ष 'श्री. दा. अ.' यांचेकडे पर्यायी समीक्षक मागावा.

३) स्वाध्यायाच्या आरंभी अभ्यासार्थी क्रमांक आणि स्वत:चे नाव घालावे. समीक्षणासाठी स्वत:चा पत्ता लिहिलेले आंतरदेशीय पत्र स्वाध्यायासोबत पाठवावे. पोस्टात वजन करून योग्य ते पोस्टेज लावावे, अन्यथा स्वाध्याय स्वीकारला जाणार नाही.

४) स्वाध्यायासाठी ''सज्जनगड'' मासिकातील मार्गदर्शक लेख वाचावेत. मासिकाची वार्षिक वर्गणी २०० रूपये किंवा १० वर्षासाठी वर्गणी १५००/- रूपये. पाठविण्याचा पत्ता : व्यवस्थापक ''सज्जनगड'' मासिक, १७९,


या पुस्तकातील दासबोधाच्या समासांचा सारांश, श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड या संस्थेने प्रकाशित केलेल्या प्रा. के. वि. बेलसरे यांनी संपादित केलेल्या आवृत्तीतून देण्यात आला आहे. या सारांशाचा अंतर्भाव करण्यास अनुमति दिल्याबद्दल तसेच मुखपृष्ठासाठी चित्राचे फोटो वापरण्यास दिल्याबद्दल आम्ही श्री समर्थसेवा मंडळाचे ऋणी आहोत -

# दासबोध प्रबोध पाठ्यपुस्तक व भावार्थाच्या एकत्रित आवृत्ती निमित्ताने.....

**प्रास्ताविक :** दासबोध प्रवेश चे पाठ्यपुस्तक व भावार्थ एकत्र करून डिसेंबर २००९ मध्ये प्रथम प्रकाशित केले. १५ मे २०११ च्या श्री. दा.अ. समितीच्या चाफळ येथील बैठकीत ठरल्याप्रमाणे आता प्रबोधचे पुस्तक भावार्थासह प्रकाशित करीत आहोत.

दासबोध प्रबोध हे पाठ्यपुस्तक प्रथम नोव्हेंबर १९८४ मध्ये प्रकाशित करण्यात आले होते. आणि भावार्थ दासबोध प्रबोध हे पुस्तक प्रथम जाने. १९९८ मध्ये प्रकाशित केले गेले. दासबोध प्रबोध भावार्थासह हे पुस्तक म्हणजे वरील दोन पुस्तकांचे एकत्रीकरणच आहे. आजपर्यंत दासबोध प्रबोधच्या तेवीस आवृत्त्या निघाल्या आहेत. भावार्थ प्रबोधच्या सहा आवृत्या निघाल्या आहेत. तीनही भावार्थ पुस्तकांचे संपादन श्री.द्वा.वा. केळकर संस्थापक, संयोजक, पत्रद्वारा दासबोध अभ्यास, यांनी केलेले आहे. त्यांनी स्वत:च भावार्थ पुस्तकांच्या प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे अभ्यासार्थींना पुस्तक जास्तीत जास्त उपयुक्त ठरावे या दृष्टीने खूप प्रयत्न केले आहेत. ओव्यांचे भावार्थ लिहितांना स.भ.पु.पां. गोखले (१८९८-१९८६) यांच्या 'स्वाध्याय साधना' या पुस्तकाचा तसेच स.भ. प्रा. के .वि. बेलसरे (१९०९-१९९८) स. भ. ल. रा. पांगारकर (१८७२-१९४१) स.भ. कृ ना. आठल्ये (१८५३-१९२६) यांच्या सार्थ ग्रंथांचाही उपयोग केला आहे.

तसेच दासबोध प्रबोधस्तराच्या अभ्यासक्रमाचे शिल्पकार डॉ. वसंतराव वैद्य (१९१८-२००६) आणि डॉ. श्री. द. देशमुख यांनी दासबोध अभ्यास वर्गात केलेली प्रवचने आणि लेखन यांचाही उपयोग भावार्थ संपादन करतांना झाला आहे.

पाठ्यपुस्तकात मूळ समासाचे अगोदर त्या त्या समासाचे सारांश हे कै. बेलसरे यांच्या सार्थ दासबोधातूनच घेतले आहेत. ते सर्व या एकत्रित पुस्तकांत जसेच्या तसे घेतले आहेत.

अभ्यासार्थी दोन वर्षे मननचिंतनपूर्वक दासबोधाचा अभ्यास करित आहेत. आता या प्रबोधच्या अभ्यासात सखोलता येण्याचे दृष्टीने दासबोधासंबधीचे काही विचार या प्रास्ताविकात संकलित करीत आहोत त्याचे मनन अभ्यासार्थींना निश्चित मार्गदर्शक होईल.

डॉ. वसंतराव वैद्य म्हणतात 'आत्मज्ञानाचा विचार दासबोधाने अत्यंत सोप्या शब्दांत, शुद्ध स्वरूपात मांडला आहे. ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम आदि संतांनी प्रभावीपणे प्रतिपादलेले अव्दैत तत्वज्ञान हेच समर्थांनी स्विकारले आहे. ते त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले आहे आणि **कोणाही साधकाला हा अनुभव घेता येईल असा दृढ विश्वास निर्माण करण्याचे सामर्थ्य दासबोधाच्या शब्दांत आहे.**'

दासबोध प्रत्यक्ष आचरणांत आणण्याची तीव्र गरज आहे आणि यांवरच खरेतर या 'पत्राद्वारे दासबोध अभ्यास' उपक्रमाचे यश अवलंबून आहे.

श्री. द्वा. वा. केळकरांच्या म्हणण्याप्रमाणे, समर्थांच्या शब्दात सांगायचे झाल्यास ''आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वत:सिद्ध।'' या वचनाप्रमाणे श्री ग्रंथराज दासबोधात समर्थांना पहाण्याचा प्रयत्न अभ्यासार्थींनी करावा.

दासबोध हा काही निव्वळ पारायणे करून पुण्यप्राप्ती करण्याचा ग्रंथ नाही. त्यातील विषय आणि ओव्यांतील आशय समजून घेऊन त्यानुसार आचरण केले जावे ही समर्थांची अपेक्षा आहे. सातत्याने श्रवण मनन चिंतन झाल्याखेरीज

हे होणार नाही.

डॉ. श्री. द. देशमुख म्हणतात ''कांही गलबला काही निवळ । ऐसा कंठीत जावा काळ।'' हे समर्थांच्या जीवनपद्धतीचे मुख्य सूत्र आहे. मानवी जीवनाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व कौटुंबिक अंगाना ते 'निवळ' असे म्हणतात. पहिल्यासाठी अंतःकरण बहिर्मुख असावे लागते. याच संदर्भात 'अंतर्निष्ठ तितुके तरले । अंतर्भ्रष्ट तितुके बुडाले ।' हा समर्थांचा विचार लक्षात घ्यावा लागतो. जागोजागी समर्थ वाङ्मयात व त्यांच्या प्रत्यक्ष जीवनात या दोन्ही सूत्रांचा बेमालूम समन्वय जाणवतो. समर्थ संप्रदायाचे मर्म ह्या समन्वयांत साठविलेले आहे.

'जनी जाणता भक्त होवोनि राहे' हे समर्थांचे वचन आणि 'सत्य गेले भोळ्यावरी अविद्येची झाली चोरी' हे श्री. जगत्गुरू तुकोबारायांचे वचन अभ्यासार्थींनी समजून घेतले पाहिजे. अध्यात्म क्षेत्रात शिरलेली जळमटांची जंगले नष्ट करण्यासाठी दासबोधातील भ्रमनिरूपणाचा निर्भयपणे अभ्यास केला पाहिजे. समर्थ म्हणतात 'प्रपंच सुखे करावा । परी काही परमार्थ वाढवावा ।' आपले प्रापंचिक जीवन विहित रसिकतेने जगून अध्यात्मबोध वाढीला लावावा. अध्यात्म शास्त्र हा केवळ शब्दांचा पसारा नाही. ते संसार जिंकण्याचे शस्त्र आहे.

## प्रबोध अभ्यासाची आखणी व कार्यवाही :

१९८० पर्यंत प्रवेश व परिचय स्तरांची कार्यवाही झाली होती. सज्जनगडावर केवळ समीक्षकांची एक सभा झाली. त्यावेळी डॉ. वसंतराव वैद्य (चाफळ) आणि डॉ. श्री. द. देशमुख (मुरगूड) यांनी पुढील अभ्यासक्रमाची आवश्यकता प्रतिपादन केली. त्याला दासबोध प्रबोध हे नांवही सुचविले आणि आखणी करून दरमहा प्रश्नपत्रिका प्रसिद्ध करण्याची जबाबदारीही स्विकारली.

डॉ. वसंतराव वैद्य आणि डॉ. श्री. द. देशमुख यांचे लेख सज्जनगड मासिकांत पूर्वीपासूनच येत. त्यावरून त्यांच्या दासबोधाच्या सखोल अभ्यासाची स्पष्ट कल्पना सहज लक्षात येते. असे असतांनाही प.दा.अ. उपक्रमाच्या प्रारंभापासूनच वरील दोघांनी त्यांचे स्वाध्याय श्री. द्वा. वा. केळकर यांचेकडे पाठविण्यास प्रारंभ केला. त्यानंतर लगेच त्यांनी समीक्षकांचे काम करावे अशी त्यांना विनंती केल्यावर लगेच त्यांनी समीक्षणाचेहि काम उत्कृष्टपणे केले.

डॉ. वैद्य यांनी चाफळच्या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे प्रसंगी देखरेखीची सर्व जबाबदारी उचलली होती. त्यांचा ज्ञानेश्वरी आणि गीता यांचा व्यासंग दांडगा होता. श्रीराम मंदिरात गीता वर्ग १९७५ पासून ते चालवीत होते. त्यांनी डॉक्टरीचा व्यवसाय करून लोकांना आरोग्य तर मिळवून दिलेच, शिवाय अध्यात्म विचारांचा प्रसार करून त्यांच्या मनालासुद्धा एक नवी दिशा दाखविली.

डॉ. श्री. द. देशमुख यांचाही एक निष्णात डॉक्टर म्हणून लौकिक आहे. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया उपक्रमामध्ये त्यांनी भरघोस कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना गौरविण्यात आले होते. कोल्हापूर जिल्ह्यातील एका बाजूला पडलेल्या मुरगूड विभागात राहूनही त्यांनी उपनिषदांची मराठीत भाषांतरे व ओवीबद्ध टीका प्रकाशित केल्या आहेत. ह.भ.प. खंदारकर महाराजांच्या ''ज्ञानदेवांचे पसायदान-विवरणासह'' या पुस्तकाचे इंग्रजी मध्ये भाषांतरही त्यांनी केले आहे.

ईश्वरी कार्यासाठी चंदनासारखे शरीर झिजविणाऱ्या या दोघांनी वेळेची सबब कधीही पुढे केली नाही. ही दोनही माणसे आदरणीय व अनुकरणीय आहेत. त्यांच्यामुळेच दासबोध

प्रबोध हा अभ्यासक्रम तयार झाला आहे.

एकंदर या तीन वर्षांच्या अभ्यासानंतर समीक्षण करायला मिळणे ही एक सुसंधीच असते. कारण तीन वर्षे स्वतः अभ्यास केल्यानंतर अनेकांना मार्गदर्शन करण्याच्या निमित्ताने आपला स्वतःचा अभ्यास अधिक सखोल होतो. समीक्षणाचे काम अवघड नाही पण त्यात एक जबाबदारी आहे. नियमितता हवी इतकेच.

दासबोधाच्या अभ्यासातून प्रेरणा घेऊन आपले रोजचेच काम अधिक चांगले कसे करता येईल हे आपण पाहू शकतो. 'दासबोध प्रबोध झाल्यानंतर काय ?' यासाठी अनेक गोष्टी करता येण्यासारख्या आहेत.

आपल्या भागांत दासबोध अभ्यासमंडळे चालवावीत. आपल्या परिसरातील मंदिरात समर्थांच्या ओव्यांचे तक्ते लावून मंदिराच्या भिंती बोलक्या करण्याचा प्रकल्प आपण करू शकता.

दासबोधाचा मनन चिंतनपूर्वक अभ्यास करून आपण वृत्तपत्रे, मासिके, आणि साप्ताहिके यांत समर्थ विचारांवर लेख लिहून समाज प्रबोधन आणि पत्राद्वारे दासबोधाच्या अभ्यासाचा प्रचार करू शकता.

चाफळला दर वर्षी १६ मे ते २० मे दासबोध अभ्यास वर्ग होतो. त्याला नियमित हजर राहून आपण आपला अभ्यास अधिक वाढवू शकता. डिसेंबरच्या दुसऱ्या शनिवारला जोडून शुक्रवार शनिवार व रविवार असा सज्जनगडावर दासबोध अभ्यासार्थींचा मेळावा असतो. वारकरी संप्रदायाच्या आषाढी कार्तिकी वारीप्रमाणे डिसेंबर व मे मधील या मेळाव्यांतून समर्थ संप्रदाय सुदृढ होण्याचे कार्य होऊ शकेल.

सज्जनगड मासिकाचा प्रचार व प्रसार वाढविणे, बाल व तरूणांसाठी संस्कारवर्ग व अभ्यासवर्ग चालविणे, श्री समर्थ सेवा मंडळाची नित्य उपासना केंद्रे चालविणे. अशा विविध उपक्रमांद्वारे प्रबोध झाल्यानंतर आपण समर्थ कार्यात सक्रिय होऊ शकता.

पाठ्यपुस्तक व भावार्थ एकत्र प्रकाशित करण्याचे ठरल्यानंतर श्री. म. वि. जोशी यांनी शास्त्रज्ञाच्या शिस्तबद्ध पद्धतीने पुस्तके अभ्यासार्थींना जास्तीत जास्त उपयुक्त होण्याच्या दृष्टीने अनेक सुधारणा केल्या. अत्यंत चिकाटीने मूळ पुस्तकांतील व टंकलेखनातील चुका दुरूस्तीचे काम चोख बजाविले. पंचाहत्तरीच्या वयांतही त्यांचा उत्साह आणि कामातील शिस्त वाखाणण्यासारखी आहे. भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटरमध्ये शास्त्रज्ञ या पदावरून निवृत्त झाल्यानंतरही आणि त्यापूर्वीही त्यांनी अनेक सामाजिक कार्यांत कौतुकास्पद काम केले आहे. तीनही पाठ्यपुस्तके भावार्थासह प्रकाशित करण्याच्या कामातील त्यांचे योगदान मोलाचे आहे ही गोष्ट येथे आवर्जून उल्लेखिली पाहिजे.

**प्रबोध नंतर दासबोध सखोल अभ्यास** : - दा. स. अ. ची योजना स.भ. अक्का वेलणकरांनी (१९२२-१९९८) कार्यान्वीत केली. त्यांच्या नंतर ती धुरा श्री. वसंत श्रीकृष्ण गाडगीळ यांनी समर्थपणे चालविली. श्री. वसंत श्रीकृष्ण गाडगीळ, नागपूर व त्यांच्या पत्नी सौ. लीलाताई गाडगीळ यांचे दासबोध अभ्यासाच्या प्रचारातील योगदान अत्यंत मोलाचे आहे. प्रवेशस्तराच्या समीक्षकांचा मार्गदीप हा सौ. लिलाताई गाडगीळांनीच संपादन केलेला आहे. इतकी वर्षे शिस्तबद्ध पद्धतीने दा.स.अ. चे संचालक म्हणून धुरा वाहिल्यानंतर आता त्यांनी ती कामाची जबाबदारी श्री. सुहास आगरकर, पुणे यांच्याकडे सुपूर्द केली आहे. श्री. सुहास आगरकर हे वयाने सर्वांत लहान असले तरी प.दा.अ.शी त्यांचा संबंध अगदी प्रथमपासून आहे. लहानपणापासूनच अभ्यासूवृत्ती आणि समाजकार्यांत सहभाग यामुळे त्यांचा अध्यात्मिक

क्षेत्रातील अधिकारही खूप मोठा आहे.

अशा अनेकांच्या योगदानातून श्री ग्रंथराज दासबोध अध्ययन ( पत्रद्वारा ) चे काम चालू आहे. अनवधानाने काहींचा उल्लेख राहून गेला आहे. मी स्वत: श्री. दा. अ. चा अध्यक्ष असलो तरी या सर्वांपेक्षा अनुभवाने आणि अधिकाराने लहान आहे. क्षमस्व...

अनेक समर्थ भक्तांच्या आणि श्रीसमर्थ सेवामंडळ, सज्जनगड यांच्या सहकार्यानेच श्री. दा. अ. चे काम चालू आहे त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानून हे प्रास्ताविक संपवितो...

**श्री. दिलीप कोठारी ,**

**अध्यक्ष, श्री. दा. अ.**

॥ श्री॥

# ॥ आरती दासबोधाची॥

वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला। श्रुतिशास्त्रग्रन्थगीता साक्ष संगम केला। महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला। अज्ञान जड जीवा मार्ग सुगम जाला॥१॥ जय जया दासबोधा ग्रन्थराज प्रसिद्धा। आरति वोवाळीन विमळज्ञान बाळबोधा॥धृ०॥ नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी। चातुर्यनिधी मोठा मायाचक्र उगवी। हरिहरहृदयींचें गुह्य प्रगट दावी। बद्धचि सिद्ध जाले असंख्यात मानवी॥२॥ वीसहि दशकींचा अनुभव जो पाहे। नित्य नेम विवरितां स्वयें ब्रह्मचि होये। अपार पुण्य गांठीं तरी श्रवण लाहे। 'कल्याण' लेखकाचें भावगर्भ हृदईं॥३॥

❁ ❁

# ॥ आरती श्रीसमर्थांची॥

आरती रामदासा। सद्‌गुरु सर्वेशा। कायावाचामनोभावें। वोवाळूं परेशा॥१॥ रामदास मूर्तिमंत। रामचंद्र अवतार। कलियुगीं अवतरोनी। केला भक्तांचा उद्धार। वैराग्य भक्ति ज्ञान। शांति क्षमा विरक्ती। विवेक सालंकृत। क्षमा दया सर्वभूतीं॥३॥ सच्चिदानंदघन। रामदास केवळ। दिनकरकृपायोगें। 'रामचंद्र' निर्मळ॥४॥

**॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु॥ ॥ जय जय रघुवीर समर्थ॥**

❁ ❁

**श्रीसमर्थ रामदासकृत**

# जन-कल्याण-कारिणी श्रीरामाची प्रार्थना

कल्याण करी रामराया। जनहित विवरी॥धृ॥
तळमळ तळमळ होतचि आहे। हे जन हातिं धरी॥१॥
अपराधी जन चुकतचि गेले। तुझा तूंचि सांवरी॥२॥
कठीण त्यावरी कठीण जालें। आतां न दिसे उरी॥३॥
कोठें जावें काय करावें। आरंभिली बोहरी॥४॥
दास म्हणे आम्ही केले पावलों। दयेसि नाहीं सरी॥५॥

| स्वाध्याय | अभ्यासावयाचे समास व त्यांची नावे | एकूण समास | एकूण ओव्या | पृष्ठांक | महिना |
|---|---|---|---|---|---|
| १ | १-१ ग्रंथारंभालक्षण, २०-१० विमळब्रह्मनिरूपण | २ | ७५ | ७ | जानेवारी |
| २ | ११-६ महंतलक्षण, १४-१ निस्पृहलक्षण<br>१८-३ निस्पृहसिकवण | ३ | ११९ | २० | फेब्रुवारी |
| ३ | १४-६ चातुर्यलक्षण, १५-१ चातुर्यलक्षण,<br>१५-६ चातुर्य विवरण | ३ | ९८ | ३८ | मार्च |
| ४ | ७-८, ७-९, १७-३ श्रवणनिरूपण | ३ | १४० | ५४ | एप्रिल |
| ५ | १६-९ नाना उपासनानिरूपण,<br>१६-१० गुणभूतनिरूपण, १७-५ अजपानिरूपण | ३ | ८४ | ७३ | मे |
| ६ | ५-७ बद्धलक्षण निरूपण. ५-८ मुमुक्षलक्षण,<br>५-९ साधक लक्षण निरूपण | ३ | १५५ | ८७ | जून |
| ७ | ४-७ दास्यभक्तिनिरूपण, ४-८ सख्यभक्तिनिरूपण,<br>४-९ आत्मनिवेदनभक्ति | ३ | ९० | १०८ | जुलै |
| ८ | १-९ परमार्थस्तवन, १३-७ प्रत्ययेविवरण,<br>१९-७ येत्ननिरूपण | ३ | ८७ | १२४ | ऑगस्ट |
| ९ | १२-४ विवेकवैराग्यनिरूपण,<br>१२-५ आत्मनिवेदन, १३-१ आत्मानात्मविवेक | ३ | ७३ | १४० | सप्टेंबर |
| १० | १-४ सद्‌गुरुस्तवन, १-५ संतस्तवन, ८-९ सिद्धलक्षण | ३ | ११७ | १५२ | |
| ११ | १८-५ करंटपरीक्षानिरूपण,<br>१९-३ करंटलक्षणनिरूपण<br>१९-४ सदेवलक्षणनिरूपण | ३ | ९४ | १६९ | ऑक्टोबर |
| १२ | २०-४ आत्मनिरूपण, २०-५ चत्वारजिनसनिरूपण<br>२०-८ देहेक्षेत्रनिरूपण | ३ | ९० | १८३ | नोव्हेंबर |
| | एकूण | ३५ | १२२२ | | |

**||जय जय रघुवीर समर्थ||**

# श्रीदासबोध

## सांप्रदायिक मंगलाचरण

**गणेशः शारदा चैव सद्गुरूः सज्जनस्तथा। आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः।। १।। गणेश शारदा सद्गुरू। संत सज्जन कुळेश्वरू। सर्वही माझा रघुवीरू। सद्गुरूरूपें।। २।। माझे आराध्य दैवत। परमगुह्य गुह्यातीत। गुह्यपणाची मात। न चले जेथें।। ३।। यो जातो मरूदंशजोक्षितितले संबोधयन् सज्जनान्। ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिधम्। यः कीर्त्या पठनेन सर्वविदुषां स्वांतापहारिः सदा। सोऽयं मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरुः।। ४।। शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें। वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें। कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा। नमस्कार माझा सद्गुरू रामदासा।। ५।। मला वाटतें अंतरीं त्वां वसावें। तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें।। अपत्यापरी पाववी प्रेमग्रासा। महाराजया सद्गुरो रामदासा।। ६।।**

**प्रास्ताविक** : मंगलाचरणामध्ये श्रीसमर्थांनी श्रीराम या माझ्या दैवतामध्ये, गणेश, शारदा, सद्गुरु, संतसज्जन, कुळेश्वर या सर्वांचा अंतर्भाव होतो असे म्हटले आहे. त्यामुळे दासबोध या ग्रंथाचा प्रारंभ करताना 'श्रीराम' या एकाच शब्दात त्यांनी सर्वांचे स्मरण करून एकदमच ग्रंथाला प्रारंभ केला आहे. जुन्या शास्त्रीय प्रथेप्रमाणे प्रारंभी नमनासाठी एकही ओवी लिहिलेली नाही. एकदमच ग्रंथाला प्रारंभ झाला आहे. ही विशेषताच आहे. एकदा वाचकांना ग्रंथकर्त्याचा हेतू समजला म्हणजे त्या ग्रंथाचे वाचन करण्याची ओढ त्यांना लागते.

# दासबोध प्रबोध : स्वाध्याय १ ला

## (द. १-१ आणि द. २०-१०)

द. १-१ आणि द. २०-१० हे दोन समास वास्तविक प्रवेश स्तरासाठी पूर्वी आपण अभ्यासिले आहेतच, पण ते अत्यंत महत्त्वाचे असल्याने वरच्या स्तराला त्याची उजळणी होणे जरूर आहे. दासबोधाच्या अभ्यासाने मनुष्याच्या अंतरंगात बदल घडावा आणि त्यामुळे त्याची क्रियाच पालटावी हा ग्रंथलेखनाचा प्रमुख हेतू असल्याचे दिसून येते. समाजाला उर्जितावस्था यावयाची असेल तर त्याचा घटक असलेल्या व्यक्तीमात्राच्या स्वभावाची घडणच संपूर्णपणे बदलविणे इष्ट आहे, असे श्रीसमर्थांना त्यांच्या काळी वाटले. आजच्या काळातसुद्धा तीच गरज प्रामुख्याने भासते. भ्रष्टाचारी माणूस सदाचारी झाला तरच समाजाची कीड नाहीशी होईल. द. २०-१० हा दासबोधातील अखेरचा समास असून सर्व दासबोधाचा सारांश या एकाच समासात ओतला गेला आहे. यातील २६ ते ३७ पर्यंतच्या ओव्या दररोज दासबोध-वाचनानंतर म्हणावयाच्या आहेत. मानवी संसार सफल होण्याबद्दल आपल्या विविध स्वरूपाच्या कल्पना असतात पण 'निर्गुण ब्रह्म

अंतरामध्ये बिंबणे' ही संसार सफल झाल्याची खूण असल्याचे श्रीसमर्थ सांगतात. शेवटच्या तेरा ओव्या प्रत्येक अभ्यासार्थीने पाठ कराव्यात आणि त्यांच्या अर्थामध्ये रंगून जावे; त्यांचे सतत चिंतन करावे अशा त्या ओव्या आहेत.

## द. १-१ ग्रंथारंभलक्षण

हा समास प्रस्तावनारूप आहे. आपल्या ग्रंथाचे नाव काय, ग्रंथ लिहिण्याचा हेतू काय, ग्रंथात विवेचिलेले विषय कोणते, ग्रंथाच्या अभ्यासाचे फल काय, ग्रंथातील प्रमेयांना आधार कोणते, इत्यादी गोष्टी श्री समर्थांनी येथे आरंभीच स्पष्टपणे सांगितल्या आहेत.

**|| श्रीराम ||**

**श्रोते पुसती कोण ग्रंथ। काय बोलिलें जी येथ। श्रवण केलियानें प्राप्त। काय आहे।।१।।**

ज्या श्रोत्यांसमोर ग्रंथ ठेवला आहे ते लगेचच प्रश्न स्वाभाविकपणेच विचारतात, हा कोणता ग्रंथ आहे? त्यामध्ये काय सांगितले आहे आणि त्याचे श्रवण केल्यावर आम्हाला फलप्राप्ती काय होईल?

**ग्रंथा नाम दासबोध। गुरुशिष्यांचा संवाद । येथ बोलिला विशद। भक्तिमार्ग।।२।।**

श्रीसमर्थ सांगतात - या ग्रंथाचे नाव दासबोध आहे. यात गुरु आणि शिष्य यांचा संवाद आहे. (संवादरूपाने आहे). यात भक्तिमार्गाचे सुस्पष्ट विवेचन आहे.

**नवविधा भक्ति आणि ज्ञान। बोलिलें वैराग्याचें लक्षण । बहुधा अध्यात्मनिरोपण। निरोपिलें।।३।।**

दासबोधामध्ये ईश्वरभक्तीचे नऊ मार्ग, ब्रह्मज्ञान तसेच वैराग्याचे लक्षण सांगितले आहे. बहुधा नाना प्रकारांनी अध्यात्मनिरूपण केले आहे. (यातून आणखी एक अर्थ निघतो की इतरही अनुषंगिक विषय ग्रंथात आहेत. पण अध्यात्म हाच प्रमुख विषय आहे. इतर विषयात मूर्खलक्षणे, लेखन प्रक्रिया, राजकारण, निःस्पृहव्याप, इत्यादि कितीतरी विषय आले आहेत.)

**भक्तिचेन योगें देव। निश्चयों पावती मानव । ऐसा आहे अभिप्राव [१]। ईये ग्रंथीं।।४।।**

माणसाला भक्तिमार्गानेच ईश्वराची प्राप्ती निश्चितपणे होते असा या ग्रंथाचा अभिप्राय आहे. (दासबोधाचा प्रधान सिद्धान्त कोणता, तोच या ओवीमध्ये सांगितला आहे.)

**मुख्य भक्तीचा निश्चयो । शुद्धज्ञानाचा निश्चयो । आत्मस्थितीचा निश्चयो । बोलिलाअसे ।।५।।**

(कोणत्या गोष्टींचे सुस्पष्ट विवेचन ग्रंथात आहे; ते यानंतरच्या ७ ओव्यांमध्ये सांगतात.) ज्या भक्तीमुळे ईश्वरप्राप्ती होते तीच मुख्य आहे. तिचे निश्चित स्वरूप, शुद्ध ज्ञान कोणते, आत्मस्थिती म्हणजे काय, यांचेही संदेह निवळून टाकणारे विवेचन ग्रंथात सांगितले आहे. (अध्यात्मामध्ये आत्मानुभव देणाऱ्या ज्ञानालाच शुद्ध ज्ञान किंवा ज्ञान ही संज्ञा आहे.)

१) अभिप्राव - सिद्धांत (श्री समर्थांचा 'अभिप्राव' हा शब्द येथे सिद्धांत अशा अर्थी आहे)

ऐक ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान।
पाहावें आपणासि आपण। या नांव ज्ञान।। ५-६-१।।

ओवीनंतर ५-६-१ असे ३ अंक लिहिले असता त्यांचा अर्थ दशक ५ समास ६ मधील १ ली ओवी असा आहे. नव्यानेच दासबोधाचा अभ्यास करणाऱ्यांना ही माहिती आवश्यक आहे. या पुस्तकात अनेक ठिकाणी असे आकडे ओवीनंतर दिलेले आढळतील.

**शुद्ध उपदेशाचा निश्चयो। सायोज्यमुक्तीचा निश्चयो। मोक्षप्राप्तीचा निश्चयो। बोलिला असे।।६।।**

शुद्ध उपदेश, सायुज्य मुक्ती, मोक्षप्राप्तीचे लक्षण यांचे निश्चित स्वरूपात निरूपण यात आहे. (मुक्तीचे चार प्रकार आहेत - स्वलोकता, समीपता, स्वरूपता आणि सायुज्यता. त्यातील पहिल्या तीन मुक्ती अशाश्वत असून फक्त सायुज्यमुक्ती शाश्वत असल्याचे द. ४-१०-२७ मध्ये सांगितले आहे. अधिक माहितीसाठी द. ४-१० जरूर तर पहावा.)

**शुद्ध स्वरूपाचा निश्चयो। विदेहस्थितीचा निश्चयो। अलिप्तपणाचा निश्चयो। बोलिला असे।।७।।**

शुद्ध आत्मस्वरूप कसे असते, विदेह अवस्था कशी असते, अलिप्तपणाचा नेमका अर्थ काय हे यात सांगितले आहे.

**मुख्य देवाचा निश्चयो। मुख्य भक्ताचा निश्चयो। जीवशिवाचा निश्चयो। बोलिला असे।।८।।**

मुख्य देव (किंवा परब्रह्म) कोणता, खरा भक्त कोणास म्हणावे, जीव आणि शिव यांचे संबंधात सुस्पष्ट किंवा निश्चयाचे ज्ञान या ग्रंथात आहे.

**मुख्य ब्रह्माचा निश्चयो। नाना मतांचा निश्चयो। आपण कोण हा निश्चयो। बोलिला असे।।९।।**

निरूपाधी स्वरूपाचे मुख्य ब्रह्माचे लक्षण स्वरूप, अनेक प्रकारचे वैचारिक भेद आणि आपली (म्हणजे मानवी जीवाची) स्थिती याबद्दल संशयातीत निरूपण येथे आहे.

**मुख्य उपासनालक्षण। नाना कवित्वलक्षण। नाना चातुर्यलक्षण। बोलिलें असे।।१०।।**

उपासनेचे प्रमुख लक्षण, काव्याची लक्षणे, विविध प्रकारची चातुर्य लक्षणे यात दिली आहेत.

**मायोद्भवाचे लक्षण। पंचभूतांचे लक्षण। कर्ता कोण हें लक्षण। बोलिलें असे।।११।।**

माया कशी निर्माण झाली, पंचभूतांची लक्षणे व त्या सर्वांच्या निर्मात्याचे स्वरूपलक्षण यांचे निश्चित ज्ञान येथे आहे.

**नाना किंत[२] निवारिले। नाना संशयो छेदिले। नाना आशंका फेडिले।। नाना प्रश्न।।१२।।**

शिष्यांचे नाना संशय या ग्रंथात निवारले आहेत. नाना आशंका (चुकीच्या समजुती) नाहीशा केल्या असून अनेक प्रश्नांची उत्तरे देऊन शिष्याला संदेहरहित केले आहे. (किंत, संशय, आशंका आणि प्रश्न हे चार संशयाचे सूक्ष्म छटादर्शक शब्द या ओवीत आहेत.)

२) किंत - कुशंका

**ऐसें बहुधा निरोपिलें । ग्रंथगर्भी जें बोलिलें । तें अवघेंचि अनुवादलें । न वचे किं कदा॥१३॥**

अशा अनेक विषयांवर निरूपण या ग्रंथामध्ये केले आहे. त्या सर्वांचा उल्लेख (प्रारंभीच) करता येणे शक्य नाही.

**तथापि अवघा दासबोध । दशक फोडून केला विशद । जे जे दशकींचा अनुवाद । ते ते दशकीं बोलिला॥१४॥**

तथापि सगळ्या ग्रंथाचे दशकवार विभाग केले असून प्रत्येक दशकात जो विषय मांडला आहे त्याचे नाव त्याला दिले आहे. (दासबोधातील प्रकरणांना 'समास' असे म्हणतात. दहा समासांच्या गटाला दशक म्हणतात.)

**नाना ग्रंथांच्या संमती[३] । उपनिषदें वेदांतश्रुती । आणि मुख्य आत्मप्रचीती । शास्त्रेंसहित॥१५॥**

या ग्रंथाला उपनिषदे, वेदान्त, श्रुती यासारख्या धर्मग्रंथांचा आधार घेतला असून मुख्य आधार आत्मज्ञानाच्या स्वानुभवाचा आहे.

**नाना समतीअन्वये । म्हणौनी मिथ्या म्हणतां न ये । तथापि हें अनुभवासि ये । प्रत्यक्ष आतां॥१६॥**

या ग्रंथाला अनेक आधार असल्याने तो खोटा असल्याचे म्हणता येणार नाही. तथापि त्याला खोटा म्हणणारे लोक निघतात असे अनुभवाला येते.

**मत्सरें यासी मिथ्या म्हणती । तरी अवघेचि ग्रंथ उछेदती । नाना ग्रंथांच्या समती । भगवद्वाक्यें॥१७॥**

मत्सरामुळे हे लोक या ग्रंथाला खोटा किंवा चुकीचा म्हणतील पण त्यामुळे सर्व आधारभूत ग्रंथांना आणि वेदासारख्या ईश्वरवचनांना खोटे म्हटल्याप्रमाणे होईल. (प्रत्यक्ष ईश्वरापासून प्राप्त झालेले ज्ञान म्हणजेच वेद. हे ज्ञान आठवून ऋषींनी जे ग्रंथ लिहिले त्यांना 'श्रुती' म्हणतात.) १८ ते २० या ओव्यांमध्ये संदर्भासाठी घेतलेल्या आणखीही आधारग्रंथांची यादीच श्रीसमर्थ देत आहेत.

**शिवगीता रामगीता। गुरुगीता गर्भगीता। उत्तरगीता अवधूतगीता। वेद आणि वेदांत॥१८॥**
**भगवद्‌गीता ब्रह्मगीता। हंसगीता पांडवगीता। गणेशगीता येमगीता। उपनिषदें भागवत॥१९॥**
**इत्यादिक नाना ग्रंथ। समतीस बोलिले येथ। भगवद्वाक्यें येथार्थ। निश्चयेंसीं॥२०॥**

शिवगीता, रामगीता, गुरुगीता, गर्भगीता, उत्तरगीता, अवधूतगीता, वेद आणि वेदान्त, भगवद्गीता, ब्रह्मगीता, हंसगीता, पांडवगीता, गणेशगीता, यमगीता, उपनिषदे आणि भागवत या ग्रंथांचा आधार घेतला आहे. हे सर्व ग्रंथ निश्चयपूर्वक भगवंताची सत्यवचने आहेत. (श्रीसमर्थांनी मूळ संस्कृतातील हे सारे ग्रंथ त्यांच्या तपश्चर्याकाळामध्ये अभ्यासिले होते. त्यातील ज्ञानाचा आधार घेऊन मराठीमध्ये दासबोधाचे लेखन केल्यामुळे वाचकांची केवढी तरी सोय झाली आहे. ज्या अभ्यासार्थींना या आधारग्रंथांची अधिक माहिती हवी असेल त्यांनी डॉ. शं. ना. पेंडसे यांच्या 'राजगुरू समर्थ रामदास' या ग्रंथातील प्रकरण १ ले पहावे.)

३) संमती - आधार

**भगवद्वचनीं अविश्वासे। ऐसा कोण पतित असे। भगवद्वाक्याविरहित नसे। बोलणें येथीचें।।२१।।**

या ग्रंथातील विवेचन म्हणजे भगवद्‌वाक्येच आहेत त्यावर अविश्वास करील असा कोणी पापी मनुष्य असू शकेल का?

**पूर्ण ग्रंथ पाहिल्याविण। उगाच ठेवी जो दूषण। तो दुरात्मा दुरभिमान। मत्सरें करी।।२२।।**

ग्रंथाचे पूर्णपणे वाचन न करताच त्याला जो दोष देतो तो दुष्ट बुद्धीचा असतो. त्या माणसाचा दुराभिमान व मत्सरीवृत्ती त्यातून प्रगट होते.

**अभिमानें उठे मत्सर। मत्सरें ये तिरस्कार। पुढें क्रोधाचा विकार। प्रबळे बळे।।२३।।**

दुराभिमानामुळे मत्सर उत्पन्न होतो. मत्सरातून तिरस्काराची भावना व तिच्यातूनच क्रोध उत्पन्न होतो.

**ऐसा अंतरी नासला। कामक्रोधें खवळला। अहंभावें पालटला। प्रत्यक्ष दिसे।।२४।।**

अशा प्रकारे ज्याचे अंत:करणच नासलेले आहे तो अहंकाराने व क्रोधामुळे संतापतो, हे प्रत्यक्ष दिसते.

**कामक्रोधें लिथाडिला[४]। तो कैसा म्हणावा भला। अमृत सेंवितांच पावला। मृत्य राहो[५]।।२५।।**

कामक्रोधाने जो लिडबिडला आहे त्याला चांगला माणूस म्हणताच येत नाही. अमृत सेवन केल्यास वास्तविक अमर होता येते पण राहू हा दैत्य अमृतपान करूनही मरण पावला. (दासबोधासारख्या अमृतवचने असलेल्या ग्रंथाचे वाचन करताना मत्सरीवृत्ती ठेवल्यास ग्रंथापासून कोणताच लाभ होणार नाही हे सांगण्यासाठी येथे राहूच्या पौराणिक कथेचा दृष्टांत दिला आहे. भागवतामध्ये अष्टम स्कंधात ही कथा आहे : समुद्रमंथन प्रसंगी श्रीविष्णूंनी मोहिनीचे रूप घेऊन देवांना अमृत वाढले त्यावेळी राहू हा राक्षस लबाडीने देवांच्या पंक्तीत जाऊन बसला. त्याला अमृत वाढले देखील गेले! पण चंद्र सूर्य यांनी श्रीविष्णूंच्या ध्यानी ही गोष्ट इशाऱ्याने आणून दिली तेव्हा राहूने तोंडात घेतलेले अमृत त्याच्या पोटात जाण्यापूर्वीच त्याचा शिरच्छेद श्रीविष्णूंच्या सुदर्शनचक्रामुळे झाला. त्यामुळे राहूला मृत्यू आला. अशी ही कथा आहे.)

**आतां असो हें बोलणें। अधिकारासारिखें घेणें। परंतु अभिमान त्यागणें। हें उत्तमोत्तम।।२६।।**

हा विषय एवढाच पुरे. प्रत्येकाने घेता येईल तेवढे घ्यावे. अहंभाव बाजूला ठेवून ते घेण्याचा प्रयत्न करणे हे सर्वात उत्तम होय.

**मागां श्रोतीं आक्षेपिलें। जी ये ग्रंथीं काय बोलिलें। तें सकळहि निरोपिलें। संकळीत मार्गें[६]।।२७।।**
**आतां श्रवण केलियाचें फळ। क्रिया पालटे तत्काळ। तुटे संशयाचें मूळ। येकसरां।।२८।।**

प्रारंभी श्रोत्यांनी विचारले होते की या ग्रंथात काय सांगितले आहे ते येथपर्यंत संक्षेपाने सांगितले आहे. आता दासबोधाच्या श्रवणाचे फळ सांगतो. यामुळे माणसाच्या क्रियेमध्ये किंवा आचारामध्ये बदल घडतो. (दासबोध वाचनाच्या अनेक फलांचा उल्लेख आहे पण 'वर्तनबदल'

४) लिथाडिला-बरबटला (५) राहो- राहू देवता ६) संकळीत मार्गे - सारांशाने

किंवा 'क्रियापालट' या बदलास श्रीसमर्थांनी प्राधान्य दिले आहे. ''अनुभव-प्राप्तीमुळे माणसाच्या वर्तनामध्ये इष्ट दिशेने घडून येणाऱ्या वर्तनबदलास 'शिकणे' असे म्हणतात.'' त्या दृष्टीने पाहिल्यास दासबोध हा एक शैक्षणिक ग्रंथ सुद्धा आहे. त्याच्यामुळे माणसाच्या विचारांमध्ये प्रथम बदल घडतो नंतर तो प्रत्यक्ष वर्तनात येतो.) माणसाच्या मनातील संदेहाचे मूळच नष्ट होते. (संदेह अनेक प्रकारचे असतात. शेंदूर फासलेले देव खरे आहेत का? येथपासून या सृष्टीच्या संचालनामध्ये 'ईश्वर' नावाची काही शक्ती असेल का? येथपर्यंत अनेक संदेह मनात असतात. दासबोधामुळे ते नष्ट होतात.)

**मार्ग सांपडे सुगम। न लगे साधन दुर्गम । सायोज्यमुक्तीचें वर्म । ठाई पडे।।२९।।**

सायुज्यमुक्तीचे रहस्य आकलनात येते आणि ती प्राप्त करण्याचा सुलभ मार्ग सापडतो. त्रासदायक किंवा कठीण साधनांची गरज लागत नाही. (सायुज्यमुक्ती म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमची सुटका होय. मानवाचे सर्वश्रेष्ठ ध्येय हेच मानले आहे.)

**नासे अज्ञान दुःख भ्रांती। शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती । ऐसी आहे फळश्रुती। ईये ग्रंथीं।।३०।।**

आत्मस्थितीबद्दलचे अज्ञान, जीवनातील दुःख आणि भ्रामक समजुती नाहीशा होतात व ज्ञानाची प्राप्ती तत्काळ होते ही या ग्रंथाची फलप्राप्ती आहे. (मानवाच्या ज्या भ्रामक समजुती असतात त्यांची अधिक चर्चा दासबोधात द. १०-६ मध्ये आहे.)

**योगियांचें परम भाग्य । आंगीं बाणे तें वैराग्य । चातुर्य कळे यथायोग्य । विवेकेंसहित।।३१।।**

योग्यांचे परमभाग्य असे जे वैराग्य ते या ग्रंथामुळे प्राप्त होते. व्यवहारामध्ये चातुर्याने आणि विवेकाने कसे वागावे ते कळते. (ज्यांचा अहंकार नष्ट झाला नाही अशा योग्यांची उदाहरणे पुराणात अनेक आहेत. वैराग्य असल्याविना योगसाधना व्यर्थ होय. जगात वागताना साधकबाधक विचार करणे आणि परमार्थामध्ये सार-असार याबद्दल विचार करणे म्हणजेच विवेक. तो अंगी बाणावा यासाठी दासबोधाचे नित्य वाचन करावे.)

**भ्रांत अवगुणी अवलक्षण। तेचि होती सुलक्षण। धूर्त तार्किक विचक्षण। समयो जाणती।।३२।।**

भ्रमिष्ट, अवगुणी आणि अवलक्षणी माणसे या ग्रंथाच्या वाचनाने सुलक्षणी होतात. दुसऱ्याच्या मनातील दुष्ट हेतू समजण्याची धूर्तता; घटनांचे पृथःकरण करून सुयोग्य तर्क करण्याचे ज्ञान आणि कोणत्या समयी कसे वागावे हे सारे या ग्रंथामुळे समजते.

**आळसी तेचि साक्षपी[७] होती। पापी तेचि प्रस्तावती । निंदक तेचि वंदूं लागती । भक्तिमार्गासी।।३३।।**

आळशी माणसे उद्योगी व पापी माणसे पश्चात्तापाने पुण्यशील होतात. भक्तिमार्गाची निंदा करणारे प्रेमादराने भक्ती करू लागतात.

७) साक्षपी - उद्योगी

**बद्धचि होती मुमुक्ष। मूर्ख होती अतिदक्ष। अभक्तचि पावती मोक्ष। भक्तिमार्गें।।३४।।**

बद्धांचे मुमुक्षू होतात व मूर्ख माणसे अतिदक्ष होतात. जे भक्तिहीन असतील त्यांना भक्तिमार्गाने मोक्ष प्राप्ती होते. (द. ५ मधील ७ व ८ हे दोन समास बद्ध आणि मुमुक्षू या संज्ञा समजून घेण्यासाठी जरूर वाचावेत. द्रव्य, दारा आणि प्रपंच यांचा सदैव विचार करणारे म्हणजेच देहबुद्धीची बेडी पडलेले 'बद्ध' असतात. ज्यांना संसाराबद्दल विरक्ती उत्पन्न होते आणि ईश्वरप्राप्तीची इच्छा होते ते मुमुक्षू होत.)

**नाना दोष ते नासती। पतित तेचि पावन होती। प्राणी पावे उत्तमगती। श्रवणमात्रें।।३५।।**

माणसांचे अनेक दोष नाहीसे होतात. पापी माणसे पवित्र होतात. याच्या श्रवणाने चांगली गती प्राप्त होते.

**नाना धोके देहबुद्धीचे। नाना किंत संदेहाचे। नाना उद्वेग संसाराचे। नासती श्रवणें।।३६।।**

देहबुद्धीमुळे निर्माण होणारे अनेक प्रकारचे धोके, नाना प्रकारच्या संशयामुळे होणारे भ्रम, आणि संसारातील हरतऱ्हेचे उद्वेग याच्या श्रवणाने नष्ट होतात.

**ऐसी याची फलश्रुती। श्रवणें चुके अधोगती। मनास होय विश्रांति। समाधान।।३७।।**

अशी या ग्रंथाची फलश्रुती आहे. याच्या श्रवणामुळे अवनति थांबते आणि (वाऱ्याप्रमाणे चंचळ असलेल्या) मनास विश्रांती मिळून समाधान लाभते.

**जयाचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा। मत्सर धरी जो पुंसा[८]। तयास तेंचि प्राप्त।।३८।।**

अशी दासबोधाची फलश्रुती आहे खरी पण ज्याची जशी मनोवृत्ती असेल तसेच फळ त्याला मिळेल. मत्सरग्रस्त मन किंवा दूषित दृष्टी ठेवून श्रवण करील त्याला त्याच धर्तीचे फळ मिळेल; हे सांगणे नकोच. (याच समासामध्ये २३ ते २६ या ओव्यांमध्ये याबद्दल विवेचन झाले आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ग्रंथारंभलक्षणनाम समास प्रथम।।१।।**

**|| श्रीराम ||**

## द. २०-१० : विमळब्रह्मनिरूपण

या विलक्षण ग्रंथामधील हा अखेरचा समास आहे. या समासात श्रीसमर्थांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा सारांश ओतला आहे. त्यामधील प्रधान मुद्दे असे : (मुद्दा पहिला) एकटे एक परब्रह्म सर्व ठिकाणी सर्व वस्तूंना सर्व काली व्यापून राहते. (मुद्दा दुसरा) सर्व कल्पनांच्या पलीकडे असलेले परब्रह्म स्थूल नाही, सूक्ष्म नाही, दृश्य नाही, अदृश्य नाही, व्याप्य नाही, व्यापक नाही, ते सर्वस्वी गुणरहित व विकाररहित आहे. (मुद्दा तिसरा) पण ते साधूसंतांचे परम विश्रांति-स्थान

८) पुंसा - पुरुष

आहे. केवळ शुद्धज्ञानदृष्टीने संत त्याचा अनुभव घेतात. म्हणून त्यांना ब्रह्मज्ञानी असे म्हणतात. (मुद्दा चौथा) ही ज्ञानदृष्टी संपादन करण्यास श्रवण व मनन हाच विवेकाचा मार्ग आहे. सतत श्रवणमनन केल्याने ज्ञान होऊन अज्ञान नाश पावते आणि अखेर मनाचे उन्मन होऊन ज्ञानाचे विज्ञान बनते. (मुद्दा पाचवा) अंतर्यामी निश्चळ परब्रह्म बिंबले की समजावे साधन फळास आले, संसार सफळ झाला, मायेचा हिशेब झाला, जन्ममृत्यु शून्याकार झाले आणि अभंग समाधान प्राप्त झाले. (मुद्दा सहावा) वास्तविक ग्रंथ येथे संपला. पण श्रीसमर्थ हेतुपूर्वक अखेर सांगतात की, दासबोध म्हणजे प्रत्यक्ष भगवंताचीच वचने आहेत. आत्माराम ग्रंथाचा कर्ता आहे. जो मनापासून अभ्यास करील त्यास दासबोध ब्रह्मज्ञानी बनवून टाकील.

**|| श्रीराम ||**

**धरूं जातां धरितां न ये। टाकूं जातां टाकितां न ये। जेथें तेथें आहेच आहे। परब्रह्म तें ।।१।।**

(परब्रह्माचे स्वरूप वर्णन करून सांगण्यापलिकडील आहे.) जे धरावें म्हटले तर धरता येत नाही, टाकण्याचा प्रयत्न केला तर टाकताही येत नाही असे हे परब्रह्म जिकडे तिकडे आहे. ते नाही असे कदापि होत नाही.

**जिकडे तिकडे जेथें तेथें। विन्मुख होतां सन्मुख होतें। सन्मुखपण चुकेना तें। कांहीं केल्यां ।।२।।**

सर्वत्र भरून राहिलेल्या परब्रह्माकडून तोंड दुसरीकडे वळविले तर ते तिकडेही समोर येते. त्याचे सन्मुखपण (तोंडासमोर येणे) काहीही केले तरी चुकविता येत नाही.

**बैसलें माणुस उठोन गेलें। तेथें आकाशचि राहिलें। आकाश चहुंकडे पाहिलें। तरी सन्मुखचि आहे ।।३।।**

एखादे बसलेले माणूस उठून गेले तर तेथे आकाश राहतेच. कोठेही पाहिले तरी आकाश सन्मुखच रहाते.

**जिकडे जिकडे प्राणी पळोन जातें। तिकडे आकाशचि भोवतें। बळें आकाशाबाहेर तें। कैसें जावें ।।४।।**

एखादा प्राणी पळून जाऊ लागला तरी आकाश त्याच्या सभोवती राहतेच. मोठ्या प्रयासानेदेखील त्याला आकाशाबाहेर जाता येऊ शकत नाही.

**जिकडे जिकडे प्राणी पाहे। तिकडे तें सन्मुखचि आहे। समस्तांचे मस्तकीं राहे। माध्यानीं मार्तंड जैसा ।।५।।**

प्राणी इकडे तिकडे पहातो पण आकाश त्याला सन्मुखच रहाते, माध्यान्हीचा सूर्य जसा सर्वांच्या मस्तकावरच दिसतो त्याप्रमाणे आकाश सर्वांच्या डोक्यावर असते.

**परी तो आहे येकदेसी[१]। दृष्टांत न घडे वस्तुसी। कांहीं येक चमत्कारासी। देउनी पाहिलें ।।६।।**

पण सूर्याचा हा दृष्टान्त तितकासा समर्पक होत नाही. कारण सूर्य एकदेशी आहे. (कोठेतरी तो डोक्यावर नाही असे स्थळ असणारच) पण ब्रह्माच्या बाबतीत असा प्रकार नाही ते सर्वदेशी

१) येकदेसी - मर्यादित

आहे. (या ओवीत वस्तू हा शब्द आला आहे. त्याचा अध्यात्मातील अर्थ मात्र परब्रह्म हाच आहे, हे ध्यानात ठेवावे.) सूर्याचे बिंब दुपारी आपल्या माथ्यावर येते तेव्हा ते परिसरातील सर्वांच्याच माथ्यावर असल्यासारखे दिसते हा चमत्कार आहे. म्हणून त्याचा दृष्टान्त समजुतीसाठी देऊन पाहिला इतकेच! पण तो दृष्टान्त तोटका पडतो.

**नाना तीर्थें नाना देसीं। कष्टत जावें पाहाव्यासी। तैसें नलगे परब्रह्मासी। बैसले ठाई ।।७।।**

अनेक देशांमध्ये अनेक पवित्र स्थळे आहेत ती पहावयाची असल्यास त्या देशात जावे लागते पण परब्रह्माच्या दर्शनासाठी तसे करावे लागत नाही. आपण असलेल्या ठिकाणीच त्याचे दर्शन घडते. (अर्थात ज्ञानचक्षूंनाच त्याचे दर्शन घडते.)

**प्राणी बैसोनीच राहातां। अथवा बहुत पळोन जातां। परब्रह्म तें तत्वतां। समागमें।।८।।**

प्राणी जरी बसून राहिला किंवा खूप दूर पळाला तरी परब्रह्म अगदी त्याच्या बरोबरच राहाते.

**पक्षी अंतराळीं गेला। भोंवतें आकाशचि तयाला। तैसें ब्रह्म प्राणीयांला। व्यापून आहे ।।९।।**

पक्षी अंतराळात उडून गेला असता तो कितीही दूर गेला तरी त्याला आकाश सभोवती असते. त्याप्रमाणे ब्रह्म हे प्राणिमात्रास व्यापून राहिले आहे.

**परब्रह्म पोकळ घनदाट। ब्रह्म सेवटाचा सेवट। ज्यासी त्यासी ब्रह्म नीट। सर्वकाळ ।।१०।।**

परब्रह्म रिकामे आहे पण ते दाट भरलेलेही आहे. (परब्रह्माच्या ठायी अन्य वस्तूच नाही या अर्थाने ते (पोकळ किंवा) रिकामे आहे. म्हणूनच ते ब्रह्मतत्त्वानेच दाट भरलेले सुद्धा आहे.) सर्वांचा शेवट ब्रह्मामध्येच होतो. ते सर्वकाळ सर्वांना अगदी सरळ असते.

**दृश्या सबाहे[२] अंतरीं। ब्रह्म दाटलें ब्रह्मांडोदरीं। आरे त्या विमळाची सरी। कोणास द्यावी ।।११।।**

सर्व दृश्य पदार्थांच्या आत व बाहेर ब्रह्मच असते व ब्रह्मांडाच्या उदरात ब्रह्मच दाटलेले आहे. त्या निर्मळ ब्रह्माची सर कोणासच येत नाही.

**वैकुंठकैळासस्वर्गलोकीं। इंद्रलोकीं चौदा लोकीं। पन्नगादिकपाताळलोकीं। तेथेंहि आहे ।।१२।।**

वैकुंठ (विष्णूंचे निवासस्थान), कैलास (शंकरांचे निवासस्थान), स्वर्गलोक (देवांचे निवासस्थान), इहलोक, परलोक, इंद्रलोक (इंद्राचे निवासस्थान), अन्य चौदा लोक (भूलोक, भुवलोक, स्वर्लोक, महलोक, जनलोक, तपलोक आणि सत्यलोक असे पृथ्वीच्या वरचे व एकेकाचेही वर असलेले सात स्वर्ग आणि अतल, वितल, सुतल, रसातळ, तलातल, महातल व पाताळ असे पृथ्वीखाली व एकमेकांखाली असलेली सात पाताळे मिळून चौदा लोक, असल्याचे शास्त्रात सांगितले आहे. केवळ माहितीसाठी ही नावे दिलीत. ७ स्वर्ग, ७ पाताळ असे १४ लोक इतकेच ध्यानात ठेवावे.) महासर्पांचे पाताळ लोक या सर्वांना ब्रह्म व्यापून आहे.

२) सबाहे-अंतर्बाह्य

**कासीपासून रामेश्वर। आवघें दाटलें अपार। परता परता पारावार[३]। त्यास नाहीं ।।१३।।**

काशीपासून रामेश्वरपर्यंत सर्व ठिकाणी अपार ब्रह्म भरले आहे. त्याने व्यापली नाही अशी जागाच नाही.

**परब्रह्म तें येकलें। येकदांचि सकळांसी व्यापिलें। सकळांस स्पर्शोन राहिलें। सकळां ठाईं ।।१४।।**

परब्रह्म हे एकलेच आहे पण त्याने एकदाच सर्वांना व्यापून टाकले आहे. सर्वांना स्पर्श करून ते सर्वांच्या ठिकाणी भरून राहिले आहे. (परब्रह्माच्या व्यापाचे हे तपशीलवार वर्णन त्याची बुद्धीला अनाकलनीय व्याप्ती दर्शविण्यासाठी करण्यात आले आहे. तपशीलामुळे गडद ठसा मनावर उमटण्यास मदत होते. या पुढील ओव्यात ब्रह्माचे आणखीही स्वरूप सांगतात.)

**परब्रह्म पाऊसें भिजेना। अथवा चिखलानें भरेना। पुरामधें परी वाहेना। पुरासमागमें ।।१५।।**

परब्रह्म पावसाने भिजत नाही किंवा चिखलाने ते भरत नाही ते पुरामध्येही राहाते पण पुरासमवेत वाहून मात्र जात नाही.

**येकसरें[४] सन्मुख विमुख। वाम सव्य दोहिंकडे येक। आर्धऊर्ध[५] प्राणी सकळीक। व्यापून आहे ।।१६।।**

एकाच वेळी ते मागे पुढे तर असतेच पण उजव्या आणि डाव्या बाजूलाही ते असते. प्राण्यांच्या खाली, वर व सर्व बाजूंनी व्यापून राहाते.

**आकाशाचा डोहो भरला। कदापी नाहीं उचंबळला। असंभाव्य पसरला। जिकडे तिकडे ।।१७।।**

आकाशामध्ये जणू परब्रह्माचा डोह भरला आहे व त्यातील पाणी डोहातील पाण्याप्रमाणे उचंबळत नाही. त्याचा अफाट विस्तार, असंभाव्यपणे सर्वत्र पसरला आहे.

**येकजिनसी गगन उदास। जेथें नाहीं दृश्यभास। भासेंविण निराभास। परब्रह्म जाणावें ।।१८।।**

आकाशामध्ये दृश्याचा भास होतो. पण ब्रह्म हे दृश्याचा थोडासाही भास नसलेल्या आकाशाप्रमाणे असते. (परब्रह्माच्या स्वरूपाची थोडीशी तरी कल्पना यावी म्हणून आकाशाशी त्याचे साम्य वरीलप्रमाणे वर्णन करतात.)

**संतसाधुमाहानुभावां। देवदानवमानवां। ब्रह्म सकळांसी विसांवा। विश्रांतिठाव ।।१९।।**

साधू, संत, महात्मे, देव, दानव आणि मानव या सर्वांनाच परब्रह्म हेच खरे विश्रांतिस्थान आहे.

**कोणेकडे सेवटा जावें। कोणेकडे काये पाहावें। असंभाव्य तें नेमावें। काये म्हणोनी ।।२०।।**

कोणत्या बाजूकडे त्याचा आरंभ आहे आणि कोठे शेवट आहे आणि कोठे व कशा प्रकारे ते पहावे हेच कळत नाही. जे मुळातच अमर्याद, कल्पनातीत आहे त्याच्या मर्यादेची कल्पनाच करता येत नाही.

---

३) परता परता पारावार । त्यास नाही । - पलीकडे कितीही लांबवर गेले तरी त्याचा अंत लागत नाही. ४) येकसरें - एकाच वेळी ५) आर्धऊर्ध - वर खाली

**स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे। कांहीं येकासारिखें नव्हे। ज्ञानदृष्टीविण नव्हे। समाधान ।।२१।।**

परब्रह्म हे स्थूल नाही तसेच सूक्ष्मही नाही. कोणत्याही वस्तूची त्याच्याशी तुलनाच करता येत नाही. ज्ञानदृष्टीनेच त्याचे आकलन होऊ शकते. मात्र तसे झाल्यास खरेखुरे समाधान प्राप्त होते.

**पिंडब्रह्मांडनिरास। मग तें ब्रह्म निराभास। येथून तेथवरी अवकास। भकासरूप ।।२२।।**

पिंड आणि ब्रह्मांड यांचा निरास झाला की परब्रह्म भासरहित होते पण येथून सर्वत्र मुक्त अवकाश प्रत्ययाला येते. (विवेक प्रलयाच्या सहाय्याने पिंड आणि सारे दृश्य विश्व यांना बाधित करणे शक्य झाल्यास केवळ ब्रह्मच सत्यस्वरूप असल्याचा अनुभव साधकाला येतो.)

**ब्रह्म व्यापक हे तो खरें। दृश्य आहे तों हें उत्तरें। व्यापेविण कोण्या प्रकारें । व्यापक म्हणावें ।।२३।।**

ब्रह्म व्यापक आहे परंतु जोवर व्याप्य पदार्थ दृश्य आहे तोवरच या म्हणण्याला काही अर्थ आहे. व्यापून टाकण्याला जर दृश्य पदार्थच नसतील तर परब्रह्माला व्यापक हे विशेषण तरी कसे देता येईल? (वरच्या ओवीतच सांगितल्याप्रमाणे) दृश्याचा निरास झाला तर ब्रह्माला व्यापक कसे म्हणता येईल? व्यापण्यासाठी दुसरा पदार्थ तरी अस्तित्वात हवा. त्याच्या अभावी व्यापक ही संज्ञा अर्थशून्य होते.)

**ब्रह्मासी शब्दचि लागेना। कल्पना कल्पूं शकेना। कल्पनेतीत निरंजना। विवेकें वोळखावें।।२४।।**

ब्रह्माचे वर्णन शब्दात करता येणे संभवत नाही. त्याची कल्पना मानवी मन करू शकत नाही. अशा या परब्रह्माचे स्वरूप कल्पनेपलीकडील आहे. मायाविरहित अशा त्या केवळ स्वरूपाला विवेकाने ओळखावे. (विवेकाचे सामर्थ्य या ओवीत व्यक्त झाले आहे. विवेक शक्तीवर श्रीसमर्थांचा अपार विश्वास आहे.)

**शुद्ध सार श्रवण। शुद्ध प्रत्ययाचें मनन। विज्ञानीं पावतां, उन्मन। सहजचि होतें ।।२५।।**

हरतऱ्हेच्या साधना आहेत पण त्यात सर्वांत अध्यात्मश्रवण ही साधना सारभूत आहे. मनन करून त्या श्रवणाचा अनुभव घ्यावा. त्यावेळी (ज्ञानाचे रहस्य जाणणारा तो मीच ही भावनाही नाहिशी झाल्याने) ज्ञानाचे विज्ञानात रूपांतर होते आणि अशा वेळी (स्वानुभवाच्या आनंदामध्ये) मनाची उन्मनी अवस्था प्राप्त होते. ती अगदी सहजतेने प्राप्त होते.

**जालें साधनाचें फळ। संसार जाला सफळ। निर्गुण ब्रह्म तें निश्चळ। अंतरीं बिंबलें ।।२६।।**

अशावेळी साधकांच्या साधनेची सिद्धी होते. साधनेला फळ मिळते आणि संसार सफल होतो. निर्गुण परब्रह्म अंतर्यामी स्थिर स्वरूपात विलसते.

**हिसेब जाला मायेचा। जाला निवाडा तत्वांचा। साध्य होतां, साधनाचा। ठाव नाहीं ।।२७।।**

मायेमधील जी तत्त्वे आहेत त्याचे स्वरूप समजल्याने त्यांच्या संबंधातील सारा हिशेब संपतो. परब्रह्माचे सत्यस्वरूपाचे आकलन किंवा केवल स्वरूपाचे ज्ञान होताच साधनेला अवकाश रहात

नाही. (वरच्या मजल्यावर चढण्यासाठी शिडीची योजना केली जाते पण वर पोहोचल्यावर शिडीचे महत्त्व विराम पावते. या दृष्टान्ताने काही अंशाने स्पष्टीकरण होऊ शकते.)

**स्वप्नीं जें जें देखिलें। तें तें जागृतीस उडालें। सहजचि अनुर्वाच्य जालें। बोलतां नये ।।२८।।**

स्वप्नामध्ये जे पाहिले ते भासमान जग जागृतीच्या अवस्थेत विरून जाते ते अगदी सहजपणे अनाकलनीय होते. त्याप्रमाणे आत्मानुभवाच्या अवस्थेत दृश्य विश्वाचे विस्मरण जीवाला होते. अनिर्वचनीय परब्रह्माच्या अनुभवाच्या अवस्थेची प्राप्ती म्हणजे मानवी संसाराची सफलता, असे श्रीसमर्थांचे प्रतिपादन आहे. त्याचे विवरण या पूर्वीच्या आणि नंतरच्या ओव्यांमध्ये आले आहे.

**ऐसें हें विवेकें जाणावें। प्रत्ययें खुणेसी बाणावें। जन्ममृत्याच्या नांवें। सुन्याकार ।।२९।।**

असे हे सर्व विवेकशक्तीने जाणावे. आत्मानुभवाच्या खुणेवरून स्वतः त्या प्रत्ययाचा अनुभव घ्यावा. मग जन्म व मृत्यूचा हिशेब शून्य होतो आणि साधक सायुज्यमुक्तीप्रत जातो.

(दासबोध हा श्रीसमर्थांच्या अनुभूतीचा ग्रंथ आहे व आपण अनुभूती घेण्याचा ग्रंथ आहे. श्रीसमर्थांची ही अलौकिक देणगी आहे. पण तिचे नाममात्र सुद्धा श्रेय ते घेत नाहीत. पुढील ओवीतच ते म्हणतात.)

**भक्तांचेनि साभिमानें। कृपा केली दाशरथीनें। समर्थकृपेचीं वचनें। तो हा दासबोध ।।३०।।**

श्रीरामरायाने भक्तांच्या अभिमानापोटी, त्यांच्यावर कृपा केली. या ग्रंथातील वचने त्या दाशरथी रामाच्या कृपेचीच आहेत. हा दासबोध ग्रंथ म्हणजे त्याच वचनांचा संग्रह होय. (यातील प्रत्येक ओवी प्रासादिक आहे.)

**वीस दशक दासबोध। श्रवणद्वारें घेतां शोध। मननकर्त्यास विशद। परमार्थ होतो ।।३१।।**

या ग्रंथाचे वीस दशक आहेत ते श्रवण करून जो त्यावर चिंतन करील त्या मननकर्त्या साधकाला परमार्थ स्पष्टपणे आकलनात येईल.

**वीस दशक दोनीसें समास। साधकें पाहावें सावकास। विवरतां विशेषाविशेष। कळों लागे ।।३२।।**

वीस दशक आणि दोनशे समास साधकाने स्वस्थपणे पहावे. त्याचे मनाने विवरण केल्यास दरवेळी अधिकाधिक कळू लागेल. विशेष काय अविशेष काय हे समजू लागेल.

**ग्रंथाचें करावें स्तवन। स्तवनाचें काये प्रयोजन। येथें प्रत्ययास कारण। प्रत्ययो पाहावा ।।३३।।**

ग्रंथाचे स्तवन करण्याची प्रथा असते पण या ग्रंथाचे स्तवन करण्याचे प्रयोजनच नाही. या ग्रंथाच्या अनुभवाचा प्रत्यय पहाणे हा उद्देश आहे. प्रधान हेतू तो आहे. (या ओवीचा गर्भितार्थ अधिक खुलाशाने असा मांडता येईल की ग्रंथाची प्रचिती येत नसेल तर त्याचे स्तवन करूनही काही उपयोग नाही आणि प्रचिती येत असेल तर स्तवन करण्याचे प्रयोजनच नाही. इतकी परखड भूमिका श्रीसमर्थांनी घेतली आहे.)

**देहे तंव पांचा भूतांचा। कर्ता आत्मा तेथीचा। आणी कवित्वप्रकार मनुशाचा। काशावरुनी ।।३४।।**

देह हा पंचभूतांचा बनलेला असतो. त्यातील कर्तृत्त्वशक्ती आत्म्याची आहे त्यामुळे (ग्रंथाच्या) कवित्वाचे श्रेय तरी माणसाचे कसे असू शकेल? (अर्थात् ते आत्म्याकडेच जाते की जो ईश्वरस्वरूपच आहे.)

**सकळ करणें जगदीशाचें। आणी कवित्वचि काय मानुशाचें। ऐशा अप्रमाण बोलण्याचें। काये घ्यावें ।।३५।।**

सर्व कर्तृत्व जर जगदीश्वराचे तर कवित्वच तेवढे माणसाचे असू शकेल काय? अशा अप्रमाण (निराधार) बोलण्याचे काय प्रयोजन आहे?

**सकळ देह्याचा झाडा केला। तत्त्वसमुदाव उडाला। तेथें कोण्या पदार्थाला। आपुलें म्हणावें।।३६।।**

जर संपूर्ण देहाचा विश्लेषण करण्यासाठी शोध घेतला तर त्याच्या घटक तत्त्वांचा समुदाय निघून जातो. त्यातील कोणत्याही तत्त्वावर आपली सत्ता नसते. (त्यामुळेही ग्रंथ निर्मितीचे श्रेय त्याला देता येत नाही.)

**ऐसी हें विचाराचीं कामें। उगेंच भ्रमों नये भ्रमें। जगदेश्वरें अनुक्रमें। सकळ केलें ।।३७।।**

असा हा त्यामागील विचार आहे. ही विचाराची कामे अशी असल्याने माणसाने भ्रमात पडून (वैचारिक) भटकंती करू नये. जगदीश्वराने यथानुक्रमे, पद्धतशीरपणे सगळी रचना केली आहे. (दासबोध हा गुरूशिष्यांचा संवाद आहे. कदाचित कोणा शिष्याने श्रीसमर्थांना म्हटले असेलही की ''स्वामी, आपण किती सुरेख ही ग्रंथरचना केली आहे!'' त्याला उत्तर देण्याच्या निमित्ताने ३४ ते ३७ या ओव्या लिहिल्या गेल्या असाव्यात. पण त्या ओव्यामुळेसुद्धा श्रीसमर्थांचे निर्मळ अंत:करण आपणापुढे उघडे झाले आहे. 'विमलब्रह्म निरूपण' समासाची व ग्रंथाची इतिश्रीसुद्धा मनोहर झाली आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विमळब्रह्मनिरूपणनाम समास दशम।।१०।।**

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका १ ली

**(ग्रंथारंभलक्षण द. १-१ आणि विमळब्रह्मनिरूपण द. २०-१० वर आधारित)**

प्र. १ (अ) ज्या एकाच ओवीमध्ये दासबोध ग्रंथाचा सारांश सांगितला आहे, ती ओवी लिहा.

(ब) द. १-१ मध्ये कोणते विषय नि:संशयपणाने वर्णिले असल्याचे श्रीसमर्थांनी म्हटले आहे?

प्र. २ क्षुद्रवृत्तीच्या टीकाकाराची भूमिका कशी असते? या भूमिकेतून वाचकाने ग्रंथ वाचू नये; हे कशा प्रकारे स्पष्ट केले आहे?

प्र. ३ ''द. २०-१० मध्ये दासबोधातील तत्त्वज्ञानाचा सारांश ओतला आहे'' या विधानाची सत्यता प्रतिपादन करा.

प्र. ४ खालील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा.

१) आता श्रवण केलियाचें फळ। (१-१-२८)

२) जालें साधनाचें फळ। (२०-१०-२६)

प्र. ५ (अ) दासबोधाचा अभ्यास कशा पद्धतीने करावा याबद्दल द. २०-१०-३१ आणि ३२ या ओव्यांमध्ये श्रीसमर्थांनी स्वतःच मार्गदर्शन कशाप्रकारे केले आहे?

(ब) मनाचे श्लोक, करुणाष्टके, दासबोध यापैकी काही भाग आपण दैनंदिन उपासनेच्या पद्धतीने म्हणता का?

# स्वाध्याय २ रा

## (द.११-६,द. १४-१, द. १८-३)

महंतलक्षण, निस्पृहलक्षण आणि निस्पृहशिकवण हे तीन समास एकत्रितपणे अभ्यासण्याजोगे आहेत. लोकांना भक्तिमार्गाकडे वळविणे आणि अशा भक्तांची प्रचंड संघटना करून भक्तीतून समाजाला शक्तीकडे नेण्याचा प्रचंड उद्योग श्रीसमर्थांनी केला. त्यांचा महंत हा आध्यात्मिक पुढारी असतो. निःस्वार्थी वृत्तीने समाजाचे नेतृत्व करणारा महंत, लोकांचा मोठाच आधार असतो. त्याने कोणती लक्षणे अंगी बाणविली पाहिजेत याची शिकवण श्रीसमर्थ येथे देत आहेत. प्रत्येक अभ्यासार्थीचे घर म्हणजे श्रीसमर्थांच्या इतिहासकालीन मठाप्रमाणे 'समर्थ' विचार पसरविण्याचे केंद्र व्हावे. या हेतूने या समासांचा अंतर्भाव या अभ्यासक्रमात केला आहे...

श्रीसमर्थांनी भारतभ्रमण केले त्यावेळी समाजाच्या अधःपतनाचे विदारक चित्र त्यांना आढळून आले. समाजाची मानसिकताच बदलून नवा मनुष्य येथे घडविण्याची आवश्यकता त्यांना जाणवली. हे काम एकट्यादुकट्याचे नाही हे ओळखून त्यासाठी फार मोठा लोकसंग्रह करून त्याकरवी कार्य घडवून आणण्याचा दीर्घ प्रयत्न श्रीसमर्थांनी केला. ठिकठिकाणी मठस्थापना केली. या मठांच्या प्रमुखाला महंत असे नाव त्यांनी दिले. महंतांनी निस्वार्थी आणि निःस्पृह असलेच पाहिजे. त्यांनी आपले वर्तन कसे ठेवावे आणि व्याप कसा वाढवावा याचे दिग्दर्शन करणाऱ्या तीन समासांचा अभ्यास आपणास करावयाचा आहे.

## द. ११-६ : महंतलक्षण

सगळे पुढारी लोकसंग्रह करतात हे खरे. परंतु समाजातील पुढारीपण एकाच प्रकारचे नसल्याने प्रत्येकाचा लोकसंग्रह भिन्न तऱ्हेचा असतो. उदा. राजकीय पुढाऱ्याचा लोकसंग्रह निराळा तर विज्ञानाच्या क्षेत्रात पुढारीपण असणाऱ्या विज्ञानपंडितांचा लोकसंग्रह निराळा असतो. एखाद्या धार्मिक पुढाऱ्याचा लोकसंग्रह निराळा तर कलेमध्ये पुढारीपण असणाऱ्या एखाद्या कलावंताचा लोकसंग्रह निराळा असतो. श्रीसमर्थांचा महंत हा आध्यात्मिक पुढारी आहे. श्रीरामचंद्र हा त्यांचा आदर्श आहे. एखादे कमल पूर्णपणे उमलल्यावर सर्व दृष्टींनी सुंदर दिसते त्याचप्रमाणे महंताचे जीवन सर्व बाजूंनी विकसित होऊन सौंदर्याने भरलेले असावे, असा श्रीसमर्थांचा अभिप्राय आहे. निःस्वार्थी प्रेमाने भरलेला महंत लोकांना मोठा आधार वाटतो. तो लोकांना सर्व प्रकारे शहाणे करून सन्मार्गावर घालतो. अशा रीतीने लोककल्याण करून, लोकांचे खरे प्रेम संपादन करून, आपण पुनः अंतरात्म्याप्रमाणे अगदी अलिप्त राहतो. यामध्येच त्याचे खरे थोरपण असते.

**।। श्रीराम।।**

**शुद्ध नेटकें ल्याहावें। लेहोन शुद्ध शोधावें। शोधून शुद्ध वाचावें। चुकों नये ।।१।।**

शुद्ध व सुवाच्य लिहावे. लिहिल्यानंतर शुद्धाशुद्ध तपासावे. (चुका दुरुस्त कराव्या) तपासल्यावर बिनचूकपणे वाचावे.

**विशकळित मात्रुका[१] नेमस्त[२] कराव्या। धाट्या[३] जाणोन सदृढ धराव्या। रंग राखोन भराव्या। नाना कथा ।।२।।**

अक्षरांवरील कानामात्रा वेड्यावाकड्या असतील तर त्या सरळ नीटनेटक्या कराव्या. लिहिण्याची ढब (धाटी) निश्चित ठरवून ती कायम ठेवावी. कथेतील चित्रे रंगाने चांगली रंगवावी. (कथेत चांगला रंग भरावा)

**जाणायाचें सांगतां न ये। सांगायाचें नेमस्त न ये। समजल्याविण कांहींच न ये। कोणीयेक ।।३।।**

जे जाणून घ्यावयाचे आहे ते ज्यांना नीट सांगता येत नाही, आणि जे सांगावयाचे ते थोडक्यात व्यक्त करता येत नाही अशी व्यक्ती महंत होऊ शकत नाही. (ज्ञान आणि ते वितरित करण्याची पात्रता दोन्ही हवी)

**हरिकथा निरूपण। नेमस्तपणें राजकारण। वर्तायाचें लक्षण। तेंही असावें ।।४।।**

भगवंताच्या कीर्तीचे (कथेतून) निरुपण, परिस्थितीनुसार अचूक राजकारण आणि सचोटीचे वर्तन या सर्वांनी युक्त महंत असला पाहिजे.

**पुसों जाणें सांगो जाणें। अर्थांतर करूं जाणे। सकळिकांचे राखों जाणें। समाधान ।।५।।**

दुसऱ्यांना कसे विचारावे किंवा कसे सांगावे हे तो जाणतो. निरनिराळे अर्थ काढून सर्व

१) मात्रुका - कानामात्रा २) नेमस्त - व्यवस्थित ३) धाट्या-धाटण्या; प्रकार

श्रोत्यांचे समाधान करणे त्याला ठावूक असते.

**दीर्घ सूचना आधीं कळे। सावधपणें तर्क प्रबळे। जाणजाणोनि निवळे[४]। येथायोग्य ।।६।।**

पुढील परिस्थितीचा तर्क सावधपणाने तो करू शकतो. पुन्हापुन्हा विचार केल्यामुळे त्याच्या विचारात स्वच्छता असते.

**ऐसा जाणे जो समस्त। तोचि महंत बुद्धिवंत। यावेगळें अंतवंत। सकळ कांहीं ।।७।।**

असे विचारपूर्वक जो सर्व जाणतो तो बुद्धिमान महंत असतो. अशा महंताखेरीज बाकी सर्व व्यर्थ (अंतवत = विनाश पावणारे) समजावे.

**ताळवेळ तानमानें। प्रबंद कविता जाडवचनें। मज्यालसी[५] नाना चिन्हें। सुचती जया ।।८।।**

ताल, वेळ, ताना, (मान) आलाप, प्रबंध, कविता, महत्त्वाची अवतरणे, सभाधीटपणा हे सर्व महंताला ठाऊक असते. आणि त्याला त्याचे स्मरणही असते. (श्रोत्यांवर वक्त्याची मोहिनी त्यामुळे पडते.)

**जो येकांतास तत्पर। आधीं करी पाठांतर। अथवा शोधी अर्थांतर। ग्रंथगर्भीचें ।।९।।**

एकान्ताची आवड त्याला असते आणि अगोदरच त्याचे बरेच पाठान्तरही झालेले असते किंवा ग्रंथातील मर्म तो शोधून काढतो.

**आधींच सिकोन जो सिकवी। तोच पावे श्रेष्ठ पदवी। गुंतल्या लोकांस उगवी। विवेकबळें ।।१०।।**

एखादी गोष्ट तो स्वतः आधी आत्मसात करतो आणि नंतरच इतरांना शिकवितो. त्यामुळेच त्याला श्रेष्ठ पदवी (मान्यता) मिळते. आपल्या विचारांच्या आधाराने तो प्रापंचिक लोकांना कोड्यातून (उगवतो) सोडवून बाहेर काढतो. (लोकांच्या समस्या समजून घेऊन त्यांना त्यातून मुक्त करतो.)

**अक्षर सुंदर वाचणें सुंदर। बोलणें सुंदर चालणें सुंदर। भक्ति ज्ञान वैराग्य सुंदर। करून दावी।।११।।**

त्याचे अक्षर सुंदर असते. वाचणे, बोलणे, चालणे सारे सुंदर (आकर्षक) असते. इतकेच नव्हे तर भक्ती, ज्ञान आणि वैराग्य सुद्धा सुंदर असते.

**जयास येत्नचि आवडे। नाना प्रसंगीं पवाडे[६]। धीटपणें प्रगटे, दडे-। ऐसा नव्हे ।।१२।।**

त्याला प्रयत्न करणे आवडते. नाना प्रसंगात तो धैर्याने पुढे सरसावतो. अशावेळी दडून बसणारा तो नसतो.

**सांकडीमधें[७] वर्तों जाणे। उपाधीमधें मिळों जाणे। अलिप्तपणें राखों जाणे। आपणासी ।।१३।।**

संकटामध्ये मार्ग काढण्याचे ज्ञान त्याला असते. उपाधीमध्ये समरस व्हावयाचे पण अलिप्तपणही राखावयाचे कसे हेही त्याला जमू शकते.

४) निवळे - निश्चय करता ५) मज्यालसी चिन्हे - सभाधीटपणा ६) पवाडे - धैर्याने उभा राहतो ७) सांकडीमध्ये - संकटात

**आहे तरी सर्वा ठाई। पाहों जातां कोठेंचि नाहीं। जैसा अंतरात्मा ठाईंचा ठाईं। गुप्त जाला ।।१४।।**

तो सर्वत्र मिसळतो पण त्याला पाहू गेले तर तो कोठेही सापडत नाही. याला दृष्टान्तच द्यावयाचा तर अंतरात्म्याचा द्यावा लागेल. अंतरात्मा सर्वांच्या ठिकाणी असूनसुद्धा, शोधू गेल्यास तो सापडत नाही. तद्वतच महंताची अलिप्तता असते.

**त्यावेगळें कांहींच नसें। पाहों जातां तो न दिसे। न दिसोन वर्तवीतसे। प्राणीमात्रांसी ।।१५।।**

त्याच्याशिवाय कोणतेच कार्य होत नाही, पण तो सापडू शकत नाही. पण अदृश्यपणे राहूनही सर्व प्राणीमात्रांचे व्यवहार आत्मा घडवून आणतो.

**तैसाच हाही नानापरी। बहुत जनास शाहाणे करी। नाना विद्या त्या विवरी। स्थूळ[८] सूक्ष्मा[९] ।।१६।।**

हा महंतही नाना प्रकारे अंतरात्म्याप्रमाणेच असतो. तो अनेक लोकांना शहाणे करतो. त्यांना अनेक प्रकारे (दृष्टांत सांगून) स्थूळ व सूक्ष्म विद्या समजावून सांगतो. (दृश्यातील विद्या त्या स्थूळ आणि अध्यात्मातील विद्येला सूक्ष्म विद्या हे शब्द त्या अर्थाने वापरले आहेत.)

**आपणांकरितां शहाणे होती। ते सहजचि सोये धरिती। जाणतेपणाची महंती। ऐसी असे ।।१७।।**

महंतामुळे जे लोक शहाणे होतात ते त्याला साहजिकच वश होतात. ते कृतज्ञ राहतात. (श्रेष्ठ) महंताची महंती अशी जाणत्याची असते.

**राखों जाणें नीतिन्याय। न करी न करवी अन्याये। कठीण प्रसंगीं उपाये। करूं जाणे ।।१८।।**

(या दोन ओव्यांमध्ये श्रीरामांचे श्रेष्ठत्व आदर्शरूपाचे कसे आहे ते सांगितले आहे) नीतीन्यायाचे रक्षण कसे करावे हे त्याला कळते. तो स्वतः कधीही अन्यायाने वागत नाही आणि इतरांकरवीही अन्याय करवीत नाही. कठीण प्रसंग आला तर त्यावेळी कोणता उपाय करावा हे त्याला कळते.

**ऐसा पुरुष धारणेचा। तोचि आधार बहुतांचा। दास म्हणे रघुनाथाचा। गुण घ्यावा ।।१९।।**

असा व्यापक बुद्धीचा (धारणेचा) जो पुरुष असतो तोच अनेक लोकांचा आधार असतो. रघुनाथाचे दास (म्हणजेच रामदास) म्हणतात, रघुनाथाचे हे गुण घ्यावेत (प्रभु रामचंद्राच्या चरित्रात आढळणारे व्यापक धारणेचे सद्‌गुण लोकांनी आत्मसात करावेत.)

शेवटच्या दोन ओव्यांतील शिकवण अत्यंत मननीय आहे. प्रभु रामचंद्र हे देवाचे अवतारच आहेत. त्यामुळे त्यांचे गुण आपल्यासारख्या क्षुद्र मानवांना कसे घेता येतील असा विचार न करता त्यांच्या गुणांचे अनुसरण केले पाहिजे असे श्रीसमर्थांनी सुचविले आहे.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे महंतलक्षणनाम समास षष्ठ।। ६।।**

---

८) स्थूळ विद्या - लौकिक विद्या ९) सूक्ष्मा- अध्यात्म

**|| श्रीराम ||**

# द. १४-१ : निस्पृह लक्षणनाम

इतर समासांच्या मानाने हा समास बराच मोठा म्हणजे ऐंशी ओव्यांचा आहे. त्यात पुढील सहा गोष्टी प्रामुख्याने नजरेत भरतात. (एक) श्रीसमर्थांनी स्वत:ची भाषा कशी आहे ते सांगितले आहे. आपली भाषा साधी पण स्पष्ट, सडेतोड आणि परिणाम करणारी आहे असे ते म्हणतात. (दोन) सबंध समासामध्ये नि:स्पृह पुरुषाने काय करू नये याचेच वर्णन आहे. पण त्यावरून त्यांच्या काळी, सामान्य समाजनेते कसे वागत असतील, याची चांगली कल्पना येते. त्याचबरोबर लोकदेखील नेत्याला कशी गळ घालीत हेही समजते. (तीन) निस्पृहाला लोकसंग्रह करावयाचा असतो. तो करताना लोकांच्या वर्तमान जीवनपद्धतीशी त्याचा निकट संबंध येतो. तेव्हा लोकांचे मनोगत राखण्यासाठी त्याला एकांतिकपणे वागून चालत नाही, पण लोकांच्या संपूर्ण आहारी जाऊनही चालत नाही. अर्थात् त्याचे वागणे समतोल पाहिजे. म्हणून विरोधी गुणांच्या जोड्या या समासात आढळतात. (चार) लोकांमध्ये वावरत असता, निस्पृहाने आपली नित्य साधना सोडता कामा नये. आपला निजध्यास कटाक्षाने सांभाळावा. (पाच) निस्पृहाने सर्व काही करावे परंतु आपण कर्तेपणाने कोठेच सापडू नये. लोककल्याणाची सारी कामे परस्पर घडवून आणावी. (सहा) वाटेल ते झाले तरी आपले समाधान अभंग ठेवावे. अशा गुणांनी संपन्न नेता समाजाला लाभणे म्हणजे त्या समाजाचे मोठे भाग्यच होय.

**प्रास्ताविक** : दासबोधामध्ये १४-१ निस्पृहलक्षण, १५-२ निस्पृहव्यापशिकवण, ११-१० निस्पृह वर्तणूक, १८-३ निस्पृह शिकवण असे चार समास आहेत. यातील ११-१० व १५-२ हे दोन समास दा. परिचय स्तरासाठी घेतले आहेत. आता उरलेले दोन या स्वाध्यायामध्ये अभ्यासावयाचे आहेत. प्रत्येक महंत हा निस्पृह असलाच पाहिजे. निस्पृहाची लक्षणे सांगणारा हा मोठा समास आहे.

**|| श्रीराम||**

**ऐका निस्पृहाची सिकवण। युक्ति बुद्धि शहाणपण। जेणें राहे समाधान। निरंतर ।।१।।**

निस्पृह पुरुषाचे अंगी कोणते गुण असतात ते आता ऐकावे. मनाचे समाधान ज्यामुळे नेहमी टिकून राहते ती युक्ती, बुद्धी आणि शहाणपण त्याच्याकडे असते.

**सोपा मंत्र परी नेमस्त[१]। साधे वोषध गुणवंत। साधें बोलणें सप्रचीत। तैसें माझें ।।२।।**

जसा एखादा सोपा मंत्र किंवा साधे औषध गुणकारी असते त्याप्रमाणे माझे बोलणे(सप्रचीत) स्वानुभवाचे असल्याने फलदायी आहे.

**तत्काळचि अवगुण जाती। उत्तम गुणाची होये प्राप्ती। शब्दवोषध तीव्र श्रोतीं। साक्षपें सेवावें ।।३।।**

१) नेमस्त मंत्र - प्रतिती आणून देणारा मंत्र

त्यामुळे अवगुण तत्काळ नाहिसे होऊन उत्तम गुण प्राप्त होतात. माझे बोलणे कडक औषधासारखे वाटले तरी श्रोत्यांनी ते प्रयत्नपूर्वक सेवन करावे.

**निस्पृहता धरूं नये। धरिली तरी सोडूं नये। सोडिली तरी हिंडों नये। वोळखीमधें ।।४।।**

निस्पृहता धरणे कठीण असल्याने ती विचारपूर्वक धरली पाहिजे हे सांगताना श्रीसमर्थ म्हणतात, एकतर निस्पृहता अंगिकारु नये आणि ती एकदा धरली तर सोडू नये आणि जर सोडलीच तर ओळखीच्या लोकांमध्ये हिंडता कामा नये.

**कांता दृष्टी राखों नये। मनास गोडी चाखऊं नये। धारिष्ट चळतां दाखऊं नये। मुख आपलें।।५।।**

स्त्रियांकडे टक लावून पाहू नये. निस्पृहाने मनाला वासनेची गोडी लावू नये. याबाबतीत संयम घसरला तर आपले तोंडसुद्धा परिचितांना दाखवू नये.

**येके स्थळीं राहों नये। कानकोडें साहों नये। द्रव्य दारा पाहों नये। आळकेंपणें[२] ।।६।।**

एका जागी फार काळ राहू नये. त्यामुळे (कानकोंडे म्हणजे) ओशाळल्याप्रमाणे होते. द्रव्य आणि स्त्रिया यांच्याकडे (आळकेपणे) आशाळभूत दृष्टीने पाहू नये.

**आचारभ्रष्ट होऊं नये। दिल्यां द्रव्य घेऊं नये। उणा शब्द येऊं नये। आपणावरी ।।७।।**

(आचारभ्रष्ट) वाममार्गी होऊ नये. कोणी द्रव्य दिले तरी निस्पृहाने ते स्वीकारू नये. कोणाचा वावगा शब्द आपणाबद्दल येईल असे वर्तन नसावे.

**भिक्षेविषीं लाजों नये। बहुत भिक्षा घेऊं नये। पुसतांहि देऊं नये। वोळखी आपली ।।८।।**

उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागताना निस्पृहाला लाज वाटण्याचे कारण नाही. (कारण लोकांना विचारधन देऊन तो त्यांना ऋणी करतो.) पण प्रमाणाबाहेर भिक्षाही स्वीकारू नये. कोणी विचारले तरी आपली ओळख देऊ नये.

**धड[३] मळिण नेसों नये। गोड अन्न खाऊं नये। दुराग्रह करूं नये। प्रसंगें वर्तावें ।।९।।**

मळलेले वस्त्र जरी धड असले तरी नेसू नये. गोड अन्न खाऊ नये. (जिभेवर नियंत्रण असावे) प्रसंग पाहून वर्तन ठेवावे, दुराग्रही नसावे.

**भोगीं मन असों नये। देहदुःखें त्रासों नये। पुढें आशा धरूं नये। जीवित्वाची ।।१०।।**

भोगवासना निस्पृहाच्या मनात नसावी. त्याने देहदुःखाने त्रासू नये. दीर्घकाळ जीवनाची आशा ठेवू नये (मृत्यूपासून निर्भय रहावे)

**विरक्ती गळों देऊं नये। धारिष्ट चळों देऊं नये। ज्ञान मळिण होऊं नये। विवेकबळें ।।११।।**

विरक्ती आणि धारिष्ट अढळ ठेवावे. विवेकाच्या सहाय्याने आपले ज्ञान ताजेतवाने राखावे.

२) आळकेपणे - हावरटपणाने ३) धड- जीर्ण न झालेले वस्त्र

**करुणाकीर्तन सोडूं नये। अंतर्ध्यान मोडूं नये। प्रेमतंतु तोडूं नये। सगुणमूर्तीचा ॥१२॥**

प्रेमळ, करुणामय कीर्तन करावे. अंतरातील ईश्वरानुसंधान मोडून जाऊ देऊ नये. सगुण परमेश्वरमूर्तीची प्रेमाने उपासना करावी. (प्रेमतंतू राखून निर्गुण बोलावे)

**पोटीं चिंता धरूं नये। कष्टें खेद मानूं नये। समई धीर सांडू नये। कांहीं केल्या ॥१३॥**

मनात काळजीचे घर नसावे, श्रमाबद्दल वाईट वाटू देऊ नये. प्रसंग कितीही कठीण आला तरी धीर सोडू नये.

**अपमानितां सिणों नये। निखंदितां[४] कष्टों नये। धिःकारितां झुरों नये। कांहीं केल्या ॥१४॥**

कोणी अपमान केला तरी कष्टी होऊ नये. कोणी (निखंदिले) मर्माघात केला तरी मनाला लावून घेऊ नये. कोणी तुच्छ म्हटले तरी झुरत बसू नये.

**लोकलाज धरूं नये। लाजवितां लाजों नये। खिजवितां खिजों नये। विरक्त पुरुषें ॥१५॥**

स्वतः सन्मार्गाने चालत असताना लोकलाज बाळगू नये. कोणी लाजविले तरी लाजू नये. खिजविण्याचा प्रयत्न केला तरी खिजू नये.

**शुद्धमार्ग सोडूं नये। दुर्जनासीं तंडों नये। समंध पडों देऊं नये। चांडाळासी ॥१६॥**

शुद्ध मार्ग सोडू नये. दुर्जनांसी वितंडवाद करू नये. दुष्ट माणसांशी संपर्क पडू नये. (संबंधच येऊ नये असे वागावे.)

**तपीळपण धरूं नये। भांडवितां भांडों नये। उडवितां उडऊं नये। निजस्थिती आपुली ॥१७॥**

तापट स्वभाव नसावा. आपणास कोणी भांडण करण्यास प्रवृत्त केले तरी भांडण करू नये. आपली ईश्वरानुसंधानाची स्थिती बिघडविण्याचा प्रयत्न कोणी केला तरी ती बिघडू देऊ नये. (समाधान कायम ठेवावे.)

**हांसवितां हांसों नये। बोलवितां बोलों नये। चालवितां चालों नये। क्षणक्षणा ॥१८॥**

परप्रेरणेने आपली वागणूक होऊ नये यासाठी या ओवीत सूचना आहे. कोणी हसविण्याचा, बोलविण्याचा, चालवण्याचा प्रयत्न केला तरी तो सफल होऊ देऊ नये. नेहमी स्वयंप्रेरणेने वागावे.

**येक वेष धरूं नये। येक साज करूं नये। येक देसी होऊं नये। भ्रमण करावें ॥१९॥**

कायम एकच वेष असू नये. एकच थाट नसावा. एका ठिकाणी नेहमी वास्तव्य न करता परिभ्रमण करावे.

**सलगी पडों देऊं नये। प्रतिग्रह[५] घेऊं नये। सभेमध्ये बैसों नये। सर्वकाळ ॥२०॥**

कोणाशीही अति (सलगी) परिचय होऊ देऊ नये. दान घेऊ नये. नेहमी सभेत (लोकसमुदायात) बसू नये. (एकान्ताचे महत्त्व सूचीत केले आहे.)

४) निखंदिता - निंदिता ५) प्रतिग्रह - दान

**नेम आंगीं लाऊं नये। भरवसा कोणास देऊं नये। अंगिकार करूं नये। नेमस्तपणाचा ।।२१।।**

कोणताही नियम लावून घेऊ नये. (अहंपणाने) कोणाला भरवसा देऊ नये. अतिशय नियमितपणाचा क्रम नसावा. (विविध बंधनाच्या कात्रीत सापडू नये.)

**नित्यनेम सांडूं नये। अभ्यास बुडों देऊं नये। परतंत्र होऊं नये। कांहीं केल्या ।।२२।।**

आपला साधनेचा अभ्यास बुडू नये त्यासाठी मात्र नेम असावा. काही झाले तरी निस्पृहाने परतंत्र जीवन जगू नये.

**स्वतंत्रता मोडूं नये। निरापेक्षा तोडूं नये। परापेक्षा[६] होऊं नये। क्षणक्षणा ।।२३।।**

जीवनातील स्वतंत्रता सांभाळावी. निस्पृहता सोडू नये. पदोपदी दुसऱ्याकडून काही तरी अपेक्षा करू नये.

**वैभव दृष्टीं पाहों नये। उपाधीसुखें राहों नये। येकांत मोडूं देऊं नये। स्वरूपस्थितीचा ।।२४।।**

ऐहिक वैभव डोळे भरून पाहू नये. उपाधीच्या सुखामध्ये बुडून राहू नये. आत्मस्थितीसाठी एकान्त सांभाळून ती (तृप्त) अवस्था कायम राखावी.

**अनर्गळता[७] करूं नये। लोकलाज धरूं नये। कोठेंतरी होऊं नये। आसक्त कदा ।।२५।।**

अनीतीचे वर्तन कदापि करू नये. लोकलाज बाळगू नये. (सत्कार्य करताना लोकांची भीड धरू नये) केव्हाही उगाच आसक्ती कशातही नसावी.

**परंपरा तोडूं नये। उपाधी मोडूं देऊं नये। ज्ञानमार्ग सोडूं नये। कदाकाळीं ।।२६।।**

(गुरु किंवा संप्रदाय) परंपरा सोडू नये. साधनेची उपाधी कमी होऊ देऊ नये. ज्ञानमार्ग कधीही सोडू नये.

**कर्ममार्ग सांडू नये। वैराग्य मोडूं देऊं नये। साधन भजन खंडूं नये। कदाकाळीं ।।२७।।**

कर्ममार्ग आणि वैराग्य यांची कास बळकट धरावी. आपले साधन व ईश्वराचे भजन केव्हाही सोडू नये. (यात कंटाळा उपयोगी नाही)

**अतिवाद करूं नये। अनित्य[८] पोटीं धरूं नये। रागें भरीं भरों नये। भलतीकडे ।।२८।।**

(प्रसंगी वाद करावा लागला तरी) अतिवाद टाळावा. चित्तामध्ये अनीतीची प्रवृत्ती नसावी. रागाच्या आहारी जाऊन भलतेच काम करू नये.

**न मनी त्यास सांगों नये। कंटाळवाणें बोलों नये। बहुसाल असों नये। येकेस्थळीं ।।२९।।**

जो आपले म्हणणे ऐकत नाही त्याला हट्टाने सांगत राहू नये. आपले बोलणे कंटाळवाणे नसावे. एकाच स्थळी पुष्कळ काळ राहू नये.

६) परापेक्षा - दुसरा मदत करील ही अपेक्षा ७) अनर्गळता - स्वेच्छाचार ८) अनित्य -अनीति

**कांहीं उपाधी करूं नये। केली तरी धरूं नये। धरिली तरी सापडों नये। उपाधीमधें ।।३०।।**

काही तरी उपाधी करू नये. करावी लागली तरी तिच्या मागे लागू नये आणि मागे लागले तरी (अलिप्तपणा राखून) तिच्या आहारी जाऊ नये.

**थोरपणें असों नये। महत्व धरून बैसों नये। कांहीं मान इछूं नये। कोठेंतरी ।।३१।।**

थोरपणाची अहंता धरू नये. मोठेपणा धरून वागू नये. कोठेही आपणास मान-सन्मान मिळेल अशी इच्छा नसावी.

**साधेपण सोडूं नये। सानेपण[९] मोडू नये। बळात्कारें जोडूं नये। अभिमान आंगीं ।।३२।।**

साधेपणा सोडू नये. आपली लहानपणाची वृत्ती गमावू नये. मुद्दाम अभिमान अंगी लावून घेऊ नये. (महंतांना मुद्दाम या सूचना दिल्या आहेत.)

**अधिकारेंवीण सांगों नये। दाटून उपदेश देऊं नये। कानकोंडा[१०] करूं नये। परमार्थ कदा ।।३३।।**

पात्रता नसलेल्या व्यक्तीला सांगू नये आणि आपलीही योग्यता नसताना बळेच उपदेश करू नये. (गुरु व शिष्य दोघेही सत्पात्र असावे.) मिंधेपणाचा किंवा ओशाळपणाचा परमार्थ करू नये.

**कठिण वैराग्य सोडूं नये। कठिण अभ्यास सांडूं नये। कठिणता धरूं नये। कोणेकेविशई ।।३४।।**

प्रखर वैराग्य सोडू नये. अभ्यास कठीण वाटला तरी सोडू नये. कोणत्याच बाबतीत कठोरपणा नसावा.

**कठिण शब्द बोलों नये। कठिण आज्ञा करूं नये। कठिण धीरत्व सोडूं नये। कांहीं केल्यां ।।३५।।**

(कठीण) कठोर शब्द बोलू नयेत. अवघड वाटेल अशी आज्ञा देऊ नये. धैर्य केव्हाही सोडू नये. (कठीण या शब्दाच्या अर्थाच्या भिन्न छटा या ओवीत आहेत त्या समजूनच घ्याव्या.)

**आपण आसक्त होऊं नये। केल्यावीण सांगो नये। बहुसाल मागों नये। शिष्यवर्गासी ।।३६।।**

आपली आसक्ती कोठेही नसावी. स्वतः केल्यावीण इतरांना सांगू नये. शिष्यांकडे सहसा काही मागू नये. (बहुसाल = निरंतर)

**उत्धट शब्द बोलों नये। इंद्रियेंस्मरण करूं नये। शाक्तमार्गें भरों नये। मुक्तपणें भरीं ।।३७।।**

उर्मटपणाने बोलू नये. विषयवासनेचे स्मरण करू नये. (कारण त्यामुळे मन आसक्त होते) शाक्तमार्गाने जाऊन स्वेच्छाचार माजविण्याच्या मागे जाऊ नये. (शाक्तपंथात स्वैराचाराचे समर्थन असते.)

**नीच कृतीं लाजों नये। वैभव होतां माजों नये। क्रोधें भरीं भरों नये। जाणपणें ।।३८।।**

---

९) सानेपण - लहानपण १०) कानकोंडा - भिडस्त

(सेवाप्रसंगी) हलके काम करण्यास लाजू नये. वैभवाच्या प्राप्तीमुळे उन्मत्त होऊ नये. जाणतेपणाच्या अहंतेमुळे क्रोधाधीन होऊ नये. (अनेकदा जाणतेपणाचा अभिमान क्रोधाचा जनक होतो.)

**थोरपणें[११] चुकों नये। न्याये नीति सांडूं नये। अप्रमाण वर्तों नये। कांहीं केल्यां ।।३९।।**

मोठेपणामुळे अयोग्य वर्तन होऊ शकते ते टाळावे. न्याय/नीती कधीच सोडू नये. मर्यादा सोडून काहीही झाले तरी वागू नये.

**कळल्यावीण बोलों नये। अनुमानें निश्चये करूं नये। सांगतां दुःख धरूं नये। मूर्खपणें ।।४०।।**

कळल्याशिवाय बोलू नये. एखाद्या गोष्टीबद्दल (अनुमान) संशय वाटत असेल तर निश्चितपणे सांगू नये. कोणी एखादी चांगली गोष्ट सांगितली तर त्याबद्दल वाईट वाटून घेणे हे मूर्खपणाचे असते.

**सावधपण सोडूं नये। व्यापकपण सांडूं नये। कदा सुख मानूं नये। निसुगपणाचें[१२] ।।४१।।**

निस्पृहाने सावधपणे रहावे. (गाफील राहू नये) मन क्षुद्र नसावे. मनाचे व्यापकपण सांभाळावे. ऐदीपणा वा आळशीपणात सौख्य मानू नये.

**विकल्प पोटीं धरूं नये। स्वार्थआज्ञा करूं नये। केली तरी टाकूं नये। आपणास पुढें ।।४२।।**

मनात विकल्प (दुर्वासना) नसावी. स्वार्थासाठी कोणाला आज्ञा करू नये. आणि केलीच तर आपण पुढे होऊन ती करू नये. (त्या आज्ञेमागे समाजाच्या हिताचा विचार असावा. व्यक्तिगत लाभासाठी आज्ञा नसावी.)

**प्रसंगेंवीण बोलों नये। अन्वयेंवीण गाऊं नये। विचारेंवीण जाऊं नये। अविचारपंथें ।।४३।।**

प्रसंग पडल्याशिवाय बोलू नये. योग्य असेल तरच गावे. सुयोग्य विचार करून वागावे. अविचारी मार्गाने जाऊ नये.

**परोपकार सांडूं नये। परपीडा करूं नये। विकल्प पडों देऊं नये। कोणीयेकासी ।।४४।।**

परोपकार करावा. लोकांना त्रास देऊ नये. आपल्या वर्तनाबद्दल कोणाच्याही मनात विकल्प येऊ नये असे वर्तन असावे.

**नेणपण सोडूं नये। महंतपण सांडूं नये। द्रव्यासाठीं हिंडों नये। कीर्तन करीत ।।४५।।**

आपण अजाण आहोत ही भावना (नम्रतेमुळे) असावी. सर्व-ज्ञातेपण आपणाकडे घेऊ नये. अर्थप्राप्तीच्या हेतूने कीर्तने करीत हिंडू नये.

**संशयात्मक बोलों नये। बहुत निश्चये करूं नये। निर्वाहेंवींण[१३] धरूं नये। ग्रंथ हाती।।४६।।**

श्रोत्यांमध्ये संशय राहील असे बोलू नये पण निश्चयही फार करू नयेत. ग्रंथातील विचार

११) थोरपणें चुकों नये - आपल्याला कोण जाब विचारणार या आढ्यतेने वागू नये. १२) निसुगपणाचे- आळशाचे
१३) निर्वहिवीण - समजाऊन सांगण्याचे सामर्थ्य असल्याविना

समजावून सांगण्याची पात्रता असल्याशिवाय तो ग्रंथ निरूपणासाठी घेऊ नये.

**जाणपणें पुसों नये[१४]। अहंभाव दिसों नये। सांगेन ऐसे म्हणों नये। कोणीयेकांसी।।४७।।**

जाणकाराची भावना धरून प्रश्न विचारू नयेत. विचारताना 'मी'पणा दिसू नये. ''मी सर्व सांगतो'' असे अहंकाराने म्हणून प्रश्नकर्त्याला उत्तर सांगू नये. (अहंतागुणे सर्वही दुःख होते, हा आशय)

**ज्ञानगर्व धरूं नये। सहसा छळणा करूं नये। कोठें वाद घालू नये। कोणीयेकांसी ।।४८।।**

ज्ञानाचा गर्व धरू नये. कोणाचा छळ (त्याचा बुद्धिभेद करून) करू नये. पात्र/अपात्र यांचा विचार न करता कोठेतरी कोणत्याही व्यक्तीशी वाद घालू नये. (वादविवाद हा सुखसंवाद व्हावा.)

**स्वार्थबुद्धी जडों नये। कारबारीं पडों नये। कार्यकर्ते होऊं नये। राजद्वारीं ।।४९।।**

स्वार्थबुद्धी अंगी जडू देऊ नये. कोणाच्या कारभारात भाग घेऊ नये. राजदरबारात निस्पृहाने कार्यकर्ता होऊ नये. (सेवक होऊ नये)

**कोणास भर्वसा देऊं नये। जड भिक्षा मागों नये। भिक्षेसाठीं सांगों नये। परंपरा आपुली ।।५०।।**

कोणालाही भलती आश्वासने देऊ नयेत. (जड म्हणजे) देण्यास कठीण अशी भिक्षा मागू नये. लोकांनी भिक्षा घालावी म्हणून आपली (गुरुपरंपरा अगर) उपासनापरंपरा सांगू नये.

**सोइरिकींत पडों नये। मध्यावर्ति घडों नये। प्रपंचाची जडों नये। उपाधी आंगीं ।।५१।।**

(विवाहस्थळे सांगून) सोयरीकीत पडू नये. त्यात मध्यवर्ती बनू नये. प्रापंचिक उपाधी मागे लावून घेऊ नयेत.

**प्रपंचप्रस्ती[१५] जाऊं नये। बाष्कळ अन्न खाऊं नये। पाहुण्यासरिसें घेऊं नये। आमंत्रणें कदां ।।५२।।**

प्रपंच्या-हाती निस्पृहाने सापडू नये. (प्रपंचप्रस्थी हा पाठभेद आहे. जेथे प्रपंचाचे प्रस्थ असेल तेथे सापडू नये.) तेथील अपवित्र अन्न घेऊ नये. पाहुण्यांसारखी प्रापंचिकांनी केलेली आमंत्रणे घेऊ नयेत.

**श्राद्ध पक्ष सटी सामासें। शांती फळशोबन बारसें। भोग राहण बहुवसें। नवस व्रतें उद्यापनें ।।५३।।**
**तेथें निस्पृहें जाऊं नये। त्याचें अन्न खाऊं नये। येळिलवाणें करूं नये। आपणासी ।।५४।।**

निस्पृहाने श्राद्ध, पक्ष, षष्ठीपूजन, षण्मासिक श्राद्धे, शांती, (फळशोधन), गर्भाधान, बारसे, भोग (मेजवानी), राहाण (भुते, दैवते शांतीसाठी केलेली ब्राह्मणभोजने), नवस, व्रते व उद्यापने अशा ठिकाणी भोजनास जाऊ नये. तेथील अन्न खाऊ नये. हे अन्न ग्रहण केल्याने ओशाळल्याप्रमाणे वाटते. म्हणून तसे आपण होऊ नये.

१४) जाणपणें पुसों नये - परीक्षा पाहण्यासाठीच विचारू नये १५) प्रपंच प्रस्ती - विवाहादी प्रसंगी

**लग्नमुहूर्तीं जाऊं नये। पोटासाठी गाऊं नये। मोलें[१६] कीर्तन करूं नये। कोठेंतरी ।।५५।।**

लग्नमुहूर्ताला निस्पृहाने जाऊ नये. उदरभरणासाठी गाणे गाऊ नये. बिदागी घेऊन कोठेही कीर्तन करू नये.

**आपली भिक्षा सोडूं नये। वारें[१७] अन्न खाऊं नये। निस्पृहासि घडों नये। मोलयात्रा ।।५६।।**

आपली भिक्षेची प्रथा सोडू नये. (वारे म्हणजे) वार लावून अन्न घेऊ नये. निस्पृहाने दुसऱ्याचे पैसे घेऊन यात्रेला जाऊ नये.

**मोले सुकृत करूं नये। मोलपुजारी[१८] होऊं नये। दिल्हा तरी घेऊं नये। इनाम निस्पृहें ।।५७।।**

पुण्यकर्म पैसे घेऊन करू नये. पगार घेऊन पुजारीपण करू नये. राजाने (अगर अन्य कोणी) इनाम देऊ केले तर निस्पृहाने त्याचा स्वीकार करू नये.

**कोठें मठ करूं नये। केला तरी तो धरूं नये। मठपती होऊन बैसों नये। निस्पृह पुरुषें ।।५८।।**

कोठेही मठ करू नये. केला तरी त्यात नित्य राहू नये म्हणजेच निस्पृहाने मठपति होऊन राहू नये.

**निस्पृहें अवघेंचि करावें। परी आपण तेथे न संपडावें। परस्परें उभारावें। भक्तिमार्गासी ।।५९।।**

निस्पृहाने परमार्थासाठी सारे काही करावे परंतु आपण त्यात आसक्त होऊन जाऊ नये. भक्तिमार्गाची उभारणी हा मुख्य हेतू तो साधण्यासाठी लोकांकरवी परस्पर कार्य करावे.

**प्रेत्नेंविण राहों नये। आळस दृष्टी आणूं नये। देह अस्तां पाहों नये। वियोग उपासनेचा ।।६०।।**

प्रयत्न केल्याविना राहू नये. आळसाला डोळ्यांपुढेसुद्धा येऊ देऊ नये. आपण हयात असताना उपासनेत खंड पडू देऊ नये. (श्रीसमर्थांनी यत्नवादाची मांडणी अशा प्रकारे अनेक प्रसंगी केली आहे.)

**उपाधीमध्यें पडों नये। उपाधी आंगी जडों नये। भजनमार्ग मोडूं नये। निसंगळपणें[१९] ।।६१।।**

महंताने उपाधीमध्ये (अडकून) पडू नये. आपल्या अंगी उपाधी चिकटू देऊ नये. (निसंगळपणे म्हणजे) अजागळपणे भजनाचा मार्ग सोडून देऊ नये.

**बहुउपाधी करूं नये। उपाधीविण कामा नये। सगुणभक्ति सोडूं नये। विभक्ति खोटी ।।६२।।**

उपाधी किंवा व्याप फार वाढवू नये पण व्याप करणे अजिबातच सोडूनही देऊ नये. (प्रमाणशीर वागण्याचा हा उपदेश आहे, त्यामुळे उद्वेग होत नाही.) सगुणभक्ती (सगुणाची भक्ती) सोडू नये. पण देवाहून वेगळे राहून भक्ती करू नये. ('तत्त्वमसि' महावाक्याचे आकलन झाले तरीही साधनेचा भक्तिमार्ग सोडू नये हा आशय)

**बहुसाल धांवो नये। बहुसाल राहों नये। बहुत कष्ट करूं नये। असुदें[२०] खोटें ।।६३।।**

१६) मोलें - बिदागी ठरवून १७) वारे - वार लावून १८) मोलपुजारी - पगारीपुजारी १९) निसंगळपणे - अव्यवस्थिपणामुळे २०) असुदें - आयते

फार भ्रमंती करू नये. पण फार वेळ एका जागीही वास्तव्य करू नये. फार कष्ट करू नयेत. पण उगीच आळशीपणाने बसूनही राहू नये.

**बहुसाल बोलों नये। अबोलणें कामा नये। बहुत अन्न खाऊं नये। उपवास खोटा ।।६४।।**

बोलणे फार नसावे तरीपण अगदी अबोलही राहू नये. फार अन्न खाऊ नये. तसेच फार उपवासही करू नयेत.

**बहुसाल निजों नये। बहुत निद्रा मोडूं नये। बहु नेम धरूं नये। बाष्कळ खोटें ।।६५।।**

अतिनिद्रा नसावी त्याप्रमाणे निद्रेचा फारसा मोह करणेही टाळावे. फार नेम धरू नयेत. पण नियमरहितही-बाष्कळपणे राहू नये.

**बहु जनीं असों नये। बहु आरण्य सेऊं नये। बहु देह पाळूं नये। आत्महत्या खोटी ।।६६।।**

फार वेळ लोकात राहू नये, आणि नित्य अरण्यवासही नसावा, देहाची फार कदर करू नये पण आत्महत्याही करणे वाईट.

**बहु संग धरूं नये। संतसंग सांडूं नये। कर्मठपण कामा नये। अनाचार खोटा ।।६७।।**

लोकांचा फार संग नसावा पण संतसंगती सोडू नये. कर्मठपणा आणि कर्मनष्टपणा दोहोंचा अतिरेक नसावा.

**बहु लौकिक सांडूं नये। लोकाधेन होऊं नये। बहु प्रीती कामा नये। निष्ठुरता खोटी ।।६८।।**

लोकांशी व्यवहार मर्यादेत असावा. लोकांच्या अधीनही (जीवन) असू नये. अतिप्रीती आणि निष्ठुरता यांचा अतिरेक नसावा.

**बहु संशये धरूं नये। मुक्तमार्ग कामा नये। बहु साधनीं पडों नये। साधनेंवीण खोटें ।।६९।।**

संशयीपणा फार धरू नये पण अगदीच स्वच्छंदीपणाही नसावा. फार साधना करण्याच्या मागे लागू नये. तरीपणा साधना मुळीच न करणे हेही वाईट आहे.

**बहु विषये भोगूं नये। विषयत्याग करतां नये। देहलोभ धरूं नये। बहु त्रास खोटा ।।७०।।**

(पंचविषय शरीराने भोगता येतात) विषयांचा भोग फार नसावा त्याप्रमाणे त्यांचा सर्वस्वी त्यागही करता येत नाही. देहाचा प्रमाणाबाहेर लोभ धरू नये. पण देहाला उपासनेच्या निमित्ताने उगाचच कष्टवू नये. (हटवादी साधना नसावी)

**वेगळा अनुभव घेऊं नये। अनुभवेंवीण कामा नये। आत्मस्थिती बोलों नये। स्तब्धता खोटी ।।७१।।**

प्रत्येक गोष्टीचा वेगळा अनुभव घेऊ नये. पण काही गोष्टींचा अनुभव मात्र अवश्य घ्यावा. आपली (आत्मस्थिती) अंतरामधील स्वरुपानुभवाची स्थिती बोलून दाखवू नये पण त्याबरोबरच अगदीच अबोल राहणे खोटे आहे. (योग्य नाही.)

**मन उरों देऊं नये। मनेंवीण कामा नये। अलक्ष वस्तु लक्षा नये। लक्षेंवीण खोटें ।।७२।।**

मन शिल्लक राहू नये. (उन्मनी अवस्थेत मनाचे अमन होते) पण मनाशिवाय (जगामध्ये जगता येणार नाही म्हणून) राहू नये. परमेश्वर ही पाहता येण्याजोगी वस्तू नाही, हे खरे पण ध्यान केल्याविना राहाणे योग्य नव्हे.

**मनबुद्धीअगोचर[२१]। बुद्धीवीण अंधकार। जाणीवेचा पडो विसर। नेणीव खोटी ।।७३।।**

परब्रह्म हे मन आणि बुद्धी यांना आकलन होत नाही. तरीपण बुद्धीने सारासारविवेकाची कास धरली नाही तर अज्ञानाचा अंधकार पसरतो. परब्रह्मप्राप्तीसाठी 'मी'पणाची जाणीव नष्ट झाली पाहिजे हे खरे पण नुसती नेणीवही चांगली नव्हे. (जाणीव व नेणीव या दोन्ही लुप्त झाल्या म्हणजे ज्ञानाचे रुपान्तर विज्ञानात किंवा प्रत्यक्ष अनुभूतीमध्ये होते)

**ज्ञातेपण धरूं नये। ज्ञानेंवीण कामा नये। अतर्क्य वस्तु तर्का नये। तर्केंवीण खोटें ।।७४।।**

मी ज्ञाता आहे असा ज्ञातेपणाचा अभिमान धरू नये पण आत्मज्ञानाशिवाय राहू नये.ब्रह्मवस्तू तर्काच्या अतीत आहे हे जरी खरे असले तरी तर्काशिवाय राहू नये. (जास्तीत जास्त मर्यादेपर्यंत तर्कशक्ती वापरावी)

**दृश्यस्मरण कामा नये। विस्मरण पडों नये। कांहीं चर्चा करूं नये। केलीयावीण न चले ।।७५।।**

अंतर्मुख होण्यासाठी बाह्य दृश्याचे स्मरण असू नये. पण ऐहिकामध्ये दृश्याचे विस्मरण होऊ नये. चर्चेतून काही निष्पन्न होत नाही तथापि चर्चा केल्याविना निरुपण कळत नाही हे सुद्धा खरे आहे.

**जगीं भेद कामा नये। वर्णसंकर करूं नये। आपला धर्म उडऊं नये। अभिमान खोटा ।।७६।।**

जगामध्ये भेद असता कामा नये, पण भेद नको म्हणून वर्णसंकर करू नये. आपण आपला धर्म सोडू नये, टाकू नये, पण धर्माचा दुराभिमानही खरा नाही.

**आशाबद्धत बोलों नये। विवेकेंवीण चालों नये। समाधान हालों नये। कांहीं केल्यां ।।७७।।**

मनामध्ये स्वार्थीपणा किंवा कशाची आशा ठेवून बोलू नये. विवेक केल्याखेरीज वर्तन करू नये, आणि काय वाटेल ते झाले तरी आपले समाधान भंगू देऊ नये.

**अबद्ध[२२] पोथी लेहों नये। पोथीवीण कामा नये। अबद्ध वाचूं नये। वाचिल्यावीण खोटें ।।७८।।**

ग्रंथ अव्यवस्थितपणे लिहू नये. पण लिहून घेतल्याविना राहू नये. (श्रीसमर्थांच्या मठातून अनेक ग्रंथांच्या नकला करून घेण्याचे काम त्याकाळी चालत असे त्याला उद्देशून हे ओवीचरण आहेत) अशुद्ध वाचन करू नये व वाचल्याविना राहू नये. वाचनच न करणे चुकीचे आहे.

---

२१) मनबुद्धी अगोचर - (ब्रह्मस्वरूप) मन-बुद्धी यांना कळणार नाही २२ ) अबद्ध - विषयांची सुसंगति नसलेली

**निस्पृहें वगत्रुत्व सांडूं नये। आशंका घेतां भांडों नये। श्रोतयांचा मानूं नये। वीट कदा ।।७९।।**

निस्पृहाने निरुपण करणे सोडू नये पण कोणी शंका घेतल्या तर त्यावेळी श्रोत्यांशी भांडू नये. श्रोत्यांचा कधीच कंटाळा मानू नये.

**हे सिकवण धरितां चित्तीं। सकळ सुखें वोळगती[२३]। आंगीं बाणे महंती। अकस्मात ।।८०।।**

निस्पृहाने ही शिकवण ध्यानात ठेवली तर सर्व सुखे त्याला लाभतात आणि पाहाता पाहाता त्याच्या अंगी महंतीची लक्षणे बाणतील.

(निस्पृह आणि महंत हे दोन वेगळे शब्द असले तरी श्रीसमर्थ ते समानार्थी शब्द म्हणूनच योजतात. महंत हा एकप्रकारे समाजाचा पुढारीच असतो. तो निस्पृह तर असलाच पाहिजे पण त्यांनी आचरणात विशिष्ट अशी पथ्ये सांभाळलीच पाहिजेत. त्या सर्वांचे तपशीलवार विवेचन या समासात पहावयास मिळते. काही महंतांना देशामध्ये दूरच्या ठिकाणी राहून मठपती होण्याची आज्ञा होती तर काहींना नेहमी भ्रमणे करण्याची तर काहींना अन्य विविध कामे करण्याची आज्ञा श्रीसमर्थांनी दिली होती.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहलक्षणनाम समास प्रथम।। १।।**

# द. १८-३ निस्पृहसिकवण

या समासाचे नाव आहे निस्पृहसिकवण. महंत बनून समाजाला अध्यात्म शिकवण्यास माणसाने कोणती तयारी करावी याचे थोडक्यात वर्णन येथे आढळते. श्रीसमर्थ आपल्या वाङ्मयामध्ये वारंवार असे बजावतात की, आळस आणि वाईट संगती माणसाच्या आयुष्याचा नाश करतात. ज्याच्यापाशी विद्या नाही, शहाणपण नाही, उत्तम गुण नाहीत आणि शिकण्याची इच्छा नाही, अशा माणसाचे जीवन वाया जाते. जीवन जर सार्थकी लावायचे असेल तर माणसाने प्रथम आळस बाजूस सारावा, बळेच साधना करावी, अवगुण सांडून उत्तम गुणांचा अभ्यास करावा. एकांत सेवन करून खूप ग्रंथ अभ्यासावे. त्यांचा अर्थ व्यवस्थितपणे समजून घ्यावा. त्या अर्थाची प्रचीती घ्यावी आणि मग मोठ्या आत्मविश्वासाने ठासून कथा करावी.

समाजाला अध्यात्माची शिकवण देण्यासाठी श्रीसमर्थांनी असंख्य महंत तयार केले. त्यांना दिलेल्या उपदेशाचा भाग या समासामध्ये आढळतो.

**।। श्रीराम।।**

**दुल्लभ[१] शरीरीं दुल्लभ आयुष्य। याचा करूं नये नास। दास म्हणे सावकास। विवेक पाहावा ।।१।।**

जगामध्ये मानवदेह प्राप्त होणे दुर्लभ आणि त्यातही (आरोग्यासह) आयुष्य मिळणे अधिकच दुर्लभ असते. त्याचा नाश करू नये. शांतपणे विचार पहावा.

**न पाहातां उत्तम विवेक। आवघा होतो अविवेक। अविवेकें प्राणी रंक । ऐसा दिसे ।।२।।**

२३) वोळगती - प्राप्त होतात. १) दुल्लभ - दुर्लभ

असा विवेक न केल्यास सारा अविचार होतो. त्यामुळे मनुष्य भिकाऱ्यासारखा होतो; दैन्यवाणा होतो.

**हें आपलें आपण केलें। आळसें उदास नागविलें। वाईट संगतीनें बुडविलें। देखतदेखतां ।।३।।**

याला कारण आपले आपणच असतो. आळस आणि उदासवृत्ती यांनी माणूस नागवला जातो. दुर्जनांच्या संगतीने माणूस (दुःख आणि गरीबीत) बुडून जातो.

**मूर्खपणाचा अभ्यास जाला। बाष्कळपणें[२] घातला घाला। काम चांडाळ उठिला। तरुणपणीं ।।४।।**

मूर्खपणा अंगवळणी पडला, पोरकटपणाच्या वागण्याच्या लीला करू लागला, त्यातच तारुण्यसुलभ कामवासनांची उठावणी झाली.

**मूर्ख आळसी आणी तरुणा। सर्वांविषीं दैन्यवाणा। कांहीं मिळेना कोणा[३]। काये म्हणावें ।।५।।**

त्यामुळे मूर्ख, आळशी असा तरुण होतो. सर्वच बाबतीत तो दैन्यवाणा होतो. तो कोणाशीही जुळवून घेऊ शकत नाही, याला काय म्हणावे?

**जें जें पाहिजें तें तें नाहीं। अन्नवस्त्र तेंहि नाहीं। उत्तमगुण कांहींच नाहीं। अंतर्यामी ।।६।।**

जीवनाला आवश्यक त्यापैकी काही त्याला लाभत नाही. अन्न, वस्त्र यांनाही तो पारखा होतो. (कारण) त्याच्याकडे अंतःकरणात एकही सद्‌गुण नसतो.

**बोलतां येना बैसतां येना। प्रसंग कांहींच कळेना। शरीर मन हें वळेना। अभ्यासाकडे ।।७।।**

त्याला नीट बोलता, बसता येत नाही, प्रसंगमान काहीच कळत नाही. शरीर आणि मन अभ्यासाकडे वळत नाही.

**लिहिणें नाहीं वाचणें नाहीं। पुसणें नाहीं सांगणें नाहीं। नेमस्तपणाचा अभ्यास नाहीं। बाष्कळपणें।।८।।**

लिहिणे, वाचणे, कोणाला काही विचारणे किंवा सांगणे काही जमत नाही. वायफळ गोष्टीमुळे नियमितपणाचा अभ्यास घडत नाही.

**आपणास कांहींच येना। आणी सिकविलेंही मानेना। आपण वेडा आणी सज्जना। बोल ठेवी ।।९।।**

आपणाला स्वतःला तर काही येत नाही आणि कोणी शिकविले तर तेही ऐकत नाही. स्वतः वेडगळ असतो आणि सज्जनांना उगाच दोष देतो.

**अंतरीं येक बाहेर येक। ऐसा जयाचा विवेक। परलोकाचे सार्थक। कैसें घडे ।।१०।।**

आत एक आणि बाहेर एक (मनात एक आणि जनात एक) अशी ज्याची वागणूक असते. (अविवेकी वागणे असेल) त्याला परलोकाचे सार्थक कसे घडणार?

**आपला संसार नासला। मनामधें प्रस्तावला। तरी मग अभ्यास केला। पाहिजे विवेकाचा।।११।।**

---

२) बाष्कळपणें - स्वच्छंदीपणाने ३) 'काहीं मिळेना कोणा' - कोणाशीही पटत नाही.

अशा प्रकारे संसारात वाया गेला त्यामुळे पश्चात्ताप झाला असेल त्याने विवेकाची कास धरली पाहिजे.

**येकाग्र करूनियां मन। बळेंचि धरावें साधन। येत्नीं आळसाचें दर्शन। होऊंच नये ।।१२।।**

मनाची एकाग्रता करून (मनावर) सक्ती करून साधना केली पाहिजे. परमार्थ साधनेच्या प्रयत्नात आळसाचे दर्शनसुद्धा होऊ देऊ नये.

**अवगुण अवघेचि सांडावे। उत्तम गुण अभ्यासावे। प्रबंध पाठ करीत जावे। जाड अर्थ[४] ।।१३।।**

अंगामध्ये भिनलेले सर्व अवगुण सोडून द्यावे. उत्तम गुणांचा अभ्यास करावा. खोल अर्थाचे प्रबंध (ग्रंथ) पाठ करावे. त्यातील अर्थ ध्यानात ठेवावा.

**पदप्रबंद श्लोकप्रबंद। नाना घाटी मुद्रा छंद। प्रसंगज्ञानेंचि आनंद। होत आहे ।।१४।।**

विविध प्रकारच्या शब्दरचना असलेले श्लोक आणि पदे तसेच अनेक घाटी, मुद्रा व छंद पाठ करावे. प्रसंगानुसार त्यांचा उपयोग (कथेमध्ये) केल्यास सर्वांना आनंद होतो.

**कोणे प्रसंगीं काये म्हणावें। ऐसें समजोन जाणावें। उगेंचि वाउगें सिणावें। कासयासी ।।१५।।**

कोणत्या वेळी कोणत्या प्रसंगात काय म्हणावे याचे तारतम्य ठेवावे. उगाच (काहीतरी म्हणून) व्यर्थ शीण का घ्यावा?

**दुसऱ्याचें अंतर जाणावें। आदर देखोन म्हणावें। जें आठवेल तें गावें। हें मूर्खपण।।१६।।**

श्रोत्यांच्या मनातील आवड अगोदर जाणून घ्यावी आणि त्यानुसारच पद्य म्हणण्याची निवड करावी. उगीच आपणास आठवले म्हणून ते गाणे म्हणू लागणे हा वेडेपणा होय.

**ज्याची जैसी उपासना। तेंचि गावें चुकावेना। रागज्ञाना ताळज्ञाना। अभ्यासावें ।।१७।।**

ज्यांची उपासना जशी असेल त्या उपासनेचे कौतुक त्यांच्यापुढे गावे. यात चूक करू नये. (स्वा. ४ द. ७-९ मधील १७ ते २२ ओव्या पहाव्या म्हणजे जास्त खुलासा होईल) गाण्यासाठी रागांचा व तालसुरांचा अभ्यास करावा.

**साहित[५] संगीत प्रसंग मानें। करावीं कथेंचीं घमशानें[६]। अर्थांतर श्रवणमननें। काढीत जावें।।१८।।**

काव्य, वाङ्मय यासारख्या साहित्याचा, संगीताचा अभ्यास करावा व त्याच्या बळावर प्रसंगाचे भान राखून मोठ्या धडाक्याने कथा (कीर्तने) करावी. (घमंड = प्रेमाची लयलूट संदर्भ स्वा. ८ द. १९-७-१ पहा) श्रवण व मननाने अर्थांच्या विविध छटा किंवा अर्थाचे रंगतरंग शोधावे.

**पाठ उदंडचि असावें। सर्वकाळ उजळीत जावें। सांगितलें गोष्टीचें असावें। स्मरण अंतरीं।।१९।।**

पाठान्तर उदंड करावे आणि ते पाठान्तर विसरू नये म्हणून नित्य त्याची उजळणी करावी.

४) जाड अर्थ - अर्थ गंभीर ५) सहित - साहित्य ६) घमशाने - लयलूट

जी गोष्ट आपण सांगितली (किंवा दुसऱ्याने आपणास सांगितली तिचे स्मरण ठेवावे. पाठान्तर आणि योग्यवेळी त्याचे स्मरण झाल्यास प्रबोधन प्रभावी होते.)

**अखंड येकांत सेवावा। ग्रन्थमात्र धांडोळावा । प्रचित येईल तो घ्यावा। अर्थ मनीं ।।२०।।**

नेहमी एकान्तामध्ये अनेक ग्रंथांचे वाचन करावे. ग्रंथ चाळीत असता ज्या अर्थाची (किंवा प्रमेयांची) प्रचीती येईल त्याचा स्वीकार करावा.

(महंताचे प्रबोधन यशस्वी व्हावे यासाठी येथे दिलेल्या सूचना बहुमोल आहेत. अध्यात्मिक ग्रंथ एकान्तात वाचणे आणि चव्हाट्यावर बसून वाचणे यात खूप फरक आहे. डोळ्यांना झापड लावून विचार ग्रहण करू नयेत. हे विचार स्वातंत्र्य समर्थ सर्वांना देतात. प्रचिती येत असेल तोच ग्रंथातील विचार स्वीकारार्ह असतो; अन्य भाग गौण समजावा. पाठान्तर, त्याचे स्मरण आणि समयसूचकता हे सद्‌गुण निस्पृहाच्या अंगी हवेत; हे सांगणारा हा समास लहान असला तरी मननीय आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे निस्पृहसिकवणनिरूपणनाम समास तृतीय।।३।।**

## दासबोध-प्रबोध : प्रश्नपत्रिका २ री

**(द. ११-६, महंत लक्षण, १४-१ निस्पृह लक्षण, १८-३ निस्पृह सिकवण वर आधारित)**

प्र. १ (१) महंताचे अक्षर, बोलणे, चालणे इ. कसे असावे याबद्दलची ओवी लिहा.

(२) श्रीसमर्थांनी स्वतःच्याच बोलण्याबद्दल ज्या ओवीत स्वतःच अभिप्राय लिहिला आहे ती ओवी लिहा.

(३) मानवी देह दुर्लभ आहे, विवेकाने तो सार्थकी लावावा अशा अर्थाची ओवी लिहा.

प्र. २ प्रभु रामचंद्राच्या कोणत्या गुणांचा निर्देश द. ११-६ मध्ये केला आहे? आणि तो कोणत्या संदर्भात आहे?

प्र. ३ लोकांचे मनोगत राखण्यासाठी निस्पृहाला अनेक पथ्ये सांभाळावी लागतात. एकान्तिकता नको, हे सांगणाऱ्या ५ ओव्या लिहा.

प्र. ४ निस्पृहसिकवण (द. १८-३) मधील ओवी क्र. १२ पासून २० पर्यंतच्या ओव्यांच्या अर्थाचा सारांश लिहा.

प्र. ५ श्रीसमर्थांच्या सान्निध्यातील पाच महंतांची नावे सांगून त्यांच्या मठांची गावे सांगा.

(महंतांमध्ये स्त्रियांचाही समावेश होतो)

# दासबोध प्रबोध : स्वाध्याय ३

**(द.१४-६, १५-१,६)**

चातुर्यलक्षणावरील दोन समास आणि चातुर्यविवरण हा समास याचा अभ्यास दासबोध प्रबोध स्तरासाठी होणे अत्यावश्यक का आहे, हे समजण्यासाठी त्या तीन समासांचा सारांश एकत्रितपणे वाचावा म्हणजे आपल्या ध्यानात येईल की निस्पृहास लोभी माणसांच्या जगातच वागावयाचे असल्याने त्याला चातुर्याने वागण्याची आणि स्वार्थपरायण लोकांवर न रागावता अशा लोकांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची कला जमलीच पाहिजे. लो. टिळक यांच्यासारख्या कर्मयोग्याने स्वतःच्या वर्तनामध्ये विवेकाचा समतोल राखण्यासाठी श्रीसमर्थांच्या उपदेशाला प्रमाणभूत मानले होते. 'गीतारहस्य' या ग्रंथामध्ये असे स्पष्ट उल्लेख आपणास काढून दाखविता येतील...

## द. १४-६ : चातुर्यलक्षण

हे दृश्य विश्व भास आहे, मिथ्या आहे, तात्पुरते आहे, असा कोणी कितीही आक्रोश केला तरी माणसाला अखेर या जगातच, येथील मानव-समाजातच आपले जीवन घालवावे लागते. शिवाय जीवनाचा जास्तीत जास्त फायदा होण्यासाठी माणसाने प्रयत्न केला तर तो करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी आहे. म्हणून प्रत्येक माणसाने स्वप्रयत्नाने निरनिराळ्या गुणांचा विकास करावा आणि आपले व्यक्तिमत्व प्रभावशाली करावे, असे श्रीसमर्थ पुनःपुनः सांगत आहेत. प्रत्येक माणूस जगात थोडातरी बदल करू शकतो. तो बदल करण्यास त्याने स्वतःपासून आरंभ करावा. स्वतःमध्ये बदल घडवून आणल्यावर त्याने इतर माणसांमध्ये तसाच बदल घडवून आणण्याचे व्रत स्वीकारावे. अशा रीतीने ज्या प्रकारच्या परिस्थितीत आपण जगात पाऊल टाकले तिच्यामध्ये थोडी का होईना पण सुधारणा करून जग सोडावे. स्वतःमध्ये आणि जगामध्ये कोणत्या प्रकारची सुधारणा करता येणे शक्य आहे, त्याचे वर्णन या समासात आढळते. श्रीसमर्थांच्या सांगण्याचा भावार्थ असा : (एक) माणसाला शहाणपण शिकता येते. (दोन) अंगी नसलेल्या उत्तम गुणांचा मनापासून अभ्यास करावा. (तीन) ऐश्वर्य मिळवून भोगावे. (चार) शरीराने व मनाने झिजावे. (पाच) व्याप वाढवून वैभव भोगावे.(सहा) बहुतांचे अंतरी भरावे. (सात) शहाणे करावे जन आणि पतित करावे पावन. (आठ) जगामध्ये भगवद्‌भजन वाढवावे.

**|| श्रीराम ||**

**रूप लावण्य अभ्यासिता न ये। सहजगुणास[१] न चले उपाये। कांहीं तरी धरावी सोये। अगांतुक[२] गुणाची।।१।।**

माणसाला त्याचे (चेहरा, रंग, उंची इत्यादींमुळे) लाभलेले रूप स्वप्रयत्नांनी पालटता येत

१) सहजगुण - जन्मतः असलेले गुण २) अगांतुक - नवीन

नाही. ते जन्मजात असल्याने त्यावर काही इलाज चालत नाही म्हणून त्याने प्रयत्नसाध्य अशा गुणांच्या किंवा अगांतुक गुणांच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करावा. (येथे श्रीसमर्थ गुणांचे वर्गीकरण दोन भागात करतात. जे उपजत प्राप्त झाले ते सहजगुण आणि प्रयत्नाने प्राप्त होतात ते अगांतुक गुण.)

**काळें माणूस गोरें होयेना। वनाळास[३] येत्न चालेना। मुक्यास वाचा फुटेना। हा सहजगुण ।।२।।**

काळे माणूस (प्रयत्नामुळे) गोरे होऊ शकत नाही. तोंडावर निसर्गतः असलेले व्रण प्रयत्नाने जात नाहीत, मुका मनुष्य बोलू शकत नाही हे त्याचे सहजगुण (किंवा जन्मजात) गुण आहेत.

**आंधळे डोळस होयेना। बधिर तें ऐकेना। पांगुळ पाये घेईना। हा सहजगुण ।।३।।**

आंधळे माणूस डोळस होत नाही, बहिऱ्यास ऐकू येत नाही, पांगळ्यास चालता येत नाही हे उपजत गुण आहेत.

**कुरुपतेचीं लक्षणें। किती म्हणोनि सांगणें। रूप लावण्य याकारणें। पालटेना ।।४।।**

कुरूपतेची अनेक लक्षणे आहेत; किती म्हणून ती सांगावी? म्हणून रूप आणि सौंदर्य प्रयत्नांनी बदलता येत नाही. (असे पहिल्या ओवीत सांगितले)

**अवगुण सोडितां जाती। उत्तम गुण अभ्यासितां येती। कुविद्या सांडून, सिकती। शाहाणे विद्या ।।५।।**

(परंतु अवगुणांचे मात्र असे नाही) अवगुण सोडावयाचे ठरविले तर ते सोडता येतात आणि उत्तम गुण प्रयत्नांनी आत्मसात करता येतात, शहाणा मनुष्य अवगुणांचा त्याग करून उत्तम गुणांचा स्वीकार करतो. (प्रयत्न केला असता मनुष्य स्वतःमध्ये आमूलाग्र बदल अशा प्रकारे करू शकतो. हरतऱ्हेच्या कला, क्रीडा यामध्ये तो प्राविण्य मिळवू शकतो. परोपकार, दयाळूवृत्ती यासारख्या सद्‌वृत्ती तो वाढवू शकतो हा सिद्धांत सुस्पष्टपणे या समासात मांडण्यात आला असल्याने हा समास विद्यार्थ्यांना शाळकरी वयातच पाठान्तराला देण्याइतका महत्त्वाचा आहे.)

**मूर्खपण सांडितां जातें। शाहाणपण सिकता येतें। कारबार करितां उमजतें। सकळ कांहीं ।।६।।**

मूर्खपण सोडावयाचे म्हटले तर सोडता येते व शहाणपण शिकता येते. त्या दृष्टीनेच प्रयत्न केले तर हे सर्व समजते.

**मान्यता आवडे जीवीं। तरी कां उपेक्षा करावी। चातुर्येंविण उंच पदवी। कदापी नाहीं ।।७।।**

आपल्याला जर लोकांमध्ये मान्यता हवी अशी आवड असेल तर सद्‌गुण मिळविण्याच्या प्रयत्नांची उपेक्षा आपण का बरे करावी? चातुर्य किंवा शहाणपण अंगी असल्याविना श्रेष्ठपणा कधीच मिळत नाही.

**ऐसी प्रचित येते मना। तरी कां स्वहित कराना। सन्मार्गें चालतां, जनां। सज्जना माने ।।८।।**

३) वनाळ - देवीचे व्रण असलेला चेहरा

या गोष्टीची जीवनात प्रचिती येते तर मग स्वतःचे हित करण्याच्या प्रयत्नात टाळाटाळ का करावी? जो सन्मार्गाने जातो तोच सज्जनांना आवडतो.

**देहे नेटकें श्रुंघारिलें। परी चातुर्येंविण नासलें। गुणेंविण साजिरें केलें। बाष्कळ जैसें ।।९।।**

स्वतःचे शरीर कितीही (वस्त्रालंकाराने) सजविले तरी शहाणपणाविना ते वाया जाते. एखाद्या वेड्याला उगाचच गुणावाचून सजविल्यासारखे हे होते.

**अंतर्कळा श्रुंघारावी। नानापरी उमजवावी। संपदा मेळऊन भोगावी। सावकास ।।१०।।**

माणसाने आपले अंतरंग सद्‌गुणांनी श्रृंगारावे. नाना प्रकारचे ज्ञान त्यात साठवावे. (त्याच्या सहाय्याने) संपत्ती किंवा वैभव प्रथम प्राप्त करावे आणि सावकाश त्याचा उपभोग घ्यावा. (सन्मार्गाने संपत्ती प्राप्त करून तिचा उपयोग करण्याचा उपदेश विद्यार्थ्यांना प्रेरकच आहे.)

**प्रेत्न करीना सिकेना। शरीर तेंहि कष्टवीना। उत्तम गुण घेईंना। सदाकोपी ।।११।।**

जो मनुष्य स्वतः प्रयत्न करीत नाही, शिकत नाही, कष्ट करीत नाही, आणि उत्तम गुणांचा स्वीकार करीत नाही तो सदा कोपिष्ट आणि चिडचिड करणारा असतो.

**आपण दुसऱ्यास करावें। तें उसिणें सवेंचि घ्यावें। जना कष्टवितां कष्टावें। लागेल बहु ।।१२।।**

आपण दुसऱ्याला जे केले असेल त्या उसन्याची परतफेड तशीच करावी लागते. लोकाला आपण त्रास दिला तर आपणालासुद्धा त्यांचा त्रास सहन करावा लागतो म्हणून आपण कष्टी होतो.

**न्यायें वर्तेल तो शाहाणा। अन्याइ तो दैन्यवाणा। नाना चातुर्याच्या खुणा। चतुर जाणे ।।१३।।**

जो न्यायाने वागतो तो शहाणा समजावा व अन्यायाने वागतो तो दैन्यवाणा होय. नाना प्रकारे चातुर्याने कसे वागावे याची लक्षणे शहाण्या लोकांनाच ठाऊक असतात.

**जें बहुतांस मानलें। तें बहुतीं मान्य केलें। येर तें वेर्थचि गेले। जगनिंद्य ।।१४।।**

जे पुष्कळांच्या पसंतीस पडते तिचा स्वीकार त्यांच्याकडून होतो. पुष्कळांना जे नापसंत असते ते जगाने निंद्य ठरविले असल्याने व्यर्थ जाते.

**लोक आपणासि वोळावे। किंवा आवघेच कोंसळावे[४]। आपणास समाधान फावे। ऐसें करावें।।१५।।**

अनेक लोक आपणास अनुकूल व्हावेत की प्रतिकूल, हे ज्याचे त्याने ठरवावे आणि आपणास ज्यामुळे समाधान लाभेल अशीच वर्तणूक ठेवावी. (वरील ३ ओव्यांमध्ये वागताना लोकप्रियता कशी मिळवावी याची जणू सूत्रेच दिली आहेत. विशेषतः लोकशाही जमान्यातील कार्यकर्त्यांना ती चांगलीच मार्गदर्शक आहेत.)

४) कोंसळावे - विरुद्ध जावे

**समाधानें समाधान वाढे। मित्रिनें मित्रि जोडे। मोडितां क्षणमात्रें मोडे। बरेपण ॥१६॥**

आपण दुसऱ्यास समाधान मिळू दिले असता आपणासही ते लाभते. इतरांशी मैत्रीचे गोड संबंध ठेवले असता त्याची परत पावती तशीच मिळते. (चांगले संबंध जुळविण्यास बराच काळ लागतो) पण मैत्रीचे संबंध क्षणामध्ये बिघडणे शक्य असते.

**अहो कांहो, अरे कारें। जनीं ऐकिजेतें किं रे। कळत असतांच कां रे। निकामीपण ॥१७॥**

'अहो' म्हटले असता 'काहो' असे उत्तर येते आणि 'अरे' म्हटल्यास लगेच 'कारे' असे उत्तर येते. हे आपण नित्य ऐकत असताना आपण नादानपणाने का बरे वागावे?

**चातुर्यें श्रृंघारे अंतर। वस्त्रें श्रृंघारे शरीर। दोहिंमधें कोण थोर। बरें पाहा ॥१८॥**

अंतरंग चातुर्याने श्रृंगारले जाते आणि शरीर चांगल्या वस्त्राने शोभिवंत दिसते. या दोहोमध्ये कोणते थोर (किंवा श्रेयस्कर) आहे? याचा आपणच विचार करावा.

**बाह्याकार श्रृंघारिलें। तेणें लोकांच्या हातासि काये आलें। चातुर्यें बहुतांसि रक्षिलें। नाना प्रकारें ॥१९॥**

आपले शरीर बाह्यात्कारे वस्त्रे अलंकार यांनी सजविले तर त्यामुळे लोकांना कोणता लाभ होणार? (अर्थात कोणताही नाहीच पण उलट आपल्या छानछोकीपणाचा तिरस्कारच होईल काही जण मत्सरही करतील) पण आपल्या शहाणपणाने लोकांचे संकटापासून रक्षण आपणास करता येईल.

**बरें खावें बरें जेवावें। बरें ल्यावें बरें नेसावें। समस्तीं बरें म्हणावें। ऐसी वासना ॥२०॥**

आपण चांगले खावे, प्यावे, चांगले वस्त्र नेसावे, पांघरावे, लोकांनी आपणास बरे म्हणावे अशीच वासना सर्वसामान्य माणसाला असते.

**तनें मनें झिजावें। तेणें भलें म्हणोन घ्यावें। उगेंचि कल्पितां, सिणावें। लागेल पुढें ॥२१॥**

पण जो तनमनपूर्वक लोकांसाठी झिजतो त्यालाच लोक 'भला माणूस' म्हणतात. जो उगाच (भलेपण मिळविण्याबद्दलच्या) नुसत्या कल्पनाच करीत बसतो त्याला (भलेपणाचा लाभ न होता उलट) कष्टीच व्हावे लागते. (कोणत्या क्रियेने काय घडते याचे सोप्या शब्दात हे विवेचन वरील दोन ओव्यात केले आहे. आपल्या वासना कोणत्या असतात व त्या फलद्रूप का होत नाहीत हे आपणास कळले पाहिजे.)

**लोकीं कार्यभाग आडे। तो कार्यभाग जेथें घडे। लोक सहजचि वोढे। कामासाठीं ॥२२॥**

लोकांचे एखादे काम अडून राहिले असता ते ज्या माणसामुळे (अडचणी बाजूला होऊन) पूर्ण होऊ शकते त्याच्याकडेच लोक कामासाठी आकर्षित होतात.

**म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें। तेणें आपण सुखी व्हावें। दुसऱ्यास कष्टवितां, कष्टावें। लागेल स्वयें ॥२३॥**

म्हणून दुसऱ्यांना आपण सुखी करावे त्यामुळे आपणासही सुख मिळते, आणि दुसऱ्यास

आपण त्रास किंवा पीडा केली तर आपणासही कष्टी व्हावे लागते. (सुख प्राप्तीचा खरा मार्ग या ओवीमध्ये श्रीसमर्थांनी अगदी सोप्या भाषेत सांगितला आहे. सर्व संतांचा हाच अभिप्राय आहे. पुणे येथील साधु वासवानी यांच्या पुतळ्याच्या खाली सुखी होण्याचा हाच सुलभ उपदेश रेखून ठेवला आहे.)

**हें तों प्रगटचि आहे। पाहिल्याविण कामा नये। समजणें हा उपाये। प्राणीमात्रांसी।।२४।।**

या गोष्टी साहजिक व उघडच आहेत पण त्यांचे नीट परीक्षण केल्याशिवाय पटत नाहीत. त्यासाठी त्या समजून घेणे हाच शहापणाचा मार्ग आहे.

**समजले आणि वर्तले। तेचि भाग्यपुरुष जाले। यावेगळे उरले। ते करंटे पुरुष ।।२५।।**

जे एखादी गोष्ट नुसतीच समजून घेत नाहीत तर त्यानुसार आचरणात आणतात तेच लोक भाग्यवान होतात; बाकीचे लोक करंटे असतात. (ज्याला काही उमजत नाही तो करंटा नव्हे तो दुर्दैवी म्हटले पाहिजे. पण ज्याला समजते पण हातून प्रत्यक्ष सत्कृत्य होत नाही तोच करंटा होय.)

**जितुका व्याप तितुकें वैभव। वैभवासारिखा हावभाव। समजलें पाहिजे, उपाव-। प्रगटचि आहे ।।२६।।**

माणूस जेवढा व्याप वाढवील तितके त्याचे वैभव वाढते व त्या वैभवासारखा उद्योग हे समजले पाहिजे. त्याचा उपाय स्पष्ट आहे. (वैभवासाठी उद्योग हवा आणि उद्योगाचा व्याप जितका वाढेल तितके वैभवही वाढते. सर्व उद्योगपतींचा हाच अनुभव आहे. ''व्याप तितका संताप'' ही म्हण श्रीसमर्थांनी मोडीत काढली आहे असे या ओवीत आढळून येते. हा उपदेश पुरुषार्थाचा आहे. ही शिकवण बालमनावर रूजविली पाहिजे.)

**आळसें कार्येभाग नासतो। साक्षेप होत होत होतो। दिसते गोष्टी[५] कळेना तो। शाहाणा कैसा ।।२७।।**

आळसामुळे कोणताही कार्यभाग बिघडतो पण मनुष्य प्रयत्न करीत राहिला तर क्रमाक्रमाने कार्य यशस्वी होते ही साधी गोष्ट आहे पण ती ज्याला कळत नाही त्याला शहाणा म्हणता येत नाही.

**मित्रि करितां होतें कृत्य। वैर करितां होतो मृत्य। बोलिलें हें सत्य किं असत्य। वोळखावें ।।२८।।**

मैत्री केली असता कार्य सिद्धीला जाते तर वैर केल्यास आपणावर मरण ओढवते. हे मी सांगतो ते खरे की खोटे; हे आपणच ओळखावे.

**आपणास शाहाणें करूं नेणे। आपलें हित आपण नेणे। जनीं मैत्रि राखों नेणे। वैर करी ।।२९।।**

**ऐसें प्रकारीचे जन। त्यास म्हणावें अज्ञान। तयापासीं समाधान। कोण पावे ।।३०।।**

जे लोक आपणास स्वतःला शहाणे करू शकत नाहीत, ज्यांना स्वतःचे हित साधणे कळत नाही, लोकांशी स्नेह न राखता जे वैर करतात अशा प्रकारच्या लोकांना अज्ञानी म्हणावे.

५) दिसते गोष्टी - प्रत्यक्ष दिसणारी गोष्ट

त्यांच्यापाशी गेल्याने कोणासच समाधान मिळू शकत नाही.

**आपण येकायेकी येकला। सृष्टींत भांडत चालिला। बहुतांमध्यें येकल्याला। येश कैंचें ।।३१।।**

आपण एकटाच राहून एकाएकी लोकांमध्ये भांडण करू लागला तर पुष्कळ लोकांमध्ये त्याला एकल्याला यश कसे मिळू शकेल?

**बहुतांचे मुखीं उरावें। बहुतांचे अंतरीं भरावें। उत्तम गुणीं विवरावें। प्राणीमात्रांसी ।।३२।।**

(यास्तव यशप्राप्तीसाठी) पुष्कळांच्या तोंडी आपले नाव असावे, पुष्कळांच्या अंतःकरणामध्ये प्रेमाने भरून राहावे, आपल्या सद्‌गुणांनी अनेक लोकांना (विवेकाचे) विवरण करावे. (उत्तम मार्ग दाखवावा)

**शाहाणे करावें जन। पतित करावे पावन। सृष्टिमधें भगवद्भजन। वाढवावें ।।३३।।**

लोकांना शहाणे करावे, जे पतित असतील त्यांना पवित्र करावे आणि जगामध्ये भगवंताचे भजन वाढवावे. (स्वकल्याणाचा हा मार्ग जनहिताची साथ करतो. श्रीसमर्थांची भक्ती ही अशा प्रकारे लोकाभिमुख असल्याचे या ओवीतून स्पष्ट होते. भक्ती हा परमार्थाचा एक भाग असला तरी भावात्मक एकात्मता साधण्याची किमयाही त्यामध्ये आहे. म्हणून भक्ताने स्वतःपुरता परमार्थ न करता इतरांना सहभागी करून स्वतःचा उद्धार करावा ही एक मार्गदर्शक सूचना या समासातून मिळते आहे.)

**''क्रिया करूनी करवावी। बहुतांकरवीं। द. ११-५-१६ हेच प.दा.अ.'' चे ब्रीद-वाक्य आहे.)**

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यलक्षणनाम समास षष्ठ ।।६।।**

# १५-१ : चातुर्यलक्षण

जीवाच्या अंतर्यामी राहणाऱ्या ईश्वररूपी अंतरात्म्यास जो जाणतो तोच खरा चतुर होय. खरा भाग्यवान होय, असे श्रीसमर्थांचे स्पष्ट मत आहे. खरा शहाणा मनुष्य जो मुख्य असेल त्याच्याशी स्नेह जोडतो. बाकीचे मग त्याला आपोआप वश होतात. ही दृष्टी ठेवून लोकसंग्रही पुरुषाने प्रथम अंतरात्मा आपलासा करून घ्यावा. मग सामान्य जनता आपोआप वश होते. लोक वश करून घेण्यास विवेकाचा मार्ग उत्तम आहे. त्या मार्गाने न जाता जे कोणी वशीकरणासारखे प्रयोग करतात ते त्यांचे प्रयोग ठिकठिकाणी लटके पडतात. वेडे लोक लटक्याचा अभिमान धरून वागतात आणि अखेर फसतात. ज्याला लोक वश व्हावे असे वाटते त्याने आपला जीव दुसऱ्याच्या जीवात घालावा, आपला अंतरात्मा त्याच्या अंतरात्म्यात मिसळावा. आपले बाह्यांग अगदी साधे ठेवावे. निःस्पृहता असावी, नेहमी ताजे राहणारे ब्रह्मज्ञान असावे. तसेच अनेक लौकिक विषयांचे ज्ञान असावे. ओळखीने ओळख करून घ्यावी. लोकांना बुद्धीने विचार

करायला शिकवावे. त्यांचे प्रेम तोडू नये. त्यांच्या मनाचे समाधान करावे. एकाच ठिकाणी फार काळ राहिल्याने व्याप सांभाळता येत नाही. म्हणून एके ठिकाणी सारखे न राहता प्रत्येकाला सावधपणे भेटत जावे. भेटून माणसाचे मन राखावे. आपल्या अंगी उत्तम गुण असावे, कारण ते पाहून माणसाला समाधान वाटते.

**||श्रीराम||**

**अस्तिमाशांचीं शरीरें। त्यांत राहिजे जीवेश्वरें। नाना विकारीं विकारें। प्रविण होईजे।।१।।**

देह हे हाडामांसांचे बनलेले असतात त्यांत जीवेश्वर राहातो. तो मूळचा विकारी असतो आणि शरीरामध्ये होणाऱ्या बदलांबरोबर बदल करून घेण्यात तो प्रवीण असतो.

**घनवट पोंचट स्वभावें। विवरोन जाणिजे जीवें। व्हावें न व्हावें आघवें। जीव जाणे।।२।।**

दाट काय आणि पातळ काय किंवा भरीव काय आणि पोकळ काय आहे याचे विवरण करून, काय हवे काय नको हे जीव सहजपणे जाणतो. (शरीराला कशाची जरूरी आहे हे जीवाला स्वभावतः कळते.)

**येकी मागमागों घेणें। येकां न मागतांच देणें। प्रचीतीनें सुलक्षणें। वोळखावीं ।।३।।**

एखाद्याला जे हवे ते मागमागून मिळवावे लागते तर दुसऱ्याला ते न मागताच मिळते यावरून जीवांची सुलक्षणे अनुभवाने कळून येतात.

**जीव जीवांत घालावा। आत्मा आत्म्यांत मिसळावा। राहराहों शोध घ्यावां। परांतरांचा ।।४।।**

दुसऱ्याच्या जीवात आपला जीव घालावा. आत्मा आत्म्यात मिसळावा असे दुसऱ्याशी एकरूप होण्याचा प्रयत्न करून दुसऱ्याच्या अंतःकरणाचा शोध घ्यावा. (इतरांचे मनोगत ओळखण्याची ही पद्धत सांगितली आहे.)

**जानवें हेंवडकारें[१] जालें। ढिलेपणें हेवड आलें। नेमस्तपणें शोभलें। दृष्टीपुढें ।।५।।**

जानवे ढिले ठेवले तर त्यांच्या पदराला वळी पडते पण व्यवस्थितपणे ते ठेवले तर नजरेला चांगले दिसते.

**तैसेंचि हें मनास मन। विवेकें जावें मिळोन। ढिलेपणें अनुमान। होत आहे ।।६।।**

(व्यवस्थित पदर ठेवल्याने जानव्याच्या दोऱ्यांची गुंतागुंत होत नाही हा दृष्टान्त देऊन समर्थ पुढे म्हणतात) आपले मन दुसऱ्याच्या मनाशी विवेकाने मिळवून घेत जावे यात चालढकल केली तर मने संशयग्रस्त होतात.

**अनुमानें अनुमान वाढतो। भिडेनें कार्यभाग नासतो। याकारणें प्रत्यये तो। आधीं पाहावा ।।७।।**

संशयाने संशय वाढत जातो आणि (तो नष्ट करण्यात) चालढकल केली तर कार्याची हानी

१) हेवडकारें - गुंतलेले

होते. म्हणून प्रत्यक्ष अनुभव घेऊन वर्तन करावे.

**दुसऱ्याचे जीवीचें कळेना। परांतर तें जाणवेना। वश्य होती लोक नाना। कोण्या प्रकारें ।।८।।**

दुसऱ्याच्या मनातील विचार कळले नाहीत, परांतर जाणून घेतले नाही तर इतर लोक आपणास अनुकूल कसे होतील?

**आकल[२] सांडून परती। लोक वश्यकर्ण[३] करिती। अपूर्णपणें हळु पडती[४]। ठाईं ठाईं ।।९।।**

काही बुद्धिहीन माणसे वशीकरणाचे (तांत्रिक) प्रयोग करतात पण जागोजागी ते कमी पडतात. (लोक अनुकूल करण्याचा खरा मार्ग अंतरपारख हा आहे, वशीकरण नव्हे.)

**जगदीश आहे जगदांतरीं। चेटकें करावीं कोणावरी। जों कोणी विवेकें विवरी। तोचि श्रेष्ठ ।।१०।।**

जगातील सर्वांच्या अंतरंगामध्ये परमेश्वर भरलेला आहे त्यामुळे चेटूक विद्येसारखा प्रयोग कोणावरही चालणार नाही. जो कोणी याचे विवेकबळावर विवरण करील तोच श्रेष्ठ होय.

**श्रेष्ठ कार्ये करी श्रेष्ठ। कृत्रिम करी तो कनिष्ठ। कर्मानुसार प्राणी नष्ट। अथवा भले ।।११।।**

श्रेष्ठ माणूस श्रेष्ठ (उदात्त) कार्ये करतो आणि कनिष्ठ माणूस हलकी किंवा क्षूद्र कामे करतो. कर्मावरून मनुष्य भला किंवा वाईट आहे ते समजते.

**राजे जाती राजपंथें। चोर जाती चोरपंथें। वेडे ठके अल्पस्वार्थें। मूर्खपणें ।।१२।।**

राजेलोक राजमार्गाने जातात तर चोर चोरमार्गाने जातात (अंधारात लपतछपत जाणे हा चोराचा मार्ग असतो.) मूर्ख माणूस अल्पस्वार्थ साधण्यासाठी (गैरमार्गाने जाऊन) फसतात.

**मूर्खास वाटे मी शहाणा। परी तो वेडा दैन्यवाणा। नाना चातुर्याच्या खुणा। चतुर जाणें ।।१३।।**

मूर्ख स्वतःला शहाणाच समजतो पण तो वेडा दीनवाणा असतो. हुशार कोण आहे हे जो चतुर असेल त्यालाच कळते. चतुराईच्या खुणा ओळखण्यास चतुर मनुष्यच हवा.

**जो जगदांतरें मिळाला। तो जगदांतरचि जाला। अरत्रीं परत्रीं तयाला। काये उणें ।।१४।।**

जो जगाचे अंतरंगाशी मिळून जातो (ते समजून घेतो) तो स्वतःचे ते अंतरंग होऊन जातो. (या मनमिळाऊपणामुळे) त्याला इहलोकी वा परलोकी काहीच कमी पडत नाही. (परलोक साधण्यास निर्मत्सरी वृत्ती लागते.)

**बुद्धि देणें भगवंताचें। बुद्धिवीण माणुस काचें[५]। राज्य सांडून फुकाचें। भीक मागे ।।१५।।**

बुद्धी ही माणसाला ईश्वराने दिलेली देणगी आहे. ज्याच्यापाशी ती नाही तो माणूस कच्चा समजावा. (जो बुद्धीचा अयोग्य वापर करतो तो) फुकाचे राज्य मिळाले तरी ते सोडून भीकच मागत राहातो.

---

२) आकल- अक्कल ३) वश्यकर्ण - वशीकरण ४) अपूर्णपणे हळू पडती । - निष्फळ झाल्याने नाद सोडतात ५) काचे - कच्चे

**जें जें जेथें निर्माण जालें। तें तें तयास मानलें । अभिमान देऊन गोविलें। ठाईं ठाईं ।।१६।।**

ज्या ठिकाणी जे निर्माण होते त्या ठिकाणच्या लोकांना त्याची आत्मीयता वाटते अशा अभिमानाचा गौरव करून (किंवा त्यात गुंतवून) बुद्धिमान नेता त्यांना जागोजागी कार्यप्रवण करतो. (व्यवस्थापन कौशल्याचा हा भाग आहे.)

**अवघेच म्हणती आम्ही थोर। अवघेचि म्हणती आम्ही सुंदर । अवघेचि म्हणती आम्ही चतुर। भूमंडळीं।।१७।।**

प्रत्येकालाच आपण थोर, सुंदर आणि चतुर आहोत असे या जगात वाटत असते.

**ऐसा विचार आणितां मना। कोणीच लाहान म्हणवीना । जाणते आणिती अनुमाना। सकळ कांहीं ।।१८।।**

हा त्यांचा विचार समजला म्हणजे कळून चुकते की जगात स्वतःला कोणीच लहान म्हणून घेत नाही. शहाणी माणसे मात्र हे सर्व वास्तव जाणून असतात. (त्यांना प्रत्येकाची वास्तव परीक्षा असते.)

**आपुलाल्या साभिमानें। लोक चालिले अनुमानें। परंतु हें विवेकानें। पाहिलें पाहिजे ।।१९।।**

लोक आपापल्या गोष्टींचा अभिमान धरून त्या अनुमानाने चाललेले असतात. (वागत असतात) पण शहाण्याने याचा विवेकाने शोध घेतला पाहिजे.

**लटिक्याचा साभिमान घेणें। सत्य अवघें च सोडणें। मूर्खपणाचीं लक्षणें। ते हे ऐसीं ।।२०।।**

सत्य पूर्णपणे बाजूला ठेवून, असत्याचा (किंवा अवास्तवाचा) अभिमान धरणे ही तर मूर्खाची लक्षणे आहेत.

**सत्याचा जो साभिमान। तो जाणावा निराभिमान। न्याये अन्याये समान। कदापि नव्हे ।।२१।।**

सत्याचा अभिमान धरणे हेच खरे तर निराभिमानाचे लक्षण आहे. (ब्रह्म सत्य आहे, त्याचा अभिमान किंवा कैवार धरणारे संत निराभिमानीच आहेत. त्यांच्या ज्ञानाचे रूपान्तर विज्ञानात किंवा अनुभवात झालेले असल्याने त्यांना निराभिमानीच म्हटले जाते.) न्याय आणि अन्याय हे दोन्ही सारख्याच मापाने तोलू नयेत. देहाभिमान व ईश्वराभिमान हे अभिमान सारखेच लेखू नयेत.

**न्याये म्हणिजे तो शाश्वत। अन्याये म्हणिजे तो अशाश्वत। बाष्कळ आणि नेमस्त। येक कैसा ।।२२।।**

न्याय हा शाश्वत आणि अन्याय हा अल्पजीवी असतो. बाष्कळ (बेशिस्त) आणि नेमक (शिस्तबद्ध) हे समान असू शकत नाहीत.

**येक उघड भाग्य भोगिती। येक तश्कर पळोन जाती। येकांची प्रगट महंती । येकांची कानकोंडी ।।२३।।**

एक राजरोसपणे वैभव भोगतात तर चोरटे पळून जातात. एकाचे मोठेपण जगजाहीर असते तर एकाची महंती, सोंग केल्याप्रमाणे वरकरणी असते. परमार्थाचे ढोंग तेथे असते

**आचारविचारेंविण। जें जें करणें तो तो सीण। धूर्त आणि विचक्षण। तेचि शोधावे।।२४।।**

आचरण आणि विचार न सांभाळता जे काही केले जाते ते व्यर्थ शीण देणारे असते. धूर्त आणि चतुर असलेल्यांचा शोध घ्यावा.

**उदंड बाजारी मिळाले। परी ते धूर्तेंचि आळिले[६]। धूर्तापासीं कांहीं न चले। बाजाऱ्यांचें ।।२५।।**

सर्वसामान्य (किंवा बाजारी) अनेक असले तरी चतुराच्या अंकित ते असतात. चतुर नेत्यासमोर त्यांचे काही चालत नाही.

**याकारणें मुख्य मुख्य। तयांसी करावें सख्य। येणेंकरिता असंख्य। बाजारी मिळती ।।२६।।**

यासाठी जे चतुर (पुढारी) असतील त्यांच्याशी सख्य करावे त्यामुळे अनेक सामान्यजन आपल्या कार्यास अनुकूल होतात. (लोकसंग्रहाची अशी अनेक सूत्रे दासबोधामध्ये विखुरली आहेत.)

**धूर्तासि धूर्तचि आवडे। धूर्त धूर्तींच पवाडे। उगेचि हिंडती वेडे। कार्येंविण ।।२७।।**

धूर्त (किंवा चतुर) माणसास चतुरच आवडतो. चतुरांच्या चतुराईचे कौतुक चतुरांच्या समुदायातच होते. न समजणारी माणसे कोणतेही कार्य न करता उगाच हिंडत राहतात.

**धूर्तासि धूर्तपण कळलें। तेणें मनास मन मिळालें। परी हें गुप्तरूपें केलें। पाहिजे सर्वें ।।२८।।**

एकाचे धूर्तपण दुसऱ्याला समजले म्हणजे त्यांची मने परस्परास मिळून जातात. (एकमेकांना सहकार्य करू लागतात.) पण हे सर्व प्रसिद्धी न होता गुप्तपणे व्हावे.

**समर्थांचें राखतां मन। तेथें येती उदंड जन। जन आणि सज्जन। आर्जव करिती ।।२९।।**

थोर मानल्या गेलेल्या माणसाचे मन (अशा प्रकारे) अनुकूल करून घेतले असता अनेक लोकही मागे येतात त्यांच्यामध्ये असलेले अनेक सामान्य लोक आणि सज्जनसुद्धा आर्जव करू लागतात. सारेजण वश होतात.

**वोळखीनें वोळखी साधावी। बुद्धीनें बुद्धि बोधावी। नीतिन्यायें वाट रोधावी। पाषांडाची ।।३०।।**

ओळखीने अन्य सज्जनांची ओळख करून घेऊन ती वाढवावी. आपल्या बुद्धीने त्यांच्या बुद्धीमध्ये जागृती (निर्माण करून) वाढवावी. नीतीन्यायाने पाखंडी लोकांची वाट बंद करावी. पाखंडी म्हणजे ईश्वरी शक्ती न मानणारे लोक असतील त्यांना नीतिन्यायाने वागून पायबंद घालावा.

**वेष धरावा बावळा। अंतरीं असाव्या नाना कळा। सगट लोकांचा जिव्हाळा। मोडूं नये ।।३१।।**

वेष साधा असावा पण अंतरंगामध्ये नाना कला, युक्त्या असाव्यात. सर्व लोकांना महंताबद्दल जिव्हाळा वाटावा, कारण त्यांच्या अंत:करणातील प्रेमतंतू तो तुटून देत नाही.

**निस्पृह आणि नित्य नूतन। प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान। प्रगट जाणता सज्जन। दुल्लभ जगीं ।।३२।।**

६) आळिले - ओळखिले

निस्पृह आणि नेहमी नूतन वाटणारा तसेच स्वानुभवाचे ब्रह्मज्ञान असूनही समाजामध्ये प्रगटपणे वावरणारा संत, जगामध्ये दुर्लभ असतो.

**नाना जिनसपाठान्तरें। निवती सकळांची अंतरें। चंचलपणें तदनंतरें। सकळां ठाईं ।।३३।।**

नाना काव्यांची पाठान्तरे त्याने केलेली असतात. त्यामुळे सर्वांची मने तो तृप्त करतो. पण तो सर्वत्र संचार करतो. एकदेशी होत नाही.

**येके ठाईं बैसोन राहिला। तरी मग व्यापचि बुडाला। सावधपणे ज्याला त्याला। भेटी द्यावी ।।३४।।**

तो (महंत) एकाच ठिकाणी बसून राहिला तर लोकसंग्रहाचा व्याप बंद पडतो. म्हणून त्याने सावधपणा ठेवून अनेकांना भेट देत असावे. (लोकांना वारंवार भेटी दिल्या तरीही त्यांना नित्यनूतन तर वाटत राहिले पाहिजे, हे अवघड वा कौशल्याचे काम करण्यासाठी सावधपणा पाहिजे.)

**भेटभेटों उरी राखणें। हे चातुर्याचीं लक्षणें। मनुष्यमात्र उत्तमगुणें। समाधान पावे ।।३५।।**

लोकांना योग्य अध्यात्ममार्गावर ठेवण्यासाठी वारंवार भेटणे आवश्यक आहे, पण पुन्हा त्याने भेटावे असे भेटलेल्या व्यक्तीला वाटले पाहिजे. हे चातुर्याचे लक्षण आहे. भेटीमध्ये स्वतःबद्दल आवड कायम रहावी. उत्तम गुणांच्या योगाने सर्वांना समाधान वाटते. (म्हणून महंतापाशी सद्‌गुण असले पाहिजेत आणि सावधपणा व चातुर्य हेही असावे हे तात्पर्य आहे याबद्दल अधिक तपशीलवार विवरण द. १५-६ मध्ये करण्यात आले आहे.)

**इति श्रीदासबोध गुरुशिष्यसंवादे चातुर्यलक्षणनाम समास प्रथम।।१।।**

# द. १५-६ : चातुर्यविवरण

मानवी जीवनात ज्ञानास परमोच्च स्थान आहे, असे श्रीसमर्थांचे अगदी स्पष्ट मत या समासात उघडपणे आढळते. आत्मज्ञानाच्या पावित्र्याबद्दल, श्रेष्ठत्वाबद्दल आणि सामर्थ्याबद्दल मुळी प्रश्नच नाही. परंतु बुद्धीच्या आणि शब्दज्ञानाच्या भूमिकेवर जीवन जगणाऱ्या सामान्य माणसाला देखील अखेर ज्ञानच खरे सामर्थ्य प्रदान करते. हे ज्ञान कागदावर लिहिले जाते. असा या समासाचा आरंभ आहे. ज्ञानाचा आधार घट्ट धरून माणूस प्रयत्न करू लागला, तर प्रारब्धाची रेषादेखील तो बदलून टाकू शकतो. असा प्रत्यक्ष अनुभव येतो. म्हणून माणसाने उगीच कोणाचे ऐकू नये. खरे-खोटे निवडावे, दृढ निश्चय करावा आणि परमार्थ साधावा. लोकसंग्रह करणाऱ्या माणसाने कोणास नाराज करू नये. प्रसंगी हेकट माणसाचे पण ऐकावे. आपले मन दुसऱ्याच्या मनाशी मिळवून वागावे. आधी कोणाचेही मन वश करून घ्यावे व मग हळूहळू ते उकलावे. अशा रीतीने वेड्याला शहाणा करून परमार्थ शिकवावा. जीवनात धक्के चपेटे सोसावे. नीच शब्द गिळावे. प्रसंगी जाणपणाने बोलावे, पण आपल्याकडे जाणतेपणा न घ्यावा. अंगी लीनता असावी. भिक्षेच्या निमित्ताने पुष्कळ गावांचे निरीक्षण करावे. पुष्कळ लोक सूक्ष्म नजरेखालून घातले तर

कुठेतरी काहीतरी आढळते. लोकांच्या शंका निरसाव्या; जरूर वाटल्यास ग्रंथ लिहावा. चांगला ग्रंथ लिहिण्यात उपकार आहे. अशा वागणुकीने जो पुष्कळांना मान्य होतो तो असामान्य होतो.

लेखनक्रियेची महती केवढी आहे, त्याबद्दल पहिल्या पाच ओव्यांमध्ये विचार सांगितला आहे. या लेखनक्रियेमुळेच श्रीसमर्थांचे दर्शन त्यांच्या ग्रंथातून, लेखनातून आपणास घडत आहे.

**||श्रीराम||**

**पीतापासून कृष्ण जालें[१]। भूमंडळीं विस्तारलें। तेणेंविण[२] उमजलें। हें तो घडेना ।।१।।**

''पीतापासून कृष्ण जाले।'' या चरणाचे दोन प्रकारे स्पष्टीकरण केले जाते. ती दोनही योग्य आहेत. पिवळ्या रंगाच्या हिरड्यापासून (कृष्ण) काळी शाई तयार होते किंवा दिव्याच्या पिवळ्या ज्योतीपासून काजळी तयार होते त्यापासून काळी शाई तयार होते. या शाईचा वापर सर्वत्र लिहिण्यासाठी होऊन ग्रंथ तयार झाले. त्या ग्रंथाशिवाय मनुष्यास ज्ञान झाले नसते.

**आहे तरी स्वल्प लक्षण। सर्वत्रांची सांठवण। अद्धम आणी उत्तम गुण। तेथेंचि असती ।।२।।**

शाई ही साधी वस्तू पण तीच ज्ञान साठवू शकते. शाईमुळेच उत्तम गुण किंवा अधमगुण ग्रंथामध्ये सांगितले जातात. (रामचंद्रांचे सद्‌गुण वा रावणाचे दुर्गुण हे ग्रंथात शाईनेच वर्णन केले जातात.)

**महीसुत[३] सरसाविला। सरसाऊन द्विधा केला[४]। उभयेता मिळोन चालिला। कार्येभाग ।।३।।**

महिसुत (म्हणजे लिहिण्याचा बोरु) तासून त्याचे टोक करतात. त्याची लेखणी तयार होते. हे चिरलेले टोक असलेले दोन भाग एकत्र येऊनच लेखनक्रिया चालते. (सध्या बॉलपेनसारखे सुलभ लेखनसाहित्य वापरले जात असल्याने बोरुपासून तयार केलेली लेखणी सध्या लोकांना माहितीसुद्धा नसते.)

**स्वेतास्वेतास गांठी पडतां[५]। मधें कृष्ण मिश्रित होतां। इहलोकसार्थकता। होत आहे ।।४।।**

पांढरा कागद आणि (अश्वेत किंवा) काळ्या शाईत बुडविलेला बोरु यांची भेट होताच (लेखन झाल्यामुळेच) शाई मिश्रित होताच माणसाचे इहलोकीचे (लेखन/वाचन) व्यवहार घडून जीवनाला सार्थकता येते.

**विवरतां याचा विचार। मूर्ख तोचि होये चतुर। सद्यप्रचित साक्षात्कार। परलोकींचा ।।५।।**

ग्रंथात लिहिलेल्या ज्ञानाचा विचार समजला म्हणजे मूर्ख मनुष्यसुद्धा शहाणा होतो. इतकेच काय? त्याला परलोकप्राप्तीच्या ज्ञानामुळे साक्षात्कार होतो. (तो कृतार्थ होतो) ही प्रत्यक्ष प्रचिती येते.

१) पीतापासून कृष्ण जाले । - दिव्याच्या काजळीपासून (किंवा हिरड्यापासून) काळी शाई झाली २) तेणेंविण - शाईशिवाय (लिखाणाशिवाय) ३) महीसुत - बोरू ४) द्विधा केला - तासून त्यास छेद केला ५) स्वेतास्वेतास गाठी पडतां । - कागद व शाई यांच्या संयोगाने झालेल्या लिखाणाने

**सकळांस जें मान्य। तेंचि होतसे सामान्य। सामान्यास अनन्य। होईजेत नाहीं ।।६।।**

सर्वसामान्य लोकांना जी गोष्ट मान्य होते तीच गोष्ट प्रचलित होते. पण या लोकमान्य असलेल्या गोष्टी चतुर माणसाला मान्य होत नाहीत. (उदा. देहबुद्धीचा विचार सर्वमान्य असला तरी आत्मबुद्धीच चतुरांना श्रेयस्कर वाटते.)

**उत्तम मध्यम कनिष्ठ रेखा। अदृष्टीची गुप्त रेखा। चत्वार अनुभव[६] सारिखा। होत नाहीं ।।७।।**

कोणाच्या ललाटीची रेषा उत्तम, कोणाची मध्यम, कोणाची कनिष्ठ असते तर कोणाची गुप्त असते. या रेषा पाहून भविष्य सांगणाऱ्यांच्या भविष्यकथनाचा सारखा अनुभव येत नाही.

**चौदा पीड्याचे[७] पवाडे[८]। सांगती ते शाहाणे कीं वेडे । ऐकत्यानें घडे किं न घडे[९]। ऐसें पाहावें ।।८।।**

पूर्वजांच्या चौदा पिढ्यांचा पराक्रम सांगतात ते शहाणे की वेडे याचा विचार श्रोत्यांनी करावयाचा असतो. त्यांच्यापैकी कोणाच्या हातून एखादे काम होते किंवा ते केवळ बाता मारतात हे ऐकणाऱ्याने पाहिले पाहिजे.

**रेखा[१०] तितुकी पुसोन जाते। प्रत्यक्ष प्रत्यया येतें। डोळेझांकणी करावी ते। कायेनिमित्य ।।९।।**

(कागदावरील पेन्सिलची रेषा जशी रबराने पुसून टाकता येते त्याप्रमाणे) आपली नशिबाची तळहातावरील किंवा ललाटरेषाही पुसून टाकता येते याचा प्रत्यक्ष प्रत्यय येतो त्याकडे डोळेझाकणी माणसाने काय म्हणून करावी? (हा यत्नवादाचा विचार श्रीसमर्थ येथे मांडत आहेत.)

**बहुतांचे बोलीं लागलें। तें प्राणी अनुमानीं बुडाले। मुख्य निश्चयें चुकलें। प्रत्ययाचा ।।१०।।**

खूप लोकांचे विचार ऐकण्याचा नादी असणारा मनुष्य शेवटी संदेहात गटांगळ्या खाऊ लागतो. म्हणून अनुभवाने ज्याचा प्रत्यय आला असेल तोच निश्चय माणसाने करावा (ऐकावे जनाचे करावे मनाचे. ते सुद्धा प्रत्ययज्ञानाचा उपयोग करून करावे हा आशय)

**उदंडाचें उदंड ऐकावे। परी तें प्रत्ययें पाहावें। खरेंखोटे निवडावें। अंतर्यामीं ।।११।।**

खूप लोकांचे खूप ऐकावे पण स्वतःच्या अनुभवाने सत्यासत्यतेचा निवाडा करावा आणि प्रत्ययाला आले असेल तेच स्वीकारावे.

**कोणासी नव्हे म्हणों नये। समजावे अपाये उपाये। प्रत्यये घ्यावा, बहुत काये। बोलोनियां ।।१२।।**

कोणालाच (तोंडावर) नाही म्हणू नये. पण मनामध्ये उपाय व अपाय यांचा विचार करावा. आपल्या हिताहिताचा प्रत्ययाने विचार करावा. उगीच वायफळ बोलून काय उपयोग?

**माणुस हेंकाड आणी कच्चें। मान्य करावें तयाचें। येणें प्रकारें बहुतांचें। अंतर राखावें ।।१३।।**

६) चत्वार अनुभव - नशिबाचे चार प्रकार आहेत ( उत्तम, मध्यम, कनिष्ठ, अदृष्ट (गुप्त) ७) पिड्याचे - पिढ्यांचे ८) पवाडे - गुणानुवाद ९) घडे किं न घडे - हल्ली तसेच आहे की नाही ते १०) रेखा - नशिबाची रेषा

हटवादी किंवा अननुभवी (कच्चा) माणूस असला तरी त्याचेही म्हणणे ऐकून घ्यावे. अशा प्रकारे बहुतांची अंतःकरणे सांभाळावी.

**अंतरीं पीळ पेच वळसा। तोचि वाढवी बहुवसा[११]। तरी मग शाहाणा कैसा। निवऊं नेणें ।।१४।।**

आपल्या मनामध्ये माणसाने पीळ (अहंकार), पेच व वाकडेपणा (वळसा) हा वाढविला तर त्याला शहाणे कसे म्हणता येईल? त्याला लोकांचे समाधान करता येणार नाही.

**वेडें करावें शाहाणें। तरीच जिणें श्लाघ्यवाणें। उगेंच वादांग वाढवणें। हें मूर्खपण ।।१५।।**

वेड्या माणसाला शहाणे करणे यातच जीवनाची सार्थकता आहे. उगीचच वादांग वाढविणे हे मूर्खपणाचे लक्षण आहे. (खडाजंगी करणे हा मूर्खपणाच)

**मिळोन जाऊन मेळवावें। पडी घेऊन उलथावें। कांहींच कळों नेदावें। विवेकबळें।।१६।।**

दुसऱ्याच्या विचारांशी समरस व्हावे पण प्रसंगच पडल्यास पडती बाजू प्रथम घेऊन त्याला उलथून टाकावे. विवेकाच्या बळाने आपले अंतरंग दुसऱ्याला उघड होऊ देऊ नये.

**दुसऱ्याचे चालणीं चालावें। दुसऱ्याचे बोलणीं बोलावें। दुसऱ्याचे मनोगतें जावें। मिळोनियां ।।१७।।**

दुसरा वागेल तसे वागावे, बोलेल तसे बोलावे. अशा प्रकारे दुसऱ्यांच्या विचारात किंवा मनोगतात आपण मिळून जावे.

**जो दुसऱ्याच्या हितावरी। तो विपट[१२] कहिंच न करी। मानत मानत विवरी। अंतर तयाचें ।।१८।।**

भला माणूस दुसऱ्याचे कल्याणाचा विचार करतो. तो कपट करीत नाही. तो दुसऱ्याचे म्हणणे मान्य करीत असतानाच त्याचे अंतरंग बदलवून टाकतो.

**आधीं अंतर हातीं घ्यावें। मग हळुहळु उकलावें। नाना उपायें न्यावें। परलोकासी ।।१९।।**

आधी दुसऱ्याचे मन वश (आपलेसे) करून घ्यावे मग त्यातील वैचारिक गुंते सोडवावेत. नाना युक्त्या करून परमार्थ साधून द्यावा.

**हेंकाडास हेंकाड मिळाला। तेथें गल्बलाचि जाला। कळहो उठतां चातुर्याला। ठाव कैंचा।।२०।।**

हेकट माणसाची दुसऱ्या हेकटाशीच गाठ पडली तर तेथे भांडाभांडी होते. मग समंजसपणाच्या चातुर्याला तेथे वावच राहात नाही.

**उगीच करिती बडबड। परी करून दाखवणें हें अवघड। परस्थळ[१३] साधणें जड। कठिण आहे ।।२१।।**

(कर्तृत्त्व अंगी नसताना) उगाच बडबड करणे सोपे असते. पण परस्थळ (म्हणजे दुसऱ्याचे अंतःकरण किंवा शत्रूच्या ताब्यातील ठिकाण) जिंकणे सोपे नव्हे.

**धके चपेटे सोसावे। नीच शब्द साहात जावें। प्रस्तावोन परावे। आपले होती ।।२२।।**

११) बहुवसा - नाना तऱ्हेने १२) विपट - वितुष्ट १३) परस्थळ - दुसऱ्याचे मन किंवा शत्रूचा किल्ला

दुसऱ्याने दिलेले आघात सोसावे. निंदेचे कटू शब्द गिळून टाकावे. मग त्याबद्दल पश्चात्ताप होऊन दुसरे लोक आपणास अनुकूल होतात. (निरहंकारी वृत्तीमुळे लोकसंग्रह वाढविता येतो; हेच पुढील ओळीतही म्हटले आहे.)

**प्रसंग जाणोनि बोलावें। जाणपण कांहींच न घ्यावें। लीनता धरून जावें। जेथतेथें ।।२३।।**

प्रसंग समजून बोलत असावे पण ज्ञातेपणाचा अभिमान घेऊन बोलू नये. सर्व ठिकाणी आर्जव वृत्तीने (नम्रतेने) वागावे.

**कुग्रामें अथवा नगरें। पाहावीं घरांची घरें[१४]। भिक्षामिसें लहानथोरें। परीक्षून सोडावीं ।।२४।।**

आपण भिक्षेच्या कारणाने बरीवाईट खेडी किंवा शहरे पहावी. त्यातील घरांची घरे पहावी. (शरीर हे जीवात्म्याचे घर आहे ते शरीर जेथे रहाते ते घर किंवा निवासस्थानसुद्धा पहावे हा मोठाच आशय 'घरांची घरे' या दोन शब्दांमध्ये आहे. माणसाचे अंतरंग कळण्यासाठी त्याची वेषभूषा त्याच्या घरातील टापटीप यांच्या निरीक्षणाचा उपयोग होतो.)

**बहुतीं कांहीं तरी सांपडे। विचक्षण लोकीं मित्री घडे। उगेंच बैसतां कांहींच न घडे। फिर्णें विवरणें ।।२५।।**

बहुत भ्रमण केल्यामुळे बहुतांचे गुणावगुण समजतात. चतुर लोकांशी मैत्री होण्याचा योग येतो. उगीच घरी स्वस्थ बसून राहिल्यामुळे फिरणे व (विवरण) चर्चा करणे आदि राहून जाते. (मनुष्य-शोधन थांबते)

**सावधपणें सर्व जाणावें। वर्तमान आधींच घ्यावें। जाऊं ये तिकडे जावें। विवेकेंसहित।।२६।।**

आधीच सावधपणाने सर्व वर्तमान-परिस्थिती जाणून घ्यावी आणि जेथे जाणे इष्ट आहे तेथे विचारपूर्वक जावे.

**नाना जिनसपाठांतरें। निवती सकळांची अंतरें। लेहोन देतां परोपकारें। सीमा सांडावी ।।२७।।**

अनेक विषयांचे (ग्रंथातील उताऱ्यांचे) पाठान्तर असावे. त्यामुळे सर्वांची मने ते ऐकून तृप्त होतात. लोकांना ते उतारे लिहून दिले तर परोपकाराची परिसीमाच होते.

**जैसें जयास पाहिजे। तैसें तयास दीजे। तरी मग श्रेष्ठचि होईजे। सकळां मान्ये ।।२८।।**

ज्या ठिकाणी ज्याला जे आवश्यक असते, त्याप्रमाणे त्याला ते द्यावे. मग व्यक्तीला मोठेपणा प्राप्त होतो आणि ती व्यक्ती सर्वमान्य होते.

**भूमंडळीं सकळांस मान्य। तो म्हणों नयें सामान्य। कित्येक लोक अनन्य। तया पुरुषासी।।२९।।**

जगामध्ये जी व्यक्ती सर्वांची मान्यता मिळविते ती असामान्य असते. तिला सामान्य माणूस म्हणता येणार नाही. अशा व्यक्तीशी असंख्य माणसे निष्ठा वाहिलेली (एकनिष्ठ) असतात.

**ऐसीं चातुर्याचीं लक्षणें। चातुर्यें दिग्विजये करणें। मग तयास काये उणें। जेथतेथें ।।३०।।**

१४) घरांची घरें । शरीर हे जीवात्म्याचे घर .... त्या 'घरा'चेही घर

अशा प्रकारची ही चातुर्याची लक्षणे असतात. चातुर्याने सर्वत्र यशप्राप्ती करून घ्यावी. मग जगामध्ये अशा माणसास कोठेही काही कमी पडत नाही.

(लोकसंग्रह करण्यासाठी माणसाने नेमके काय करावे याचे मोठे तपशीलवार वर्णन वर दिले आहे. कोणासही नाराज न करता त्यांना शहाणे करणे यासाठी जरुर तर उतारे लिहून देऊन परोपकार करणे, अखंड भ्रमण करून शहाणी माणसे शोधून त्यांच्या अनुयायांसह सर्वांना वश करून घेणे इत्यादि कितीतरी गोष्टी येथे सांगितल्या आहेत. अहंता आणि स्वार्थ यांचा त्याग करील त्याला यशस्वीपणे लोकसंग्रह करता येतो.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चातुर्यविवरणनाम समास षष्ठ।। ६।।**

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका ३ री

**(द. १४-६, १५-१ चातुर्यलक्षण, १५-६ चातुर्यविवरण; वर आधारित)**

प्र. १ खालील ओव्यांचा अर्थ सांगा.

(१) पीतापासून कृष्ण जालें। १५-६-१

(२) समजले आणि वर्तले। १४-६-२५

(३) भेटभेटों उरी राखणें। १५-१-३५

प्र. २ कल्पना-विस्तार करा.

(१) १४-६-२३ (२) १५-१-२१ (३) १५-६-८

प्र. ३ लेखनक्रियेची महति श्रीसमर्थांनी द. १५-६ मध्ये प्रारंभीच्या पाच ओव्यात कशी सांगितली आहे?

प्र. ४ टिपणे द्या.

(१) रेखा तितुकी पुसोनि जाते। (२) पडी घेऊन उलथावें।

प्र. ५ ''माणसाने चातुर्याने दिग्विजय संपादन करावा'' असे सांगताना श्रीसमर्थांनी कोणती पथ्ये सुचविली आहेत आणि कोणते मार्ग दाखविले आहेत ?

# दासबोध प्रबोध : स्वाध्याय ४

## (द. ७-८,९; १७-३)

श्रवणाची क्रिया ही ज्ञानमंदिराची पहिली पायरी आहे. श्रवणक्रिया मनावर संस्कार करण्याचा प्रभावी मार्ग आहे. काय ऐकावे आणि काय ऐकू नये, याचा विवेकही श्रीसमर्थांनी सांगितला असून साधकाने अद्वैत ग्रंथ श्रवण करणे आवश्यक असल्याबद्दल आग्रहाने ते सांगतात. अभ्यासार्थींनी या समासांचा अभ्यास केला तर खचितच दैनंदिन जीवनात श्रवण-मनन व निजध्यास यामुळे त्यांच्या विचारात क्रांतिकारी बदल घडेल, दासबोधामध्ये आत्मदर्शनाचा मार्ग अत्यंत सोप्या भाषेत सांगितलेला आहे. हा ग्रंथ आपण वाचू लागलो की, आपोआपच श्रीसमर्थांच्या निरूपणाचे श्रवणच आपणास घडते. दासबोधाचे वाचन म्हणजे साक्षात् त्यांचेच मार्गदर्शन मिळविणे आहे, असा दृढ विश्वास आपण बाळगूया...

### द. ७-८ : श्रवणनिरूपण

बृहदारण्यक उपनिषदामध्ये याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवाद आहे. त्यामध्ये ''न वा अरे सर्वस्य कामाय सर्वं प्रियं भवति आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति।'' अर्थ - ''सर्व वस्तु आपल्याला आवडतात, त्या वस्तूंसाठी त्या आवडत नाहीत, तर आपल्या आत्म्यासाठी त्या आपल्याला आवडतात.'' असा मोठा महत्त्वाचा निष्कर्ष याज्ञवल्क्याने काढला आणि शेवटी मैत्रेयीला असे सांगितले की, ''आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः।'' अर्थ - ''अर्थात् सर्वात प्रिय असलेला हा आत्माच दर्शनास योग्य आहे. त्याचे श्रवण करावे, मनन करावे आणि पुन्हा पुन्हा ध्यान करावे.'' श्रवण हा शब्द श्रीसमर्थ फार व्यापक अर्थाने वापरतात. उपनिषदांत सांगितलेला आत्मदर्शनाचा मार्गच श्रीसमर्थांनी आपल्या ग्रंथामध्ये, विशेषतः दासबोधामध्ये, निःसंदेहपणे प्रतिपादन केला आहे म्हणून त्यांच्या श्रवणाच्या निरूपणात मनन आणि निदिध्यासन अंतर्भूत आहे हे दृढपणे ध्यानात ठेवावे. ज्ञानमार्ग असो की भक्तिमार्ग असो, योगमार्ग असो की शक्तिमार्ग असो, मनाची संपूर्ण एकाग्रता होऊन ध्यानावस्था साध्य होणे हे ध्येय असते. ध्यानावस्थेत एकत्र गोळा होणारे मन एकाएकी तयार होत नाही. त्यासाठी त्याच्यावर ध्येयाचे संस्कार सारखे करावे लागतात. श्रवणाने हे कार्य होते. परंतु झालेला संस्कार खोल रुतून मनाचा अविभाज्य घटक होण्यासाठी त्या संस्काराचे रवंथ करावे लागते. एकच विषय मनात पुष्कळ वेळ घोळविण्याचे कार्य मननाने साधते आणि अधिकारी पुरुषाकडून नित्य श्रवण केल्याने मनाला सतत प्रेरणा मिळते. साधू पुरुषाचे शब्द श्रोत्याला (इलेक्ट्रिफाय) प्रस्फुरित करतात. म्हणून परमार्थामध्ये श्रवणाला इतके महत्त्व आहे.

**श्रवण निरूपण यावरील तीन समासांचा गट येथे स्वाध्यायासाठी निवडला आहे.** श्रवणाचे महात्म्य फार थोर आहे. मानवी जीवन यशस्वी करण्याची किंवा सार्थकी लावण्याची जणू

गुरुकिल्लीच ती आहे. ‘नाना उद्वेग संसाराचे नासती श्रवणें।’ आणि ‘श्रवणे चुके अधोगति। मनास होय विश्रांती। समाधान।।’ हे ग्रंथराजाच्या प्रारंभी सांगितलेच आहे.

## ।। श्रीराम।।

**ऐका परमार्थाचें साधन। जेणें होये समाधान। तें तूं जाण गा श्रवण। निश्चयेंसीं ।।१।।**

ज्यायोगे समाधान होते असे परमार्थाचे साधन म्हणजे श्रवणच आहे असे निश्चयाने तुम्ही ध्यानात ठेवावे.

**श्रवणें आतुडें भक्ती। श्रवणें उद्भवे विरक्ती। श्रवणें तुटे आसक्ती। विषयांची ।।२।।**

श्रवणाने भक्ती आणि विरक्ती उत्पन्न होतात. (आतुडे = प्राप्त होणे) आणि विषयांची आसक्ती सुटते.

**श्रवणें घडे चित्तशुद्धी। श्रवणें होये दृढबुद्धी। श्रवणें तुटे उपाधी। अभिमानाची ।।३।।**

श्रवणाने चित्त शुद्ध होते. तसेच चित्ताला स्थिरता येते. अभिमान (अहंतेची) उपाधी नाहिशी होते. (मल, विक्षेप आणि आवरण हे मनाचे दोष जातात.)

**श्रवणें निश्चयो घडे। श्रवणें ममता मोडे। श्रवणें अंतरीं जडे। समाधान ।।४।।**

श्रवणाने निश्चय दृढ होतो. ‘मी’पणावरील ममता मोडते. अंत:करणात समाधान जडते.

**श्रवणें आशंका फिटे। श्रवणें संशय तुटे। श्रवण होतां पालटे। पूर्वगुण आपुला ।।५।।**

श्रवणाने संशय फिटतात. शंकांचे निरसन होते. आपले अंगभूत गुण श्रवणामुळे पालटतात. (त्यामुळे मूळ स्वभाव जो बदलणे कठीण तो बदलतो)

**श्रवणें आवरें मन। श्रवणें घडे समाधान। श्रवणें तुटे बंधन। देहबुद्धीचें ।।६।।**

मनाला आवर घालण्याची शक्ती प्राप्त होते. श्रवणामुळे समाधान घडते आणि देहबुद्धीचे ‘देह म्हणजेच मी’ या बेडीचे बंधन तुटते. (आत्मबुद्धी वाढू लागते)

**श्रवणें मीपण जाये। श्रवणें धोका न ये। श्रवणें नाना अपाये। भस्म होती ।।७।।**

श्रवणाने मीपणा जातो. घात टळतो. श्रवणाने नाना प्रकारच्या अपायांची राख होते.

**श्रवणें होये कार्यसिद्धी। श्रवणें लागे समाधी। श्रवणें घडे सर्व सिद्धी। समाधानासी ।।८।।**

श्रवणाने कार्यसिद्धी होते, समाधी अवस्था प्राप्त होते. पूर्ण समाधानास आवश्यक अशी पूर्वतयारीची वाट तयार होते.

**सत्संगावरी श्रवण। तेणें कळें निरूपण। श्रवणें होईजे आपण। तदाकार ।।९।।**

सत्संगतीत श्रवण करण्याचे फळ विशेष आहे. त्यामुळे निरूपण कळू लागते. (सत्संगात चर्चा संभवते. त्यामुळे आशंकांची निवृत्ती होते.) श्रवणामुळे मन तदाकार होते.

**श्रवणें प्रबोध वाढे। श्रवणें प्रज्ञा चढे। श्रवणें विषयांचे वोढे। तुटोन जाती ।।१०।।**

श्रवणामुळे बुद्धीचा उत्कर्ष होऊन प्रबोधन अधिकच होते. श्रवणामुळे विषयप्राप्तीसाठी मनाला लागणारे ओढीचे पाश तुटून जातात.

**श्रवणें विचार कळे। श्रवणें ज्ञान हें प्रबळें। श्रवणें वस्तु निवळे। साधकासी ।।११।।**

श्रवणाने (सारासार) विचार कळू लागतो. आत्मज्ञान वाढते आणि साधकाच्या चित्तामध्ये ब्रह्मस्वरूप प्रगट होऊ लागते. (वस्तू हा शब्द ब्रह्म या अर्थाने वापरला जातो. वास्तविक ती वस्तू मुळीच नव्हे पण अध्यात्मात वस्तू = परब्रह्म)

**श्रवणें सद्‌बुद्धि लागे। श्रवणें विवेक जागे। श्रवणें मन हें मागे। भगवंतासी ।।१२।।**

श्रवणाने बुद्धी ईश्वराकडे वळते, सारासार विचार (विवेक) जागृत होतो आणि मन भगवंताकडे ओढ घेऊ लागते.

**श्रवणें कुसंग तुटे। श्रवणें काम वोहटे। श्रवणें धोका आटे। येकसरां ।।१३।।**

श्रवणाने वाईट संगति सुटते, कामवासना ओहोटीस लागते आणि क्रोधाचा विकार एकदमच आटून जातो.

**श्रवणें मोह नासे। श्रवणें स्फूर्ति प्रकाशे। श्रवणें सद्वस्तु भासे। निश्चयात्मक ।।१४।।**

श्रवणामुळे मोह नष्ट होतो, स्फूर्ति उत्पन्न होते आणि (सद्‌वस्तू) परब्रह्माची अनुभूती नक्कीच येऊ लागते.

**श्रवणें होये उत्तम गती। श्रवणें आतुडे शांती। श्रवणें पाविजे निवृत्ती। अचळ पद ।।१५।।**

श्रवणाने उत्तम गति, शांती मिळते आणि अढळ असे निवृत्तीपद मिळते. (योग्यांची शांती व तीमधून अच्युतपदाची प्राप्ती होते.)

**श्रवणा ऐसें सार नाहीं। श्रवणें घडे सर्व कांहीं। भवनदीचा प्रवाहीं। तरणोपाव श्रवणें ।।१६।।**

श्रवणासारखे सार अन्य कशातच नाही. त्याने सर्व काही घडते. या संसाररूपी नदीतून पैलतीरावर जाण्यासाठी श्रवणच उपयुक्त आहे.

**श्रवण भजनाचा आरंभ। श्रवण सर्वी सर्वारंभ। श्रवणें होये स्वयंभ। सर्व कांहीं ।।१७।।**

भगवंताच्या भक्तीचा आरंभ श्रवणामुळे होतो. त्यामुळे सर्व काही आपोआप घडून येते.

**प्रवृत्ती अथवा निवृत्ती। श्रवणेंविण न घडे प्राप्ती। हे तों सकळांस प्रचिती। प्रत्यक्ष आहे ।।१८।।**

प्रपंच (प्रवृत्ती) किंवा परमार्थ (निवृत्ती) दोन्हीकडे सफलतेसाठी श्रवणच कारण असते, असाच सर्वांचा अनुभव आहे.

**ऐकल्याविण कळेना। हें ठाउकें आहे जना। याकारणे मूळ प्रेत्ना। श्रवण आधीं ।।१९।।**

कोणाकडून तरी ऐकल्याशिवाय आपणास कळत नाही, हे सर्वांना ठाऊक आहे. यासाठी कोणत्याही क्षेत्रातील कार्याआधी श्रवणच करणे हाच मूळ प्रयत्न होय.

**जें जन्मीं ऐकलेंचि नाहीं। तेथें पडिजे संदेहीं। म्हणोनियां दुजें कांहीं। साम्यता न घडे ।।२०।।**

जन्मात जे कधी ऐकलेच नाही त्याबद्दल संशय वाटतो म्हणून तो घालवून खात्रीने ज्ञानप्राप्ती होण्यास श्रवण हे अतुलनीय साधन आहे.

**बहुत साधनें पाहातां। श्रवणास न घडे साम्यता। श्रवणेंविण तत्वतां। कार्य न चले।।२१।।**

ज्ञानाची अनेक साधने पाहिली तरी श्रवणाची बरोबरी कोणीच करू शकत नाही. श्रवणावाचून खरोखरीच कसलेही कार्य चालणार नाही.

**न देखतां दिनकर। पडे अवघा अंधकार। श्रवणेंविण प्रकार। तैसा होये ।।२२।।**

सूर्य (प्रकाश) डोळ्यास दिसत नाही तोवर सर्व अंधार असतो. तसाच प्रकार श्रवणाच्या बाबतीत आहे. (अज्ञान अंधकार तसाच राहतो)

**कैसी नवविधा भक्ती। कैसी चतुर्विधा मुक्ती। कैसी आहे सहजस्थिती। हे श्रवणेंविण न कळे ।।२३।।**

नवविधाभक्ती कशा आहेत, चार मुक्ती कोणत्या, सहजस्थिती म्हणजे काय हे श्रवण केल्याविना कळणार नाही.

**न कळे शड्कर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण। न कळे कैसें उपासन। विधियुक्त ।।२४।।**

षट्कर्माचरण (अध्ययन, अध्यापन, यजन[१], याजन[२], दान व प्रतिग्रह) कसे करावे, पुरश्चरण कसे करावे, विधीयुक्त उपासना कशी करावी हे श्रवणाशिवाय कळत नाही.

**नाना व्रतें नाना दानें। नाना तपें नाना साधनें। नाना योग तीर्थाटणें। श्रवणेंविण न कळती ।।२५।।**

अनेक प्रकारची व्रते, दाने, तपे, साधने व तीर्थाटने (त्यांची महती) या गोष्टी श्रवण केल्याशिवाय कळत नाहीत.

**नाना विद्या पिंडज्ञान। नाना तत्त्वांचें शोधन। नाना कळा ब्रह्मज्ञान। श्रवणेंविण न कळे ।।२६।।**

नाना विद्या, मानवी शरीराचे ज्ञान, तत्त्वांचे, कलांचे ज्ञान आणि ब्रह्मज्ञानसुद्धा श्रवणाशिवाय कळत नाही.

**आठराभार वनस्पती। येका जळें प्रबळती। येका रसे उत्पत्ती। सकळ जीवांची ।।२७।।**

अठराभार (म्हणजेच सर्वच) वनस्पती एका पाण्यानेच वाढतात, एका रसानेच सर्व जीवांची निर्मिती होते.

**सकळ जीवां येक पृथ्वी। सकळ जीवां येक रवी। सकळ जीवां वर्तवी। येक वायो ।।२८।।**

सर्व जीवांसाठी (वावरण्यासाठी) एकच पृथ्वी, सर्वांना एकच सूर्य असतो आणि प्राणिमात्रांच्या

१) यजन - स्वतः यज्ञ करणे २) याजन - दुसऱ्याकडून यज्ञ करविणे

जीवनासाठी एकच वायू असतो, तो हालचाल करवितो.

**सकळ जीवां येक पैस। जयास बोलिजे आकाश। सकळ जीवांचा वास। येका परब्रह्मीं।।२९।।**

सर्व जीवांसाठी आकाश हीच वावरण्याची जागा आहे. एका परब्रह्मातच सकळ जीवांचा रहिवास आहे. (सर्वांचे अधिष्ठान परब्रह्मच आहे)

**तैसें सकळ जीवांस मिळोन। सार येकचि साधन। तें हें जाण श्रवण। प्राणीमात्रांसी ।।३०।।**

त्याप्रमाणे सर्व जीवांना एकच सारभूत साधन आहे ते म्हणजे श्रवण होय.

**नाना देश भाषा मतें। भूमंडळीं असंख्यातें। सर्वांस श्रवणापरतें। साधनचि नाहीं ।।३१।।**

पृथ्वीतलावर नाना देश व नाना भाषा असल्या तरी त्या सर्वांना श्रवणाव्यतिरिक्त दुसरे साधनच नाही.

**श्रवणें घडे उपरती। बद्धाचे मुमुक्ष होती। मुमुक्षाचे साधक, अती-। नेमेंसिं चालती ।।३२।।**

श्रवणामुळे वैराग्य उत्पन्न होते. जे (देहबुद्धीची बेडी असलेले) बद्ध असतात ते मुमुक्षू होतात. मुमुक्षूचे साधक होतात आणि नियमितपणे उपासना करू लागतात.

**साधकाचे होती सिद्ध। आंगीं बाणतां प्रबोध। हें तों आहे प्रसिद्ध। सकळांस ठाउकें ।।३३।।**

साधकाचे (श्रवणामुळे) सिद्ध होतात. यथार्थ ज्ञान अंगी मुरण्याची क्रिया घडते. हे तर प्रसिद्धच आहे. सर्वांना माहिती आहे.

**ठाईंचे खळ चांडाळ। तेचि होती पुण्यसिळ। ऐसा गुण तत्काळ। श्रवणाचा ।।३४।।**

स्वभावतः जे दुष्ट प्रवृत्तीचे असतात ते पुण्यशील होतात हा श्रवणाचा लगेच होणारा परिणाम आहे.

**जो दुर्बुद्धि दुरात्मा। तोचि होये पुण्यात्मा। अगाध श्रवणाचा महिमा। बोलिला न वचे ।।३५।।**

जो दुर्बुद्धी, दुरात्मा असेल तो पुण्यात्मा होतो. असा श्रवणाचा अगाध महिमा आहे. तो शब्दात व्यक्त करता येत नाही. (तो बोलून सांगणे शक्य नाही)

**तीर्थां व्रतांची फळश्रुति। पुढें होणार सांगती। तैसें नव्हे हातीचा हातीं। सप्रचित श्रवण ।।३६।।**

तीर्थ, व्रते यांचे फळ मागाहून मिळते असे सांगतात. तसे श्रवणाचे बाबतीत होत नाही. हातोहात त्याची प्रचिती येते.

**नाना रोग नाना व्याधी। तत्काळ तोडिजे औषधी। तैसी आहे श्रवणसिद्धी। अनुभवी जाणती ।।३७।।**

नाना प्रकारच्या रोगावर, व्याधींवर रामबाण औषधे असतात. त्यामुळे व्याधी तत्काळ नाहिशा होतात. श्रवणाचा असाच परिणाम होतो हे अनुभवी लोक जाणतात.

**श्रवणाचा विचार कळे। तरीच भाग्यश्री प्रगटे बळें। मुख्य परमात्माच आकळे। स्वानुभवासी ।।३८।।**

श्रवणातील (सारासार) विचार समजला तर भाग्यलक्ष्मी अपरिहार्यपणे उदयाला येते, आणि परमात्मस्वरूपाचा स्वानुभव प्राप्त होतो. (साक्षात्कार होतो)

**या नांव जाणावें मनन। अर्थालागीं सावधान। निजध्यासें समाधान। होत असे ।।३९।।**

श्रवण केले असेल त्याच्या अर्थाकडे पूर्ण लक्ष देणे यास मनन म्हणतात. अर्थावर मन एकाग्र केले की निदिध्यास होतो. निदिध्यासाने समाधान प्राप्त होते. (श्रवण, मनन, निदिध्यास व साक्षात्कार असा क्रम आहे)

**बोलिल्याचा अर्थ कळे। तरीच समाधान निवळे। अकस्मात अंतरीं वोळे। निःसंदेहता ।।४०।।**

निरुपणाचा अर्थ समजला की समाधानाचा उदय होतो. एकाएकी मन निःसंदेह होऊन जाते. ('अहं ब्रह्मास्मि' याचे आकलन होते.)

**संदेह जन्माचें मूळ। तें श्रवणें होये निर्मूळ। पुढें सहजचि प्रांजळ। समाधान ।।४१।।**

आत्मस्वरूपाविषयीच्या संदेहामुळेच जन्म घ्यावा लागतो. संदेहरुपी मूळच श्रवणाने नष्ट होते. मन निःसंदेह झाले की निश्चल समाधान अनुभवाला येते.

**जेथें नाहीं श्रवण मनन। तेथें, कैचें समाधान। मुक्तपणाचें बंधन। जडलें पाई ।।४२।।**

जेथे श्रवण-मननच नाही तेथे समाधान कोठले? 'आपण मुक्त आहोत' या भावनेचे बंधन तेथे पडलेले असते.

**मुमुक्ष साधक अथवा सिद्ध। श्रवणेंविण तो अबद्ध। श्रवणमननें शुद्ध। चित्तवृत्ति होये ।।४३।।**

मनुष्य मुमुक्षु, साधक किंवा सिद्ध असो श्रवणाच्या अभावी तो मूढच राहातो. श्रवण-मननाने चित्तवृत्ती शुद्ध होते.

**जेथें नाहीं नित्य श्रवण। तें जाणावें विलक्षण। तेथें साधकें येक क्षण। क्रमूं नये सर्वथा ।।४४।।**

ज्या ठिकाणी श्रवण नित्य होत नाही ते स्थान विपरीत होय. तेथे साधकाने क्षणभरदेखील वास्तव्य करू नये.

**जेथें नाहीं श्रवणस्वार्थ। तेथें कैंचा हो परमार्थ। मागें केलें तितुकें वेर्थ। श्रवणेंविण होये ।।४५।।**

ज्या ठिकाणी श्रवणाचा स्वार्थ नाही तेथे परमार्थ-विचारच नसतो. श्रवणाअभावी पूर्वी केलेले साधनही वाया जाण्याची भीती असते.

**तस्मात् श्रवण करावें। साधन मनीं धरावें। नित्यनेमें तरावें। संसारसागरीं।।४६।।**

म्हणून (नित्य) श्रवण करावे. मन:पूर्वक साधना करावी आणि या भवसमुद्रातून नित्यनेम-श्रवणाच्या बळावर तरून जावे.

**सेविलेंच सेवावें अन्न। घेतलेंचि घ्यावें जीवन। तैसें श्रवणमनन। केलेंचि करावें ।।४७।।**

ज्याप्रमाणे अन्न, पाणी एकदाच सेवून भागत नाही, पुन्हा पुन्हा ते घ्यावे लागते त्याप्रमाणे श्रवणमनन पूर्वी केले तरी पुन्हापुन्हा ते करावे.

**श्रवणाचा अनादर। आळसें करी जो नर। त्याचा होये अपहार। स्वहितविषईं ।।४८।।**

आळसामुळे जो श्रवणाचा अनादर करील तो स्वहिताला (आत्मज्ञानाला) मुकतो.

**आळसाचें संरक्षण। परमार्थाची बुडवण। याकारणें श्रवण। केलेंचि पाहिजे ।।४९।।**

आळसाचा सांभाळ म्हणजे परमार्थाची बुडवणूकच! यासाठी जागृत राहून नित्य श्रवण करीत जावे.

**आतां श्रवण कैसें करावें। कोण्या पंथास पाहावें। पुढिलें समासीं आघवें। सांगिजेल ।।५०।।**

असो आता श्रवण तरी कसे करावे कोणत्या ग्रंथाचा अभ्यास करावा हे सर्व पुढील समासात सांगू.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास अष्टम।।८।।**

## द. ७-९ : श्रवणनिरूपण

माणसाच्या जीवनातील सर्व अंगांना समाज स्पर्श केल्यावाचून राहात नाही. केवळ अंतरंगाशी संबंध असणारे आध्यात्मिक जीवन का असेना, त्या जीवनामध्ये देखील सद्गुरु मिळणे व त्याची संगती घडणे ही समाजाचीच देणगी आहे. वस्तुस्थिती अशी असल्याने स्वत: मिळवलेले ज्ञान प्रत्येकाने समकालीन समाजाला मुक्तहस्ताने द्यावे, असा श्रीसमर्थांचा आग्रह आहे. हे ज्ञानदान करण्याचे दोन प्रधान मार्ग चालत आले आहेत. व्याख्यान व प्रवचन यांच्या द्वारा आपले ज्ञान लोकांना श्रवण करायला लावून त्यांना ज्ञानसंपन्न करणे हा एक मार्ग होय आणि आपले ज्ञान भाषाबद्ध करून लोकांमध्ये प्रसृत करणे हा दुसरा मार्ग होय. कोणत्याही ज्ञानाची उपासना करण्यास एक विशिष्ट धारणा लागते. अर्थात् आत्मज्ञानाची उपासना करण्यासाठी देखील काही पूर्वतयारी अवश्य असते. परंतु मानवी समाज अफाट आहे. कोणत्या स्त्री किंवा पुरुषापाशी अशी तयारी आहे हे आपणास माहीत नसते. म्हणून सर्व समाजाची जी व्यवहारभाषा आहे तिच्यामध्ये अध्यात्म सांगत राहावे, तिच्यामध्ये अध्यात्म लिहीत जावे. जो अधिकारी असेल तो त्याचा फायदा करून घेतोच घेतो. पण जो अधिकारी नसेल तो देखील ग्रंथामधील विचारांच्या प्रभावाने अधिकारी बनून आपले कल्याण करून घेतो. **संतांचा दृष्टिकोन एका अर्थाने विज्ञानाशी जुळत असतो. निरीक्षण आणि प्रयोग यांनी सिद्ध झालेले सिद्धांत तयार करणे** आणि त्यांच्या सहाय्याने घटनांचा बरोबर अर्थ लावणे **हे विज्ञानाचे काम आहे.** संतांनी मानवी जीवनाचे सूक्ष्म निरीक्षण केले. **स्वत:च्या जीवनावर निर्भयपणे प्रयोग केले आणि या जगातील जीवनाचा संपूर्ण अर्थ**

**शोधून काढला.** संतांचे अनुभवविश्व मोठे व्यापक आणि सर्वस्पर्शी असते. ते अति जिवंत, ताजे व रसरशीत असते. त्यांची बुद्धी सूक्ष्म असतेच पण त्यांची प्रतिभा अखंड जागी असते. संत स्वत:चे जीवनदर्शन ग्रंथामध्ये भाषाबद्ध करतात. अर्थात् ग्रंथ कसा असावा याबद्दल त्यांचे विचार थोडेसे भिन्न असतात. श्री समर्थांचे तर म्हणणे असे की, ग्रंथाच्या बहिरंगापेक्षा (त्यामध्ये ग्रंथाची भाषा पण आली) त्याच्या अंतरंगास फार महत्त्व असते. संत जी भाषा वापरतात तिच्यामध्ये स्वत:चा अफाट अनुभव गच्च भरण्याचा प्रयत्न करतात. म्हणून संतग्रंथामध्ये जेथे तेथे अनंताला गवसणी घालणाऱ्या कल्पनांचा सुकाळ आढळतो. ग्रंथामधील शब्दांचा आधार घेऊन वाचक जर अतींद्रिय, अव्यय, अव्यक्त आणि अनंत सद्वस्तूच्या अनुभवक्षेत्रामध्ये शिरू शकला तर तो ग्रंथ, ग्रंथ या नावास पात्र समजावा. तो ग्रंथ खरा उत्तम की जो अभ्यासला असता वाचकाच्या अंतरंगावर खोल परिणाम करतो आणि त्याच्या जीवनाला ताबडतोब अध्यात्माचे वळण लागते. इतकेच नव्हे तर वाचकाचे अनेक संशय फिटून आत्मस्वरूपाबद्दल त्याची निश्चित धारणा झाली पाहिजे. सांगण्याचा सारांश असा की, सामान्य माणसाचे स्वार्थी व अहंकारी जीवन अनेक अशुभ वासनांनी लिडबिडलेले असते. श्रवणाने अथवा ग्रंथसेवनाने त्या जीवनात आमूलाग्र बदल घडणे अवश्य असते. यासाठी माणसाने पुन:पुन्हा श्रवण करावे किंवा एकच ग्रंथ अहोरात्र अभ्यासावा.

## ||श्रीराम||

**आतां श्रवण कैसें करावें। तेंहि सांगिजेल अघवें। श्रोतां अवधान द्यावें। येकचित्तें ।।१।।**

आता श्रवण (कोणत्या ग्रंथाचे) कसे करावे हे नीट सांगतो. श्रोत्यांनी एकाग्र चित्ताने अवधान द्यावे.

**येक वग्तृत्व श्रवणीं पडे। तेणें जालें समाधान मोडे। केला निश्चय विघडे। अकस्मात ।।२।।**

एखादे वक्तृत्व असे असते की त्यामुळे पूर्वी प्राप्त झालेले समाधान भंगते आणि मनाचा निश्चय डळमळतो.

**तें वग्तृत्व त्यागावें। जें माईक स्वभावें। जेथें निश्चयाच्या नावें। सुन्याकार ।।३।।**

असे जे भ्रामक वक्तृत्व असते त्याचा त्याग करावा कारण त्यातून काहीच निश्चित ज्ञान होत नाही.

**येक्या ग्रंथें निश्चय केला। तो दुजयानें उडविला। तेणें संशयोचि वाढला। जन्मवरी ।।४।।**

एका ग्रंथामुळे झालेले निश्चित ज्ञान काही वेळा दुसरा ग्रंथ वाचल्याने डळमळू लागते. त्यामुळे जन्मभर मनाची संदेहावस्था कायम राहाते.

**जेथें संशय तुटती। होये आशंकानिवृत्ती। अद्वैत ग्रंथ परमार्थी। श्रवण करावे ।।५।।**

म्हणून ज्या ग्रंथांमुळे शंकानिरसन होते, संशय नाहिसे होतात असे अद्वैत सिद्धान्ताचे प्रतिपादन केलेले ग्रंथ वाचावे.

**जो मोक्षाचा अधिकारी। तो परमार्थपंथ धरी। प्रीति लागली अंतरीं। अद्वैतग्रंथाची ।।६।।**

जो मोक्षाचा अधिकारी असतो तो परमार्थाचा मार्ग धरतो. त्याच्या मनात अद्वैत ग्रंथांबद्दल प्रेम असते.

**जेणे सांडिला इहलोक। जो परलोकींचा साधक। तेणें पाहावा विवेक। अद्वैतशास्त्रीं ।।७।।**

इहलोकातील गोष्टींची आसक्ती सोडून ज्यांनी परमार्थाची साधना सुरू केली असेल त्यांनी अद्वैत ग्रंथातील विवेकाचे रंगतरंगांचा अभ्यास करावा.

**जयास पाहिजे अद्वैत। तयापुढें ठेवितां द्वैत। तेणें क्षोभलें उठे चित्त। तया श्रोतयाचें ।।८।।**

ज्याला अद्वैत पाहिजे त्याच्यापुढे द्वैत विचारांची पोथी मांडली तर त्याला ती रुचत नाही.

**आवडीसारिखें मिळे। तेणें सुखचि उचंबळे। नाहीं तरी कंटाळे। मानस ऐकतां ।।९।।**

आपल्या आवडीसारखे श्रवणास मिळाले तर आपल्या मनाला सुख वाटते नाहीतर श्रवणाचा कंटाळा वाटू लागतो. (ते स्वाभाविकच आहे)

**ज्याची उपासना जैसी। त्यासी प्रीति वाटे तैसी। तेथें वर्णितां दुजयासी। प्रशस्त न वटे।।१०।।**

ज्याची जी उपासना असेल तिच्याबद्दलच त्याला प्रेम वाटते. तेथे दुसऱ्याची स्तुती केली तर ती सुयोग्य नव्हे.

**प्रीतीचें लक्षण ऐसें । अंतरी उठे अनायासें । पाणी पाणवटे जैसें । आपणचि धांवे ।।११।।**

पाणी ज्याप्रमाणे उताराच्या दिशेने स्वाभाविकपणे वाहाते त्याप्रमाणे प्रेम हे आपोआपच अंत:करणात उत्पन्न होते, हे प्रेमाचे लक्षणच आहे.

**तैसा जो आत्मज्ञानी नर। तयास नावडे इतर। तेथें पाहिजे सारासार। विचारणा ते ।।१२।।**

त्याप्रमाणे जो मनुष्य आत्मज्ञानाचा भुकेला असतो त्याला इतर गोष्टी आवडत नाहीत त्याला सार-असार विचारणाच आवडते.

**जेथें कुळदेव्या भगवती। तेथें पाहिजे सप्तशती। इतर देवांची स्तुती। कामा न ये सर्वथा।।१३।।**

जेथे कुलदैवता भगवतीदेवी आहे तेथे सप्तशती पोथीच हवी इतर देवतांच्या स्तुतीचा तेथे उपयोग कामाचा नाही.

**घेतां अनंताच्या व्रता। तेथें नलगे भगवद्गीता। साधुजनासी वार्ता। फळाशेची नाहीं ।।१४।।**

अनंताचे व्रत घेतल्यावर तेथे भगवद्गीता उपयोगी नाही. साधुजन श्रोते असतील तेथे फलाशा नसतेच. (फलाशेची पोथी तेथे नको)

**वीरकंकण[१] घालितां नाकीं। परी तें शोभा पावेना कीं। जेथील तेथें, आणिकीं। कामा न ये सर्वथा ।।१५।।**

१) वीरकंकण-शौर्याबद्दल इनाम मिळणारे सुवर्णाचे कडे

वीरकंकण हातात घालावयाचे ते नाकामध्ये अडकविणे शोभणार नाही. अलंकार असला तरी तो जेथल्या तेथेच घातला तर शोभतो.

**नाना महात्में बोलिलीं। जेथील तेथें वंद्य जालीं। विपरीत करून वाचिलीं। तरी तें विलक्षण।।१६।।**

नाना प्रकारची (स्थळ) महात्म्ये आहेत ती तेथेच वंदनीय आहेत. ती भलत्या ठिकाणी वाचली तर ते चमत्कारिक होईल.

**मलारमाहात्म[२] द्वारकेसी। द्वारकामाहात्म नेलें कासी। कासीमाहात्म वेंकटसीं[३]। शोभा न पवे।।१७।।**

मल्हारीमहात्म्य द्वारकेला नेले, द्वारकामहात्म्य काशीला नेले किंवा काशीमहात्म्य व्यंकटेशगिरीला नेले तर ते शोभा देत नाही.

**ऐसें सांगतां असे वाड[४]। परी जेथील तेथेंची गोड। तैसी ज्ञानीयांस चाड। अद्वैत ग्रंथाची ।।१८।।**

असे खूपच सांगता येईल पण जेथले महात्म्य तेथेच गोड वाटते. त्याप्रमाणे ज्ञानी लोकांना अद्वैत ग्रंथातच गोडी वाटते.

**योगियांपुढें राहाण[५]। परीक्षवंतापुढें पाषाण। पंडितांपुढें डफगाण। शोभा न पवे ।।१९।।**

योग्यांच्या पुढ्यात भुताटकीचे प्रयोग, रत्नपारख करणाऱ्यांपुढे साधा दगड किंवा विद्वान पंडितांपुढे डफगाणे ठेवले जाणे अयोग्य आहे.

**वेदज्ञापुढें जती[६]। निस्पृहापुढें फळश्रुती। ज्ञानीयांपुढें पोथी। कोकशास्त्राची ।।२०।।**

वेदवेत्यांपुढे (वैदिक कर्मानुष्ठान करणाऱ्यांपुढे) कर्मसंन्यासी उभा केला, निस्पृह महंतापुढे फलश्रुती सांगितली, ज्ञानी लोकांपुढे कोकशास्त्राची पोथी (शृंगारशास्त्रावरील चोपडे) किंवा,

**ब्रह्मचर्यापुढें नाचणी। रासक्रीडा निरूपणीं। राजहंसापुढें पाणी। ठेविलें जैसें ।।२१।।**

ब्रह्मचाऱ्यापुढे नृत्यांगनांचा ताफा, अध्यात्मिक निरुपणामध्ये रासक्रीडांचे वर्णन, अथवा जो राजहंस, पाणी व दूध निराळे करतो त्यांच्यापुढे फक्त पाणी ठेवल्याने ते शोभत नाही तसे करणे अनुचित ठरते.

**तैसें अंतर्निष्ठांपुढें। ठेविलें शृंघारिक टिपडें[७]। तेणें त्याचें कैसें घडे। समाधान ।।२२।।**

त्याचप्रमाणे अंतर्मुख असलेल्या सत्पुरुषांपुढे शृंगारिक चोपडे ठेवले तर ते त्यांना कसे आवडेल? त्यांना समाधान कसे होईल?

**रायास रंकाची आशा। तक्र सांगणें पीयुषा[८]। संन्याशासी वोवसा[९]। उचिष्ट[१०] चांडाळी ।।२३।।**

एखाद्या भिकाऱ्याला क्षुद्र वस्तूची अभिलाषा असते. तीच अभिलाषा एखाद्या राजाला दाखविणे वेडेपणाचे असते, अमृतापुढे ताकाच्या श्रेष्ठपणाची बढाई मारणे, किंवा संन्याशाला

२) मलार-मल्हार (३) वेंकटसी-व्यंकटेशक्षेत्री ४) वाड-पुष्कळ ५) राहाण-अंगात दैवत आणवून बोलाविणे ६) जती-बैरागी ७) टिपडे-चोपडे ८) पीयूषा-अमृताला ९) वोवसा-व्रत १०) उचिष्ट-उच्छिष्ट चांडाळीच्या मंत्राचे

उष्ट्या चांडाळीचे व्रत करण्यास सांगणे शोभत नाही. (चांडाळी ही एक क्षुद्र देवता मानली जाते. तिचा मंत्र म्हणताना दोन जेवणांमधील काळामध्ये तोंडात भाकरीचा तुकडा ठेवावयाचा असतो. जुन्या जमान्यात अशा काही गोष्टी होत्या त्या आता इतिहासजमा झाल्या आहेत.)

**कर्मनिष्ठा वशीकर्ण। पंचाक्षरी निरूपण। तेथें भंगे अंतःकर्ण। सहजचि त्याचें ।।२४।।**

एखाद्या धर्मज्ञ कर्मनिष्ठाला वशीकरणाचा प्रयोग सांगणे किंवा जारण-मारण करणाऱ्या पंचाक्षरी माणसास ब्रह्मज्ञान सांगणे, यामुळे त्यांच्या मनाचा हिरमोडच होईल.

**तैसे परमार्थिक जन। तयांस नस्तां आत्मज्ञान। ग्रंथ वाचितां समाधान। होणार नाहीं ।।२५।।**

तसे परमार्थाला लागलेल्या साधकांना आत्मज्ञानाचा ग्रंथच आवडतो. ते ज्ञान ज्यात नाही तो ग्रंथ वाचण्याचे त्यांना समाधान वाटणार नाही.

**आतां असो हें बोलणें। जयासि स्वहित करणें। तेणें सदा विचरणें। अद्वैतग्रंथीं ।।२६।।**

हे बोलणे आता पुरे. ज्यांना कल्याण करून घ्यावयाचे आहे त्यांनी नेहमी अद्वैत ग्रंथांचाच अभ्यास करावा.

**आत्मज्ञानी येकचित्त। तेणें पाहाणें अद्वैत। येकांत स्थळीं निवांत। समाधान ।।२७।।**

आत्मज्ञानाच्या साधकांनी एखाद्या अत्यंत निवान्त स्थानी जाऊन एकाग्र मनाने अद्वैत ग्रंथ अभ्यासावे. त्यामुळे त्यांना समाधान लाभेल.

**बहुत प्रकारें पाहातां। ग्रंथ नाहीं अद्वैतापरता। परमार्थास तत्त्वता। तारूंच[११] कीं ।।२८।।**

सर्व प्रकारे विचार करता अद्वैत ग्रंथासारखा दुसरा श्रेष्ठ ग्रंथच नाही. परमार्थाच्या प्रवासासाठी हे जणू तारु (जहाजच) आहे.

**इतर जे प्रपंचिक। हास्य विनोद नवरसिक। हित नव्हे तें पुस्तक। परमार्थासी ।।२९।।**

इतर जी नवरसाची वा हास्यविनोदाची अशी प्रापंचिकांची जी आवडीची पुस्तके आहेत ती पारमार्थिकांसाठी योग्य नव्हेत. त्यांना ती उपयुक्त होणार नाहीत.

**जेणें परमार्थ वाढे। आंगीं अनुताप चढे। भक्तीसाधन आवडे। त्या नांव ग्रंथ ।।३०।।**

ज्या ग्रंथाच्या वाचनामुळे पारमार्थिक विचार वाढतात, ज्यांच्यामुळे अंगामध्ये विरक्ती संचारू लागते, भक्ती व साधना आवडू लागते त्यालाच ग्रंथ म्हणावे.

**जो ऐकतांच गर्व गळे। कां ते भ्रांतीच मावळे। नातरी येकसरें वोळे। मन भगवंतीं ।।३१।।**
**जेणें होये उपरती। अवगुण पालटती। जेणें चुके अधोगती। त्या नांव ग्रंथ ।।३२।।**

जो ग्रंथ ऐकताना गर्व नष्ट होतो, भ्रम लोप पावतो, मन ईश्वराकडे एकाएकी धाव घेऊ लागते, ज्याच्या श्रवणाने उपरति होते, अवगुण पालटतात, अधोगति थांबून ईश्वराकडे वाटचाल होते

११) तारुंच-होडी, नाव

त्यालाच ग्रंथ ही संज्ञा शोभते.

**जेणें धारिष्ट चढे। जेणे परोपकार घडे। जेणें विषयवासना मोडे। त्या नांव ग्रंथ ।।३३।।**

ज्याच्या वाचनाने अंगी धारिष्ट्य येते, परोपकाराची बुद्धी वाढते आणि विषयांची वासना नाहिशी होते, त्याला ग्रंथ म्हणावे.

**जेणें परत्रसाधन। जेणें ग्रंथें होये ज्ञान। जेणें होईजे पावन। या नांव ग्रंथ ।।३४।।**

ज्यायोगे आत्मज्ञानाचे साधन लाभते, आत्मज्ञानाची प्राप्ती होते, ज्यामुळे पतित असणारा पावन होतो त्याला ग्रंथ म्हणावे.

**ग्रंथ बहुत असती। नाना विधानें फळश्रुती। जेथें नुपजे विरक्ती भक्ती। तो ग्रंथचि नव्हे ।।३५।।**

अनेक ग्रंथ असतात त्यांच्या फलश्रुतीची विधानेही नाना प्रकारची असतात पण ज्यांच्या वाचनामुळे विरक्ती आणि भक्ती निर्माण होत नाहीत तो ग्रंथच नव्हे.

**मोक्षेंविण फळश्रुती। ते दुराशेची पोथी। ऐकतां ऐकतां पुढती। दुराशाचि वाढे ।।३६।।**

ज्या ग्रंथामध्ये मोक्षप्राप्ती ही फलश्रुती नसते ते ग्रंथ प्रापंचिक दुराशा वाढविणाऱ्या पोथ्या असून त्यांच्यामुळे अन्य दुराशाच वाचकांमध्ये वाढतात.

**श्रवणीं लोभ उपजेल जेथें। विवेक कैचा असेल तेथें। बैसलीं दुराशेचीं भूतें। तया अधोगती।।३७।।**

ज्या ग्रंथाच्या श्रवणाने प्रपंचाचा लोभ वाढतो तेथे आत्मानात्मविवेक असू शकणार नाही. वासनांची भुते ज्याच्या चित्तात नाचतात त्याला खचितच अधोगति प्राप्त होणार.

**ऐकोनिच फळश्रुती। पुढें तरी पावोन ह्मणती। तयां जन्म अधोगती। सहजचि जाली ।।३८।।**

ग्रंथाची फलश्रुती वाचून या जन्मी नाही तरी ते फल पुढील जन्मात तरी प्राप्त होईल असे म्हणणाऱ्यांना पुनर्जन्म साहजिकच प्राप्त होणार. (ही अधोगतीच आहे)

**नाना फळें पक्षी खाती। तेणेंचि तयां होये तृप्ति। परी त्या चकोराचे चित्तीं। अमृत वसे ।।३९।।**

अन्य पक्षी नाना प्रकारची फळे खाऊन तृप्त होतातही पण चकोर या श्रेष्ठ पक्षाच्या मनात अमृतप्राप्तीचा हट्ट अमृतप्राप्तीचाच असतो. (त्याविना त्याला संतोष नसतो)

**तैसें संसारी मनुष्य। पाहें संसाराची वास[१२]। परी ते भगवंताचे अंश। भगवंतचि इछिती ।।४०।।**

त्याप्रमाणे संसारी माणसे पुन्हा संसाराची इच्छा धरतात पण देवाचे खरे भक्त असतात त्यांना ईश्वरप्राप्ती हीच एक इच्छा असते.

**ज्ञानियास पाहिजे ज्ञान। भजकास पाहिजे भजन। साधकास पाहिजे साधन। इछेसारिखें।।४१।।**

ज्ञानी पुरुषांना आत्मज्ञान, भक्ताला भजन तर साधकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे साधन हवे असते.

१२) वास-सोय

**परमार्थ्यास परमार्थ। स्वार्थ्यास पाहिजे स्वार्थ। कृपणास पाहिजे अर्थ। मनापासुनी ।।४२।।**

परमार्थी व्यक्तीला परमार्थ, स्वार्थी माणसाला स्वार्थ तर (कृपण) चिक्कू माणसाला मनापासून धन हवे असते.

**योगियांस पाहिजे योग। भोगियांस पाहिजे भोग। रोगियांस पाहिजे रोग-। हर्ति मात्रा ।।४३।।**

योग्यांना योग, भोगीवृत्तीच्या लोकांना भोग आणि रोग्यांना रोग नाहिसे करणारी मात्रा हवी असते.

**कवीस पाहिजे प्रबंद[१३]। तार्किकांस तर्कवाद। भाविकांस संवाद। गोड वाटे ।।४४।।**

कवीला काव्यरचना, तार्किकांना तर्कप्रधान वाद आवडतो. भाविकांना ईश्वरविषयक सुखसंवाद गोड वाटतो.

**पंडितांस पाहिजे वित्पत्ती[१४]। विद्वांसास अधेनप्रीती[१५]। कळावंतां आवडती। नाना कळा ।।४५।।**

पंडितांना व्युत्पत्ती (विद्वत्ता) पाहिजे. विद्याभ्यासींना अध्ययनात गोडी असते तर कलावंतांना नाना प्रकारच्या कलांमध्ये रस वाटतो.

**हरिदासा आवडे कीर्तन। सुचिस्मंतां संध्यास्नान। कर्मनिष्ठां विधिविधान। पाहिजे तें ।।४६।।**

हरिदासांना कीर्तन तर शुचिर्भूत माणसांना स्नानसंध्या आवडते. कर्मनिष्ठांना नाना विधियुक्त शास्त्रपद्धती आवडते.

**प्रेमळास पाहिजे करुणा। दक्षता पाहिजे विचक्षणा। चातुर्य पाहे शाहाणा। आदरेंसीं ।।४७।।**

प्रेमळांना करुणा, चिकित्सकांना दक्षता आवडते तर शहाणा माणूस चतुरपणाचा शोध आदरपूर्वक घेतो.

**भक्त पाहे मूर्तिध्यान। संगीत पाहे ताळज्ञान। रागज्ञानी तानमान। मूर्छना[१६] पाहे ।।४८।।**

भक्त मूर्तीध्यान बारकाईने पाहातो. गाणारा तालज्ञान पाहातो तर रागदारीचा ज्ञाता ताल (स्वरांतील विस्तार) व दोन स्वरांमधील तीन तीन सूक्ष्म सुरांश (मूर्च्छना) आवडीने पाहातो.

**योगाभ्यासी पिंडज्ञान। तत्वज्ञासि तत्वज्ञान। नाडिज्ञानी मात्राज्ञान। पाहातुसे ।।४९।।**

योगाभ्यासी माणसाला शरीररचनेच्या ज्ञानाची आवड तर तत्त्वज्ञानीयाला विविध तत्त्वज्ञानाची आवड असते. नाडीपरीक्षा जाणणाऱ्यांना (वैद्यांना) वनौषधी मात्रांची आवड असते.

**कामिक पाहे कोकशास्त्र। चेटकी पाहे चेटकमंत्र। यंत्री पाहे नाना यंत्र। आदरेंसीं।।५०।।**

शृंगारिक प्रवृत्तीच्या माणसाला कोकशास्त्र तर चेटूक विद्या करणाऱ्यांना चेटूकमंत्र आवडतात. जारणमारण करणाऱ्यांना निरनिराळी यंत्रे आवडतात. (कागदावर किंवा ताम्रपत्रांवर आकृती

१३) प्रबंद-छंदोक्त काव्य १४) वितपत्ती-व्युत्पत्ती भाषाशास्त्र १५) अधेनप्रीती-अध्ययनप्रीती १६) मूर्च्छना-गायनातील स्वरांचा उच्चार विशेष

काढून त्यावर मंत्र लिहिलेले असतात. त्यांना यंत्र ही संज्ञा आहे. आधुनिक काळातील यंत्राचा येथे संदर्भ नाही.)

**टवाळां आवडे विनोद। उन्मत्तास नाना छंद। तामसास अप्रमाद[१७]। गोड वाटे ।।५१।।**

टवाळवृत्तीच्या लोकांना विनोद आवडतो. (विनोद यांचा येथे अर्थ थट्टा करणे)अंगात माज असलेल्या माणसास नाना व्यसने आवडतात. तामसी माणसाला दुष्कर्म करणेच गोड वाटते.

**मूर्ख होये नादलुब्धी। निंदक पाहे उणी संधी। पापी पाहे पापबुद्धि। लाऊन आंगीं ।।५२।।**

मूर्खांना नादिष्टपणा आवडतो, निंदक दुसऱ्याचे न्यून कोठे सापडेल तेच पहातो आणि आपण स्वतः पापी असताना दुसऱ्यांवर पापांचा आरोप करू पाहातो.

**येकां पाहिजे रसाळ। येका पाहिजे पाल्हाळ। येकां पाहिजे केवळ। साबडी[१८] भक्ती ।।५३।।**

एखाद्याला रसाळ कथा आवडते तर दुसऱ्याला पाल्हाळिक कथन आवडते. कोणास केवळ भोळी (भाबडी) भक्तीच पाहिजे असते.

**आगमी[१९] पाहे आगम। शूर पाहे संग्राम। येक पाहाती नाना धर्म। इछेसारिखे ।।५४।।**

आगमी (वेदशास्त्रज्ञ किंवा तंत्रज्ञ) आगम (वेद व तंत्र) पाहातो. शूराला लढाई पहावीशी वाटते आणि काही माणसे विविध धर्म (धर्मशाखा) स्वेच्छेने पाहतात. (त्यांचा अभ्यास करणे आवडते.)

**मुक्त पाहे मुक्तलीळा। सर्व पाहे[२०] सर्व कळा। जोतिषी भविष्य पिंगळा। वर्णू पाहे ।।५५।।**

मुक्त असणारा मुक्तांच्या लीला पाहातो. बहुश्रुताला अनेक विषय आवडतात. तर ज्योतिषी पिंगळा पक्षाच्या आवाजावरून भविष्य सांगू पहातात.

**ऐसें सांगावें तें किती। आवडीसारिखें ऐकती। नाना पुस्तकें वाचिती। सर्वकाळ ।।५६।।**

अशा प्रकारे जगातील माणसांच्या आवडीनिवडी किती म्हणून सांगाव्यात! प्रत्येकजण आपल्या आवडीनुसार श्रवण करीत असतो आणि अनेक प्रकारची पुस्तके वाचतो. (आपल्या आवडीनुसार पुस्तकांची निवड व वाचन लोक करीत असतात.)

**परी परत्र साधनेंविण। म्हणों नये तें श्रवण। जेथें नाहीं आत्मज्ञान। तया नाव कर्मणा ।।५७।।**

परंतु ज्या श्रवणातून आत्मज्ञानाचा मार्ग सापडत नाही ते श्रवणच नव्हे. त्या अन्य श्रवणाला करमणूक किंवा कालक्रमण हेच नाव योग्य.

**गोडीविण गोडपण। नाकेंविण सुलक्षण। ज्ञानेंविण निरूपण। बोलोंचि नये ।।५८।।**

गोडी असल्याशिवाय गोडपण नाही किंवा नासिका सुंदर नाही तेथे सौंदर्यच नाही. त्याप्रमाणे

१७) अप्रमाद-अमर्याद मस्ती १८) साबडी-भोळी १९) आगमी-तांत्रिक २०) सर्व पाहे-सर्वज्ञ पाहतो

निरुपणात आत्मज्ञानाचे विवरण नाही ते निरुपणच नव्हे!

**आतां असो हें बहुत। ऐकावा परमार्थग्रंथ। परमार्थग्रंथेविण वेर्थ। गथागोवी ।।५९।।**

आता अधिक सांगणे नकोच. साधकाने परमार्थ ग्रंथाचेच (वाचन) श्रवण करावे. पारमार्थिक ग्रंथाशिवाय अन्य ग्रंथ म्हणजे (गथागोवी) गोंधळच होय. (त्याचे वाचन करणे व्यर्थ जाते)

**म्हणोनि नित्यानित्यविचार। जेथें बोलिला सारासार। तोचि ग्रंथ पैलपार। पाववी विवेकें ।।६०।।**

म्हणून ज्या ग्रंथात नित्य काय आणि अनित्य काय किंवा सार काय किंवा असार काय हा विवेक सांगितला असेल तोच ग्रंथ त्या विवेकाच्या योगाने भवसागराच्या पैलपार साधकाला पोहोचवितो.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास नवम।। ९।।**

## द. १७-३ : श्रवणनिरूपण

आत्मज्ञान साध्य करण्यासाठी अनेक मार्ग प्रचलित आहेत. परंतु श्रुती माउलीने सांगितलेला व अनेक थोर आत्मज्ञानी पुरुषांनी चोखाळलेला राजमार्गच श्री समर्थांना अतिशय आवडतो. श्रवण, मनन, निदिध्यासन आणि रोकडा आत्मसाक्षात्कार असा तो चार पायऱ्यांचा मार्ग आहे. या समासात त्याचे थोडक्यात वर्णन आढळते. श्रीसमर्थ म्हणत आहेत की हा ग्रंथ आधीच सोडू नका. त्यात काय सांगितले आहे ते नीट बघा. कोणतेही ज्ञान होण्यास प्रथम व्यवस्थित श्रवण झाले पाहिजे. नंतर त्यावर मनन करणे अति अवश्य असते. ज्ञानाचा विषय जितका सूक्ष्म तितका त्यावर मनन करण्यास विचार सूक्ष्म लागतो. परमार्थात आत्मस्वरूपावर विचार करायचा असतो. अंतरात्मा युगानयुगे विश्व चालवतो आहे. जगातील मोठमोठे पुरुष त्याच्यासाठीच जगले. तो नसेल तर सारे व्यर्थ जाते. म्हणून सर्व ज्ञानामध्ये आत्मज्ञान श्रेष्ठ आहे. जो अत्यंत मननशील आहे, विवेकसंपन्न आहे, त्याला पंचमहाभूतांच्या पलीकडे स्वत:पाशीच तो आत्मा सापडतो. त्यासाठी सूक्ष्मात शिरणे अवश्य असते. परंतु या मायादेवीच्या धांदलीत सूक्ष्मामध्ये लक्ष गुंतवणारा माणूस क्वचितच आढळतो. दृश्याच्या नादी लागल्याने अधोगती होते. यासाठी साधकाने विचारांनी ऊर्ध्व व्हावे, म्हणजेच सूक्ष्मामध्ये शिरावे. निरंजनास धुंडता धुंडता देहातीत होणारा तो धन्य होय. उपासनेने अगदी मूळ संकल्पापर्यंत पोचावे. त्याच्या पलीकडे निश्चळ ब्रह्म असते. त्या ब्रह्माचा विचार तर सूक्ष्माहून सूक्ष्म आहे. साधकाने विवेकप्रलयाने जावे. हा साधला की, ग्रंथ बाजूला ठेवावा.

### ।। श्रीराम।।

**थांबा थांबा ऐका ऐका। आधींच ग्रंथ सोडूं नका। सांगितलें तें ऐका। सावधपणें ।।१।।**

श्रीसमर्थ ग्रंथ वाचणाऱ्यांना सांगतात - ‘‘थांबा जरा थांबा. माझे भाषण ऐकून घ्या. ग्रंथवाचन

सोडून देऊ नका. त्या ग्रंथामध्ये जे सांगितले आहे ते एकाग्रचित्ताने सावधपणे श्रवण करा. (ग्रंथाचा आशय नीट समजून न घेता तो हातावेगळा करणे योग्य नाही हे सांगण्याचा आशय.)

**श्रवणामध्यें सार श्रवण। तें हें अध्यात्मनिरूपण। सुचित करून अंतःकर्ण। ग्रन्थामधें विवरावें ।।२।।**

श्रवणामध्ये सर्वात महत्त्वाचे श्रवण म्हणजे अध्यात्मनिरूपण होय. आपले मन चांगले एकाग्र करून ग्रंथातील तत्त्वांचा शोध घ्यावा.

**श्रवणमननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार। रोकडा मोक्षाचा उधार। बोलोंचि नये ।।३।।**

श्रवणाचे (अर्थ समजून घेऊन) मनन करावे. निदिध्यास धरावा. त्यामुळे साक्षात्कार होतो (प्रत्यक्ष अनुभूती येते.) मोक्षप्राप्तीचा रोखीचा हा व्यवहार आहे. (उधारीचा नव्हे)

**नाना रत्नें परीक्षितां। अथवा वजनें करितां। उत्तम सोनें पुटीं[१] घालितां। सावधान असावें ।।४।।**

नाना प्रकारच्या रत्नांची परीक्षा करताना, मौल्यवान वस्तूचे वजन करताना किंवा उत्तम सोने मुशीमध्ये (वितळविण्यासाठी) ठेवताना फार सावध असावे लागते.

**नाना नाणीं मोजून घेणें। नाना परीक्षा करणें। विवेकी मनुष्यासी बोलणें। सावधपणें ।।५।।**

नाना नाणी मोजून घेताना किंवा त्याचे खरेखोटेपणाची परीक्षा करताना आणि विचारवंत माणसाशी भाषण करताना सावधपणा आवश्यक असतो.

**जैसें लाखोलीचें धान्य। निवडून वेंचितां[२] होतें मान्य। सगट मानितां[३] अमान्य। देव क्षोभे।।६।।**

देवाला धान्याची लाखोली वाहताना ते निवडून घ्यावे. (किडके दाणे बाजूला काढावे) तरच देवाला ते मान्य होते. सरसकट ते अर्पण केले तर ते अमान्य होते; देव रागावतो. (लक्ष वस्तू फुले, दुर्वा देवाला वाहणे यासारखी व्रते असतात त्याला 'लाखोली' म्हणतात)

**येकांतीं नाजुक कारबार। तेथें असावें अतितत्पर। त्याच्या कोटिगुणें विचार। अध्यात्मग्रन्थीं।।७।।**

एकान्तात नाजूक (राजकारणाची) खलबते करताना अत्यंत दक्षतेने चर्चा करावी लागते. त्याच्या कितीतरी अधिक पटीने सावधपणा अध्यात्मग्रंथाच्या अर्थाचा विचार करताना पाळावा लागतो.

**काहिण्या कथा गोष्टी पवाड। नाना अवतारचरित्रें वाड। त्या समस्तांमध्यें जाड। अध्यात्मविद्या ।।८।।**

कहाण्या, कथा, गोष्टी, पोवाडे, नाना अवतारांच्या थोर कथा या सर्वांपेक्षा अध्यात्मविद्या गहन आहे.

**गत गोष्टीस ऐकिलें। तेणें काये हातास आलें। म्हणती पुण्य प्राप्त जालें। परी तें दिसेना कीं ।।९।।**

झाल्या-गेल्या गोष्टी/कथा ऐकल्याने आपणास काय प्राप्त होते? त्यामुळे पुण्य प्राप्त होते असे म्हणतात. पण ते पुण्य तर डोळ्यांना दिसत नाही.

१) पुटीं-मुशीत २) वेंचिता-अर्पण करिता ३) सगट मानितां-सरसकट वाहिल्याने

**तैसें नव्हे अध्यात्मसार। हा प्रचितीचा विचार। कळतां अनुमानाचा संव्हार। होत जातो।।१०।।**

आध्यात्मिक ज्ञानाचा तसा प्रकार नसतो. त्या ज्ञानाची प्रचिती येऊ शकते आणि त्यातील विचार समजला म्हणजे संशयाचे निर्मूलन होते.

**मोठे मोठे येऊन गेले। आत्म्याकरितांच वर्तले। त्या आत्म्याचा महिमा बोले। ऐसा कवणु।।११।।**

या जगतात थोर थोर लोक होऊन गेले. त्यांनी आत्मप्राप्तीसाठीच नाना प्रयास केले. या आत्म्याचा महिमा वर्णन करू शकेल असा कोण आहे?

**युगानयुगें येकटा येक। चालवितो तिनी लोक। त्या आत्म्याचा विवेक। पाहिलाच पाहावा।।१२।।**

युगानुयुगे तिन्ही लोकांचा कारभार एका आत्म्यामुळेच चालला आहे, त्या आत्म्याचा शोध निरंतर पुन:पुन्हा घ्यावा.

**प्राणी आले, येऊन गेले। ते जैसे जैसे वर्तले। ते वर्तणुकेचें कथन केलें। इछेसारिखें ।।१३।।**

या जगात आजवर अनेक प्राणी आले आणि गेले. त्यांचे वर्तन जसे झाले त्याचे वर्णन ग्रंथकारांनी स्वेच्छेप्रमाणे केले आहे. (त्या वर्तनामागे प्रेरणा अंतरात्म्याचीच होती)

**जेथें आत्मा नाहीं दाट[४]। तेथें अवघें सरसपाट। आत्म्याविण बापुडें काष्ठ। काये जाणे।।१४।।**

जेथे व्यापणारा आत्मा नाही तेथे चेतनेअभावी सारे शुष्क आहे. आत्म्याविना बिचारे लाकडासारखे शरीर काय करू शकेल?

**ऐसें वरिष्ठ आत्मज्ञान। दुसरें नाहीं यासमान। सृष्टीमधें विवेकी सज्जन। तेचि हें जाणती।।१५।।**

आत्मज्ञान हेच सर्व प्रकारच्या ज्ञानामध्ये श्रेष्ठ आहे त्यासारखे दुसरे या जगात काहीच नाही ही गोष्ट जे विचारवंत सज्जन असतात त्यांनाच फक्त ठाऊक आहे.

**पृथ्वी आणी आप तेज। याचा पृथ्वीमध्यें समज। अंतरात्मा तत्वबीज। तें वेगळेंचि राहिलें।।१६।।**

पृथ्वी, आप आणि तेज यांचा अंतर्भाव पृथ्वी तत्त्वातच होतो. पण या सर्वांचे मूळ जो अंतरात्मा, तो या भूतांहून वेगळा आहे.

**वायोपासून पैलिकडे। जो कोणी विवेकें पवाडे। जवळीच आत्मा सांपडे। तया पुरुषासी।।१७।।**
**वायो आकाश गुणमाया[५]। प्रकृतिपुरुष मूळमाया। सूक्ष्मरूपें प्रचित येया। कठिण आहे।।१८।।**

(वायु, आकाश, गुणमाया, मूळमाया, अंतरात्मा अशी ही चढती श्रेणी आहे.) वायू पलीकडील तत्त्वे ज्ञानेंद्रियांच्या आकलनाच्या पलीकडील असल्यामुळे ती जाणवत नाहीत. जो विवेकाच्या सहाय्याने प्रयत्न करील त्याला अंतरात्मा जवळच सापडेल. वायुपासून पुढे आकाशादि तत्त्वे सूक्ष्म आहेत. पृथ्वी, आप, तेज यांचे रूप व्यक्त असल्याने ते अनुभवता येते. त्यापलीकडील तत्त्वे व त्याहून अतिसूक्ष्म व पलीकडे असलेले आत्मतत्त्व अनुभवाला येणे कठीण आहे.

---

४) दाट-प्रगट, जागृत ५) ओवी १८-वायु, आकाश, गुणमाया व प्रकृतिपुरुषरूपी मूळमाया ही सूक्ष्म असल्याने त्यांचा उलगडा होणे कठीण जाते.

**मायादेवीच्या धांदली। सूक्ष्मीं कोण मन घाली। समजला त्याची तुटली। संदेहवृत्ती ॥१९॥**

मायादेवीने निर्माण केलेल्या गलबल्यातून इतक्या सूक्ष्म विचारांच्या अभ्यासाकडे कोण ध्यान देणार? तरीसुद्धा ज्याने सारे समजावून घेतले त्याचा संदेह समूळ नष्ट होतो, हे सत्य आहे.

**मूळमाया चौथा देह। जाला पाहिजे विदेह। देहातीत होऊन राहे। धन्य तो साधु ॥२०॥**

मूळमाया म्हणजे मूळ संकल्प. 'मी ब्रह्म आहे' ही जाणीव जेथे असते तो ब्रह्मांडाचा, चौथा (महाकारण) देह आहे. त्याचाही लय झाला म्हणजे विदेही स्थिती अवतरते. चारी देहांचे निरसन होऊन जो निराळा होतो तो विदेही साधू धन्य होय!

**विचारें ऊर्ध चढती। तयासीच ऊर्धगती। येरां सकळां अधोगती। पदार्थज्ञानें ॥२१॥**

विचाराने सूक्ष्मात प्रवेश करण्याची वरची पायरी जे चढतात त्यांना ब्रह्मज्ञानापर्यंत पोहोचणे शक्य होते. पण याखेरीज जे ऐहिक दृश्य पदार्थांच्या ज्ञानामध्ये गुंतून जातात त्यांना अधोगति प्राप्त होते.

**पदार्थ चांगले दिसती। परी ते सर्वेंचि नासती। अतो भ्रष्ट ततो भ्रष्ट होती। लोक तेणें ॥२२॥**

दृश्य पदार्थ चांगले दिसतात खरे पण ते लगेच नष्ट पावतात. त्यामुळे त्यातच अडकून राहणाऱ्यांना इहलोकही साधत नाही व परलोक साधू शकत नाही. समाधान प्राप्तीच्या दृष्टीने ते दोन्हीकडे भ्रष्टच ठरतात.

**याकारणें पदार्थज्ञान। नाना जिनसीचा अनुमान। सर्व सांडून निरंजन। धुंडीत जावें ॥२३॥**

म्हणून अनेक ऐहिक पदार्थांच्या ज्ञानप्राप्तीत अडकू नये. त्या दृश्य पदार्थांच्या संबंधातील संशयाचे ज्ञान सोडावे आणि निरंजन (निर्मल) परब्रह्माचा शोध घ्यावा.

**अष्टांग योग पिंडज्ञान। त्याहून थोर तत्वज्ञान। त्याहून थोर आत्मज्ञान। तें पाहिलें पाहिजे ॥२४॥**

अष्टांगयोग (यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी) आणि पिंडज्ञान यांच्याहून तत्त्वज्ञान थोर आहे. पण तत्त्वांच्या विचारांपेक्षाही आत्मज्ञान अधिकच श्रेष्ठ आहे म्हणून तेच प्राप्त करून घ्यावे.

**मूळमायेचे सेवटीं। हरिसंकल्प मुळीं उठी। उपासनायोगें मिठी। तेथें घातली पाहिजे ॥२५॥**

मूळ मायेच्या पलीकडे मूळापर्यंत जाताना तेथे प्रथम संकल्पाचे स्फुरण आढळेल. त्या आद्य संकल्पकर्त्याशी उपासनेच्या योगे एकरुप व्हावे. (अशाप्रकारे उपासक एकरुप होतो तेव्हा उपासना फळास येते.)

**मग त्यापैलिकडे जाण। निखळ ब्रह्म निर्गुण। निर्मळ निश्चळ त्याची खूण। गगनासारिखी ॥२६॥**

अंतरात्म्याच्या पलिकडे निर्गुण, निर्मळ, निश्चळ असे शुद्ध परब्रह्म आहे ते आकाशाप्रमाणे आहे हीच त्याची खूण सांगता येणे शक्य आहे.

**येथून तेथवरी दाटलें। प्राणीमात्रांस भेटलें। पदार्थमात्रीं लिगटलें। व्यापून आहे ।।२७।।**

ते येथून तेथवर (पिंडापासून ब्रह्मांडापर्यंत) घनदाट सर्वत्र भरलेले आहे. प्राणिसृष्टी व जडपदार्थ या सर्वांना व्यापून ते लिगडले आहे. (द. २० स. १० मधील पहिल्या वीस ओव्या पुन्हा वाचाव्या. स्वाध्याय १ मध्ये वरील समासाचा अभ्यास आपण पूर्वी केला आहेच)

**त्याऐसें नाहीं थोर। सूक्ष्माहून सूक्ष्म विचार। पिंडब्रह्मांडाचा संव्हार। होतां, कळे ।।२८।।**

परब्रह्मासारखे श्रेष्ठ अन्य काहींही नाही. अत्यंत सूक्ष्म विचार, ते कळण्यासाठी करावा लागतो. पिंड ब्रह्मांडाचा संहार झाला म्हणजे हे समजते. (द. १३-४ 'प्रलयनिरूपण' ओवी २४ पहा.)

**अथवा पिंडब्रह्मांड असतां। विवेकप्रळये पाहो जातां। शाश्वत कोण तें तत्वतां। उमजों लागे ।।२९।।**

अथवा पिंड-ब्रह्मांड यांचा (कल्पान्तकाळी) प्रलय झाला नसतानाही म्हणजे त्यांचे अस्तित्व असतानासुद्धा 'विवेक-प्रलय' करून त्यांचा निरास केला असतानासुद्धा शाश्वत काय आहे याचे आकलन होऊ शकते. (दृश्य विश्व असतानासुद्धा ब्रह्माचा सूक्ष्म विचार करावा म्हणजे प्रकृति असूनही बाधित होते आणि शाश्वत ब्रह्माची अनुभूति येते याला विवेक प्रलय म्हणतात. संदर्भासाठी द. १०-५ 'पंचप्रलयनिरुपण' पहावा)

**करून अवघा तत्वझाडा। सारासाराचा निवाडा। सावधपणें ग्रन्थ सोडा। सुखिनावें[६] ।।३०।।**

सर्व तत्त्वांचा विचार करून त्यांचा निरास करावा. आत्मानात्मविचार सारासारविचार निश्चित झाला म्हणजे साधना करण्यासाठी ग्रंथ खुशाल बाजूला ठेवा. (याच समासाच्या प्रारंभी 'थांबा थांबा ऐका ऐका। आधीच ग्रंथ सोडू नका।' ही जी सूचना केली आहे तिच्याशी या ओवीचा संबंध ध्यानी येईल. ग्रंथात सांगितल्याप्रमाणे विचाराचे आकलन करून न घेता ग्रंथ हातावेगळा करण्याची सामान्य प्रवृत्ती असते. म्हणून येथे श्रीसमर्थांनी वरीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणनिरूपणनाम समास तिसरा ।। ३।।**

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका ४ थी

**(श्रवणमाहात्म्य : द. ७-८, ७-९, १७-३ वर आधारित)**

प्र. १ द. १७-३ मध्ये पहिल्याच ओवीत ग्रंथ सोडण्यापूर्वी कोणती तयारी करावी असे समर्थांनी सांगितले आहे?

प्र. २ श्रवणापासून कोणते लाभ होतात? दहा लक्षणे लिहा. (द. ७-८)

६) सुखीनावें-सुखेनैव, खुशाल.

प्र. ३ ज्ञानी साधकाला अद्वैत ग्रंथ-श्रवणच पाहिजे हा विचार समर्थांनी द. ७-९ मधील तीन चार ओव्यात मांडला आहे. त्या ओव्या लिहा.

प्र. ४ येकांती नाजुक कारबार। तेथें असावे अति तत्पर। त्याच्या कोटि गुणें विचार। अध्यात्म ग्रंथीं।। या ओवीचे ७-८ ओळीत स्पष्टीकरण करा.

प्र. ५ १) तुम्ही आतापर्यंत ऐकलेल्या पाच प्रभावी प्रवचनकारांची नावे लिहा.

२) त्यांनी केलेल्या प्रवचनातील कोणत्या विशिष्ट विचारांचा ठसा आपल्यावर उमटला?

३) श्रीसमर्थांची चांगल्या ग्रंथाची लक्षणे सांगा.

# दासबोध प्रबोध : स्वाध्याय ५ वा

## (द. १६-९, १०; १७-५)

यात जे तीन समास आहेत त्यातून आत्मज्ञानाच्या अतिसूक्ष्म विचारांकडे आपली वाटचाल होणार आहे. लोक नाना देवतांच्या उपासना करत असले तरी ती उपासना निर्गुण निराकार परमेश्वरालाच पावते हा जो विचार आपल्या धर्मात आहे, त्यातून सहिष्णुवृत्ती अंगी बाणते. श्रीसमर्थांचे दैवत 'आत्माराम' आहे, त्यासंबंधी अत्यंत सखोल विचार द. १६-१० मध्ये आहे.

सध्याच्या धावपळीच्या वातावरणात मनुष्य बहिर्मुख झाला आहे त्याला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य द. १७-५ मध्ये आहे. दररोज आपले एकवीस हजार सहाशे श्वासप्रश्वास होतात. देहाच्या या 'अजपा' जपाबद्दल माणसाला जाणीव करून देण्याचे कार्य हा समास करतो.'सोऽहं' साधना हा अनुभूती घेण्याचा विषय आहे. गावांमध्ये जागोजागी छोटी दासबोध अभ्यास मंडळे काढली जाऊन त्यामध्ये प्रवचन-चर्चा या मार्गाने या समासांचा अभ्यास व्हावा हे प्रश्नमालिकेतील प्रश्नांच्या रोखावरून ध्यानी येईल...

### द. १६-९ : नाना उपासनानिरूपण

श्रोत्यांनी असा प्रश्न विचारला कीं जगामध्ये पुष्कळ प्रकारचे लोक आहेत. त्यांच्या उपासनादेखील पुष्कळ प्रकारच्या असतात. जो तो आपल्या देवतेचे श्रद्धेने व मनापासून भजनपूजन करतो, स्तवन करतो, आणि प्रत्येक जण आपल्या उपासनेला निर्गुण म्हणतो. हे कसे? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी श्रीसमर्थांनी हा समास सांगितला आहे. त्यांचे उत्तर असे की, आपल्या दैवताची स्तुति करण्याचा माणसाचा स्वभाव आहे. त्याचा हा परिणाम असतो. येथे निर्गुण म्हणजे बहुगुण. अंतरात्मा हाच खरा बहुगुणी आहे. सगळ्या देवता अंतरात्म्याच्याच

अंशरूप असतात. भक्त लोक जे भजनपूजन करतात ते अखेर अंतरात्म्यास पोचते. पावसाचे पाणी झाडाच्या शेंड्यावर पडते, तरीपण ते मुळाकडे जाते. तसे हे घडते. सगळ्यांनाच मूळ सापडत नाही. फक्त साधूच्या अंतर्यामी खरा आत्मानात्मविवेक असतो. तो मूळ अंतरात्म्यापर्यंत पोचतो. जे चंचळपणे बदलते, त्यास सगुण म्हणतात. जे निश्चल असते त्यात कधी विकार किंवा बदल होत नाही. ते गुणातीत निर्गुण होय. या गोष्टी ज्याने त्याने विवेकाने समजाव्या. उगीच वाद घालू नये. राजे दोन प्रकारचे असतात. एक सिंहासनावर आरूढ झालेला खरा राजा आणि दुसरा राजा नावाचा कोणी सेवक, खोटा राजा. या दोघांमधील खरा राजा आपण ओळखतो. त्याचप्रमाणे उपास्यदेवतेला देव म्हणणे ठीक आहे; पण तो खोटा राजा आहे. सर्व दृश्य विरल्यावर जे शिल्लक उरते ते खरे निर्गुण होय. बाकीचे सारे मायेमध्ये येते. जगात सगळी चंचळ निश्चळाची सरमिसळ आहे. सगुण निर्गुण एकत्र कालवले आहे. त्यांचा नीट विवेक केल्यावाचून सगुण कोणते व निर्गुण कोणते ते कळत नाही. म्हणून साधकाने अति सूक्ष्म विचार करावा आणि खरे-खोटे व भ्रष्ट-अंतर्निष्ठ नीट समजून घ्यावे.

## ||श्रीराम||

**पृथ्वीमध्यें लोक नाना। त्यास नाना उपासना। भावार्थें प्रवर्तले भजना। ठाईं ठाईं ।।१।।**

पृथ्वीमध्ये नाना प्रकारचे लोक आहेत. त्यांच्या उपासनाही अनेक प्रकारच्या आहेत. ठिकठिकाणी हे लोक श्रद्धापूर्वक ईश्वराचे भजन-पूजन करीत असतात.

**आपल्या देवास भजती। नाना स्तुती स्तवनें करिती। जे ते निर्गुण ह्मणती। उपासनेसी ।।२।।**

आपल्या उपास्य दैवताला भजतात; स्तुती स्तोत्रे गातात 'आपला देव निर्गुणच आहे' असे सर्वजण म्हणतात.

**याचा कैसा आहे भाव। मज सांगिजे अभिप्राव। अरे हा स्तुतीचा स्वभाव। ऐसा आहे ।।३।।**

'हे त्यांचे म्हणणे योग्य आहे काय याबद्दल आपले मत काय आहे' असा प्रश्न वक्त्याला श्रोत्याने विचारला. ते उद्गारले ''अरे, आपल्या देवाची स्तुती करणे हा माणसाचा स्वभावच आहे. त्यामुळे असे घडते.''

**निर्गुण ह्मणिजे बहुगुण। बहुगुणी अंतरात्मा जाण। सकळ त्याचे अंश हें प्रमाण। प्रचित पाहा ।।४।।**

यात काही बिघडत नाही. अंतरात्मा हा निर्गुण म्हणजे बहुगुण आहे. साऱ्या देवता त्या अंतरात्म्याचेच अंश आहेत. भक्त जेव्हा भजनपूजन करतात ते त्या अंतरात्म्यालाच पोहोचते, याची प्रचीती पहावी.

**सकळ जनासी मानावें तें। येका अंतरात्म्यास पावतें। अधिकारपरत्वें तें। मान्य कीजे ।।५।।**

सर्व लोकांना संतुष्ट केले तरी ते या अंतरात्म्यालाच पावते कारण सर्वांच्या अंतर्यामी

अंतरात्माच असतो. तथापि प्रत्येकाची पात्रता पाहाणे जरुर आहे.

**श्रोता म्हणे हा अनुमान। मुळीं घालावें जीवन। तें पावे पानोपान। हे सध्या[२] प्रचिती ॥६॥**

यावर श्रोता पुन्हा विचारतो ''हे जरा संशयाचे वाटते (आपण म्हणता कोणतीही पूजा एका अंतरात्म्याला पावते पण) झाडाच्या मुळाला पाणी घातले तर ते पानापानापर्यंत पोहोचते हा प्रत्यक्ष अनुभव आहे.' (त्यानुसार जर निर्गुणाची उपासना केली तरच ती सर्व देवतांना पोहोचेल.)

**वक्ता म्हणे तुळसीवरी। उदक घालावें पात्रभरी। वरी न थिरे निमिषभरी। भूमीस भेदे ॥७॥**

वक्ता म्हणतो - 'तुळशीवर भांडेभर पाणी (शेंड्यावर किंवा पानांवर) घातले की ते क्षणभरही तेथे स्थिर न राहाता जमिनीत येऊन मुरते.'

**थोरा वृक्षास कैसें करावें। सेंड्या पात्र कैसें न्यावें। याचा अभिप्राय देवें। मज निरोपावा ॥८॥**

श्रोता विचारतो - 'तुळशीबद्दल हे ठीक आहे पण मोठ्या वृक्षाच्या बाबतीत काय करावे? त्याच्या शेंड्याकडे पात्र कसे नेता येईल; याचे उत्तर मला सांगावे.'

**प्रजन्याचें उदक पडतें। तें तों मुळाकडे येतें। हातचि पावेना तेथें। काये करिती ॥९॥**

वक्ता म्हणतो - 'कळशी मोठ्या वृक्षाच्या शेंड्यापर्यंत नेता येत नाही. तेथे आपला हात पोहोचत नाही त्याला काय करणार? पण पावसाचे पाणी झाडाच्या शेंड्यावर पडते ते तेथून मुळाकडे येतेच की नाही?'

**सकळास मूळ सांपडे। ऐसें पुण्य कैंचें घडे। साधुजनाचे पवाडे। विवेकीं मन ॥१०॥**

**तथापी वृक्षांचेनि पडिपाडें[३]। जीवन घालितां कोठें पडे। ये गोष्टीचें सांकडें। कांहींच नाहीं॥११॥**

(उपासनेचे बाबतीतही तसेच आहे) फार मोठा पुण्यसंग्रह असल्याशिवाय मूळ सापडत नाही. साधुजनांना मात्र विवेकी दृष्टी असल्याने ते थेट अंतरात्म्याची उपासना करतात. अन्य लोक आपल्या उपास्य देवतेचीच उपासना करतात. ते वरील दृष्टान्तानुसार झाडाच्या शेंड्याला पाणी घालण्यासारखे आहे. तरीसुद्धा ते पाणी शेवटी मुळाकडेच येते. त्याप्रमाणे ती उपासनासुद्धा अंतरात्म्याकडे पोहोचते. म्हणून तसे करण्यातसुद्धा काही हरकत नसावी.

**मागील आशंकेचें निर्शन। होतां जालें समाधान। आतां गुणास निर्गुण। कैसे म्हणती ॥१२॥**

श्रोता म्हणतो - 'माझ्या पूर्वीच्या आशंकेचे समाधान झाले पण आता मला हे सांगावे की सगुणालाच हे उपासक निर्गुण कसे म्हणू शकतात?'

**चंचळपणें विकारलें। सगुण ऐसें बोलिलें। येर तें निर्गुण उरलें। गुणातीत ॥१३॥**

निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी प्रथम चंचलपणाचा विकार (स्फूर्ति) निर्माण झाला त्याला सगुण म्हणतात. सगुणाच्या पलीकडे जे बाकी राहाते त्याला निर्गुण म्हणतात.

२) सध्या-सद्यः, रोकडी ३) पडिपाडें-दृष्टान्तावरून

**वक्ता म्हणे हा विचार। शोधून पाहावें सारासार। अंतरीं राहातां निर्धार। नांव नाहीं ।।१४।।**

वक्ता म्हणतो - हा विचार बरोबर आहे. सगुण व निर्गुण यातील भेद निश्चितपणे ध्यानात घेण्यासाठी सार व असार विचार दृढ शोधून अंतःकरणात धरला पाहिजे. याचा निश्चित विचार मनात बिंबला तर सगुण व निर्गुण यातील भेद लयाला जातो. (महावाक्याचे सार तेच आहे)

**विवेकेंचि तो मुख्य राजा। आणी सेवकाचें नांव राजा। याचा विचार समजा। वेवाद खोटा ।।१५।।**

विवेकाच्या बळावर चातुर्यादि गुणांमुळे एखादा मनुष्य राजा झाला आणि एखाद्या सेवकाचे नाव राजा असले तरी त्या दोघांची योग्यता सारखी होऊ शकते काय? याचा मनामध्ये विचार करावा यासंबंधात वादंग माजविणे खोटे आहे हे कोणीही सांगू शकेल. (हा दृष्टांत यासाठी दिला आहे की सगुणाला निर्गुण म्हटल्याने सगुण हे निर्गुणाची बरोबरी करू शकत नाही. कोणी जरी तसेच म्हटले तरी सेवक व राजा यांची समानता कशी होईल?)

**कल्पांतप्रळई जें उरलें। तें निर्गुण ऐसें बोलिलें। येर ते अवघेंचि जालें। मायेमधें ।।१६।।**

कल्पान्त प्रलयकालीही जे न नासता उरते ते निर्गुण, असे म्हणतात आणि बाकी जे सर्व नाश पावते ते सर्व मायेमध्ये आले. (असे वेदशास्त्रात सांगितले आहे आणि संतांनी हेच सांगितले आहे. देवदैवते सुद्धा सर्व मायेमध्येच अंतर्भूत होतात. हा निर्णय आत्मानात्मविवेकाने केला जातो. सगुण व निर्गुण यांचा निवाडा अशा प्रकारे होतो; एरव्ही काहीच निश्चय ठरत नाही.)

**सेना शाहार[४] बाजार। नाना यात्रा लाहानथोर। शब्द उठती अपार। कैसे निवडावे ।।१७।।**

सैन्य, शहरे, बाजाराची गर्दी, लहानमोठ्या यात्रांची गजबज यांच्या गर्दीत अनेक शब्दांचे ध्वनी होतात. त्यामध्ये कोणाचा शब्द कोणता हे कसे निवडता किंवा ओळखता येतील?

**काळामधें प्रज्यन्यकाळ। मध्यरात्रीं होतां निवळ। नाना जीव बोलती सकळ। कैसें निवडावें ।।१८।।**

पावसाळ्यामध्येसुद्धा पाऊस पडून गेल्यावर त्यातल्या त्यात मध्यरात्री अनेक प्रकारच्या किड्यांचे (जीवांचे) आवाज ऐकू येतात तेव्हा कोणाचा आवाज कोणता हे कसे सांगता येईल?

**नाना देश भाषा मतें। भूमंडळीं असंख्यातें। बहु ऋषी बहु मतें। कैसीं निवडावीं ।।१९।।**

अनेक देशांमध्ये अनेक भाषा आहेत, पुष्कळ ऋषींची (विद्वानांची) अनेक मते आहेत ती कशी निवडावी ही मोठी समस्या आहे.

**वृष्टि होतांच अंकुर। सृष्टीवरी निघती अपार। नाना तरु लाहानथोर। कैसें निवडावें ।।२०।।**

पर्जन्याची वृष्टी झाल्यावर जमिनीतून अनेक अंकुर बाहेर येतात. वृक्षांचे अंकुर, लहानमोठे (वेलींचे) तंतू निर्माण होतात त्यांची निवड कशी करावी?

**खेचरें भूचरें जळचरें। नाना प्रकारींचीं शरीरें। नाना रंग चित्रविचित्रें। कैसीं निवडावीं ।।२१।।**

४) शाहार-शहर

आकाशातील, जमिनीवरील आणि पाण्यातील अनेक प्राण्यांची भिन्न प्रकारींची शरीरे असतात. त्यांचे रंग विविध असतात. त्यात निवड कशी करावी?

**कैसे दृश्य आकारलें। नानापरीं विकारलें। उदंडचि पैसावलें। कैसें निवडावें ।।२२।।**

हे दृश्य कसे आकाराला आले, कैक प्रकारची रचना घडली आणि त्याचा इतका अफाट विस्तार झाला त्यात काय काय निवडावे (मूळ मायेतून अष्टधा प्रकृती प्रगट झाली तिचा केवढा विस्तार झाला यातून निवड कशी करावी)

**पोकळीमधें गंधर्वनगरें। नाना रंग लाहानथोरें। बहु वेक्ति बहु प्रकारें। कैसी निवडावीं ।।२३।।**

आकाशामधील पोकळीत विविध रंगांच्या ढगांची गंधर्वनगरे दिसतात त्यात लहानथोर आकाराच्या रंगाने चित्रित व्यक्ती दिसतात त्यात विविध प्राण्यांचे भास होतात हे कसे निवडावे?

**दिवसरजनीचे प्रकार। चांदिणें आणी अंधकार। विचार आणि अविचार। कैसा निवडावा ।।२४।।**

दिवस आणि रात्र, चांदणे आणि अंधःकार, विचार आणि अविचार यांच्यात निवडण्यासाठी शोध कसा घ्यावा.

**विचार आणी आठवण। नेमस्त आणी बाष्कळपण। प्रचित आणि अनुमान। येणें रीती ।।२५।।**

विस्मरण आणि स्मरण, नेटकेपणा व बाष्कळपणा, अनुभव आणि तर्क यातील निवड कशी करावयाची. (सृष्टीमध्ये यांचे मिश्रणच आढळते.)

**न्याय आणी अन्याय। होय आणी न होये। विवेकेंविण काये। उमजों जाणें ।।२६।।**

न्याय आणि अन्याय, होऊ शकणारे व न शकणारे, हे सूक्ष्म विचारांशिवाय कसे उमगणार?

**कार्यकर्ता आणी निकामी। शूर आणि कुकर्मी। धर्मी आणि अधर्मी। कळला पाहिजे ।।२७।।**

**धनाढ्य आणि दिवाळखोर। साव आणि तश्कर। खरें आणि खोटें हा विचार। कळला पाहिजे ।।२८।।**

कार्यकर्ता आणि निकामी पुरुष, शूर आणि वाईट कर्मे करणारा, धार्मिक आणि अधार्मिक, श्रीमंत आणि दिवाळखोर, सभ्य आणि चोर, खरे आणि खोटे यातील भेदाचा विचार समजला पाहिजे.

**वरिष्ठ आणि कनिष्ठ। भ्रष्ट आणि अंतरनिष्ठ। सारासारविचार पष्ट। कळला पाहिजे ।।२९।।**

वरिष्ठ आणि कनिष्ठ, भ्रष्ट आणि अंतर्निष्ठ, सार आणि असार, या सर्वांतील फरक तारतम्याने स्पष्ट कळला पाहिजे.

(सारांशाचा विचार असा की या सृष्टीत नानाविध उपासना आहेत. त्यांच्या उपासनापद्धतीही विविध आहेत. ही विविधता मायेतील आहे. चंचळ आणि निश्चळ, सगुण आणि निर्गुण एकत्र कालवले गेले आहेत. साधकाने अति सूक्ष्म विवेक (सारासार विचार) करून ईश्वराहूनसुद्धा सूक्ष्म असलेले निश्चळब्रह्म ओळखले पाहिजे व त्याच्याशी अनन्य झाले पाहिजे. 'आत्मा वर्तवितो

शरीर। तोचि देव उत्तरोत्तर।' यासंबंधीचा विचार असलेला द. १८-८ हा अंतर्देवनिरुपणाचा समास, दा. परिचय स्तराच्या अभ्यासात आपण पाहिला आहे. त्याची उजळणी या निमित्ताने करावी अशी अभ्यासार्थींना सूचना करावीशी वाटते.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नाना उपासनानिरूपणनाम समास नवम।।९।।**

## द. १६-१० : गुणभूतनिरूपण

श्रोत्यांनी प्रश्न विचारला की जगात सारी पंचभूतांची धांदल दिसते. पंचभूते विकारी आहेत. ती गेल्यावर काय शिल्लक राहते? तीन गुण कोठे जातात? श्रीसमर्थ याचे उत्तर देतात, अंतरात्मा हे पाचवे भूत आहे. त्याच्यात त्रिगुणांचा अंतर्भाव असतो. जे जे झालेले आहे ते ते सारे भूत होय. अर्थात त्रिगुण त्याच्यातच येतात. आपल्याला दिसणारे सारे दृश्य पंचभूतांपासून झालेले आहे. दृश्य पदार्थात एका भूताची उणीव दुसरे भूत भरून काढते. अशा पद्धतीने सजीव देह तयार होतो. सर्व ठिकाणी पंचभूतांचा काला असल्याने त्यामध्ये वेगवेगळे निवडता येत नाही. दृश्य विश्वाबद्दल सर्व काही समजणे दुर्घट आहे. थोडेसे लक्षात यावे म्हणून काही येथे सांगितले. निरनिराळ्या शास्त्रांच्यामध्ये विरोध असतो. अनुमानाने एक धड निश्चय होत नाही. भगवंताचे गुण अगाध आहेत. एकटा आत्माराम सगळे विश्व पाळतो. त्याच्यावाचून सर्व प्राणी केवळ प्रेत बनतात, धूळ बनतात. अंतरात्मा म्हणजे जिवंतपण, अंतरात्मा नाही म्हणजे मरण, हे बरोबर समजले पाहिजे. माणसाचा विवेकसुद्धा अंतरात्म्यामुळेच घडतो. तात्पर्य, माणसाने अंतरात्मारूपी जगदीशाला भजावे. प्रत्येकाने त्याची उपासना करावी. उपासना उत्तम चालली तर वरील विचार आपोआप कळतात. उपासनेचा आधार फार मोठा असतो. भजन, साधन व अभ्यास यांच्या योगाने परमार्थ साधतो असा विश्वास बाळगावा.

### ।। श्रीराम।।

**पंचभूतें चाले जग। पंचभूतांची लगबग। पंचभूतें गेलियां मग। काये आहे ।।१।।**

पंचभूतांच्या योगाने जगाचा कारभार चालतो. सारी उलाढाल तीच करतात तीच नाहिशी झाली तर मग काय मागे राहाते?

**श्रोता वक्तयास बोले। भूतांचे महिमे वाढविले। आणि त्रिगुण कोठें गेले। सांगा स्वामी ।।२।।**

यावर श्रोता विचारतो - ''पंचभूतांची एवढी थोरवी आहे तर मग त्रिगुणांचे काहीच महत्त्व नाही का? ते कोठे गेले ते स्वामीजी सांगावे.''

**अंतरात्मा पांचवें भूत। त्रिगुण त्याचे अंगभूत। सावध करूनियां चित्त। बरें पाहें ।।३।।**

वक्त्याने सांगितले - ''आकाश म्हणजे अंतरात्मा हे पाचवे भूत आहे आणि त्रिगुणांचा अंतर्भाव त्यातच होतो हे सावधपणाने ध्यानात घ्यावे. (शास्त्रामध्ये आत्म्याला चिदाकाश असे म्हटले आहे.)

**भूत म्हणिजे जितुकें जालें। त्रिगुण जाल्यांत आलें। इतुकेन मूळ खंडलें। आशंकेचें ।।४।।**

जितके काही निर्माण झाले त्या सर्वाला भूत म्हणतात. त्रिगुण हे झालेल्या भूतातच येतात त्यामुळे शंकेचे निरसन आपोआपच होते.

**भूतांवेगळें कांहीं नाहीं। भूतजात[१] हें सर्वही। येकावेगळें येक कांहीं। घडेचिना ।।५।।**

भूतांवेगळे काही निर्माण होत नाही. सर्व काही 'भूतजात' आहे. भूते आणि त्रिगुण यांच्या परस्पर सहकार्याने सर्व चालते. एकावेगळे एक काहीच घडत नाही.

**आत्म्याचेनी जाला पवन। पवनाचेन प्रगटे अग्न। अग्नीपासून जीवन। ऐसें बोलती ।।६।।**

अंतरात्म्यापासून वायू, वायूपासून अग्नि झाला. अग्नीपासून पाणी निर्माण झाले असे म्हणतात.

**जीवन आवघें डबाबिलें। तें रविमंडळें आळलें। वन्हीवायोचेन जालें। भूमंडळ ।।७।।**

सर्वत्र पाणी भरलेले होते ते सूर्याच्या तेजापासून आळले. वायु आणि वन्ही यापासून भूमंडळ तयार झाले.

**वन्ही वायो रवी नस्तां। तरी होते उदंड सीतळता। ते सीतळतेमधें उष्णता। येणें न्यायें ।।८।।**

अग्नी, वायू व सूर्यच नसते तर उदंड थंडीच भरून राहिली असती. त्या थंडीत सूर्यामुळे उष्णता निर्माण झाली.

**आवघें वर्मासी वर्म केलें। तरीच येवढें फांपावलें। देहेमात्र तितुकें जालें। वर्माकरितां ।।९।।**

अशा प्रकारे सर्व एकाला एक मारक (किंवा आवरणारे) करून ठेवल्यामुळे दृश्याचा एवढा पसारा झाला. समतोल गुणधर्मामुळे पिंड/देह निर्माण झाले.

**आवघें सीतळचि असतें। तरी प्राणीमात्र मरोनी जाते। आवघ्या उष्णेंचि करपतें। सकळ कांहीं ।।१०।।**

सर्व शीतलताच असती तर प्राणिमात्र मरुन गेले असते आणि सारी केवळ उष्णताच राहिली असती तरीही सर्व करपून गेले असते.

**भूमंडळ आळोन गोठलें। तें रविकिर्णें वाळोन गेलें। मग सहजचि देवें रचिलें। उपायासी ।।११।।**

पाणी आटून पृथ्वी निर्माण झाली ती सूर्य किरणांच्या उष्णतेने वाळून गेली. मग त्यावर देवाने आणखी उपाय काढला.

**म्हणोनी केला प्रज्यन्यकाळ। थंड जालें भूमंडळ। पुढें उष्ण कांहीं सीतळ। सीतकाळ जाणावा ।।१२।।**

१) भूतजात-पंचभौतिक

म्हणून देवाने पावसाळा उत्पन्न केला. त्यामुळे पृथ्वी थंड झाली. नंतर काही उष्ण काही थंड असा हिवाळा केला.

**सीतकाळें कष्टले लोक। कर्पोन गेले वृक्षादिक। म्हणोन पुढें कौतुक। उष्णकाळाचें ।।१३।।**

थंडीमुळे लोकांना त्रास होऊ लागला. वृक्षादिक गारठून गेले म्हणून त्यानंतर उन्हाळा (ऋतु) निर्माण केला.

**त्याहिमधें प्रातःकाळ। माध्यानकाळ सायंकाळ। सीतकाळ उष्णकाळ। निर्माण केले ।।१४।।**

रोजच्या दिवसामध्येदेखील सकाळ, दुपार व सायंकाळ निर्माण करून शीतकाळ व उष्णकाळ समतोल ठेवला.

**ऐसें येकामागें येक केलें। विलेनें[२] नेमस्त लाविलें। येणेंकरितां जगले। प्राणीमात्र ।।१५।।**

असे एकापाठोपाठ एक क्रमाने लावून दिल्यामुळे प्राणिमात्र जगले.

**नाना रसें रोग कठीण । म्हणोनी औषधी केल्या निर्माण । परंतु सृष्टीचें विवरण । कळलें पाहिजे ।।१६।।**

अन्नातील अनेक रसांच्या सेवनाने असह्य रोग उत्पन्न होतात म्हणून औषधी (वनस्पती) उत्पन्न केल्या. या सृष्टीची अशा प्रकारची रचना समजली पाहिजे.

**देहेमूळ रक्त रेत। त्या आपाचे होती दांत। ऐसीच भूमंडळीं प्रचित। नाना रत्नांची।।१७।।**

देहाचे मूळ रक्त रेत आहे. रक्त, रेत इत्यादी जलरूप आहे. पण त्या आपरूपाचे कठीण दात होतात. याचप्रमाणे जगामध्ये (त्याच न्यायाने) द्रवापासून घनरुप रत्ने निर्माण झाली आहेत.

**सकळांसी मूळ जीवन बांधा। जीवनें चाले सकळ धंदा। जीवनेंविण हरिगोविंदा। प्राणी कैंचे ।।१८।।**

सगळ्या दृश्य पदार्थांचा मूळ उगम आप (पाणी) आहे. पाण्यामुळे तर सर्व जीवनव्यवहार होतात. जीवन-पाणी याविना रे देवा जीव जगणारच नाहीत.

**जीवनाचें मुक्ताफळ[३]। शुक्रासारिखें सुढाळ[४]। हिरे माणिके इंद्रनीळ। ते जळें जाले ।।१९।।**

शुक्राच्या चांदणीसारखी (सुढाळ) चमकदार मोत्ये, हिरेमाणके, इंद्रनीलमणी पाण्याचीच झाली आहेत. पाणीदार किंवा तेजाळ झाली आहेत.

**महिमा कोणाचा सांगावा। जाला कर्दमुचि आघवा। वेगवेगळु निवडावा। कोण्या प्रकारें ।।२०।।**

बाकीच्या सर्व भूतांचा महिमासुद्धा असाच थोर आहे. त्या सर्व भूतांचा असा काही संगम झाला आहे की, त्या काल्यातून भूते वेगवेगळी करणे अवघड आहे.

**परंतु बोलिले कांहींयेक। मनास कळावया विवेक। जनांमधें तार्किक लोक। समजती आघवें ।।२१।।**

तथापि सर्वसामान्य माणसाला समजावे म्हणून थोडेसे सांगितले. जे चिकित्सक वृत्तीचे

२) विलेनें-विल्हेवारीने, क्रमाने ३) मुक्ताफळ-मोती (मोती पाण्यामुळे होतो) ४) सुढाळ-तेजस्वी

शहाणे लोक आहेत त्यांना पंचभूतांच्या गुणधर्मांची माहिती आहेच.

**आवघें समजलें हें घडेना। शास्त्रांशास्त्रांसी पडेना[५]। अनुमानें निश्चय होयेना। कांहींयेक।।२२।।**

पण सर्व रचना समजू शकत नाही. कारण शास्त्रांचा एकमेकांशी विरोधही आढळतो. त्यामुळे नुसत्या तर्काने कोणताच निश्चय पक्का होत नाही. संशय मागे राहातोच.

**अगाध गुण भगवंताचे। शेष वर्णू न शके वाचें। वेद विधी ते हि काचे[६]। देवेंविण ।।२३।।**

भगवंताचे गुण अगाध आहेत. (एवढा बोलका सहस्रमुखांचा) शेष पण तोसुद्धा त्यांचे वर्णन करू शकत नाही. वेद आणि ब्रह्मदेव हे देखील कमी पडतात!

**आत्माराम सकळां पाळी। आवघें त्रयलोक्य सांभाळी। तया ऐकेंविण धुळी। होये सर्वत्रांची ।।२४।।**

आत्माराम (अंतरात्मा) सर्वांचा सांभाळ करतो. त्रैलोक्याचा प्रतिपाळ करतो. एका अंतरात्म्याशिवाय सर्वांची माती होते. (धुळधाण होते)

**जेथें आत्माराम नाहीं। तेथें उरों न शके कांहीं। त्रयलोकीचे प्राणी सर्व ही। प्रेतरूपी ।।२५।।**

जेथे अंतरात्मा नाही तेथे काहीच शिल्लक रहात नाही. त्याच्याविना त्रैलोक्यातील सर्व प्राणिमात्र मरून जातील. (प्रेते राहातील)

**आत्मा नस्तां येती मरणें। आत्म्याविण कैंचें जिणें। बरा विवेक समजणें। अंतर्यामी ।।२६।।**

अंतरात्मा नसेल तर मरण येते. आत्म्याशिवाय जीवन शक्य नसते. ही गोष्ट विवेकाने सर्वांनी मनात समजून घ्यावी.

**समजणें जें विवेकाचें। तेंहि आत्म्याविण कैंचें। कोणीयेकें जगदीशाचें। भजन करावें ।।२७।।**

समजावून घेण्याची विवेकाची क्रियासुद्धा अंतरात्म्याशिवाय होत नाही. अंतरात्म्याचे किंवा जगदीशाचे महत्त्व जाणून सर्वांनी त्याचे भजन करावे.

**उपासना प्रगट जाली। तरी हे विचारणा कळली। याकारणें पाहिजे केली। विचारणा देवाची ।।२८।।**

(देव म्हणजे अंतरात्मा ही) विचारणा समजली म्हणजे त्याची उपासना प्रगट रूपाने दिसू लागते. याच कारणासाठी अंतरात्मा हाच सर्वेसर्वा आहे. हा विवेक मनाला पटवून घ्यावा.

**उपासनेचा मोठा आश्रयो। उपासनेविण निराश्रयो। उदंड केलें तरी तो जयो। प्राप्त नाहीं ।।२९।।**

उपासनेचा आधार फार मोठा आहे. उपासनेच्या अभावी सर्व जीव जणू निराश्रित आहेत. उपासनेच्या अभावामुळे कितीही यत्न केले तरी यशप्राप्ती होत नाही. (उपास्य असलेला अंतरात्मा आपल्याच अंतर्यामी आहे ही जाणीव आत्मविश्वास उत्पन्न करते. त्याने मनाला धीर येतो आणि यशप्राप्तीसाठी केलेले यत्न सफल होतात.)

**समर्थांची नाहीं पाठी। तयास भलताच कुटी। याकारणें उठाउठी। भजन करावें ।।३०।।**

५) शास्त्रांशास्त्रांशी पडेना-मतैक्य होईना ६) काचे-कच्चे, व्यर्थ

आपल्याला सामर्थ्यशाली पाठिंबा मिळविला पाहिजे. तो नसेल तर आपणास कोणीही ठोकून काढील. (बाह्य सृष्टीतील वैरी किंवा कामक्रोधादि विकाररुपी शत्रू आपणास आवरणार नाहीत हा भावार्थ) म्हणून वेळ व्यर्थ जाऊ न देता तत्काळ भजनास लागावे.

**भजन साधन अभ्यास। येणें पाविजे परलोकास। दास म्हणे हा विश्वास। धरिला पाहिजे ।।३१।।**

भजन, साधना व अभ्यास यांच्या सहाय्याने परलोकाची प्राप्ती होते. (परमार्थ साधतो) यावर विश्वास ठेवलाच पाहिजे असे रामदास सांगतात.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे गुणभूतनिरूपणनाम समास दशम।। १०।।**

## द. १७-५ : अजपानिरूपण

श्रीसमर्थांनी या समासामध्ये अजपाजपाचा थोडक्यात परामर्ष घेतला आहे. खरे सांगायचे म्हणजे साधकाच्या दृष्टीने अजपाजपाचे महत्त्व सांगावे तेवढे थोडेच आहे. वेद, उपनिषदे, न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, तंत्र आणि बौद्धदर्शन या सर्वात अजपाजपाचे महत्त्व आढळते. जपा शब्द जप् धातूपासून बनतो. जप् म्हणजे मंत्र इ. मनात म्हणणे. आपण होऊन न करता जो जप आपोआप चालतो तो अजप होय. त्यास गायत्री म्हणतात. ''अजपां नाम गायत्रीम् जीवो जपति सर्वदा'' गायत्री स्त्रीलिंगी म्हणून अजपा असे रूप बनते. आपण प्रयत्न न करता जो आपोआप जप होतो त्यास अजपाजप असे म्हणतात. ''हंसः किंवा हंसो'' या मंत्राला अजपा नाव आहे. विद्यारण्यमुनींच्या सर्व दर्शनसंग्रहांमधील पातंजलदर्शनावर भाष्य करताना अभ्यंकर शास्त्री लिहितात - ''अजपामंत्रेति, स्वभावसिद्ध एवायं श्वासप्रश्वासरूपः अजपा मंत्रः। स्वभावसिद्धत्वात् न अयम् इतरमंत्रवत् जप्यते, तेन अजपा इति उच्यते, तत्र श्वासप्रश्वासयोः ''हंसः'' इति भावना क्रियते।'' - बाहेरचा वायू आत घेणे हा श्वास तर आतील वायू बाहेर सोडणे हा प्रश्वास. श्वास घेताना सोकार तर श्वास सोडताना हंकार होतो. सोकार शक्तिरूप आहे तर हंकार शिवरूप आहे. हंसः व सोहं दोन्ही एकच समजावे. मरा, मरा जेव्हा अजपा झाला तेव्हा तोच आपोआप राम राम झाला. त्याने वाल्ह्याचा वाल्मीकी झाला. तसेच सोहं आणि ओंकार दोन्ही एकच आहेत. सोहं प्रणवरूप आहे. प्रत्येक जीव, सर्व देहाला, सर्व अवयवांना व्यापून सोहं सोहं करीत हृदयात राहतो. भक्तिमान योग्यांना प्रणवजप अतिप्रिय असतो. प्रणवामध्ये परमेश्वराची भावना करून रात्रंदिवस योगी लोक भक्तिपूर्वक प्रणवाचा जप करतात. ज्ञानप्रधान वेदान्ती लोक परमेश्वराशी तदाकार भावनेने अहोरात्र सोहंचा जप करतात. स्वरसाधना करणारे काही लोक केवळ कुंभक करून अजपा जपतात. अशा जपाने त्यांना त्रिकालज्ञान होते. अलौकिक सिद्धी प्राप्त होतात आणि अखेर मोक्ष मिळतो. अजपाजप करणारे अद्वैत वेदान्ती सगुणब्रह्माची अभेदाने उपासना करतात. त्यास ''अहंग्रहोपासना'' म्हणतात. या उपासनेतील जपाने जीव चटकन स्वरूपमय होऊन जातो. निरनिराळ्या सगुण देवतांची उपासना करणारे भक्तिमार्गी संत अखंड नामस्मरण करतात. सतत अभ्यासाने त्यांना नामाचा अजपाजप साधतो

आणि प्रेमसमाधीचा अनुभव येतो. पुढे त्यांचे नाम आपोआप चोवीस तास अखंड चालते. वाणी चार प्रकारच्या आहेत. त्यांपैकी परावाणी केवळ मूळसंकल्परूप, स्फुरणरूप, उन्मेषरूप किंवा शिवशक्तिरूप असते. ती भावमय, शांत, स्वस्थ व आनंदमय अशी अनुभवास येते. तिच्यात केवळ आनंदाचे भान राहते. तिच्यातून प्रथम नाद येतो. तो प्रणवरूप किंवा ओंकारमय असतो. वेदांचे तो सनातन बीज असून महदाकाश त्याचे वसतिस्थान होय. यास नादब्रह्म म्हणतात. पश्यन्तीरूप नादब्रह्म अर्थप्रधान असते, सर्व चराचराला व्यापून राहते. सूक्ष्म नादरूपाने प्रत्येक जीवाच्या अंतर्यामी ते वास्तव्य करते. नादश्रवणाचा अभ्यास करणारे साधक कानात कापसाचे बोळे घालून ध्यानात आतील प्रणव नाद ऐकतात. ते नादश्रवण मंद झाले की स्वरूप प्रचीती मंद झाली असे समजावे. श्रीसमर्थ या समासात असे सांगतात की रोज चोवीस तासांत आपले एकवीस हजार सहाशे श्वासप्रश्वास होतात. हीच अजपाजपाची संख्या होय. स्वराचे जन्मस्थान आत आहे. एकांतात मौन धरून बसावे व आत लक्ष द्यावे, म्हणजे सोहं सूक्ष्म नाद ऐकू येतो. उच्चार तर नाही पण शब्द तर असतो. सोहंला ध्वनि नाही म्हणूनच तो सहजशब्द होय. श्वास घेताना सो आणि सोडताना हं असा सोहं मंत्र अजपात चालतो. हा शब्द मागे टाकून सूक्ष्मात जाणारा तो खरा मौनी होय. सर्व जीवांच्या अंतर्यामी अजपा असते. आपल्यामधील अजपा आपण अगदी सहज बघावी. अंतरात्म्याला सहज बघावे, कष्टाने बघू नये. त्याचे दर्शन झाले की ध्यान सहज घडते. माणूस सहजपणे वागला की, अंतरात्मा प्रसन्न होतो. समजा, एखाद्या माणसाच्या घरात आजूबाजूला द्रव्य गुप्तपणे भरलेले आहे. पण ते माहीत नसल्याने तो दारिद्र्य भोगतो. आपल्या घरात द्रव्य भरलेले आहे, ही समजूत पटण्यासच कष्ट पडतात. नंतर तें मिळविण्यास कष्ट पडत नाहीत. त्याचप्रमाणे आपल्या अंतर्यामी अजपा भरलेली आहे हे काही केल्या उमजत नाही. ती समजूत एकदा पटली म्हणजे मग अजपा साधणे कठीण नाही.

या समासामध्ये सोहं साधनेबद्दल महत्त्वाची माहिती श्रीसमर्थ देत आहेत.

## ||श्रीराम||

**येकवीस सहस्र सासें[१] जपा। नेमून गेली ते अजपा। विचार पाहतां सोपा। सकळ कांहीं ।।१।।**

दिवसाच्या चोवीस तासामध्ये (आपणास जाणीव नसली तरी) आपले एकवीस हजार सहाशे श्वास प्रश्वास होतात. यास अजपाजप असे म्हणतात. हा विचार समजण्यास अगदी सोपा आहे. श्वासाकडे एकाग्रतेने लक्ष ठेवणे हाच अजपाजप.

**मुखीं नासिकीं असिजे प्राणें। तयास अखंड येणें जाणें। याचा विचार पाहाणें। सूक्ष्मदृष्टीं ।।२।।**

मुखात व नाकात प्राणवायूची सारखी येजा चाललेली असते. तिचा सूक्ष्म दृष्टीने विचार करावा.

**मुळीं पाहातां येक स्वर। त्याचा तार मंद्र घोर[२]। त्या घोराहून सूक्ष्म विचार। अजपाचा ।।३।।**

१) सासें-सहाशे २) तार मंद्रघोर-टाळूत, हृदयात आणि नाभीजवळ जाणवणारा

मुळामध्ये स्वर एकच आहे त्याचे प्रकार - तारस्वर (वरचा षडज्), मंद्र (मधला षडज्) व घोर (खालचा षडज्) असे आहेत. त्या घोरापेक्षाही अजपा अधिक सूक्ष्म असतो आणि सर्व शरीरभर तिचा व्याप असतो.

**सरिगमपदनिस। सरिं मात्रुका सायास[३]। प्रथम स्वरें मात्रुकांस। म्हणोन पाहावें ।।४।।**

गायनशास्त्रामध्ये सा, रे, ग, म, प, ध, नि, सा हे सात स्वर आहेत. प्रथम सप्तकातील हे स्वर सा पासून आरंभ करून दुसऱ्या सप्तकातील रे पर्यंत स्वरमातृका प्रयत्नपूर्वक म्हणून पहाव्या.

**परेवाचेहून अर्ते[४]। आणि पश्यंतीखालतें[५]। स्वराचें जन्मस्थानतें। तेथून उठे ।।५।।**

म्हणजे कळून येईल की परावाणीच्या अलीकडे आणि पश्यन्ती वाणीच्या खालच्या बाजूस म्हणजेच नाभी व हृदय ह्यांच्या दरम्यान स्वराचे उगमस्थान आहे. तेथून स्वर उमटतो.

**येकांतीं उगेंच बैसावें। तेथें हें समजोन पाहावें। अखंड घ्यावें सांडावें। प्रभंजनासी।।६।।**

गलबल्यापासून अगदी दूर एकान्तामध्ये स्वस्थ स्थिर बैठक घालावी आणि या गोष्टीचा अनुभव घ्यावा. हवा (वायु) सारखी आत घ्यावी व बाहेर सोडावी.

**येकांतीं मौन्य धरून बैसे। सावध पाहातां कैसें भासे। सोहं सोहं ऐसे। शब्द होती ।।७।।**

एकान्तामध्ये मौन धरून बसावे आणि सूक्ष्मपणाने वेध घ्यावा म्हणजे 'सोहं सोहं' असे शब्द होत असल्याचा भास होतो. प्रत्यक्ष ध्वनिविना शब्द ऐकू येतात.

**उच्चारेंविण जे शब्द। ते जाणावे सहजशब्द। प्रत्यया येती परंतु नाद। कांहींच नाहीं ।।८।।**

उच्चारावाचून हे शब्द होतात म्हणून त्यांना सहज शब्द म्हणतात. हे शब्द झाल्याचे कळते पण त्यांना नाद असत नाही.

**ते शब्द सांडून बैसला। तो मौनी म्हणावा भला। योगाभ्यासाचा गल्बला। याकारणें ।।९।।**

ते सोहं सोहं शब्द जो मागे टाकून बसतो तो उत्तम योगी होय. योगाभ्यासाची जी खटपट करावयाची असते ती हे साध्य करण्यासाठीच.

**येकांतीं मौन्य धरून बैसला। तेथें कोण शब्द जाला। सोहं ऐसा भासला। अंतर्यामीं ।।१०।।**

एकान्तात मौन धरून बसल्यास कोणता शब्द होतो? सोहं हा शब्द ऐकत असल्याचा भास होतो.

**धरितां सो सांडितां हं। अखंड चाले सोहं सोहं। याचा विचार पाहातां बहु। विस्तारला ।।११।।**

श्वास आत येताना 'सो:' व सोडताना 'हं' असा 'सोहं' जप अखंडपणे चाललेला असतो. शास्त्रामध्ये याबद्दलचा खूप तपशीलवार विस्तार झाला आहे.

**देहधारक तितुका प्राणी। श्वेतजउद्भिजादिक खाणी। स्वासोस्वास नस्तां प्राणी। कैसे जिती[६] ।।१२।।**

३) सायास-(आरोहावरोहाच्या) प्रयत्नाने ४) परेवाचेहून अर्ते-नाभीपासून वर ५) पश्यंती खालते-हृदयाच्या खाली
६) जिती-जगू शकतात

जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज असे चार खाणींमधील देहधारक प्राणी आहेत. श्वासोच्छवासाशिवाय ते कसे जगू शकतील? (म्हणून सर्वच प्राण्यांचाही 'सोहं, सोहं' असा जप चालू असतो.)

**ऐसी हे अजपा सकळांसी। परंतु कळे जाणत्यासी। सहज सांडून सायासीं। पडोंच नये ।।१३।।**

असा हा अजपाजप सर्व प्राणी अखंडपणे करीत आहेत. पण जो जाणता आहे त्यालाच याची समज असते. हा आपोआप सहजपणे जप चाललेला असताना सायासाने होणारा जप करू नये. (सोपा मार्ग सोडून अवघड मार्ग का धरावयाचा?)

**सहज देव असतचि असे। सायासें देव[७] फुटे नासे। नासिवंत देवास विश्वासे। ऐसा कवणु ।।१४।।**

देव तुमच्यापाशी सतत असतो,. (सर्वस्य चाहं। गीता) सायासाने व कष्टाने तयार केलेला देव फुटतो, तुटतो, नष्ट होतो. नाशिवंत देवावर श्रद्धा ठेवेल असा कोण आहे?

**जगदांतराचें दर्शन। सहज घडे अखंड ध्यान। आत्मइछेनें जन। सकळ वर्तती ।।१५।।**

प्राणिमात्रांच्या अंतर्यामी राहाणाऱ्या आत्मारामाचे दर्शन सहज होते. त्याचे ध्यान अखंड राहाणे हेच त्याचे दर्शन होय. सर्वांचे वर्तन अंतरात्म्याच्या इच्छेनेच होते.

**आत्मयाचें समाधान। घडे तैसेंचि आशन[८]। सांडले फिटलें समर्पण। तयासीच होये ।।१६।।**

अंतरात्म्याचे समाधान होईल तोच आहार प्राणी घेत असतात. त्याचप्रमाणे जे सांडते, लवंडते, हरवते ते सुद्धा अंतरात्म्यालाच समर्पित होते.

**अग्रपुरुष पोटीं वसती। तयास अवदानें[९] सकळ देती। लोक आज्ञेमधें असती। आत्मयाचे ।।१७।।**

प्रत्येकाच्या पोटामध्ये जठराग्नि असतो. त्यालाच सर्वजण आहुती देतात. अशा रीतीने त्याच्याच आज्ञेत प्राणी वागतात. (अंतरात्म्याने इच्छा केलेले अन्न त्याला देणे, तहान लागली तर पाणी देणे हे आज्ञेतच वागणे नव्हे का?)

**सहज देवजपध्यानें। सहज चालणें स्तुति स्तवनें। सहज घडे तें भगवांतें। मान्य कीजे ।।१८।।**

अंतर्यामातील अंतरात्मा नैसर्गिक/सहज आहे त्याची स्मृती सहज व (जप-ध्यान करून) सतत राहिली पाहिजे. अशा प्रकारे सहजपणाने (म्हणजे कोणतेही अवडंबर न माजविता) जे केले असेल तेच भगवंताला मान्य होते.

**सहज समजायाकारणें। नाना हटयोग करणें। परंतु येकायेकीं समजणें। घडत नाहीं ।।१९।।**

ही सहजस्थिती काय आहे ते समजण्यासाठीच साधकांना शरीराला त्रास देऊन केलेली हठयोगासारखी साधने करावी लागतात. पण साधना केल्याविना एकाएकी/आपोआपच सहजावस्थेची कल्पना येत नाही.

७) सायासें देव-मूर्ति इ. कृत्रिम देव ८) आशन-अशन-भोजन इ. भोग ९) अवदान-आहुती

**द्रव्य चुकतें दरिद्र येतें। तळीं लक्ष्मी वरी वर्ततें। प्राणी काये करील तें। ठाउकें नाहीं ।।२०।।**

पुरून ठेवलेल्या द्रव्याची नेमकी जागा ठाऊक नसल्यामुळे माणूस ते काढू शकत नाही व तो दरिद्री राहातो. तळघरामध्येच द्रव्य असताना वर बसून दरिद्री अवस्थेत हा राहातो. निधान आपल्यापाशीच आहे हे माहिती नसल्याने बिचारा काय करणार?

**तळघरांमधें उदंड द्रव्य। भिंतीमधें घातलें द्रव्य। स्तंभी तुळवटीं द्रव्य। आपण मधें ।।२१।।**

खाली तळघरात खूप द्रव्य पुरलेले असते. भिंतीमध्येही आत द्रव्य घातलेले असते. घराच्या खांबातून, तुळयांमध्येही द्रव्य असून हा मध्येच असतो.

**लक्ष्मीमधें करंटा नांदें। त्याचें दरिद्र आधीक सांदे[१०]। नवल केलें परमानंदें। परमपुरुषें ।।२२।।**

अशी संपत्ती सर्वत्र असूनही हा करंटा मध्ये नांदत असतो. त्याची दरिद्री अवस्था अधिकच उठून दिसते. सच्चिदानंद परमात्म्याने हा केवढा चमत्कार मांडला आहे. (आनंदस्वरूप परमात्मा देहाच्या आत व बाहेरही भरलेला आहे असे असूनही अज्ञानामुळे प्राणी दु:ख भोगीत राहातो हे सांगण्यासाठी वरील दृष्टान्त दिला आहे.)

**येक पाहाती येक खाती। ऐसी विवेकाची गती। प्रवृत्ति अथवा निवृत्ति। येणेंचि न्यायें ।।२३।।**

एकजण खाऊन पिऊन सुखी असतात तर दुसरे त्यांच्या तोंडाकडे पाहात बसतात. हा सर्व विवेकाचा परिणामच आहे. (विवेकाचे फळ तें सुख। अविवेकाचे फळ ते दु:ख।।) प्रपंचात प्रवृत्ती असते. परमार्थात निवृत्ती असते. या दोन्ही ठिकाणी हाच न्याय आहे. (माणसामाणसात जे अंतर प्रपंच/परमार्थात पडते ते विवेकाची कमी अधिक जाणीव असल्यामुळेच पडते. विवेकी मनुष्य परमार्थप्राप्ती करून आनंद मिळवितो. अविवेकी नुसता आशाळभूतपणे पाहातो.)

**अंतरीं वसतां नारायेणें। लक्ष्मीस काये उणें। ज्याची लक्ष्मी तो आपणें। बळकट धरावा ।।२४।।**

अंत:करणामध्ये (जाणीवरूप अंतरात्मा किंवा) नारायण असताना लक्ष्मीला काय तोटा? म्हणून लक्ष्मी ज्याचे पाय चेपते तो नारायणच हृदयामध्ये घट्ट धरावा. (अंतरात्माच वश झाला की जीवनात वैभवाला काय उणे?)

**दासबोध प्रबोध अभ्यासार्थींना काही सूचना -** दासबोध हे आत्मज्ञानाचे भांडार आहे. 'प.दा.अ.' उपक्रम ही त्या भांडाराची जणू किल्ली आहे. भांडाराचे दार उघडल्याशिवाय आपणास धन मिळणार नाही. आपण प्रश्नोत्तरातून अभ्यासपद्धती आत्मसात करावी यासाठी स्वा. ५ मधील ५ वा प्रश्न आहे. व्यक्तिनिष्ठ स्वरुपाचे उपप्रश्न यात आहेत. त्यांची उत्तरे आपण प्रांजळपणे विचारपूर्वक लिहावीत. त्यामुळे समीक्षकांना आपली अभ्यासपद्धती कळेल आणि त्यांच्याकडून बहुमोल मार्गदर्शन मिळेल.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे अजपानिरूपणनाम समास पंचम।।५।।**

१०) सांदे-दु:खकारक होते.

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका ५ वी

**(द. १६-९ नाना उपासनानिरूपण, १६-१० गुणभूतनिरूपण, १७-५ अजपानिरूपण, वर आधारित)**

प्र. १ जगामध्ये नाना लोक, नाना देवतांची उपासना करतात पण ती एका अंतरात्म्यालाच पावते हे श्रीसमर्थांनी कसे सिद्ध केले आहे?

प्र. २ अंतरात्मा (किंवा आत्माराम) रूपी जगदीशाची महति द. १६-१० मध्ये कशा प्रकारे वर्णन केली आहे?

प्र. ३ 'अजपानिरूपण' समासामध्ये साधना करण्याची एक पद्धती समर्थांनी सुचविली आहे; ती कोणती?

प्र. ४ पुढील ओव्यांचा अर्थ संदर्भासहित स्पष्ट करा.

१) लक्ष्मीमध्यें करंटा नांदे। त्याचें दरिद्र आधीक सांदे। नवल केलें परमानंदें। परमपुरुषें।।

२) न्याय आणी अन्याय। होये आणी न होये। विवेकेविण काये। उमजों जाणें।।

प्र. ५ १) प्रश्नपत्रिका हाती पडल्यापासून पंधरवड्याचे आत आपला स्वाध्याय पाठविण्याचा संकल्प असतो का? त्याप्रमाणे वेळेचे नियोजन आपण करता का?

२) प्रबोध स्तराचे अन्य अभ्यासार्थी आपणास परिचित आहेत का? असल्यास त्यांच्याबरोबर प्रश्नपत्रिकेबद्दल विचारविनिमय होतो का?

३) आपल्या गावी 'दासबोध अभ्यास मंडळ' आहे का? असल्यास त्याचे कार्य कसे चालते?

# दासबोध प्रबोध : स्वाध्याय ६ वा

## (द. ५-७,८,९)

बद्ध, मुमुक्षू, साधकलक्षणांचे तीन समास येथे अभ्यासताना आपल्या देहाचे सार्थक कशामध्ये आहे हे समजून येईल. द्रव्य, दारा आणि प्रपंच या तीन विषयांचे सतत चिंतन करणारा सामान्य मनुष्य पशुतुल्य जीवन देहपातळीवर जगत असतो. नैसर्गिक प्रवृत्तींचे उन्नयन करण्याचा प्रयत्न मानव देहातच करून शाश्वत सुखाकडे त्याला जाता येते. शारीरिक व्याधी, अपघात किंवा स्वजनांच्या आकस्मिक निधनामुळे होणारा आघात यामुळे जसा मनुष्य अध्यात्माकडे वळतो त्याचप्रमाणे सुकृत किंवा सत्संगप्राप्तीमुळेसुद्धा मुमुक्षू अवस्था त्याला प्राप्त होते. आपण अभ्यासार्थींनी तर सत्संग धरावाच आणि बद्धावस्थेतील अनेकांनाही तो घडविण्याचा प्रयत्न करावा यासाठी या समासांचे प्रयोजन आहे. साधकावस्थेकडे आपली वाटचाल घडावी. त्यातूनच

व्यक्तिचे तसेच समाजाचे हित साधणार आहे. सुख-शांतीचे साम्राज्य भूतलावर अवतरण्यासाठी आपण प्रयत्नशील रहावे...

## द. ५-७ : बद्धलक्षण

जगातील सर्व माणसे फक्त दोनच वर्गात बसविता येतात. एक वर्ग अज्ञानी माणसांचा आणि दुसरा वर्ग ज्ञानी माणसांचा. अशी कल्पना करावी की पृथ्वीला समांतर असणाऱ्या एका सरळ रेषेवर सर्व माणसे उभी आहेत. रेषेचा आरंभबिंदु म्हणजे अज्ञानी माणसे, रेषेचा अंतबिंदु म्हणजे ज्ञानी माणसे समजावी. मग पारमार्थिक प्रगती म्हणजे आरंभबिंदूकडून अंतबिंदूकडे अधिकाधिक सरकणे होय. अज्ञान सांगते की मी खरा आहे, देव खरा नाही. ज्ञान सांगते की, मी खरा नाही, देव खरा आहे. ज्या प्रमाणात माणसांच्या मीपणाचे, अहंकाराचे खरेपण कमी होत जाईल त्या प्रमाणात देवाचे खरेपण त्याच्या अनुभवास येईल. अज्ञानाचे मुख्य चिन्ह असणारा देहाभिमान कमी कमी होत जाणे हे पारमार्थिक प्रगतीचे मुख्य लक्षण समजावे. अत्यंत अज्ञानी माणसाला श्री समर्थांनी ''बद्ध म्हणजे बांधलेला'' असे नाव दिले तर संपूर्ण आत्मज्ञानी माणसाला त्यांनी ''सिद्ध म्हणजे प्राप्त झालेला'' असे नाव दिले. आपण कल्पना केलेल्या रेषेला मध्यबिंदु आहे. त्यामुळे माणसांचे आणखी दोन वर्ग शक्य होतात. आरंभबिंदु सोडून मध्यबिंदूकडे सरकणारे हा तिसरा वर्ग आणि मध्यबिंदूकडून अंतबिंदूकडे सरकणारे हा चौथा वर्ग होय. तिसऱ्या वर्गातील माणसांना ''मुमुक्षु म्हणजे मोक्षाची इच्छा असणारा'' असे नाव दिले तर चौथ्या वर्गातील माणसांना ''साधक म्हणजे साधना करणारा'' असे नाव दिले. परमार्थाच्या प्रगतिपथावर बद्धापेक्षा मुमुक्षु उत्तम, मुमुक्षूपेक्षा साधक अधिक उत्तम, आणि साधकाहून सिद्ध सर्वोत्तम होय. या चौघांची लक्षणे आता सांगितली आहेत.

### ॥श्रीराम॥

**सृष्टी जे कां चराचर। जीव दाटले अपार। परी ते अवघे चत्वार। बोलिजेती ॥१॥**

या चराचर सृष्टीमध्ये अगणित माणसे आहेत पण वर्गवारी केली तर त्यांचे चारच वर्ग पडतात.

**ऐक तयांचें लक्षण। चत्वार ते कोण कोण। बद्ध मुमुक्ष साधक जाण। चौथा सिद्ध ॥२॥**

ते चार वर्ग कोणते आहेत त्यांची नावे ऐका. बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध.

**यां चौघांविरहित कांहीं। सचराचरीं पांचवा नाहीं। आतां असो हें सर्वही। विशद करूं ॥३॥**

वरील चार वर्गाखेरीज पाचवा वर्गच नाही. असो आता त्यांची लक्षणे स्पष्ट करतो.

**बद्ध म्हणिजे तो कोण। कैसें मुमुक्षाचें लक्षण। साधकसिद्धवोळखण। कैसी जाणावी ॥४॥**

बद्ध कोणास म्हणावे, मुमुक्षुचे लक्षण काय, साधक व सिद्ध कसे ओळखावे?

**श्रोतीं व्हावें सावध। प्रस्तुत ऐका बद्ध। मुमुक्ष साधक आणि सिद्ध। पुढें निरोपिले॥५॥**

या समासामध्ये बद्ध कसा असतो ते ऐकावे. मुमुक्षु, साधक व सिद्ध यांची लक्षणे पुढे सांगितली आहेत.

**आतां बद्ध तो जाणिजे ऐसा। अंधारींचा अंध जैसा। चक्षुविण दाही दिशा। सुन्याकार ।।६।।**

अंधारामध्ये चाचपडणारा आंधळा जसा असतो तसा बद्ध असतो. आंधळ्याला डोळे नसल्याने चारही दिशा अंधाराने शून्यवत असतात. (बद्धाला ज्ञानदृष्टी नसल्याने आत व बाहेर दोन्ही ठिकाणी अंधकार असतो.)

**भक्त ज्ञाते तापसी। योगी वीतरागी[१] संन्यासी। पुढें देखतां दृष्टीसी। येणार नाहीं ।।७।।**

भक्त, ज्ञानी, तापसी, योगी, विरक्त, संन्यासी त्याच्यापुढे आले तरी त्यांची योग्यता न समजल्याने त्याला ते दिसूनही दिसत नसल्यासारखेच असतात.

**न दिसे नेणे कर्माकर्म। न दिसे नेणे धर्माधर्म। न दिसे नेणे सुगम। परमार्थपंथ ।।८।।**

चांगले व वाईट कर्म, धर्म व अधर्म त्याला दिसत नाही व समजतही नाही. सोपा परमार्थमार्ग तो पहात नाही व जाणून घेण्याची इच्छा नसते. त्यामुळे समजत नाही.

**तयास न दिसे सच्छास्त्र। सत्संगति सत्पात्र। सन्मार्ग जो कां पवित्र। तोही न दिसे ।।९।।**

खरे शास्त्र, सत्संगती, चांगला माणूस, पवित्र सन्मार्ग हे त्याला काही दिसतच नाही. (म्हणून अंधारीचा अंध असे वर वर्णन केले आहे.)

**न कळे सारासार विचार। न कळे स्वधर्म आचार। न कळे कैसा परोपकार। दान पुण्य ।।१०।।**

सार व असार यांचा विवेक त्याला कळत नाही. स्वधर्माचा आचार, परोपकार, दान, पुण्य यापैकी त्याला कळत नाही.

**नाहीं पोटीं भूतदया। नाहीं सुचिष्मंत काया। नाहीं जनासि निववावया। वचन मृद ।।११।।**

त्याच्या पोटी भूतदया नसते. त्याच्यापाशी देहाची शुद्धता नसते. (तो मलीन असतो.) आणि लोकांची मने तृप्त व्हावीत अशी मृदु भाषाही नसते.

**न कळे भक्ति न कळे ज्ञान। न कळे वैराग्य न कळे ध्यान। न कळे मोक्ष न कळे साधन। या नांव बद्ध ।।१२।।**

ज्याला भक्ती, ध्यान, मोक्ष, मोक्षप्राप्तीचे साधन कळत नाही त्याला बद्ध म्हणतात.

**न कळे देव निश्चयात्मक। न कळे संतांचा विवेक। न कळे मायेचें कौतुक। या नांव बद्ध ।।१३।।**

ज्याला खरा देव निश्चित कळत नाही, संतांचा विवेक, मायेचे कौतुक ठाऊकच नसते त्याला बद्ध असे म्हणतात.

**न कळे परमार्थाची खूण। न कळे अध्यात्मनिरूपण। न कळे आपणासि आपण। या नांव बद्ध ।।१४।।**

१) वीतरागी - विरक्त

परमार्थाची खूण, अध्यात्मनिरुपण व आपण कोण हे कळत नाही त्याचे नाव बद्ध.

**न कळे जीवाचें जन्ममूळ। न कळे साधनाचें फळ। न कळे तत्वता केवळ। या नांव बद्ध ॥१५॥**

जीवाचे जन्म घेण्याचे कारण, साधनेची फलव्याप्ती, केवळ शुद्ध ब्रह्म कशाला म्हणतात हे काही ज्याला कळत नाही त्याचे नाव बद्ध.

**न कळे कैसें तें बंधन। न कळे मुक्तीचें लक्षण। न कळे वस्तु विलक्षण। या नांव बद्ध ॥१६॥**

बंधनाचे लक्षण, मुक्तीचे लक्षण, विलक्षण अशा परमात्म्याचे लक्षण ज्याला कळत नाही तो बद्ध.

**न कळे शास्त्रार्थ बोलिला। न कळे निजस्वार्थ आपुला। न कळे संकल्पें बांधला। या नांव बद्ध ॥१७॥**

शास्त्रार्थ सांगूनही कळत नाही, आपला स्वतःचा स्वार्थ समजत नाही, संकल्पामुळे आपण बांधले जातो हे ज्याला कळत नाही तो बद्ध.

**जयासि नाहीं आत्मज्ञान। हें मुख्य बद्धाचें लक्षण। तीर्थ व्रत दान पुण्य। कांहींच नाहीं ॥१८॥**

आत्मज्ञान नसणे हे बद्धाचे मुख्य लक्षण आहे. तीर्थ, व्रत, दान, पुण्य हे काहीच त्याला ठाऊक नसते.

**दया नाहीं करुणा नाहीं। आर्जव[२] नाहीं मित्रि नाहीं। शांति नाहीं क्षमा नाहीं। या नांव बद्ध ॥१९॥**

दया, करुणा, आर्जव, मैत्री, शांती, क्षमा यापैकी त्याच्यापाशी काहीच नसते.

**जें ज्ञानविशिं उणें। तेथें कैंचीं ज्ञानाचीं लक्षणें। बहुसाल कुलक्षणें। या नांव बद्ध ॥२०॥**

जेथे ज्ञानाचा अभाव असतो तेथे ज्ञानाची लक्षणे कशी असणार? अज्ञानाची सर्व कुलक्षणे ज्याच्यापाशी असतात त्याला बद्ध म्हणतात.

**नाना प्रकारीचे दोष। करितां वाटे परम संतोष। बाष्कळपणाचा हव्यास। या नांव बद्ध ॥२१॥**

नाना प्रकारचे दोषाचरण (पापाचरण) करताना त्याला फार संतोष वाटतो आणि टारगटपणा करण्याची हौस असते त्याला बद्ध म्हणतात. आणखी काही बद्ध लक्षणे पुढे दिली आहेत. ज्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात

**बहु काम बहु क्रोध। बहु गर्व बहु मद। बहु द्वंद्व[३] बहु खेद। या नांव बद्ध ॥२२॥**

काम, क्रोध, गर्व, मद, द्वंद्व (झगडा), खेद

**बहु दर्प बहु दंभ। बहु विषये बहु लोभ। बहु कर्कश बहु अशुभ। या नांव बद्ध ॥२३॥**

दर्प, दंभ, विषय, लोभ, कर्कशपणा, अशुभ लक्षणे

**बहु ग्रामणी[४] बहु मत्सर। बहु असूया[५] तिरस्कार। बहु पापी बहु विकार। या नांव बद्ध ॥२४॥**

गावगुंडी, मत्सर, हेवा, तिरस्कार, पाप, विकार

२) आर्जव-ऋजुत्व ३) द्वंद्व-भांडखोरपणा ४) ग्रामणी-गांवगुडी ५) असूया-मत्सर

**बहु अभिमान बहु ताठा। बहु अहंकार बहु फांटा[६]। बहु कुकर्मांचा सांठा। या नांव बद्ध ।।२५।।**

अभिमान, ताठा, अहंकार, फाटे फोडण्याची बुद्धी, दुष्कृत्यांचा साठा

**बहु कापट्य वादवेवाद। बहु कुतर्क भेदाभेद। बहु कृर कृपामंद। या नाव बद्ध ।।२६।।**

कपटीपणा, वादविवाद, कुतर्क, भेदाभेद, क्रौर्य, दयाहीनता

**बहु निंदा बहु द्वेष। बहु अधर्म बहु अभिळाष। बहु प्रकारीचे दोष। या नांव बद्ध ।।२७।।**

निंदा, द्वेष, अधर्म, अभिलाष, अनेक प्रकारचे दोष

**बहु भ्रष्ट अनाचार। बहु नष्ट येकंकार। बहु आनित्य[७] अविचार। या नाव बद्ध ।।२८।।**

भ्रष्टपणा, अनाचार, नष्टपणा, एकंकारी वृत्ती, अनीती, अविचार

**बहु निष्ठुर बहु घातकी। बहु हत्यारा बहु पातकी। तपीळ[८] कुविद्या अनेकी। या नांव बद्ध ।।२९।।**

निष्ठूर, घातकी, खुनशीपणा, पातकी, तापटपणा, कुविद्येचा धारक

**बहु दुराशा बहु स्वार्थी। बहु कळह बहु अनर्थी। बहु डाईक[९] दुर्मती। या नांव बद्ध ।।३०।।**

दुराशा, स्वार्थ, तंटेखोर, अनर्थकारी, दावा (मनात डाव) धरणारा, दुर्मती

**बहु कल्पना बहु कामना। बहु तृष्णा बहु वासना। बहु ममता बहु भावना। या नांव बद्ध ।।३१।।**

कल्पना, कामना, तृष्णा, वासना, ममता, भावना

**बहु विकल्पी बहु विषादी। बहु मूर्ख बहु समंधी[१०]। बहु प्रपंची बहु उपाधी। या नांव बद्ध ।।३२।।**

विकल्प, विषाद, मूर्खपणा, बहुतांशी वाईट संबंध ठेवणारा, प्रापंचिक उपाधी लावून घेणारा हे दुर्गुण व लक्षणे असतात तो बद्ध समजावा. बद्ध माणसाच्या दुर्गुणांच्या वरील यादीमध्ये आणखी भर पुढे घातली आहे.

**बहु वाचाळ बहु पाषांडी। बहु दुर्जन बहु थोतांडी। बहु पैशून्य बहु खोडी। या नांव बद्ध ।।३३।।**

वाचाळपणा, पाखंडीपणा, दुर्जनता, थोतांडी वृत्ती, दुसऱ्याचे उणे पाहण्याची वृत्ती, खोडकरपणा

**बहु अभाव[११] बहु भ्रम। बहु भ्रांति बहु तम। बहु विक्षेप[१२] बहु विराम[१३]। या नांव बद्ध ।।३४।।**

नास्तिकता, भ्रम, भ्रांती, अज्ञान, चांचल्य, आळस

**बहु कृपण बहु खंदस्ती[१४]। बहु आदखणा[१५]। बहु मस्ती। बहु असत्क्रिया व्यस्ती। या नांव बद्ध ।।३५।।**

कृपणता, दांडगाईची वृत्ती, मत्सर, मस्तीखोरी, दुष्कर्मता, अस्ताव्यस्त वागण्याची सवय हे दुर्गुण मोठ्या प्रमाणावर असतात तो बद्ध जाणावा.

६) फांटा-वटवट ७) आनित्य-अनीति ८) तपीळ - तापट ९) डाईक-दावा धरणारा १०) समंधी-नातलगाचा हव्यास धरणारा ११) अभाव-नास्तिकपणा १२) विक्षेप-व्याप १३) विराम-विश्रांती १४) खंदस्ती-दांडगा १५) आदखणा-मत्सरी

**परमार्थविषईं अज्ञान। प्रपंचाचें उदंड ज्ञान। नेणे स्वयें समाधान। या नांव बद्ध ।।३६।।**

ज्याच्याकडे परमार्थाबद्दल पूर्ण अज्ञान असते. पण प्रपंचाबद्दल मात्र उदंड ज्ञान असते व समाधानाचे चिन्हही नसते त्याचे नाव बद्ध.

**परमार्थाचा अनादर। प्रपंचाचा अत्यादर। संसारभार जोजर। या नांव बद्ध ।।३७।।**

जेथे परमार्थाचा अनादर व प्रपंचाबद्दल आदर असतो, आणि जो संसाराचा भार घेऊन (जोजार किंवा) कष्ट करतो त्याला बद्ध म्हणतात.

**सत्संगाची नाहीं गोडी। संतनिंदेची आवडी। देहबुद्धीची घातली बेडी। या नांव बद्ध ।।३८।।**

ज्याला सत्संगाची मुळीच गोडी नसते उलट संतांची निंदा करण्याची आवड असते व ज्याने 'देहबुद्धी'रुपी बेडी पायात अडकवून घेतलेली असते त्याला बद्ध असे म्हणतात. ('देह म्हणजेच मी' अशा भावनेची बेडी स्वेच्छेने अडकवून घेऊन मनुष्य बद्ध होतो.)

**हातीं द्रव्याची जपमाळ। कांताध्यान सर्वकाळ। सत्संगाचा दुष्काळ। या नांव बद्ध ।।३९।।**

'द्रव्य, द्रव्य' असे मणी ओढत जपमाळ हाती बाळगणारा, चित्तात बायकोचे ध्यान करणारा, व संतसंगाचा दुष्काळ वाटणारा तो बद्ध जाणावा. (याच ओवीचे अधिक स्पष्टीकरण पुढील चार ओव्यात आहे)

**नेत्रीं द्रव्य दारा पाहावी। श्रवणीं द्रव्य दारा ऐकावी। चिंतनी द्रव्य दारा चिंतावी। या नांव बद्ध ।।४०।।**

डोळ्यांनी द्रव्य व दारा पहावी. कानानी द्रव्य/दारा यांच्या गोष्टी ऐकाव्या, चिंतनामध्ये द्रव्य, दारा असावी असे वाटते तो बद्ध.

**काया वाचा आणि मन। चित्त वित्त जीव प्राण। द्रव्यदारेचें करी भजन। या नांव बद्ध ।।४१।।**

काया, वाचा मनेकरून, चित्त, द्रव्य, जीव प्राण ओतून जो द्रव्य आणि दारा यांचे जणू भजन करतो त्याचे नाव बद्ध.

**इंद्रियें करून निश्चळ। चंचल होऊ नेदी पळ। द्रव्यदारेसि लावी सकळ। या नांव बद्ध ।।४२।।**

इंद्रिये स्थिर करून त्यांना (क्षणभरही देवाकडे जाऊ न देता) द्रव्य दारा यांचे भजन करतो तो बद्ध.

**द्रव्य दारा तेंचि तीर्थ। द्रव्य दारा तोचि परमार्थ। द्रव्य दारा सकळ स्वार्थ। म्हणे तो बद्ध ।।४३।।**

द्रव्य, दारा हेच तीर्थक्षेत्र, तोच ज्याचा परमार्थ, द्रव्य दारा हाच ज्याचा स्वार्थ असतो तो बद्ध.

**वेर्थ जाऊं नेदी काळ। संसारचिंता सर्वकाळ। कथा वार्ता तेचि सकळ। या नांव बद्ध ।।४४।।**

बद्ध माणूस काळ व्यर्थ जाऊ देत नाही तर सर्वकाळ संसाराची चिंता करीत राहातो. आणि कथा, वार्ता, केवळ संसाराच्याच असतात.

**नाना चिंता नाना उद्वेग। नाना दुःखाचे संसर्ग। करी परमार्थाचा त्याग। या नांव बद्ध ।।४५।।**

अनेक प्रकारच्या प्रापंचिक चिंता करतो. नाना उद्वेग आणि दुःखाचे संसर्ग मागे लावून घेतो. परमार्थाचा त्याग करतो तो बद्ध होय.

**घटिका पळ निमिष्यभरी। दुश्चीत नव्हतां अंतरीं। सर्वकाळ ध्यान करी। द्रव्यदाराप्रपंचाचें ।।४६।।**

एक निमिषसुद्धा (सेकंदसुद्धा) मन चंचल न होता तो चिंतन करतो पण ते कशाचे? तर द्रव्य दारा आणि प्रपंचाचे! असा मनुष्य बद्ध असतो.

**तीर्थ यात्रा दान पुण्य। भक्ति कथा निरूपण। मंत्र पूजा जप ध्यान। सर्वही द्रव्य दारा ।।४७।।**

त्याचे तीर्थ, यात्रा, दान, पुण्य, भक्ती, कथानिरूपण, मंत्र, पूजा, जप, ध्यान हे सर्व द्रव्यद्वारा या बद्दलच असते.

**जागृति स्वप्न रात्रि दिवस। ऐसा लागला विषयेध्यास। नाहीं क्षणाचा अवकाश। या नांव बद्ध ।।४८।।**

जागृत अवस्थेत, स्वप्नात, रात्री, दिवसा, केव्हाही त्याला विषयांचा ध्यास लागलेला असतो; त्याविना एक क्षणही जात नाही; तो बद्ध.

**ऐसें बद्धाचें लक्षण। मुमुक्षपणीं पालटे जाण। ऐक तेही वोळखण। पुढिलीये समासीं ।।४९।।**

असे हे बद्धाचे लक्षण असते. पण मुमुक्षु अवस्थेत त्याचा प्रवेश होताच ते पालटते. त्या मुमुक्षुदशेची ओळख पुढील समासामध्ये आहे ती आता ऐकावी.

(सर्वसामान्य प्रापंचिक माणूस बहुतांशी बद्ध अवस्थेत असतो. त्याला परमार्थाची ओळख नसते ती करून घेण्याची इच्छा नसते आणि दुर्गुणांचे प्राबल्य त्याच्या ठायी असते. देहबुद्धीच्या प्राबल्यामुळे त्याला दृश्य सृष्टीतील उपभोगातच गोडी वाटते. बद्धसुद्धा जप, ध्यान, चिंतन करतो पण ते कशाचे तर द्रव्य-दारा यांचे. हे वर्णन उपरोधिक पद्धतीने या समासात केले आहे. बद्ध स्वतःचा काळ व्यर्थ दवडत नाही तर सर्व काळ उपभोगातच घालवितो. पण कालांतराने आणि योगायोगानेही त्याचे डोळे उघडतात व तो मुमुक्षु बनतो. आजार, अपघात, शारीरिक व मानसिक आघात, गरीबी इत्यादी आपत्तीने अथवा पूर्वजन्म सुकृतामुळेही बद्धाचा मुमुक्षु होतो.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे बद्धलक्षणनाम समास सप्तम।।७।।**

## द. ५-८ : मुमुक्षुलक्षण

मानवी जीवनाला दोन अंगे आहेत. एक अंग पशुपणाचे तर दुसरे अंग देवपणाचे. पशुपणाचे अंग अज्ञानाच्या अंमलाखाली वावरते तर देवपणाचे अंग आत्मज्ञानाच्या अंमलाखाली वावरते. बद्ध माणसाचे जीवन पशुपणाचे जीवन असते. बद्ध माणसाच्या आशा व आकांक्षा, भावना व वासना, हौशी व हव्यास देहसुखाभोवती केंद्रित असतात. द्रव्य, दारा आणि प्रपंच यांच्या ठिकाणी त्याची बुद्धी घट्टपणे चिकटलेली असते. तिच्यावर आघात होऊन ती तेथून स्थानभ्रष्ट

झाल्याखेरीज देवपणाकडे किंवा शाश्वत आत्मज्ञानाकडे जाण्याचा मार्ग मोकळा होत नाही. रोग, दारिद्र्य, दैन्य, अपघात, स्वजनांचा आकस्मिक मृत्यु या व अशा आपत्तींनी मनुष्याचे अंतरंग गदागदा हालविले जाते. त्याच्यामधील देवपणा जागा होतो आणि मग तो पशुपणातून बाहेर पडण्यासाठी तळमळू लागतो. या मनाच्या अवस्थेला मुमुक्षुपणा असे म्हणतात. मुमुक्षुपणा उदय पावल्यावर माणसाला आपले पूर्वायुष्य आठवते. आतापर्यंत आपल्या हातून घडलेल्या चुकांची, कुकर्मांची त्याला आठवण येऊन अतिशय वाईट वाटते, याला अनुताप म्हणतात. अनुताप झाल्यावाचून परमार्थ साधत नाही. एकीकडे आतापर्यंत घालविलेल्या जीवनाबद्दल अनुताप आणि त्याबरोबरच आत्मज्ञानाबद्दल तळमळ ही मुमुक्षुपणाची दोन अंगे आहेत. अनुतापाने पूर्वीच्या जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल होतो. म्हणून साधुसंत मुमुक्षुपणाला ''नवीन जन्म'' असे म्हणतात. आत्मज्ञानाच्या तळमळीमुळे मुमुक्षु संतांची संगत धरतो आणि त्यांनी सांगितलेले साधन करून साधक बनतो.

## ||श्रीराम||

**संसारमदाचेनि गुणें। नाना हीनें कुलक्षणें। जयाचेनि मुखावलोकनें। दोषचि लागे ।।१।।**

संसारमदाच्या धुंदीमुळे अनेक हीन लक्षणे माणसामध्ये निर्माण होतात. अशा कुलक्षणी माणसाचे तोंड पाहूनही दोष लागतो.

**ऐसा प्राणी जो कां बद्ध। संसारीं वर्ततां अबद्ध[१]। तयास प्राप्त झाला खेद। काळांतरीं ।।२।।**

असा जो बद्ध माणूस संसारामध्ये बेतालपणे वागतो त्यालासुद्धा कालांतराने खेद उत्पन्न होतो.

**संसारदुःखें दुखवला। त्रिविधतापें पोळला। निरूपणें प्रस्तावला। अंतर्यामीं ।।३।।**

संसारातील दुःखाने हा पोळला जातो. त्रिविध तापांचे चटके त्याला बसतात आणि कोठेतरी पारमार्थिक निरुपण श्रवण केल्यावर अंतःकरणात त्याला पश्चात्ताप होतो.

**जाला प्रपंचीं उदास। मनें घेतला विषयत्रास। म्हणे आतां पुरे सोस[२]। संसारींचा ।।४।।**

प्रपंचात त्याला उदासीनता येते आणि मनाला (पूर्वी ज्या विषयसुखांचा आनंद वाटत होता त्याच विषयसुखाचा) त्रास वाटतो. 'आता हा संसाराचा सोस पुरे झाला' असे म्हणतो.

**प्रपंच जाईल सकळ। येथील श्रम तो निर्फळ। आतां कांहीं आपुला काळ। सार्थक करूं ।।५।।**

हा प्रपंच नाशिवंत आहे. येथील परिश्रम निष्फळ आहेत. आता यापुढे मात्र आपला काळ सार्थकात घालवू.

**ऐसी बुद्धि प्रस्तावली। पोटीं आवस्ता[३] लागली। म्हणे माझी वयेसा[४] गेली। वेर्थचि आवघी ।।६।।**

१) अबद्ध-अनियमित २) सोस-हव्यास ३) आवस्ता-तळमळ ४) वयेसा-वय

अशा प्रकारचा बुद्धीला पश्चात्ताप होतो, अंतःकरणात चुटपूट निर्माण होते आणि 'माझे सगळे आयुष्य फुकट गेले' असे म्हणू लागतो.

**पूर्वी नाना दोष केले। ते अवघेचि आठवले। पुढें येउनि उभे ठेले। अंतर्यामीं ।।७।।**

पूर्वी केलेली नाना पातके ती सर्व आठवू लागतात आणि ती पातके समोर येऊन उभी राहतात.

**आठवे येमाची यातना। तेणें भये चि वाटे मना। नाहीं पापासि गणना। म्हणौनियां ।।८।।**

त्याला यमयातनांचे भय वाटू लागते. कारण पूर्वी असंख्य पातके हातून घडलेली असतात.

**नाहीं पुण्याचा विचार। जाले पापाचे डोंगर। आतां दुस्तर हा संसार। कैसा तरों ।।९।।**

पूर्वी पुण्याचा विचारच केला नाही. पापांचे जणू डोंगर झाले. आता ह्या दुस्तर संसारातून तरून तरी कसा जाऊ! (अशी चिंता वाटते)

**आपले दोष आच्छादिले। भल्यांस गुणदोष लाविले। देवा म्यां वेर्थच निंदिले। संत साधु सज्जन ।।१०।।**

आपण केलेल्या दोषांवर आजवर पांघरुण घातले. भल्या सज्जनांवर दोषारोप केले! देवा मी साधु संत सज्जन यांची व्यर्थच निंदा केली.

**निंदे ऐसे नाहीं दोष। ते मज घडले का विशेष। माझे अवगुणीं आकाश। बुडों पाहे ।।११।।**

निंदा करण्यासारखे थोर पाप दुसरे नाही. ते माझ्याकडून फारच घडले. माझ्या अवगुणांच्या साठ्यांमध्ये आकाशसुद्धा झाकले जाईल.

**नाहीं वोळखिले संत। नाहीं अर्चिला भगवंत। नाहीं अतित अभ्यागत। संतुष्ट केले ।।१२।।**

संतांना मी ओळखले नाही, देवपूजा केली नाही, अतीत अभ्यागत (अतिथी व आलेगेलेले) यांना संतोष दिला नाही. (अन्नदान, आश्रय दिला नाही)

**पूर्व पाप वोढवलें। मज कांहींच नाहीं घडलें। मन अव्हाटीं [५] पडिलें। सर्वकाळ ।।१३।।**

जणू पूर्वपापच आडवे आल्यामुळे माझ्याकडून हे काहीच घडले नाही. मन नेहमी आडवाटेला लागले होते.

**नाहीं कष्टविलें शरीर। नाहीं केला परोपकार। नाहीं रक्षिला आचार। काममदें ।।१४।।**

मी शरीर झिजविले नाही, परोपकार केला नाही, कामविकारामुळे मी आचारही राखला नाही. (षड्रिपूंच्या आहारी गेलो)

**भक्ति माता हे बुडविली। शांति विश्रांति मोडिली। मूर्खपणें म्यां विघडिली। सद्बुद्धि सद्वासना ।।१५।।**

भक्तीरूपी मातेला जलसमाधी दिली. शांतीरुप अशी विश्रांती नष्ट केली. सद्बुद्धी व सद्वासना मूर्खपणाने मी बिघडून टाकली.

---

५) अव्हाटी-कुमार्गी

**आतां कैसें घडे सार्थक। दोष केले निरार्थक। पाहों जातां विवेक। उरला नाहीं ।।१६।।**

आता जिवाचे सार्थक कसे होणार? मी निरर्थक पातकेच केली. पहावयास गेलो तर विवेकच मजपाशी नव्हता. (असे आता वाटते)

**कोण उपाये करावा। कैसा परलोक पावावा। कोण्या गुणें देवाधिदेवा। पाविजेल ।।१७।।**

आता यावर काय उपाय करावा? परलोकप्राप्ती कशी करावी? कोणत्या उपायाने देवाधिदेवाची प्राप्ती मला होईल?

**नाहीं सद्भाव उपजला। अवघा लोकिक संपादिला। दंभ वरपंगें[६] केला। खटाटोप कर्माचा ।।१८।।**

अंतरामध्ये सद्‌भाव निर्माण झाला नाही. लौकिकप्राप्तीसाठी सर्व केले. कर्माचा खटाटोप केला तो वरकरणी किंवा दांभिकपणाचा होता.

**कीर्तन केलें पोटासाठीं। देव मांडिलें हाटवटीं[७]। आहा देवा बुद्धि खोटी। माझी मीच जाणें ।।१९।।**

पोटासाठी कीर्तने केली, देवांना (हाटवटी) बाजारात मांडून त्यावर पैसे मिळविले. आहा रे देवा, माझी खोटी बुद्धी मलाच ठाऊक!

**पोटी धरूनि अभिमान। शब्दीं बोले निराभिमान। अंतरीं वांछूनियां धन। ध्यानस्त जालों ।।२०।।**

अभिमान अंतरात ठेवून (वरकरणी) निराभिमानी शब्द बोललो. मनामध्ये धनाची आशा बाळगून ध्यानस्थ होण्याचे सोंग केले.

**वित्पत्तीनें[८] लोक भोंदिले[९]। पोटासाठी संत निंदिले। माझे पोटीं दोष भरले। नाना प्रकारींचे ।।२१।।**

पांडित्याचा देखावा करून लोकांना भुलविले. पोटाची खळगी भरण्यासाठी संतनिंदा केली. अशा नाना प्रकारचे दोष माझ्या पोटी भरले आहेत.

**सत्य तेंचि उछेदिलें। मिथ्य तेंचि प्रतिपादिलें। ऐसें नाना कर्म केलें। उदरंभराकारणें[१०] ।।२२।।**

सत्याचा उच्छेद केला आणि असत्याचे प्रतिपादन केले. उदरभरणासाठी अशी नाना प्रकारची कर्मे केली.

**ऐसा पोटीं प्रस्तावला। निरूपणें पालटला। तोचि मुमुक्ष बोलिला। ग्रंथांतरी ।।२३।।**

असा ज्याच्या अंत:करणात पश्चात्ताप झाला आहे व जो निरुपणामुळे अंतरात पार बदलून गेला आहे त्यालाच ग्रंथामध्ये मुमुक्षु असे म्हणतात.

**पुण्यमार्ग पोटीं धरी। सत्संगाची वांछा करी। विरक्त जाला संसारीं। या नांव मुमुक्ष ।।२४।।**

जो पुण्यमार्गाची आवड धरतो, संतसंगतीची इच्छा करतो, संसारातून विरक्त होतो त्याचे नाव मुमुक्षु होय.

६) वरपंगे-वरवर ७) हाटवटीं-बाजारात ८) वित्पत्तीने-विद्वत्तेने ९) भोंदिले-फसविले १०) उदरंभराकारणे-पोट भरण्यासाठी

**गेले राजे चक्रवती। माझें वैभव तें किती। म्हणे धरूं सत्संगती। या नांव मुमुक्ष ।।२५।।**

चक्रवर्ती राजेरजवाडे झाले, गेले तेथे माझे पामराचे वैभव ते किती! आता तरी संतसंगती धरू असे म्हणतो तो मुमुक्षु!

**आपुले अवगुण देखे। विरक्तिबळें वोळखे। आपणासि निंदी दुःखें। या नांव मुमुक्ष ।।२६।।**

स्वतःचे दोष जो पाहू शकतो; विरक्ती निर्माण झाल्यामुळे तो ते ओळखू शकतो आणि उद्वेग वाटू लागून जो स्वतःचीच निंदा करू लागतो तो मुमुक्षु.

**म्हणे मी काये अनोपकारी। म्हणे मी काय दंभभारी। म्हणे मी काये अनाचारी। या नांव मुमुक्ष ।।२७।।**

मी कोणावर कधी उपकार केला नाही, मी किती ढोंगी होतो आणि मी किती दुर्वर्तनी

**म्हणे मी पतित चांडाळ। म्हणे मी दुराचारी खळ। म्हणे मी पापी केवळ। या नांव मुमुक्ष ।।२८।।**

मी पापी, चांडाळ, वाईट वर्तणुकीचा, दुष्ट, केवळ पापी

**म्हणे मी अभक्त दुर्जन। म्हणे मी हीनाहूनि हीन। म्हणे मी जन्मलो पाषाण। या नांव मुमुक्ष ।।२९।।**

मी अभक्त, दुर्जन, हीनाहून हीन असा नुसता पाषाण जन्माला आलो असे म्हणून स्वतःची निंदा करतो.

**म्हणे मी दुराभिमानी। म्हणे मी तपीळ जनीं। म्हणे मी नाना वेसनी। या नांव मुमुक्ष ।।३०।।**

मी दुराभिमानी, सर्व लोकांपेक्षा तापट, अनेक व्यसनाधीन

**म्हणे आळसी आंगचोर। म्हणे मी कपटी कातर[११]। म्हणे मी मूर्ख अविचार। या नांव मुमुक्ष ।।३१।।**

आळशी, चुकार, कपटी, भित्रा, मूर्ख, अविचारी

**म्हणे मी निकामी वाचाळ। म्हणे मी पाषांडी तोंडाळ। म्हणे मी कुबुद्धि कुटिळ। या नांव मुमुक्ष ।।३२।।**

मी नालायक, बडबड्या, पाखंडी, तोंड टाकून बोलणारा, वाकड्या बुद्धीचा आणि वाकड्या वृत्तीचा आहे.

**म्हणे मी कांहींच नेणे। म्हणे मी सकळाहूनि उणें । आपलीं वर्णी कुलक्षणें । या नांव मुमुक्ष ।।३३।।**

मला काहीच ज्ञान नाही, सर्वांपेक्षा मी कनिष्ठ आहे अशी आपली कुलक्षणे जो स्वतःच वर्णन करतो तो मुमुक्षु होय.

**म्हणे मी अनाधिकारी। म्हणे मी कुश्चिळ अघोरी[१२]। म्हणे मी नीच नानापरी। या नांव मुमुक्ष ।।३४।।**

मी अपात्र, गलिच्छ, अघोरी, सर्व प्रकारे नीच.

**म्हणे मी काये आपस्वार्थी । म्हणे मी काये अनर्थी । म्हणे मी नव्हे परमार्थी। या नांव मुमुक्ष ।।३५।।**

मी किती स्वार्थसाधू, किती अनर्थकारी आणि परमार्थ न जाणणारा

११) कातर-भित्रा १२) अघोरी-दुष्ट कृत्ये करणारा

**म्हणे मी अवगुणाची रासी। म्हणे मी वेर्थ आलों जन्मासी। म्हणे मी भार जालों भूमीसी। या नांव मुमुक्ष ।।३६।।**

मी दुर्गुणांची रास असून उगाचच जन्म घेतला आणि जमिनीला भारभूत झालो, असे स्वतःला म्हणू लागतो तो मुमुक्षु.

**आपणास निंदी सावकास। पोटीं संसाराचा त्रास। धरी सत्संगाचा हव्यास। या नांव मुमुक्ष ।।३७।।**

अशा प्रकारे जो आपलीच भरपूर निंदा करतो, ज्याच्या मनामध्ये संसाराबद्दल वीट येतो आणि जो संतसंगतीला हापापून जातो तो मुमुक्षु.

**नाना तीर्थें धुंडाळिलीं। शमदमादि साधनें केलीं। नाना ग्रंथांतरे पाहिलीं। शोधूनियां ।।३८।।**

मग नाना तीर्थक्षेत्रे धुंडाळतो, शमदम (मनशांती आणि निग्रहासाठी) साधने करतो. अनेक ग्रंथातील अर्थ शोधून पाहातो

**तेणें नव्हे समाधान। वाटे अवघाच अनुमान। म्हणे रिघों संतांस शरण। या नांव मुमुक्ष ।।३९।।**

पण त्यामुळे समाधानप्राप्ती होत नाही, सगळा संशयच वाटू लागतो. मग संतांनाच शरण जावे असे ज्याला वाटू लागते तो मुमुक्षु होय.

**देहाभिमान कुळाभिमान। द्रव्याभिमान नानाभिमान। सांडूनि संतचरणीं अनन्य। या नांव मुमुक्ष ।।४०।।**

देहाचा, कुळाचा, श्रीमंतीचा आदि सारे अभिमान सोडून देऊन संतांच्या चरणाशी जो अनन्य निष्ठा ठेवून शरण जातो तो मुमुक्षु.

**अहंता सांडूनि दूरी। आपणास निंदी नानापरी। मोक्षाची अपेक्षा करी। या नांव मुमुक्ष ।।४१।।**

(वरील ओवीत सांगितल्याप्रमाणे) सर्व अभिमान व अहंकार सोडून स्वतःचीच नाना प्रकारे निंदा करतो आणि मोक्षाची इच्छा करतो तो मुमुक्षु.

**ज्याचें थोरपण लाजे। जो परमार्थाकारणें झिजे। संतापांई विश्वास उपजे। या नांव मुमुक्ष ।।४२।।**

ज्याचा स्वतःच्या थोरवीचा अभिमान जिरून जातो, जो परमार्थासाठी झिजू लागतो, आणि संतांच्या चरणापाशी ज्याला विश्वास उत्पन्न होतो तो मुमुक्षु होय.

**स्वार्थ सांडून प्रपंचाचा। हव्यास धरिला परमार्थाचा। अंकित होईन सज्जनाचा। ह्मणे तो मुमुक्ष ।।४३।।**

प्रपंचातील स्वार्थ जो सोडून देतो व परमार्थाचा हव्यास धरतो आणि सज्जनांचा मी सेवक होईन असे म्हणतो तो मुमुक्षु होय.

**ऐसा मुमुक्ष जाणिजे। संकेतचिन्हें वोळखिजे। पुढें श्रोतीं अवधान दीजे। साधकलक्षणीं ।।४४।।**

मुमुक्षु हा असा असतो (वर सांगितलेल्या) थोड्याशा लक्षणांवरून त्याला ओळखावे. यापुढे साधकाची लक्षणे ऐकण्यासाठी श्रोत्यांनी अवधान द्यावे. (दासबोधाच्या श्रवणाने बद्धाचे मुमुक्षु होतात असे ग्रंथारंभलक्षण समासामध्ये (द. १-१-३४) सांगितले आहे. प्रारंभी या दोन शब्दांचा अर्थ ठाऊक नसतो. पण या दोन समासांच्या वाचनानंतर मनात त्याबद्दल कल्पना स्पष्ट होते.

दासबोधाच्या आरतीमध्ये तर 'बद्धचि सिद्ध जाले। असंख्यात मानवी।।' असे म्हटले आहे. ती सिद्धावस्था येण्यापूर्वी साधकावस्था असते. साधकाची लक्षणे पुढील समासात आहेत.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मुमुक्षलक्षणनाम समास अष्टम।।८।।**

## द. ५-९ : साधकलक्षणनिरूपण

मुमुक्षुची लक्षणे सांगताना श्री समर्थांनी अखेर सत्संगतीवर भर दिला आहे हे ध्यानात आलेच असेल. त्याचे कारण असे की, प्रापंचिक दुःखांचा चटका बसून संसाराची अपूर्णता जाणवली की, मुमुक्षुपणाला आरंभ होतो. त्यातूनच स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव निर्माण होते. आपले दोष आपल्याला स्पष्टपणे दिसू लागतात. प्रापंचिक ध्येये व आकांक्षा फोल वाटतात. पण आत्मज्ञानाचे ध्येय निश्चित होण्यास आत्मज्ञानी पुरुषाची भेट होणे अवश्य असते. म्हणून मुमुक्षूला संतसंगतीची तहान लागते. सत्संगतीने प्रथम आत्मज्ञानाचे ध्येय निश्चित होते. नंतर ते ध्येय गाठण्याचा मार्ग निश्चितपणे समजतो. त्या मार्गात राहण्याचा अभ्यास जो करतो त्याला साधक म्हणतात. साधकाने संतांपाशी अनुसंधानाची विद्या शिकायची असते. ''मी देहच आहे'' या भावनेत राहणारा साधक ''मी आत्माच आहे'' या भावनेत राहण्याचा अभ्यास करीत राहतो. देहाचे अनुसंधान बाजूस सारून आत्मस्वरूपाचे अनुसंधान ठेवायची युक्ति साधणे हे साधकाच्या साऱ्या साधनेचे मर्म समजावे. ही युक्ति वश होण्यास पूर्वीच्या आवडीनिवडी, आचारविचार बदलून नवीन स्वरूपानुकूल आवडीनिवडी व आचारविचार अंगी आणावे लागतात. देहावर व दृश्यावर सहजपणे राहणारे मन सतत अभ्यासाने आत्म्यापाशी किंवा स्वस्वरूपाशी ठेवण्यास अखंड धारणा धरावी लागते. इंद्रियांमध्यें पसरलेले मन एकवटून किंवा गोळा करून त्याला हृदयकमलात घट्ट धरून ठेवण्याचा नित्य प्रयत्न केला की धारणा साधते. ज्याला धारणा साधली तो साधक होय.

### ।। श्रीराम।।

**मागां मुमुक्षाचें लक्षण। संकेतें केलें कथन। आतां परिसा सावधान। साधक तो कैसा ।।१।।**

मागे मुमुक्षुची लक्षणे थोडक्यात सांगितली. आता साधक कसा असतो ते सावधान चित्ताने श्रवण करा.

**अवगुणाचा करुनि त्याग। जेणें धरिला संतसंग। तयासि बोलिजे मग। साधक ऐसा ।।२।।**

स्वतःच्या अवगुणांचा त्याग करून जो संतसंग धरतो त्याला मग साधक म्हणतात.

**जो संतांसि शरण गेला। संतजनीं आश्वासिला। मग तो साधक बोलिला। ग्रन्थांतरीं।।३।।**

जो संतांना शरण जातो आणि ज्याला त्यांनी आश्वासन दिलेले असते त्याला ग्रंथांमध्ये साधक म्हणतात.

**उपदेशिलें आत्मज्ञान। तुटलें संसारबंधन। दृढतेकारणें करी साधन। या नांव साधक ।।४।।**

सद्गुरुंनी त्याला आत्मज्ञानप्राप्तीचा उपदेश केला म्हणजे त्याचे संसाराचे बंधन सुटून जाते. मग आत्मज्ञान पक्के व्हावे म्हणून तो साधना करू लागतो. तेव्हा त्यास साधक म्हणावे.

**धरी श्रवणाची आवडी। अद्वैतनिरूपणाची गोडी। मननें अर्थांतर काढी। या नांव साधक ।।५।।**

अध्यात्मश्रवणाची तो आवड धरतो, अद्वैतनिरुपणाची गोडी त्याला लागते. मनन करून शब्दातील लक्ष्यार्थ ध्यानात घेतो तो साधक होय.

**होतां सारासारविचार। ऐके होऊनि तत्पर। संदेह छेदूनि दृढोत्तर। आत्मज्ञान पाहे ।।६।।**

सारासार विचारांचे तत्परतेने श्रवण करतो आणि पूर्वी मनात असलेले संदेह नष्ट करून घेऊन तो साधक आत्मज्ञानाचा विचार निश्चयपूर्वक करू लागतो.

**नाना संदेहनिवृत्ती। व्हावया धरी सत्संगती। आत्मशास्त्रगुरुप्रचीती। ऐक्यतेसि आणी ।।७।।**

पारमार्थिक शंकांचे समाधान करून घेण्यासाठी तो संतसंगती धरतो आणि गुरुप्रचिती, शास्त्रप्रचिती व आत्मप्रचिती या एकरुपच आहेत अशी अनुभूती घेतो.

**देहबुद्धि विवेकें वारी। आत्मबुद्धि सदृढ धरी। श्रवण मनन केलेंचि करी। या नांव साधक ।।८।।**

विवेकबळावर देहबुद्धीला आवर घालतो, आत्मबुद्धीचा दृढतेने स्वीकार करतो. जे एकदा श्रवण मनन केले असेल तेच पुनःपुन्हा करतो.

**विसंचूनि[१] दृश्यभान। दृढ धरी आत्मज्ञान। विचारें राखे समाधान। या नांव साधक ।।९।।**

दृश्य सृष्टीचे भान विसरून, आत्मज्ञान दृढ धरतो. 'सर्वत्र आत्माच आहे' ही भावना विचाराने दृढ करून समाधान राखतो; तोच साधक.

**तोडूनि द्वैताची उपाधी। अद्वैत वस्तु साधनें साधी। लावी ऐक्यतेची समाधी। या नांव साधक ।।१०।।**

द्वैतामुळे जी देहबुद्धीची उपाधी निर्माण होते ती तोडून टाकून परब्रह्माच्या अद्वैत साधनेने स्वरुपाकाराची समाधी प्राप्त करून घेतो तो साधक होय.

**आत्मज्ञान जीर्ण जर्जर। त्याचा करी जीर्णोद्धार। विवेकें पावे पैलपार। या नांव साधक ।।११।।**

पूर्वीच्या असंख्य जन्मांत देहबुद्धीमुळे आत्मज्ञान विसरले गेले व जीर्णजर्जर झाले त्या आत्मज्ञानाचा जीर्णोद्धार करतो आणि विवेकबळावर भवसागरातून पैलपार जातो.

**उत्तमें साधूचीं लक्षणें। आंगिकारी निरूपणें। बळेंचि स्वरूपाकार होणें। या नांव साधक ।।१२।।**

१) विसंचूनि-विसरून, दुर्लक्षून

चांगल्या साधूची लक्षणे कोणती त्याचे श्रवण (निरुपणामध्ये) केल्यावर त्यांचा स्वीकार करतो आणि प्रयत्नपूर्वक स्वरुपस्थिती प्राप्त करून घेतो. (आत्मलाभ करून घेण्याचा निश्चय प्रयत्नपूर्वकच करतो.)

**असत्क्रिया ते सोडिली। आणी सत्क्रिया ते वाढविली। स्वरूपस्थिती बळावली। या नांव साधक ।।१३।।**

वाईट कर्मांचा त्याग करून सत्कर्मांची वृद्धी केली आणि त्यामुळे स्वरुपस्थितीचा एकसारखा ध्यास ज्याला लागतो तो साधक.

**अवगुण त्यागी दिवसेंदिवस। करी उत्तम गुणाचा अभ्यास। स्वरुपीं लावी निजध्यास। या नांव साधक ।।१४।।**

अवगुणांचा त्याग करून उत्तमगुण अंगी बाणवून घेण्याचा यत्न करतो आणि आत्मस्वरुपाचा निदिध्यास चित्ताला लावून घेतो तो साधक.

**दृढ निश्चयाचेनि बळें। दृश्य असतांच नाडळे[२]। सदा स्वरूपीं मिसळे। या नांव साधक ।।१५।।**

या निश्चयामुळे बाह्यसृष्टी जरी असली तरी त्याच्या दृष्टीपुढे ती येत नाही आणि तो आत्मस्वरूपात एकरूप होऊन जातो.

**प्रत्यक्ष माया अलक्ष करी। अलक्ष वस्तु लक्षी अंतरीं। आत्मस्थितीची धारणा धरी। या नांव साधक ।।१६।।**

जरी भासात्मक इंद्रियगोचर माया प्रत्यक्ष दिसत असली तरी तिच्याकडे दुर्लक्ष करून जे लक्षात येऊ शकत नाही अशा परब्रह्माशी समरस होण्याची बुद्धी धरतो तो साधक होय.

**जें या जनासि चोरलें। मनास न वचे अनुमानलें। तेंचि जेणें दृढ केलें। या नांव साधक ।।१७।।**

जे सामान्य जनापासून गुप्त आहे, मनाला ज्याच्याबद्दल तर्क करता येत नाही तेच परब्रह्मस्वरुप, साधकाने चित्तामध्ये दृढ साठविलेले असते.

**जें बोलतांचि वाचा धरी। जें पाहतांचि अंध करी। तें साधी नाना परी। या नांव साधक ।।१८।।**

ज्या आत्मस्वरुपाचे वर्णन शब्दांनी करता येत नाही. वाणी कुंठीत होते, आणि डोळ्यांनी जे पाहाता येत नाही त्याच्याशी समरस होतो तो साधक.

**जें साधूं जातां साधवेना। जें लक्षूं जातां लक्षवेना। तेंचि अनुभवें आणी मना। या नांव साधक ।।१९।।**

ज्याचा अनुभव घेण्याचे प्रयत्न थिटे पडतात, जे पाहण्याचा प्रयत्न केला तरी दिसत नाही, ते अनुभवाच्या बळावर मनामध्ये साठवितो.

**जेथें मनचि मावळे। जेथें तर्कचि पांगुळे। तेंचि अनुभवा आणी बळें। या नांव साधक ।।२०।।**

ज्या स्वरुपस्थितीशी मनाचे अमन होते, जेथे तर्क पांगळा ठरतो, त्या ब्रह्मस्थितीचा जो (साधनेच्या) बळाने अनुभव घेतो तो साधक असतो.

---

२) दृश्य असतांच नाडळे-दृश्य विश्वाचे आकर्षण उरले नाही.

**स्वानुभवाचेनि योगें। वस्तु साधी लागवेगें। तेंचि वस्तु होये आंगें। या नांव साधक ।।२१।।**

साधनेच्या सहाय्याने ब्रह्मस्वरूपापाशी जो पोहोचतो आणि स्वतःच ब्रह्मस्वरुप बनून जातो तोच साधक.

**अनुभवाचीं आंगें जाणे। योगियांचे खुणे बाणे। कांहींच नहोन असणें[3]। या नांव साधक ।।२२।।**

योगी लोकांना आलेले अनुभवाचे टप्पे व खुणा यांचा भेद जो जाणतो आणि स्वतः देहासकट साऱ्या विश्वप्रकृतीशी संबंध न राहाता जो असतो तो साधक असतो.

**परती सारून उपाधी। असाध्य वस्तु साधनें साधी। स्वरूपीं करी दृढ बुद्धी। या नांव साधक ।।२३।।**

दृश्य जगाची सारी उपाधी जो झटकून टाकतो आणि पचनी पडण्यास कठीण अशी वस्तू (ब्रह्म) साधनेच्या बळावर पचनी पाडतो, स्वस्वरुपामध्ये बुद्धी दृढ करतो.

**देवाभक्ताचें मूळ। शोधून पाहे सकळ। साध्यचि होये तत्काळ। या नांव साधक ।।२४।।**

देव आणि भक्त यांचा उगम शोधून पाहातो आणि त्यायोगे ब्रह्माशी तात्काळ तद्रुप/तदाकार होतो. त्याला साधक असे म्हणतात.

**विवेकबळें गुप्त जाला। आपेंआप मावळला। दिसतो परी देखिला। नाहींच कोणीं।।२५।।**

साधक देहरुपात जरी असला तरी त्याचे स्वरुप कोणास दिसू शकत नाही. कारण विवेकामुळे नित्य व अनित्य यांचे स्वरुप ओळखून त्याने स्वस्वरूपाच्या किंवा परब्रह्माच्या स्वरुपात बुडी मारलेली असते. त्यामुळे तो जणू गुप्त झालेला असतो हा भावार्थ.

**मीपण मागें सांडिलें। स्वयें आपणास धुंडिलें। तुर्येसहि वोलांडिलें[4]। या नांव साधक ।।२६।।**

अहंता मागे टाकून स्वतः आपले स्वरूप शोधून काढतो. तुर्यावस्था किंवा साक्षीभावाची अवस्था त्याने ओलांडलेली असते.

**पुढें उन्मनीचा सेवटीं। आपली आपण अखंड भेटी। अखंड अनुभवीं ज्याची दृष्टी। या नांव साधक ।।२७।।**

आणि त्यानंतर मनाचे उन्मन होऊन आत्मवस्तूची भेट निरंतरच होऊन जाते. या स्वानुभूतीवर त्याची वृत्ती स्थिर होते. तो सद्‌चिदानंद स्वरुपाशी तद्रूप होतो.

**द्वैताचा तटका[5] तोडिला। भासाचा भास मोडिला। देहीं असोनि विदेह जाला। या नांव साधक ।।२८।।**

त्रिपुटी नाहीशी झाल्याने द्वैताचा संबंध तोडून टाकतो. अविद्याजन्य (मायेमुळे) दृश्याचा जो भास होतो तो त्याने नाहीसा केला असल्याने तो देहामध्ये असूनही विदेही बनतो.

**जयास अखंड स्वरूपस्थिती। नाहीं देहाची अहंकृती। सकळ संदेहनिवृत्ती। या नांव साधक ।।२९।।**

अखंड स्वरुपस्थिती असणाऱ्या साधकाला देहाभिमान राहात नाही. साधकाची सारी

३) कांहींच नहोन असणे-मीपण विरहीत सहजतेने प्रारब्धाचा क्षण होईतो देहाने असणे. ४) तूर्येसही वोलांडिलें-साक्षित्वाची-द्रष्टेपणाची जाणीवही सोडली. ५) तटका-संबंध

संदेहनिवृत्ती झालेली असते.

**पंचभूतांचा विस्तार। जयासि वाटे स्वप्नाकार। निर्गुणीं जयाचा निर्धार। या नांव साधक ।।३०।।**

विश्वाचा हा पंचभूतांचा विस्तार त्याला स्वप्नवत वाटतो आणि निर्गुण, निराकार ब्रह्म हेच सत्य, असा त्याचा निर्धार झालेला असतो.

**स्वप्नीं भये जें वाटलें। तें जागृतीस नाहीं आलें। सकळ मिथ्या निर्धारिलें। या नांव साधक ।।३१।।**

स्वप्नामध्ये एखाद्या भीषण घटनेमुळे जी भीती वाटते ती अवस्था जागेपणी राहात नाही जे सर्व काही स्वप्नात पाहिले ते मिथ्या होते अशी दृश्यजगाबद्दलही ज्याची धारणा असते तो साधक असतो.

**मायेचें जें प्रत्यक्षपण। जनास वाटे हें प्रमाण। स्वानुभवें अप्रमाण। साधकें केलें ।।३२।।**

माया प्रत्यक्ष दिसते त्यामुळे अज्ञजनांना ती खरी वाटते. ज्याला तिच्या भ्रामकपणाबद्दल अनुभव आला तो साधक तिला मिथ्या मानतो.

**निद्रा सांडूनि चेइरा[६] जाला। तो स्वप्नभयापासून सुटला। माया सांडून तैसा गेला। साधक स्वरूपीं ।।३३।।**

झोपेचा त्याग करून जागृत होणारा स्वप्नभयापासून सुटतो. त्याचप्रमाणे आत्मानुभवामुळे साधक मायेचा त्याग करून मुक्त होतो.

**ऐसी अंतरस्थिती बाणली। बाह्य निस्पृहता अवलंबिली। संसारउपाधी त्यागिली। या नांव साधक ।।३४।।**

अशी आंतरिक स्थिती बाणल्यामुळे साधकाला बाह्याचरणात निस्पृहता प्राप्त होते. प्रापंचिक उपाधींचा त्याग करतो तो साधक.

**कामापासून सुटला। क्रोधापासूनि पळाला। मद मत्सर सांडिला। येकीकडे ।।३५।।**

आत्मानुभूती प्राप्त झाल्यामुळे कामविकारापासून सुटतो, क्रोधापासून दूर पळतो, मदमत्सरादि विकारांना बाजूला सारतो.

**कुळाभिमानासी सांडिलें। लोकलाजेस लाजविलें। परमार्थास माजविलें। विरक्तिबळें ।।३६।।**

कुळाबद्दलचा अहंकार सोडून देतो, लोकलज्जेला फेटाळून लावतो आणि विरक्तीच्या प्रभावामुळे सर्वत्र परमार्थ वर्धमान करतो; तो साधक होय.

**अविद्येपासून फडकला। प्रपंचापासून निष्टला। लोभाचे हातींचा गेला। अकस्मात ।।३७।।**

(या पुढील ओव्यातून साधकाच्या वर्तनाचे वर्णन एखाद्या पराक्रमी वीराप्रमाणे मोठ्या बहारीने करण्यात आले आहे. देहबुद्धीच्या लक्षणांचा समूळ नाश केल्याविना आत्मबुद्धी स्थिर होऊ शकत नाही. त्या लक्षणांचा नि:पात करणारा साधक आध्यात्मिक क्षेत्रातील वीरपुरुषच होय.) साधक अविद्येपासून दूर जातो, प्रपंचाच्या हातातून निसटतो, लोभाच्या मगरमिठीतून

६) चेईरा-जागृत

अकस्मात सुटून जातो.

**थोरपणासि पाडिलें। वैभवासि लिथाडिलें। महत्वासि झिंजाडिलें। विरक्तिबळें ।।३८।।**

'अहं ब्रह्मास्मि' या महावाक्याच्या प्रचितीमुळे लटक्या देहाभिमानाच्या थोरवीला पाडतो, वैभवाला लाथा घालतो आणि विरक्तीच्या बळावर मानसन्मानाला तो झिडकारतो. तुच्छ समजून ढकलून देतो.

**भेदाचा मडघा[७] मोडिला। अहंकार सोडून पाडिला। पाई धरूनि आपटिला। संदेहशत्रु ।।३९।।**

भेदाचे घर मोडून टाकतो. अहंकाराला अंगझटीला येऊ न देता त्याला लोळवतो, संशयरुपी शत्रूला तो पायाला धरुन आपटतो.

**विकल्पाचा केला वधु। थापे मारिला भवसिंधु। सकळ भूतांचा विरोधु। तोडून टाकिला ।।४०।।**

(निर्विकल्प स्थिती प्राप्त करतो म्हणजेच) विकल्पाचा वध करतो, प्रहार करून भवसागराला मारून टाकतो. (साधकाला बाह्यविश्व मृगजळाप्रमाणे वाटत असल्याने भवसागर त्याच्या दृष्टीने नष्ट होतो.) आणि पंचभूतांच्या विरोधाचा मोड करतो. (कारण पंचभौतिक सृष्टी ही आत्मज्ञान मिळविताना एकप्रकारे विरोध करीत असते.)

**भवभयासि भडकाविलें। काळाचें टांगे मोडिलें। मस्तक हाणोनि फोडिलें। जन्ममृत्याचें ।।४१।।**

संसारभयाच्या तोंडात ठेवून दिली, काळाची तंगडीच मोडली आणि जन्म-मृत्यूंचे डोकेच ठेचून काढले.

(ते आता डोकेच वर काढू शकत नाहीत)

**देहसमंधावरी लोटला[८]। संकल्पावरी उठावला। कल्पनेचा घात केला। अकस्मात ।।४२।।**

देहरुपी समंधावर हल्ला चढविला. संकल्पावर चाल केली आणि कल्पनेचा एकदम धुव्वा उडविला. (कल्पना ही बंधनाला कारण असते. तिचे निर्मूलन केले)

**अपधाकासि ताडिलें। लिंगदेहासि विभांडिलें [९]। पाषांडास पछ्याडिलें। विवेकबळें ।।४३।।**

आपल्याच अंगी वसणाऱ्या भवभयाला मार दिला, सूक्ष्म देहाचा पराभव केला. पाखंडी विचारांना विवेकबळावर वेढा घातला.

**गर्वावरी गर्व केला। स्वार्थ अनर्थी घातला। अनर्थ तोहि निर्दाळिला। नीतिन्यायें ।।४४।।**

देहाभिमानाच्या गर्वावर 'मी ब्रह्मरूप' या गर्वाने मात केली. स्वार्थाच्या ठिकाणी अनर्थ दाखविला व अनर्थही नीतीन्यायाच्या विवेकाने ठार केला.

**मोहासी मधेंचि तोडिलें। दुःखासि दुःधडचि केलें। शोकास खंडून सांडिलें। येकीकडे ।।४५।।**

७) मडघा-मठ ८) लोटला-हल्ला केला ९) लिंगदेहासि विभांडिले-वासनामय सूक्ष्म देहास जिंकले

मोहाचा दुष्परिणाम होण्यापूर्वीच त्याला तोडून टाकले, दु:खाचे दोन तुकडे केले. शोकाची खांडोळी करून एकीकडे फेकून दिली.

**द्वेष केला देशधडी। अभावाची घेतली नरडी। धाकें उदर तडाडी। कुतर्काचें ।।४६।।**

जीवनातून द्वेषाला हद्दपार केले. (अभाव किंवा) नास्तिकतेचे नरडेच आवळले. कुतर्काचे पोटच फाडले. (सुयोग्य तर्क केला)

**ज्ञानेंविवेक माजला। तेणें निश्चयो बळावला। अवगुणाचा संव्हार केला। वैराग्यबळें ।।४७।।**

आत्मज्ञानविवेक बलिष्ठ केला. त्यामुळे परमार्थप्राप्तीचा निश्चय दृढावला. वैराग्याच्या बळावर अवगुणांचा संहार केला. ('अवगुण सोडता जाती' हा श्रीसमर्थांचा सिद्धान्तच आहे.)

**अधर्मास स्वधर्में लुटिलें। कुकर्मासि सत्कर्में झुगटिलें[१०]। लांटून वाटा लाविलें। विचारें अविचारासी ।।४८।।**

अधर्माला स्वधर्म/कर्माच्या योगे लुटले. सत्कर्मांनी वाईट कर्मांना झुगारुन दिले. विचाराने अविचाराला ठेचून मार्गी लावले.

**तिरस्कार तो चिरडिला। द्वेष खिरडूनि सांडिला। विषाद अविषादें घातला। पायांतळीं ।।४९।।**

तिरस्काराला चिरडून टाकले. (जे जे भेटे भूत। तेचि मानिजे भगवंत। अशा विचाराने) द्वेषाला उपटून टाकले. खेद किंवा निरुत्साहाला पायदळी तुडविले.

**कोपावरी घालणें घातलें। कापट्य अंतरीं कुटिलें। सख्य आपुलें मानिलें। विश्वजनीं ।।५०।।**

क्रोधावर घाला घातला, अंत:करणातच कपटी विचारांना ठेचून टाकले व जगातील सर्व लोकांशी सख्य मानले.

**प्रवृत्तीचा केला त्याग। सुहृदांचा सोडिला संग। निवृत्तिपथें ज्ञानयोग। साधिता जाला ।।५१।।**

(विषयांकडे धावणाऱ्या) प्रवृत्तींचा त्याग केला. जिवलगांबद्दल प्रेमासक्ती सोडली. निवृत्तीपंथाने जाऊन ज्ञानयोग प्राप्त करून घेतला.

**विषयेमैंदास सिंतरिलें[११]। कुविद्येसि वेढा लाविलें। आपणास सोडविलें। आप्ततश्करापासुनी ।।५२।।**

विषयरुप लबाडाला ठकविले, कुविद्येला/अज्ञानाला ज्ञानाच्या बळाने पळवून लावले. आप्त हे आपणास प्रपंचात गुंतवून आपले आयुष्य चोरून नेतात अशा आप्त-तस्करांपासून स्वत:ची सुटका करून घेतली.

**पराधेनतेवरी कोपला। ममतेवरी संतापला। दुराशेचा त्याग केला। येकायेकी ।।५३।।**

पराधीनपणावर राग केला, ममतेवर संतापला. (उपाधींवरील ममतेचा त्याग केला) दुराशेचा (दु:खरूप आशेचा) एकदमच त्याग केला.

१०) झुगटिले-झुगारले ११) विषय मैंदास सिंतारिले-विषयरुपी ठगाला ठकविले

**स्वरूपीं घातलें मना। यातनेसि केली यातना। साक्षेप आणि प्रेत्ना। प्रतिष्ठिलें ।।५४।।**

आत्मस्वरुपाच्या ठिकाणी (चंचल) मन स्थिर केले. त्रिविध तापांच्या यातनेला यातना केली. दीर्घोद्योग आणि प्रयत्न यांची प्रतिष्ठा वाढविली.

**अभ्यासाचा संग धरिला। साक्षपासरिसा निघाला। प्रेत्न सांगाती भला। साधनपंथें ।।५५।।**

अभ्यासाशी मैत्री केली. प्रयत्नांची सोबत घेऊन सद्‌गुरुंनी दिलेल्या साधनेच्या मार्गाने दीर्घोद्योगाबरोबर निघाला. असा असतो साधक.

**सावध दक्ष तो साधक। पाहे नित्यानित्यविवेक। संग[१२] त्यागूनि येक। सत्संग धरी ।।५६।।**

नित्यानित्य विवेक करणारा साधक नेहमी सावध आणि तत्पर असतो. संग (देहबुद्धी) सोडून देतो आणि संतसंगतीमात्र दृढ धरतो.

**बळेंचि सारिला संसार। विवेकें टाकिला जोजार। शुद्धाचारें अनाचार। भ्रष्टविला ।।५७।।**

विरक्तीच्या बळाने संसार सोडतो तर विवेकाच्या बळावर प्रापंचिक खटपटी (किंवा जोजार) टाकून देतो. शुद्ध आचरणाने अनाचाराला भ्रष्ट करतो.

**विसरास विसरला। आळसाचा आळस केला। सावध नाही दुश्चित्त जाला। दुश्चित्तपणासी [१३] ।।५८।।**

(स्वस्वरुपाच्या) विस्मरणालाच विसरतो. (अखंड ईश्वरानुसंधान राखतो) साधना करण्याच्या आळसाचा कंटाळा करतो. दुश्चितपणाची (चित्त ठिकाणावर नसण्याची जी) स्थिती तेथेच दुश्चित असतो. (नेहमी सावध असतो.)

**आतां असो हें बोलणें। अवगुण सांडी निरूपणें। तो साधक ऐसा येणें प्रमाणें। बुझावा[१४] ।।५९।।**

असो आता हा विषय पुरे. जो निरुपणामुळे अवगुणांचा त्याग करतो तो साधक असतो, असे याप्रमाणे जाणावे. (श्रवणाची फलश्रुती = अवगुणांचा त्याग)

**बळेंचि अवघा त्याग कीजे। म्हणौनि साधक बोलिजे। आतां सिद्ध तो जाणिजे। पुढीलें समासीं ।।६०।।**

विवेकबळावर उपाधींचा मुद्दाम त्याग करतो तो साधक. (हा त्याग साधकाला जाणूनबुजून करावा लागतो. पण सिद्धावस्थेत तो सहजच झालेला असतो हे ध्यानात येण्यासाठी 'बळेंचि' हा शब्द ओवीत आहे.) आता सिद्धाची लक्षणे पुढील समासात सांगतो.

**येथें संशय उठिला। निस्पृह तोचि साधक जाला। त्याग न घडे संसारिकाला। तरी तो साधक नव्हे कीं ।।६१।।**

या ठिकाणी श्रोत्यांच्या मनात संशय उठला की निस्पृह असेल तोच साधक होतो असे असेल तर सांसारिकांना काही त्याग घडत नाही. म्हणून सांसारिक कधीच साधक होऊ शकणार नाहीत का?

१२) संग-मी पणाचा संग १३) दुश्चितपणा-मनाचे इतस्ततः भटकणे १४) बुझावा-जाणावा.

**ऐसें श्रोतयांचें उत्तर। याचें कैसें प्रत्योत्तर। पुढिले समासीं तत्पर। होऊन ऐका ।।६२।।**

असा श्रोत्यांनी प्रश्न केला, याचे उत्तर कसे आहे ते पुढील समासामध्ये तत्परतेने ऐकावे.

(अभ्यासार्थींना एका महिन्यात प्रमाणाबाहेर अभ्यास करावा लागू नये म्हणून सिद्धलक्षण निरुपणाच्या समासाचा या स्वाध्यायात समावेश केलेला नाही. १० व्या स्वाध्यायात त्याचा समावेश केला आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे साधकलक्षणनिरूपणनाम समास नवम।।९।।**

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका ६ वी

**(द. ५-७, ५-८ आणि ५-९ वर आधारित)**

प्र. १. द. ५-७ मध्ये माणसांचे कोणते चार वर्ग श्रीसमर्थांनी सांगितले आहेत?

प्र. २. बद्धाचा मुमुक्षु होण्याचे परिवर्तन कोणत्या विविध कारणांमुळे होऊ शकते? आपले यासंबंधात स्वतःचे काही निरीक्षण आहे का? 'मुमुक्षुलक्षण' समासातील ओवी क्र. ६, क्र. २० आणि क्र. ४१ यांचा अर्थ स्पष्ट करा.

प्र. ३. द. ५-७ बद्धलक्षण निरूपणातील ३५ ते ४० पर्यंतच्या ओव्यात कोणती लक्षणे वर्णिली आहेत?

प्र. ४. साधकावस्थेतील प्राथमिक अवस्था द. ५-९ मध्ये कशी मांडली आहे?

प्र. ५. एखाद्या वीरपुरुषाच्या पराक्रमाप्रमाणे साधकाचे वर्णन आले आहे. अशा कोणत्याही ५ ओव्या लिहा. अशा प्रकारचे वर्णन एकंदर किती ओव्यांमध्ये आले आहे?

# दासबोध प्रबोध : स्वाध्याय ७ वा

## (द. ४-७,८,९)

'नवविधाभक्ती' या विषयावरील ९ समास दासबोधामध्ये आहेत. त्यापैकी 'नामस्मरणा'चा समास प्रवेशस्तराला आणि 'पादसेवन', 'अर्चन' आणि 'वंदनभक्ती' यांचा अभ्यास परिचयस्तराला आपण केला आहे. आता प्रबोधस्तराला 'दास्यभक्ती', 'सख्यभक्ती' आणि 'आत्मनिवेदन' यावरील तीन समास एकाच महिन्यात अभ्यासावयाचे आहेत. दासबोधाचा आपला अभ्यास भक्तिरसामध्ये रंगलेला असावा कारण

**'भक्तिचेनि योगें देव। निश्चयें पावती मानव।**

**ऐसा आहे अभिप्राव। ईये ग्रंथीं।।' १-१-४।।**

असे समर्थांनी प्रारंभीच म्हटलेले आहे.

ज्या काळामध्ये मंदिरे पाडली जात होती, त्यावेळी श्रीसमर्थ मंदिरे उभारीत होते आणि 'नाना रचना जीर्ण जर्जर। त्यांचे करावे जीर्णोद्धार।।' असे सांगत होते. 'दास्यभक्ती' हा समास वाचताना जीर्णोद्धार कशा प्रकारे व्हावा याची तपशीलवार माहिती दिली गेली आहे. आज 'मंदिर' ही संस्थाच जीर्ण झाली आहे. अस्वच्छ मंदिरे आणि लोभीवृत्तीचे पंडे हे आजचे दृश्य जाऊन त्या ठिकाणी चाफळ, जांब, सज्जनगड यासारखी स्वच्छ आणि सुंदर मंदिरे निर्माण झाली पाहिजेत. सख्यभक्ती आणि आत्मनिवेदन या समासांचा अभ्यास सूक्ष्मरीतीने केला तर स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याची आपली दृष्टी समूळ बदलून जाईल. जीवनात समाधान आणि प्रेरणा निर्माण होईल...

## द. ४-७ : दास्यभक्ति

भक्तीच्या साम्राज्यामध्ये भगवंताच्या किंवा सद्‌गुरूंच्या दास्यभावाला अनन्यसाधारण स्थान आहे. संतसमाजसम्राट योगी कुलगुरु श्रीज्ञानेश्वर महाराज स्वतःला पदोपदी 'निवृत्तिदास' म्हणवून घेण्यात धन्य मानतात. ''राम हमारा जप करे, हम बैठे आराम'' अशी भगवंतावर मोठी सत्ता गाजविणारा कबीर ''मैं गुलाम मैं गुलाम मैं गुलाम  तेरा। तूं साहेब मेरा'' असे त्यालाच ओरडून सांगतो. ज्यांचे भक्तिज्ञानवैराग्य पाहून गाथ्याला पाचवा वेद अशी सार्थ पदवी चिकित्सक मराठी माणसाने दिली ते श्रीतुकाराम ठासून सांगतात की ''तरीच जन्मा यावे दास विठ्ठलाचे व्हावे.'' भक्तिभास्कर प्रतिवाल्मीकि गोस्वामी तुलसीदासांच्या साहित्यामध्ये सेव्यसेवक संबंधाचे इतके भव्य चित्र रंगविले आहे की, त्यांचे वाङ्मय म्हणजे दास्यभक्तीची भागीरथीच बनली आहे. ''सेवक सेव्य-भाव बिनु भव न तरिय उरगारि'' असा आपला अनुभव त्यांनी स्पष्टपणे निवेदिला आहे आणि ज्यांचे वैराग्य पाहिले की शुकाचार्यांची आठवण होते, ज्यांचे अगाध ज्ञान पाहिले की वशिष्ठमुनींची आठवण होते, ज्यांची दया आणि प्रेम पाहिले की प्रभू रामचंद्रांची आठवण येते, ज्यांचा संचार आणि वाङ्मयसंभार पाहिला की श्रीशंकराचार्यांची आठवण येते, ज्यांची अनन्यभक्ती पाहिली की मारुतिरायाची आठवण येते, ज्यांची राजैश्वर्यातील अलिप्तता पाहिली की विदेही जनकाची आठवण होते, व ज्यांचे व्यवहारचातुर्य तसेच वागण्याची खुबी पाहिली की भगवान श्रीकृष्णाची आठवण होते ते श्रीसमर्थ ''श्रीरामाचा दास'' म्हणूनच अखेरच्या क्षणापर्यंत जगले. त्यांच्या नावातच त्यांनी दास्यभक्तीचा चमत्कार दाखविला, ''रामदासस्वामी'' याचा अर्थ असा की ''मी रामाचा दास बनलो  पण त्यामुळे जगाचा म्हणजे प्रपंचाचा स्वामी झालो व जगामध्ये अकिंचन असून समर्थपणे मिरविलो.'' सांगण्याचा हेतू असा की, भगवंताचे किंवा सद्‌गुरूंचे दास्य अंगीकारल्याखेरीज भक्तीची पूर्तता होत नाही. माणसाच्या वर्तनाला ज्या प्रेरणा

कारण होतात त्यांपैकी स्वामीपणा व दासपणा ही प्रेरणा फारच मूलगामी आहे. प्रत्येक माणूस कोठेतरी मालकी गाजवितो व त्याबरोबरच कोठेतरी दास्य पत्करतो. एखादा मोठा सेनापती अफाट सैन्यावर सत्ता गाजवितो पण स्त्रीच्या पुढे अगदी लाचार होतो. भगवंताच्या दास्यामध्ये खरोखर मोठे दिव्य प्रेम असते. 'तो म्हणजे भगवंत माझा आहे पण मी सर्वस्वी त्याचा आहे.' या शुद्ध भावनेपायी स्वामींच्या सेवेशिवाय भक्ताला जीवनात दुसरा काहीही स्वार्थ उरत नाही. किंबहुना भगवंताची सेवा आणि स्वार्थ यांच्यामध्ये स्वभाववैर आहे. आपल्या सेवेचे फळ काय मिळाले, मिळते किंवा मिळेल याचा विचारदेखील भक्ताच्या मनात येत नाही. आपले काही का होईना, आपला स्वामी सदा प्रसन्न असावा, हाच भक्ताचा स्वार्थ असतो. 'खुद भूका मरे, मगर माशूकको राजी करे।' (अर्थ - 'आपण उपाशी मरावे परंतु आपले प्रेमपात्र प्रसन्न राहावे') या सूफी वचनामध्ये दास्यभक्तीचे मर्म साठविले आहे. भगवंताचा दास जसजसा सेवाप्रवीण होत जातो तसतसा त्याचा स्वामी चराचर व्यापून आहे अशी प्रतीती त्याला येते. मग सर्व प्राणिमात्रांची मनोभावे सेवा करणे हे त्याच्या दास्याला स्वरूप प्राप्त होते, असो. मराठी वाङ्मयसागरामध्ये दास्यभक्तीची पुण्य सलिला गंगा आणून सोडणारे श्रीसमर्थ, भक्तीचे मोठेच आचार्य होऊन गेले हे निर्विवाद होय.

## ||श्रीराम||

**मागां जालें निरूपण। साहवें भक्तीचें लक्षण। आतां ऐका सावधान। सातवी भक्ती ।।१।।**

मागे सहाव्या भक्तीचे निरुपण झाले. आता सातवी भक्ती सावधपणे ऐका.

**सातवें भजन तें दास्य जाणावें। पडिलें कार्य तितुकें करावें। सदा सन्निधचि असावें। देवद्वारीं ।।२।।**

सातवी भक्ती म्हणजे दास्यभक्ती. नेहमी देवद्वाराजवळ जे काम पडेल ते ते करीत जावे.

**देवाचे वैभव सांभाळावें। न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें। चढतें वाढतें वाढवावें। भजन देवाचें ।।३।।**

देवाच्या ऐश्वर्याचे रक्षण करून त्यात काही उणेपणा येऊ देऊ नये. चढत्या वाढत्या प्रमाणात देवाचे भजन करावे.

**भंगलीं देवालयें करावीं। मोडलीं सरोवरें बांधावीं। सोफे[१] धर्मशाळा चालवावीं। नूतन चि कार्यें ।।४।।**

मोडकळीला आलेली मंदिरे बांधावी. सरोवरे बांधून काढावी. (जलसंचयाची निगा राखावी) पडव्या, धर्मशाळा नवीन बांधाव्या.

**नाना रचना जीर्ण जर्जर। त्यांचे करावे जीर्णोद्धार। पडिलें कार्य तें सत्वर। चालवित जावें ।।५।।**

मोडकळीला आलेल्या वास्तूंचे जीर्णोद्धार करावे. देवाचे जे काम अडले असेल ते तत्परतेने करावे.

१) सोफे-ओसऱ्या

**गज रथ तुरंग सिंहासनें। चौकिया[२] सिबिका सुखासनें। मंचक डोल्हारे विमानें। नूतनचि करावीं ॥६॥**

हत्ती, रथ, घोडे, सिंहासने, चौरंग, पालख्या, मेणे, पलंग, झोपाळे, विमाने नवीन करावे.

**मेघडंब्रें छत्रें चामरें। सूर्यापानें निशाणें अपारें। नित्य नूतन अत्यादरें। सांभाळित जावीं ॥७॥**

मेघडंबऱ्या, छत्र, चामरे, अब्दागिरी, निशाणे, नेहमी नवी करून आदरपूर्वक त्यांचे रक्षण करावे.

**नाना प्रकारीचीं यानें। बैसावयाचीं उत्तम स्थानें। बहुविध सुवर्णासनें। येत्नें करीत जावीं ॥८॥**

नाना वाहने, बैठकीची स्थळे, अनेक प्रकारची सुवर्ण आसने प्रयत्नपूर्वक करावी.

**भुवनें कोठड्या पेट्या मांदुसा। रांझण कोहळीं [३] घागरी बहुवसा। संपूर्ण द्रव्यांश ऐसा। अति येत्नें करावा ॥९॥**

घरे, कोठड्या, पेट्या, तिजोऱ्या, रांजण, कोहळे, घागरी अशी द्रव्य साठविण्याची पात्रे तयार करून देवस्थानचे द्रव्य प्रयत्नपूर्वक साठवावे.

**भुयेरीं तळघरें आणी विवरें। नाना स्थळें गुप्त द्वारें। अनर्घ्ये [४] वस्तूंचीं भांडारें। येत्नें करीत जावीं ॥१०॥**

भुयारे, तळघरे आणि विवरे अशी गुप्तस्थळे व त्यांच्या गुप्तवाटा कराव्या. अमोल वस्तू ठेवण्याची तेथे भांडारे करावी. (चाफळ येथील श्रीराम देवस्थानामध्ये तळघर, भुयार होते. मंदिराचा जीर्णोद्धार करताना त्याचा सुगावा लागला. त्या स्थळाचाही पुरावस्तू म्हणून जीर्णोद्धार केलेला तेथे आढळतो.)

**आळंकार भूषणें दिव्यांबरें। नाना रत्नें मनोहरें। नाना धातु सुवर्णपात्रें। येत्नें करीत जावीं ॥११॥**

देवाचे अलंकार, भूषणे, उत्तम वस्त्रे, अनेक मनोहर रत्ने, नाना धातूची व सुवर्णाची भांडी, प्रयत्नपूर्वक मिळवून देवाचे वैभव वाढवावे.

**पुष्पवाटिका नाना बनें। नाना तरुवरांचीं वनें। पावती करावीं जीवनें। तया वृक्षांसी ॥१२॥**

देवासाठी पुष्पवाटिका, अनेक वनें व उपवनें नाना वृक्षांची लागवड करून तयार करावी. त्यांना पाणी देण्याची सोय करावी.

**नाना पशूंचिया शाळा। नाना पक्षी चित्रशाळा। नाना वाद्यें नाट्यशाळा। गुणी गायेक बहुसाल ॥१३॥**

नाना प्रकारच्या पशुशाळा, पक्षीशाळा व चित्रशाळा बांधाव्यात. अनेक प्रकारची वाद्ये असावीत. नाटके करण्यासाठी रंगभूमी तयार करून अनेक कलावंत, गुणी गायक यांना आश्रय द्यावा.

**स्वयंपाकगृहें भोजनशाळा। सामग्रीगृहें धर्मशाळा। निद्रिस्तांकारणें पडशाळा। विशाळ स्थळें ॥१४॥**

स्वयंपाक घरे, जेवणासाठी जागा, स्वयंपाकाचे साहित्याची कोठी, धर्मशाळा, झोपण्यासाठी ओवऱ्या या सर्व वास्तू विशाल (भव्य) असाव्या.

**नाना परिमळद्रव्यांचीं स्थळें। नाना खाद्यफळांचीं स्थळें। नाना रसांचीं नाना स्थळें। येत्नें करीत जावीं ॥१५॥**

२) चौकिया-चौरंग ३) कोहळीं-भोपळा कोरून त्यात द्रव्य भरण्यासाठी केलेले भांडे ४) अनर्घ्ये-मूल्यवान

सुवासिक अत्तरांसाठी, खाद्य वस्तूंसाठी, फळे ठेवण्यासाठी, अनेक पातळ रसांसाठी, साठवण-स्थाने प्रयत्नपूर्वक तयार करावी.

**नाना वस्तांचीं [५] नाना स्थानें। भंगलीं करावीं नूतनें। देवाचें वैभव वचनें। किती म्हणौनि बोलावें ।।१६।।**

अशा वस्तूंची स्थाने भंगली असतील तर नूतन करावी. देवाचे वैभव शब्दात सांगणे अवघड आहे. (असे 'वैभव चढते वाढते रहावे' हा समर्थांचा खास शब्दप्रयोग त्यांच्या पत्रव्यवहारातही आढळतो.)

**सर्वां ठाईं अति सादर। आणी दास्यत्वासहि तत्पर। कार्यभागाचा विसर। पडणार नाहीं ।।१७।।**

देवद्वारी येणाऱ्यांबद्दल आदर बाळगावा. आपले थोरपण विसरून सेवा करण्यात तत्पर असावे आणि कोणत्याही कामाची विस्मृती पडू देऊ नये.

**जयंत्या पर्वें मोहोत्साव। असंभाव्य चालवीं वैभव। जें देखतां स्वर्गींचे देव। तटस्त होती ।।१८।।**

जयंत्या, पर्वे, महोत्सव हे कल्पनातीत दिमाखामध्ये चालवावे. ते वैभव पाहून स्वर्गातील देवांनासुद्धा अचंबा वाटावा!

**ऐसें वैभव चालवावें। आणी नीच दास्यत्वहि करावें। पडिले प्रसंगीं सावध असावें। सर्वकाळ ।।१९।।**

असा वैभवाचा थाट चालत असताना दिसावयास क्षुद्र अशी सेवाही करावी. (प्रसंगी उष्टीखरकटी काढण्यासारखी कामे करावी!) प्रत्येक प्रसंगात सावध राहून तो निभावून न्यावा.

**जें जें कांहीं पाहिजे। तें तें तत्काळचि देजे। अत्यंत आवडीं कीजे। सकळ सेवा ।।२०।।**

ज्या प्रसंगी जे हवे ते तत्काळ द्यावे आणि आवडीने सर्व सेवा करावी.

**चरणक्षाळणें स्नानें आच्मनें। गंधाक्षतें वसनें भूषणें। आसनें जीवनें नाना सुमनें। धूप दीप नैवेद्य ।।२१।।**

पाय धुण्यासाठी, स्नानसंध्येसाठी पाणी, गंध, अक्षता, वस्त्रे, भूषणे, आसने, नाना प्रकारची फुले, पाणी, धूप, दीप, नैवेद्य इ. सर्व साहित्य पूजासमयी द्यावे.

**शयेनाकारणें उत्तम स्थळें। जळें ठेवावीं सुसीतळें। तांबोल गायनें रसाळें। रागरंगें करावीं ।।२२।।**

देवास निजण्यासाठी उत्तम शय्या, तेथे गार व शुद्ध सुवासिक पाणी भरून ठेवावे. विडा ठेवावा आणि रागरंगाचे रसाळ गाणे करावे.

**परिमळद्रव्यें आणी फुलेलें[६]। नाना सुगंधेल तेलें। खाद्य फळें बहुसालें। सन्निधचि असावीं ।।२३।।**

सुगंधी द्रव्ये, अत्तरे, सुवासिक तेले, खाण्यासाठी मुबलक फळे देवाजवळ ठेवावी.

**सडे संमार्जनें करावीं। उदकपात्रें उदकें भरावीं। वसनें प्रक्षालून आणावीं। उत्तमोत्तमें ।।२४।।**

सडा संमार्जन करून (स्वच्छता व पावित्र्य ठेवावे) पाण्याची भांडी भरून ठेवावी. मौल्यवान

५) वस्तांची-वस्तूंची ६) फुलेले-अत्तरे

वस्त्रे अगदी स्वच्छ धुवून ठेवावी. (मलीन वस्त्रे नसावीत. ही अगदी बारीक सूचनासुद्धा सूक्ष्म अवलोकनावरून दिलेली दिसते.)

**सकळांचें करावें पारपत्य[७]। आलयाचें करावें आतित्य[८]। ऐसी हे जाणावी सत्य। सातवी भक्ती ।।२५।।**

जे लोक दर्शनाला येतील त्यांचा परामर्श घेऊन सत्कार करावा. (पारिपत्य याचा हा अर्थ येथे आहे) आल्या-गेल्याचा पाहुणचार करावा. अशी ही खरीखुरी सातवी भक्ती आहे.

**वचनें बोलावीं करुणेचीं। नाना प्रकारें स्तुतीचीं। अंतरें निवतीं सकळांची। ऐसें वदावें ।।२६।।**

सर्वांची अंत:करणे समाधान पावतील अशी करुणेची व स्तुतीची भाषा सेवकाने मंदिरात बोलावी.

**ऐसी हे सातवी भक्ती। निरोपिली येथामती। प्रत्यक्ष न घडे तरी चित्तीं। मानसपूजा करावी ।।२७।।**

अशी ही सातवी दास्यभक्ती यथामति सांगितली आहे. ही भक्ती प्रत्यक्षपणे जर करणे शक्य नसेल तर मानसपूजा तरी करावी.

**ऐसें दास्य करावें देवाचें। येणें चि प्रकारें सद्गुरुचें। प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें। करित जावें ।।२८।।**

याप्रमाणे देवाची दास्यभक्तीने सेवा करावी व तशीच सद्गुरुची करावी. ती सेवा प्रत्यक्षात घडण्याचा योग नसेल तर मानसपूजेत तरी करावी.

(या समासामध्ये सांगितलेली दास्यभक्ती मंदिरामध्ये दर्शनार्थींना दिसून आली तर त्यांच्या चित्तातही सद्भक्ती भावना उत्पन्न होते. सध्याच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे मंदिराचे व्यवस्थापन शास्त्रच येथे श्रीसमर्थांनी प्रगट केले आहे. भक्तांकरिता चरणक्षाळणासाठी पाणी ठेवण्यापासून, देवदर्शन घेऊन परत येईपर्यंत त्याला मंदिरात काय आढळून यावे याचे मोठे सुंदर व तपशीलवार वर्णन येथे पाहून घ्यावे. मानसपूजा करूनही दास्यभक्ती होऊ शकते.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दास्यभक्तिनिरूपणनाम समास सप्तम।।७।।**

## द. ४-८ : सख्यभक्ति

दास्यामध्ये भक्त आपले सर्वस्व भगवंताला देतो, हातचे काहीही राखून ठेवीत नाही. त्यामुळे भगवंतापासून लपविलेले काही उरत नाही. आपले गुणदोष भगवंताला जसेच्या तसे विदित होतात. दोघांमध्ये कसलाही आडपडदा राहात नाही. सेवा केल्याविना खाणेपिणे न रुचणे, सेवा झाली नाही तर चित्त व्याकूळ होणे ही दास्यभक्तीची परम सीमा आहे. भगवंताची किंवा सद्गुरूची कीर्ति वाढवावी म्हणून खरा भक्त अहोरात्र खटपट करतो. असे दास्य करता करता

७) पारपत्य-आदरसत्कार ८) आतित्य-पाहुणचार.

भगवंताशी भक्ताचा अतिपरिचय होतो. पण त्यामधून भगवंताची अवज्ञा निर्माण होण्याऐवजी भक्तच अधिक लीन, निष्काम आणि प्रेममय बनतो. ज्ञानदृष्टीने जीवात्मा व शिवात्मा अथवा ईश्वर सखे आहेत. मुंडक उपनिषदामध्ये एक मंत्र आहे तो असा - ''द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजातें'' अर्थ - ''या शरीररूपी वृक्षावर दोन सुरेख पक्षी राहतात. दोघे सदा एकत्र राहतात. दोघे एकमेकांचे सखे आहेत.'' भगवंत सर्व जीवांचा मित्र आहे. म्हणून दास्याचा विकास झाल्यावर दास आपले दासपण विसरत नाही. पण भगवंत आपले स्वामीपण विसरतो आणि दासाला मित्रत्वाने पाहतो. भक्ताचे भगवंतावरील प्रेम दास्यप्रधान तर भगवंताचे भक्तावरील प्रेम सख्यप्रधान असते. दासाला न संकोच न भीती उरते. तर भगवंताला न परकेपण न मोठेपण उरते. भगवंताचे निरंतर नामस्मरण, चिंतन, पादसेवन, अर्चन, वंदन आणि सेवन करीत राहिल्याने भक्ताचे मन भगवंताला सोडून अन्यत्र जाण्यास असमर्थ होते. दोघेजण वेगळे होत नाहीत, वेगळे होऊ शकत नाहीत. ज्या दासाने भगवंताच्या मोहपाशामध्ये स्वतःला गुंतवून घेतले, जन्मभर त्याचे अनुसंधान ठेवले, त्याच्या सेवेत जीवन वेचले, त्या भगवंताचे गुण, स्वभाव व विभूती भक्तामध्ये उतरतात. त्याच्या शरीराची आकृति, त्याचा रंग भगवंतासारखा बनतो. ही भक्तीची अवस्था फार मधुर असते. कारण भक्ताचा प्रेमाने पवित्र केलेला आपलेपणा आणि भगवंताचा मंगलमय मित्रपणा यांचा मधुर संगम सख्यभक्तीमध्ये घडून येतो. भक्तांना ही भक्ति फार आवडते. म्हणूनच नवविधा भक्तीवरील सगळ्या समासांत हा समास भक्तीच्या अनेक गुह्य सिद्धांतांनी नुसता खच्चून भरला आहे. दास्यामध्ये थोडेतरी शास्त्राचे, व्यवहाराचे, समाजाचे बंधन असते. सख्यामध्ये ते राहात नाही. तेथे भगवंताची इच्छा तोच धर्म, तेच शास्त्र, तेच कर्तव्य, आणि तोच व्यवहार होतो. भगवंताच्या अखंड सान्निध्यात राहणारा भक्तसखा सर्व जीवांचा मित्र बनतो. न काम न क्रोध, न लोभ न मोह, न द्वेष न मत्सर, न योग न भोग, न त्याग न संग्रह, न सुख न दुःख अशा अवस्थेत जगाचे मंगल करीत तो जीवन जगतो. भगवंताची अनुरक्ती + देहसुखाची विरक्ती + प्राणिमात्रांबद्दल करुणावृत्ती = सख्यभक्ती असे समीकरण करणे उचित ठरेल.

## ||श्रीराम||

**मागां जालें निरूपण। सातवें भक्तीचें लक्षण। आतां ऐका सावधान। आठवी भक्ती ॥१॥**

मागे सातव्या भक्तीचे लक्षण सांगितले. आता सावधपणे आठवी (सख्यभक्ती) ऐका.

**देवासी परम सख्य करावें। प्रेम प्रीतीनें बांधावें। आठवे भक्तीचें जाणावें। लक्षण ऐसें ॥२॥**

देवाबरोबर इतके दृढ सख्य करावे की त्याला प्रेम-प्रीतीच्या (धाग्याने) बांधून टाकावे. आठव्या भक्तीचे हे लक्षण आहे.

**देवास जयाची अत्यंत प्रीती। आपण वर्तावें तेणें रीतीं। येणें करितां भगवंती। सख्य घडे नेमस्त ॥३॥**

देवाला ज्याची अत्यंत आवड आहे, असेच आपण वागावे. असे वर्तन केले असता देवाशी

निश्चितपणाने सख्य होईल.

**भक्ति भाव आणी भजन। निरूपण आणी कथाकीर्तन। प्रेमळ भक्तांचें गायन। आवडे देवा ।।४।।**

भाव, भक्ती आणि भजन, निरूपण, कथाकीर्तन आणि प्रेमळ भक्तांचे गायन हे देवाला आवडते. (स्वत:मधील आवडी निवडी बाजूस सारून ईश्वर वा सद्गुरु यांच्याशी त्यांच्या आवडीनिवडीशी अनन्य होऊन राहाणे हे चंचल आत्मनिवेदनाचे साधन आहे.)

**आपण तैसेंचि वर्तावें। आपणासि तेंच आवडावें। मनासारिखें होतां स्वभावें। सख्य घडे नेमस्त ।।५।।**

आपण (देवाची आवड ओळखून) त्याप्रमाणे वागावे. आपल्यालासुद्धा तेच आवडावे. देवाच्या मनासारखे वागले असता सख्य खात्रीने घडते. (जनव्यवहारातही हेच आढळते)

**देवाच्या सख्यत्वाकारणें। आपलें सौख्य सोडून देणें। अनन्यभावें जीवें प्राणें। शरीर तेंहि वेंचावें[१] ।।६।।**

देवाबरोबर सख्य व्हावे यासाठी (आपल्या आवडीनिवडी इ.) सर्व सुखांवर पाणी सोडावे. अन्य विषयभावना सोडून जीवित, प्राण व शरीर अनन्य निष्ठेने ईश्वरचरणी अर्पण करावे. 'मी देवासाठी आहे' ही भावना अंत:करणात असावी.

**सांडून आपली संसारवेथा। करित जावी देवाची चिंता। निरूपण कीर्तन कथा वार्ता। देवाच्याचि सांगाव्या ।।७।।**

आपली प्रापंचिक दु:खे बाजूला सारून देवाच्याच कार्याची काळजी करावी. कथा निरूपण आणि हकीगती यांचे केंद्र देव हेच असावे. (भावविश्वात देव असावा)

**देवाच्या सख्यत्वासाठीं। पडाव्या जिवलगांसी तुटी [२]। सर्व अर्पावें सेवटीं। प्राण तोहि वेचावा ।।८।।**

देवाचे सख्य साधण्यासाठी जिवलगांचा संग सोडावा, सर्व त्यालाच अर्पण करून शेवटी प्राणही अर्पण करावा.

**आपुलें आवघेंचि जावें। परी देवासीं सख्य राहावें। ऐसी प्रीती जिवें भावें। भगवंतीं लागावी ।।९।।**

आपले सर्व काही जावे पण देवाशी सख्य रहावे अशी जीवाभावाची प्रीती देवाबद्दल असावी. (श्रीसमर्थांच्या करुणाष्टकात ही भावना प्रगट झाली आहे.)

**देव म्हणिजे आपुला प्राण। प्राणासी न करावें निर्वाण। परम प्रीतीचें लक्षण। तें हें ऐसें असे ।।१०।।**

देव हाच आपला प्राण समजून त्याच्याशी अंतर पडू देऊ नये. अत्यंत प्रीतीचे लक्षण असेच असते.

**ऐसें परम सख्य धरितां। देवास लागे भक्ताची चिंता। पांडव लाखाजोहरीं [३] जळतां। विवरद्वारें काढिलें ।।११।।**

याप्रमाणे परम सख्य देवाबरोबर झाले म्हणजे भक्ताची काळजी देवाला लागते. पांडवांना लाक्षागृहातून देवाने वाचविले. (जळणाऱ्या लाक्षागृहातून भुयारी मार्गाने त्यांचे प्राण श्रीकृष्णाने वाचविले या पौराणिक कथेचा दृष्टांत दिला आहे)

१) वेंचावें-समपवि २) तुटी-वियोग ३) लाखाजोहरीं-लक्षागृहात

**देव सख्यत्वें राहे आपणांसी। तें तो वर्म आपणाचि पासी। आपण वचनें बोलावीं जैसीं। तैसीं येती पडसादें[४] ॥१२॥**

देवाने आपणाशी सख्यत्वाने वागावे याचे मर्म आपल्याच हाती आहे. आपण जसे बोलावे तसाच प्रतिध्वनी निघतो. त्याप्रमाणेच हे सुद्धा घडते.

**आपण असतां अनन्यभावें। देव तत्काळचि पावे। आपण त्रास घेतां जीवें। देवहि त्रासे ॥१३॥**

आपण देवाशी अनन्य श्रद्धा ठेवून राहिले की देवही तत्काळ प्रसन्न होतो. आपणच मनाने देवाचा कंटाळा केला तर देवही आपला कंटाळा करतो.

**श्लोक ॥ ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ॥ (भ. गी. ४/११)**

श्लोक - जे लोक मला ज्याप्रमाणे भजतात त्याचप्रकारे मी त्यांना भजतो. (किंवा त्यांच्यावर कृपा करतो)

**जैसें जयाचे भजन। तैसाचि देवहि आपण। म्हणौन हें आवघें जाण। आपणाचि पासीं ॥१४॥**

ज्या उत्कटपणे आपण देवाचे भजन करतो तसाच देवही आपणावर प्रेम करतो. म्हणून देवाची कृपा संपादन करणे, न करणे हे आपणावरच असते.

**आपुल्या मनासारिखें न घडे। तेणें गुणें निष्ठा मोडे। तरी गोष्टी आपणांकडे। सहजचि आली ॥१५॥**

आपल्या मनासारखे घडले नाही की आपली देवावरील निष्ठा मोडते. साहजिकच त्याचा दोष आपणाकडेच येतो.

**मेघ चातकावरी वोळेना। तरी चातक पालटेना। चंद्र वेळेसि उगवेना। तऱ्ही चकोर अनन्य ॥१६॥**

मेघाचे पाणी चातकाला मिळाले नाही तरीही तो मेघावर रुष्ट होत नाही. त्याची निष्ठा पालटत नाही. चकोर पक्षी केवळ चंद्रकिरणे सेवन करून राहातो. चंद्र नियमितपणे उगवला नाही तरीसुद्धा चकोराची निष्ठा चंद्रावर असते.

**ऐसें असावें सख्यत्व। विवेकें धरावें सत्व[५]। भगवंतावरील ममत्व। सांडूंचि नये ॥१७॥**

अशा प्रकारचे देवाशी सख्यत्व असावे. भगवंतावरील प्रेम विवेकाने दृढ करावे. त्याच्यावरील प्रेम थोडेसुद्धा कमी होऊ देऊ नये.

**सखा मानावा भगवंत। माता पिता गण गोत। विद्या लक्ष्मी धन वित्त। सकळ परमात्मा ॥१८॥**

भगवंताला आपला जिवाभावाचा सखा मानावा. आपले माता, पिता, आप्त, विद्या, द्रव्य, वैभव, सर्वकाही परमात्माच आहे असे मानावे.

**देवावेगळें कोणीं नाहीं। ऐसें बोलती सर्वहि। परंतु त्याची निष्ठा कांहीं। तैसीच नसे ॥१९॥**

देवाखेरीज अन्य कोणीही नाही असे सारे म्हणतात खरे पण त्यांची अंतर्गत निष्ठा तशीच नसते.

४) पडसादे-प्रतिध्वनी ५) सत्व-धैर्य

**म्हणौनि ऐसें न करावें। सख्य तरी खरेंचि करावें। अंतरीं सदृढ धरावें। परमेश्वरासी ।।२०।।**

तर आता असे करू नये. सख्य करावयाचे ते खरेच (मनापासूनचे) असावे. अंतरामध्ये भगवंताला दृढ (बळकट) धरावे.

**आपुलिया मनोगताकारणें। देवावरी क्रोधास येणें। ऐसीं नव्हेत किं लक्षणें। सख्यभक्तीचीं ।।२१।।**

आपल्या मनासारखे न घडल्याने मनोभंग झाला तरी देवावर राग धरणे ही सख्यभक्तीची लक्षणे नव्हेत.

**देवाचें जें मनोगत। तेंचि आपुलें उचित। इच्छेसाठीं भगवंत। अंतरूं नये कीं ।।२२।।**

देवाचे इच्छेने जे काही घडते ते आपल्याला उचित असेच मानावे. आपल्या वेगळ्या इच्छेप्रीत्यर्थ देवाशी अंतर पडू नये.

**देवाचे इच्छेनें वर्तावें। देव करील तें मानावें। मग सहजचि स्वभावें। कृपाळु देव ।।२३।।**

देवाच्या इच्छेनुसार वर्तन करावे, देव जे करील ते मान्य करावे, मग नैसर्गिकपणे देव आपणावर कृपा करील.

**पाहातां देवाचे कृपेसी। मातेची कृपा कायेसी। माता वधी बाळकासी। विपत्तिकाळीं ।।२४।।**

तसे पाहू गेले तर देवाच्या कृपेपुढे मातेचे प्रेम ते किती? कठीण प्रसंगी आई एखादेवेळी बालकाचा वध करते.

**देवें भक्त कोण वधिला। कधीं देखिला ना ऐकिला। शरणागतांस देव जाला। वज्रपंजरु[६] ।।२५।।**

पण देवाने आपल्या भक्ताचा वध केल्याचे कधी कोणाच्या पाहण्यात किंवा ऐकण्यात नाही. देव वज्राचा पिंजरा बनून शरणागतांचे रक्षण करतो.

**देव भक्तांचा कैवारी। देव पतितांसि तारी। देव होये साहाकारी। अनाथांचा ।।२६।।**

देव भक्तांचा कैवारी असून तो पतितांनाही तारतो. देव हा अनाथांचा सहाय्यकर्ता होतो. (पुढील ओव्यांमध्ये उदाहरणे देतात.)

**देव अनाथांचा कैपक्षी[७]। नाना संकटांपासून रक्षी। धांविन्नला अंतरसाक्षी। गजेंद्राकारणें ।।२७।।**

देव अनाथांचा कैवारी असून त्यांचे रक्षण नाना संकटातून तो करतो. गजेंद्रासाठी (त्याच्या अंतरातील भाव जाणून) ऐन वेळी धावत गेला. (पुष्कर सरोवरात गजेंद्र जलक्रीडा करीत असताना त्याचा पाय पकडून मगर त्याला पाण्यात ओढून नेऊ लागली. गजेंद्राने सुटण्याचे केलेले यत्न व्यर्थ गेले. तेव्हा त्याने देवाचा धावा करून एक कमलपुष्प सोंडेने भिरकावून श्रीविष्णूला वाहिले. विष्णूंनी तत्काळ मगरीचे मुख विदारण करून गजेंद्राची मुक्तता केली. अशी गोष्ट भागवतात आहे.)

६) वज्र पंजरू-संरक्षक ७) कैपक्षी-कैवारी

**देव कृपेचा सागरु। देव करुणेचा जळधरु। देवासि भक्तांचा विसरु। पडणार नाहीं ।।२८।।**

देव कृपासागर असून करुणेचा जणू मेघच आहे. देवाला भक्ताच्या भक्तीची विस्मृती कधीच होणार नाही.

**देव प्रीती राखों जाणें। देवासी करावें साजणें[८]। जिवलगें आवघीं पिसुणें। कामा न येती।।२९।।**

प्रेम कसे राखावे हे देवाला कळते म्हणून त्याच्याशी सख्य करावे. दुसरे जितके देहाचे जिवलग म्हणवितात ते खरोखर वैरी असून कोणीही वेळप्रसंगी कामाला येत नाहीत.

**सख्य देवाचें तुटेना। प्रीति देवाची विटेना। देव कदा पालटेना। शरणागतांसी ।।३०।।**

देवाचे सख्य मात्र कधीच तुटत नाही. देवावर केलेल्या प्रेमाचा रंग कधी विटत नाही. (जिव्हाळा कायम राहातो.) शरणागत जे एकनिष्ठ असतील त्यांच्याशी तो पालटत नाही.

**म्हणौनि सख्य देवासी करावें। हितगुज तयासी सांगावें। आठवे भक्तीचें जाणावें। लक्षण ऐसें ।।३१।।**

म्हणून सख्य करावयाचे ते देवाशीच करावे. त्याला आपले मनोगत सांगावे. आठव्या सख्य भक्तीचे लक्षण हे असे आहे.

**जैसा देव तैसा गुरु। शास्त्रीं बोलिला हा विचारु। म्हणौनि सख्यत्वाचा प्रकारु। सद्‌गुरूसीं असावा ।।३२।।**

शास्त्रामध्ये असे सांगितले आहे की जसे देवाला तसेच सद्‌गुरुला मानावे म्हणून सख्याचा जो प्रकार (या समासात) वर्णन केला तसा गुरुबद्दलही असावा. सद्‌गुरूंशी अनन्यनिष्ठेने सख्य करावे.

(या समासामध्ये सख्यभक्तीचे अमृतमाधुर्य श्रीसमर्थांच्या शब्दातून आपणास समजते. त्याची गोडी चाखण्यासाठी हा समास मुखोद्‌गत व्हावा. पूर्वी शालेय पाठ्यपुस्तकातसुद्धा याचा काही भाग घातला गेला होता. सर्वमान्य होणारे सद्‌विचार या समासात आहेत)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादेसख्यभक्तिनिरूपणनाम समास अष्टम।।८।।**

## द. ४-९ : आत्मनिवेदनभक्ति

आतापर्यंत भक्तीच्या आठ प्रकारांचे वर्णन झाले. भक्तीचा नववा प्रकार आत्मनिवेदन होय. या भक्तीचे वर्णन करतांना श्रीसमर्थांनी ज्ञानीभक्ताची भूमिका घेतली आहे. अद्वैत न सोडता भक्ती कशी करावी हे साधनचातुर्य या समासावरून शिकता येईल. वास्तविक भक्ति आणि ज्ञान यांची फारकत करता येत नाही. भगवंताच्या सामर्थ्याची, सौंदर्याची, महिम्याची किंमत कळली म्हणजे त्या कळण्यातून किंवा ज्ञानातून भगवंताबद्दल जी श्रद्धा, भावना आणि मदीयता, आपलेपणा निर्माण होतात त्यांच्या पोटी भक्ति उदय पावते. म्हणून ज्ञानामध्ये भक्तीचा जन्म

८) सांजणें-मैत्री.

होतो. त्याचप्रमाणे भगवंताच्या दिव्य, मंगल, मधुर मूर्तीचे, लीलांचे, कथांचे आणि नामाचे श्रवण, कीर्तन, स्मरण करीत गेल्याने मन तदाकार होऊन भगवंताच्या अंतरंगात शिरते. ज्या मानाने मनाच्या तदाकारतेची खोली वाढते त्या मानाने भगवंताचे अधिक ज्ञान होते. म्हणून भक्ति ही ज्ञानाची जननी आहे. भगवंत परमानंदरूप आहे, रसस्वरूप आहे. त्याच्या चिंतनात मग्न होऊन भक्त स्वतःला संपूर्णपणे विसरतो. त्यावेळी तो आनंदसमुद्रात बुचकळी मारतो म्हणून स्वानंदानुभव हे भक्तीचे चरम फल आहे. भगवंत शाश्वत आहे, सत्तारूप आहे, सूक्ष्माहून अति सूक्ष्म आहे. त्याच्या शोधाला लागल्यावर विवेकाच्या जोराने अशाश्वत स्थूल दृश्य मनातून बाजूला सरते. वैराग्याचा उदय होऊन देहबुद्धी हरवते आणि आत्मबुद्धी उदय पावते. मी तोच आहे हा विलक्षण साक्षात्कार होऊन ज्ञानी आनंदसागरात बुडून जातो. म्हणून स्वानंदानुभव हेच ज्ञानाचे पण चरम फल आहे. ज्ञानात काय किंवा भक्तीत काय, अविद्या संपूर्ण नाश पावते. फरक इतकाच की ज्ञानमार्गामध्ये परमात्मा सत्तारूपाने सारखा स्फुरतो तर भक्तिमार्गामध्यें तो आनंदरूपाने सारखा स्फुरतो. दोघांच्या ब्रह्मसाक्षात्कारात यत्किंचित फरक नाही. एकाचा भर वीतरागप्रधान शांतरसावर तर दुसऱ्याचा भर अनुरागप्रधान सख्यरसावर असतो. ज्ञानमार्गामध्ये स्वस्वरूपाच्या निरुपम अनंतपणाचे सानंदाश्चर्य वाटते तर भक्तिमार्गामध्ये त्याच स्वरूपाच्या असीम सौंदर्याचे मनोहर आकर्षण वाटते. दृश्यावर वाया जाणारे प्रेम ज्ञानाने भगवंताकडे वळते व त्याचे रूपांतर होऊन भक्ती उदय पावते. भक्तीने अभिमान क्षीण पावून भगवंताशी तादात्म्य साधते. आणि त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणून ज्ञानाची झपाट्याने वाढ होते. अखेर दोन्ही एकमेकांत मिसळून भक्त ज्ञानी होतो व ज्ञानी भक्त बनतो. मग मुक्ति निराळी राहिली कोठे! ज्ञान आणि मुक्ति भक्तीच्या मागे मागे जातात असा संतांचा अनुभव आहे. ज्ञानामध्ये आणि भक्तिमध्यें त्याग सारखाच, वैराग्य सारखेच, तन्मयता सारखीच, आणि ताजेपणा व नवीनपणा सर्व सारखाच असतो. पण एक फरक असा की अज्ञान नाहीसे होऊन ज्ञान झाले की तेही पुढे नाहीसे होते. भक्तीच्या बाबतीत तसे घडत नाही. भगवंताच्या उपासनेने भक्ताला वैराग्य साधते आणि त्यांतून त्याला ब्रह्मज्ञान प्राप्त होते. तरी पण त्याची भक्ति संपत नाही, थांबत नाही. अद्वैतभक्ति म्हणतात ती हीच होय. श्रीसमर्थांसारखे मुक्त महामानव परमानंदमय रससागरामध्ये केवळ स्वानंदासाठी डुंबत राहतात.

**प्रास्ताविक** : अध्यात्मातील खोल सिद्धान्त सांगणारा हा समास आहे. यातील ओव्यांचा भावार्थ अधिक चांगला समजावा म्हणून द. १७ समास ८ व ९ हे संदर्भासाठी वाचावे. पिंड ब्रह्मांड तत्त्वांचा संदर्भ त्यातून आपणास व्यक्त होईल. यास्तव ही सूचना.

## ।।श्रीराम।।

**मागां जालें निरूपण। आठवें भक्तीचें लक्षण। आतां ऐका सावधान। भक्ति नवमी ।।१।।**

मागे आठव्या भक्तीचे निरुपण झाले. आता नववी भक्ती 'आत्मनिवेदन' सावधपणाने ऐका.

**नवमी निवेदन जाणावें। आत्मनिवेदन करावें। तेंहि सांगिजेल स्वभावें। प्रांजळ करूनि ।।२।।**

**ऐका निवेदनाचें लक्षण। देवासि वाहावें [१] आपण। करावें तत्त्वविवरण। म्हणिजे कळे ।।३।।**

निवेदनाला नववी भक्ती म्हणतात. आपण देवाला अर्पण कसे व्हावे हे स्पष्ट करून सांगतो. सामान्यपणे निवेदन याचा अर्थ कथन असा केला जातो. पण येथे त्याचा अर्थ 'समर्पण करणे' असा आहे. समर्पण केलेली वस्तू आपण एकदा देऊन टाकली की तिच्यावरील हक्क किंवा आसक्ती तर सोडतोच पण पुढे त्या वस्तूबद्दलचा विचारसुद्धा चित्तात आणत नाही. या समासात 'आत्मनिवेदन' करावयाचे म्हणजे आपला 'मी' कोणत्या तत्त्वांचा बनलेला आहे. ते नीट जाणून घेऊन त्याचे समर्पण करावयाचा खोल विचार आहे.

**मी भक्त ऐसें म्हणावें। आणी विभक्तपणेंचि[२] भजावें। हें आवघेंचि जाणावें। विलक्षण ।।४।।**

स्वत:बद्दल 'मी भक्त' असे म्हणावयाचे वेगळेपणे राहावयाचे हे सारेच विलक्षण ठरते. भक्ताला विभक्तपणे राहाणे कसे शक्य आहे?

**लक्षण असोन विलक्षण। ज्ञान असोन अज्ञान। भक्त असोन विभक्तपण। तें हें ऐसें ।।५।।**

भक्ताच्या ठिकाणी भक्ताचे लक्षण असूनही तो देवापासून विभक्त राहात असेल तर ते लक्षण, विलक्षणच नव्हे का? जसे ज्ञान असताना अज्ञान कसे असेल, तसे भक्त म्हणविणारा विभक्त कसा असेल?

**भक्त म्हणिजे विभक्त नव्हें। आणी विभक्त म्हणिजे भक्त नव्हे। विचारेंविण कांहींच नव्हे। समाधान ।।६।।**

भक्त म्हणजे वेगळे अस्तित्व असणारा असा विभक्त नव्हे. जो अशा प्रकारे एकात्मता नसल्याने विभक्त राहातो तो भक्तच होऊ शकत नाही; याबद्दल पूर्ण, यथायोग्य विचार केल्याविना कोणतेही समाधान प्राप्त होणार नाही.

**तस्मात् विचार करावा। देव कोण तो वोळखावा। आपला आपण शोध घ्यावा। अंतर्यामीं ।।७।।**

म्हणून अंतर्यामी विचार करून देव कोणता ते ओळखावे आणि आपणही कोण आहोत याचा शोधच घेतला पाहिजे.

**मी कोण ऐसा निवाडा[३]। पाहों जातां तत्वझाडा। विचार करितां उघडा। आपण नाहीं ।।८।।**

मी कोण याचे उत्तर शोधू लागताना पिंडब्रह्मांडीच्या मूलभूत तत्त्वांचे विवरण व पृथक्करण करावे लागते. ती सारी तत्त्वे त्या त्या मूळतत्त्वांमध्ये विसर्जित झाली म्हणजे 'मी' म्हणून ज्याला आपला मानतो तो त्या तत्त्वांमध्ये नाही असे आढळते. माणूस हा शरीर + मन + आत्मा या ज्या घटकांचा असतो त्यातील शरीर व मन ही पंचमहाभूतिकांच्या काल्यातून बनतात. ती नश्वर आहेत; आत्मा हा खरा मी असून तोच शाश्वत आहे. (द. १३-३ मध्ये दिल्याप्रमाणे) विश्वाची उभारणी होताना आकाशापासून वायू झाला. वायूतून तेज, तेजातून आपाची निर्मिती

१) वाहावें-समर्पण करावे २) विभक्तपणेचि- भिन्नपणाने, द्वैतपणाने ३) निवाडा-शोध

झाली आणि आपापासून पृथ्वी झाली. (आणि पृथ्वीवर चत्वार खाणी, वाणी निर्माण झाल्या. त्यामध्येच मानवी पंचभूतिक देहाची निर्मिती झाली) लयाला जाताना पंचभूतिक तत्त्वे, जग, उलट क्रमाने नाहीशी होतात. संहारणी या समासामध्ये सांगितल्याप्रमाणे पृथ्वी आपात लय पावते. आप तेजात, तेज वायूत व वायू आकाशात विरतो. मानवी देह आणि मन बनविणारी स्थूल पंचमहाभूते त्यांच्या सूक्ष्म रुपात व शेवटी मूळ प्रकृतीत मिसळून जातात. मानवी देहामध्ये 'मी' असे आपण समजतो तो देखील नाहिसा होतो. खरा 'मी' म्हणजे आत्मतत्त्व ते मात्र शरीर व मन यांच्याप्रमाणे विकारी, नाशवंत नसून तेच शाश्वत आहे. 'मी कोण' या प्रश्नाचे उत्तर शोधू लागता (वरीलप्रमाणे) तत्त्वाची छाननी करताना ज्याला आपण 'मी' म्हणून समजत होतो. तो खरा नाही हे उघडपणे समजते.

**तत्वें तत्व जेव्हां सरे[४]। तेव्हां आपण कैंचा उरे। आत्मनिवेदन येणें प्रकारें। सहजचि जालें ।।९।।**

एका तत्त्वाने दुसऱ्या तत्त्वाचा निरास होतो आणि अशा प्रकारे आपण (देह व मनाने) त्यांच्यात सम्मिलीत होतो, वेगळे उरु शकत नाही आणि देहबुद्धीचे विसर्जन होते व आत्मनिवेदन सहजच घडते.

**तत्वरूप सकळ भासे। विवेक पाहतां निरसे। प्रकृतिनिरासें आत्मा असे। आपण कैंचा ।।१०।।**

सर्व प्रकृती तत्त्वरूप भासते. विवेक (आत्मानात्मविचार) केला असता ती नाहिशी होते किंवा बाधित होते आणि आत्मा मात्र तेवढा उरतो. मी म्हणावयास आपण तेथे कोठे राहातो?

**येक मुख्य परमेश्वरु। दुसरी प्रकृति जगदाकारु। तिसरा आपण कैंचा चोरु। आणिला मधें ।।११।।**

एक मुख्य परमेश्वर असून दुसरी (दृश्यविश्वरूप) प्रकृती असते असे असता 'आपण' किंवा 'मी' हा तिसरा चोर मध्ये कोठे उपटला?

**ऐसें हें सिद्धचि असतां। नाथिली [५] लागे देहअहंता। परंतु विचारें पाहों जातां। कांहींच नसे ।।१२।।**

असे हे सिद्धच झाले असता जी स्वतः मिथ्या आहे अशी देहअहंता आपल्या पाठीमागे लागते पण आत्मानात्मविचाराने पाहिले असता 'आपण' म्हणून काही नाहीच आहे!

**पाहतां तत्त्वविवंचना। पिंडब्रह्मांडतत्वरचना। विश्वाकारें वेक्ती, नाना-। तत्वें विस्तारलीं ।।१३।।**

तत्त्वांचा विचार व दृश्य विश्वातील रचना यांचा मूलभूत शोध घेता विश्वामध्ये असलेल्या अनेक व्यक्ती हा तत्त्वांचाच विस्तार आहे.

**तत्वें साक्षत्वें[६] वोसरतीं। साक्षत्व नुरे आत्मप्रचिती। आत्मा असे आदिअंतीं। आपण कैंचा ।।१४।।**

एखाद्या प्रसंगाचा साक्षीदार जसा प्रसंगात गुरफटलेला नसतो तो केवळ साक्षी असतो.

---

४) तत्वें तत्व जेव्हा सरे।- संहारणीच्या व्यतिरेक मार्गाने जे तत्त्व ज्यातून निर्माण झालें त्यात त्याचा विवेकाने लय करीत प्रकृतीचा निरास होतो (विवेकप्रलय) ५) नाथिली-लटकी (६) ओवी १४ (प्रथम चरण)-द्रष्टेपणाने तत्वाचे आकलन आपल्याला होते त्या योगे द्रष्टेपणाच विलीन होतो.

आपण अशाच भावनेने जगाकडे पाहिले असता तत्त्वांचा निरास होतो आणि आपलेही साक्षित्व (किंवा निराळेपणा) नाहिसे होते आदि अंती एक आत्माच आहे. आपण व त्यातील 'मी' कोठला आला? अशा प्रकारे दृश्य सृष्टीचे विवेकाने निरसन झाले की आत्मस्वरूपच तेवढे शिल्लक असल्याची जाणीव येते.

**आत्मा एक स्वानंदघन। आणी अहमात्मा हें वचन। तरी मग आपण कैंचाभिन्न। उरला तेथें ।।१५।।**

आनंदस्वरुप असा आत्मा सर्वत्र भरून राहिला आहे आणि श्रुतिवचन ''अहं आत्मा'' असेच सांगते तर मग आपण भिन्नपणाने तेथे कसे राहू शकतो. देहाभिमान धरणाऱ्या 'अहम्'चे विसर्जन अशा रीतीने होते.

**सोहं हंसा हें उत्तर। याचें पाहावें अर्थांतर। पाहतां आत्मयाचा विचार। आपण कैंचा तेथें ।।१६।।**

मी कोण? (कोऽहम्) याचे उत्तर (सोऽहं) 'तो मी' (हं सा) मीच तो असे आहे ह्याचा अर्थ लक्षात घ्यावा. आत्म्यासंबंधात विचार करताना मी अन्य कोणी वेगळा नाही. मी आत्माच आहे हा विचार झाला की निराळेपणाने आपण उरतोच कोठे?

**आत्मा निर्गुण निरंजन। तयासी असावें अनन्य। अनन्य म्हणिजे नाहीं अन्य। आपण कैंचा तेथें ।।१७।।**

आत्मा मायारहित व निर्गुण आहे त्याच्याशी तद्रुप व्हावे. त्याच्याशी अनन्य झाल्यावर आपण शिल्लकच कोठे राहाणार? (निर्गुणीं अनन्य होता आपण। मुक्त जाला।। ६-३-३३)

**आत्मा म्हणिजे तो अद्वैत। जेथें नाहीं द्वैताद्वैत। तेथें मीपणाचा हेत। उरेल कैंचा ।।१८।।**

आत्मा म्हणजे शुद्ध अद्वैत त्याच्या ठिकाणी द्वैत आणि अद्वैत दोन्ही नाहीत तेथे 'मी'पणाचा हेतू कसा राहील? आत्मा म्हणजे एकेमेव, अद्वितीय असे ब्रह्मस्वरूपच असल्याने तेथे दुसऱ्या कशाच्याच अस्तित्वाचा अभाव असतो. अद्वैत हा शब्दसुद्धा तेथे स्पर्श करू शकत नाही. हे विश्व मायेच्या साम्राज्यात असते म्हणून द्वैत किंवा अद्वैत ही भाषा सार्थ ठरते. मी आणि तू यात वेगळेपण मायेच्या राज्यात असते. म्हणून द्वैत किंवा अद्वैत या शब्दांना येथे अर्थ आहे.

**आत्मा पूर्णत्वें परिपूर्ण। जेथें नाहीं गुणागुण। निखळ निर्गुणी आपण। कोण कैंचा ।।१९।।**

आत्म्याचे व्यापकत्व सर्वत्र आहे. त्याच्या ठिकाणी गुणत्व नाही तसे निर्गुणत्वही नाही. (द्वैतामधील ही भाषा आत्मतत्त्वाबद्दल विचार करताना अर्थशून्य होते) अशा शुद्ध किंवा निखळ निर्गुणाच्या ठिकाणी 'आपण' कोण व कोठले?

**त्वंपद[७] तत्पद असिपद। निरसुनि सकळ भेदाभेद। वस्तु ठाईंची अभेद। आपण कैंचा ।।२०।।**

'तत् त्वम् असि' या महावाक्यामध्ये तीन पदे आहेत. तत् = ते, त्वम् = तू, असि = आहेस. ते परब्रह्म तू आहेस. या तीनही पदातील भेदाचे निरसन करून आत्मस्वरूपापर्यंत पोहोचल्यावर

७) ओवी २० - ''तत्त्वमसि'' या महावाक्यातील त्वंपद ''तू'' पण (मीपणा) व तत्पद-परब्रह्माचा ''ते'' पणा असिपदाने म्हणजे जाणिवेतील केवळ अस्तित्वाने निरसन झाल्यावर ''आपण'' म्हणून कोण वेगळा उरणार?

भेद किंवा अभेद लटके पडतात. जेव्हा संतांना आत्मसाक्षात्कार होतो तेव्हा 'मी'पणाची द्वैताची भावनाच तेथे लय पावते. 'आपण' तेथे कसा उरेल!

**निरसितां जीवशिवउपाधी। जीवशिवचि कैंचे आधी। स्वरूपीं होतां दृढबुद्धि। आपण कैंचा ।।२१।।**

जीव व शिव ही उपाधी भेददर्शकच आहे. बुद्धीने स्वस्वरुपात लीन झाल्यावर 'आपण' कोठचा उरेल?

**आपण मिथ्या साच देव। देव भक्त अनन्यभाव। या वचनाचा अभिप्राव। अनुभवी जाणती ।।२२।।**

'आपण' मिथ्या असून देव खरा आहे आणि देव आणि भक्त हे एकच आहेत. या वचनाचे रहस्य अनुभूती घेतली असेल त्यांनाच कळेल. स्वरुपाची अनुभूती आल्यावर ज्ञानाचे रुपान्तर विज्ञानात होते हे सत्य अनुभवी असतील त्यांनाच कळेल.

**या नांव आत्मनिवेदन। ज्ञानियांचें समाधान। नवमे भक्तीचें लक्षण। निरापिलें ।।२३।।**

याचे नाव 'आत्मनिवेदन' असे असून तेच ज्ञानी लोकांचे समाधान, याच भक्तीमध्ये घडते. असे हे नवव्या भक्तीचे लक्षण आहे.

**पंचभूतांमध्यें आकाश। सकळ देवांमध्यें जगदीश। नवविधा भक्तीमध्यें विशेष। भक्ति नवमी ।।२४।।**

पंचभूतांमध्ये मुख्य आकाश किंवा देवांमध्ये परमेश्वर मुख्य आहे त्याप्रमाणे नवविधाभक्तीमध्ये आत्मनिवेदन भक्ती श्रेष्ठ आहे.

**नवमी भक्ती आत्मनिवेदन। न होतां न चुके जन्ममरण। हें वचन सत्य, प्रमाण-। अन्यथा[८] नव्हे ।।२५।।**

आत्मनिवेदन हा भक्तीचा नववा प्रकार आहे. हिचे आचरण न केल्यास जन्ममरण चुकणार नाही. हे वचन सत्य व अनुभवाचे असून ते खोटे ठरणार नाही.

**ऐसी हे नवविधा भक्ती। केल्यां पाविजे सायोज्यमुक्ती[९]। सायोज्यमुक्तीस कल्पांतीं। चळण नाहीं ।।२६।।**

अशी ही नवविधाभक्ती असून तिच्यामुळे सायुज्यमुक्ती प्राप्त होते. सारे विश्व कल्पान्तकाळी लयाला जाते. पण या मुक्तीला धक्का लागत नाही. ती कायम राहाते.

**तिहीं मुक्तींस आहे चळण। सायोज्यमुक्ती अचळ जाण। तैलोक्यास होतां निर्वाण[१०]। सायोज्यमुक्ती चळेना ।।२७।।**

(द. १-१-२९ मध्ये 'सायोज्यमुक्तीचे वर्म। ठाई पडे।।' असे म्हटले आहे. त्याबद्दल अधिक माहिती येथे आहे) मुक्तीचे चार प्रकार आहेत. त्यातील पहिल्या तीन मुक्ती अशाश्वत किंवा चंचल आहेत. पण त्रैलोक्याचा अंत झाला तरी चौथी सायुज्यमुक्ती मात्र अविनाशी आहे.

**आवघीया चत्वार मुक्ती। वेदशास्त्रें बोलती। तयांमध्यें तीन नासती। चौथी ते अविनाश ।।२८।।**

वेदशास्त्रामध्ये एकूण चार मुक्ती सांगितल्या आहेत. त्यात तीन विनाशी व चौथी शाश्वत आहे.

**पहिली मुक्ती ते स्वलोकता। दुसरी ते समीपता। तिसरी ते स्वरूपता। चौथी सायोज्यमुक्ती ।।२९।।**

८) अन्यथा-खोटे ९) सायुज्यता-तद्रूपता १०) निर्वाण-नाश.

पहिल्या मुक्तीचे नाव सलोकता, दुसरीचे समीपता तिसरीचे स्वरुपता आणि चौथीचे सायुज्यता अशी नावे आहेत.

**ऐसिया चत्वार मुक्ती। भगवद्भजनें प्राणी पावती। हेंचि निरूपण प्रांजळ श्रोतीं। सावध पुढे परिसावें ।।३०।।**

भगवद्भजन केल्यामुळे स्पष्ट योग्यतेनुसार या चत्वार मुक्ती प्राणी मिळवितात. तेच निरुपण पुढे स्पष्ट सांगितले आहे. श्रोत्यांनी तत्परतेने ते ऐकावे.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिवेदनभक्तिनाम समास नवम।।९।।**

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका ७

**(द. ४-७ दास्यभक्ती, ४-८ सख्यभक्ती, ४-९ आत्मनिवेदनभक्ति वर आधारित)**

प्र. १ ''दास्यभक्ती'' आणि ''सख्यभक्ती'' यांच्या व्याख्या ज्या ओव्यांमध्ये आल्या आहेत त्या ओव्या लिहा.

प्र. २ ''नाना रचना जीर्ण जर्जर। त्याचें करावें जीर्णोद्धार।।'' या ओवीच्या स्पष्टीकरणार्थ द. ४-७ मध्ये कोणता तपशील सांगितला आहे?

प्र. ३ ''सख्यभक्ती'' संबंधातील खालील ओव्यांचा अर्थ सांगा.

(१) ४-८-४ (२) ४-८-१२ (३) ४-८-३०

प्र. ४ खालील कल्पना ज्यात आहेत त्या ओव्या लिहा.

१) देवापासून जो विभक्त नसतो तोच भक्त.

२) आत्मनिवेदन ही सर्वात श्रेष्ठ भक्ती होय.

प्र. ५ अ) मुक्तीचे चार प्रकार अध्यात्मशास्त्रात वर्णन केले आहेत. त्यांच्या संबंधात ४-९-२६ ते २९ पर्यंत कोणती माहिती दिली आहे?

ब) नवविधाभक्ती म्हणजे काय? त्यातील भक्तीचा कोणता प्रकार आपणास सुलभ वाटतो? एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात आपला प्रवेश होऊ शकतो का?

# दासबोध प्रबोध : स्वाध्याय ८ वा

## (द. १-९,१३-७, १९-७)

या आठव्या अध्यायामध्ये तीन समासांचा अभ्यास आपणास करावयाचा आहे. यापैकी एक आहे परमार्थस्तवनाचा, दुसरा प्रत्यय विवरण व तिसरा यत्ननिरूपणाचा.

समर्थ वाङ्मयाचे विवेक, वैराग्य, प्रयत्न, प्रत्यय व प्रबोध हे पंचप्राण आहेत. परमार्थ प्राप्तीनेच नरदेहाचे सार्थक होते हा सर्व संतांप्रमाणेच समर्थांचाही दृढ विश्वास आहे. परमार्थप्राप्तीचे ध्येय समर्थांनी सतत दृष्टीपुढे ठेवले आहे. परमार्थी हा जगाचा सम्राट आहे व 'परमार्थ नाही तो भिकारी' असे त्यांनी म्हटले आहे. भक्तीच्या योगाने ईश्वर लाभ होतो हाच दासबोधाचा अभिप्राय आहे हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. यासाठी वैराग्य, विवेक व प्रत्यय याची नितान्त आवश्यकता आहे.

समर्थांचे वेगळेपण हे आहे की, विवेकाला व्यवहाराच्या पातळीपासून प्रारंभ करून ते अध्यात्माच्या सर्वोच्च पातळीपर्यंत अलगदपणे घेऊन जातात. तीच गोष्ट प्रयत्न व प्रत्ययाची आहे. साध्या व्यवहारातही चांगल्या शब्दांनी अनेकांना संतुष्ट करून एक क्षण वाया न घालवता सतत उद्योग करावा. अचूक यत्न केल्याने व अनेकांची अंतरे राखल्याने भाग्य लाभते असा त्यांचा उपदेश आहे. यत्नाला देवपणाची प्रतिष्ठा देणारा व आळस, दुश्चितपणा यांना उभा आडवा छेद देणारा हा महानुभाव संत सर्वांचे गुरुस्थान भूषवील यात नवल नाही.

प्रत्ययावरही समर्थांचा विलक्षण भर आहे. प्रयत्नावाचून काही लिहायचे नाही अशी त्यांची प्रतिज्ञाच आहे. प्रत्यय आल्यावाचून, संदेह नाहीसा झाल्यावाचून आत्मज्ञान नाही असा त्यांचा सिद्धांत आहे. प्रत्ययावाचून शब्दज्ञान म्हणजे श्वानाच्या वमनाप्रमाणेच आहे असे ते म्हणतात. आत्मज्ञान विवेकाने जाणून घ्यावे व प्रत्ययाने त्याची खूण बाणली म्हणजे जन्म-मृत्याच्या नावाने शून्य लिहिता येते असा अनुभव ग्रंथराजाच्या शेवटी समर्थांनी सांगून ठेवला आहे.

ऐसें हें विवेकें जाणावें। प्रत्ययें खुणेसी बाणावें।

जन्ममृत्याच्या नांवे। सुन्याकार।। २०-१०-२९

परमार्थासाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या विवेक, प्रयत्न व प्रत्यय यांची शिकवण दासबोधातील पानापानावर आपल्याला दिसून येईल. संतांचे ग्रंथ हे मनोरंजनासाठी; पुण्यप्राप्तीसाठी किंवा प्रवचनासाठी नसून प्रत्ययासाठी आहेत हे अभ्यासार्थींच्या अंत:करणात बिंबवण्यासाठी या समासांची योजना आहे. परमार्थ हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार आहे. इथे अनुमानाचे किंवा उधारीचे काम नाही. विश्वकर्त्या विश्वेश्वराला विवेकाने ओळखणे हाच प्रत्यय विवरणाचा विषय आहे. तसेच अरबी अश्वावर स्वार होण्यासाठी जे चापल्य व कौशल्य असावे लागते ते परमार्थ प्राप्तीच्या यत्नामध्ये असावे असा समर्थांचा संदेश आहे. यासाठी समर्थांचा संदेश समजून घेण्यासाठी

समग्र दासबोधाचाच अभ्यास आपणास करावा लागेल. इतकेच नव्हे तर इतर संतांची वचनेही आत्मसात करावी लागतील तरच यापैकी एका समासावर आपणास पाच मिनिटे व्याख्यान करता येईल किंवा १५-२० ओळी लिहिता येतील. त्यासाठी या स्वाध्यायाचा शेवटचा प्रश्न आहे. आपण मन:पूर्वक यत्न कराल तर याचा सहज प्रत्यय येईल.

असाध्य ते साध्य करिता सायास। कारण अभ्यास तुका म्हणे।।...

## द. १-९ : परमार्थस्तवन

श्रीसमर्थ अध्यात्मवादी आहेत. ते अतिशय अध्यात्मज्ञानसंपन्न होते. परमार्थ त्यांच्या जीवनाचा प्राण होता. ज्याच्यामुळे ते स्वत: धन्य झाले व त्यांनी अनेकांना धन्य केले त्या परमार्थाला या समासात ते वंदन करतात. दासबोधाला खरी सुरुवात येथे होते. ब्रह्म, ब्रह्मज्ञान आणि ब्रह्मज्ञानसाधना या तिन्हीसाठी परमार्थ हा एकच शब्द संत वापरतात. परमार्थ शब्दामध्ये परम व अर्थ अशी दोन पदे आहेत. त्यांचे अर्थ पाहिले तर परमार्थ म्हणजे काय हे सहज ध्यानात येईल. (अ) परम म्हणजे सर्वश्रेष्ठ आणि अर्थ म्हणजे ज्ञेयवस्तू. माणूस एकवेळ अन्नपाण्यावाचून जगू शकेल पण अनुभवावाचून तो क्षणभरही राहू शकत नाही. त्याच्या अनुभवात अक्षरश: अनंत ज्ञेयवस्तू शिरतात. त्या सगळ्याच एका योग्यतेच्या नसतात. त्या वस्तूंमध्ये सर्वोत्कृष्ट असणारी वस्तू शोधून काढणे हा परमार्थ होय. आत्मज्ञानी व सिद्ध पुरुषांचा असा स्पष्ट अभिप्राय आहे की ब्रह्म किंवा आत्मा सर्वश्रेष्ठ वस्तू आहे. (आ) परम म्हणजे निरतिशय आणि अर्थ म्हणजे भावार्थ. माणसाला वस्तूचे ज्ञान होते म्हणजे तिचा अर्थ कळतो. सर्व मानवी ज्ञान अर्थरूप असते. मी आणि जग याभोवती ते फिरत राहते. मोठमोठे कवी, नाटककार, कादंबरीकार आणि शास्त्रज्ञ मानवी जीवनाचा आणि दृश्य विश्वाचा अर्थ समजण्याची खटपट करतात. त्यांना त्यांचा अर्धामुर्धा अर्थ समजतो. स्वस्वरूपाचा अनुभव घेणाऱ्या ब्रह्मज्ञानी पुरुषांनाच संपूर्ण अर्थ कळतो. म्हणून संतांचे जे ज्ञान तो परमार्थ होय. (इ) परम म्हणजे अनुपम, सर्वोत्तम आणि अर्थ म्हणजे ध्येय. वस्तूला ज्या प्रमाणात अर्थ असतो त्या प्रमाणात तिला मूल्य किंवा किंमत असते. जगातील वस्तूंना संपूर्ण अर्थ नसतो. म्हणून त्यांना संपूर्ण मूल्य नसते. ब्रह्मवस्तूला संपूर्ण अर्थ असतो म्हणून ती निरतिशय मूल्यवान असते. मूल्यवान वस्तू माणसाला सहजच आवडते. ती मिळवणे त्याचे ध्येय बनते. म्हणून ब्रह्मवस्तू प्राप्त करून घेणे हेच माणसाचे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे. ते गाठण्यासाठी जी साधना करावी लागते तो परमार्थ होय. (ई) परम म्हणजे अखेरचे, अद्वितीय आणि अर्थ म्हणजे कारण, हेतू, मूळ. आपल्या अनुभवास येणारे विश्व घटनामय आहे, अनंत घटनांचा सागर आहे. घटना अनुभविली की तिचे मूळ किंवा कारण किंवा तिचा हेतू शोधल्यावाचून मानवी बुद्धीला चैनच पडत नाही. या शोधप्रवृत्तीमधून धर्म, तत्त्वज्ञान आणि विज्ञान जन्म पावतात. एक, दोन किंवा अनेक घटनांचे कारण शोधून माणूस स्वस्थ बसत नाही. तो स्वस्थ बसू शकत नाही. यच्चयावत् घटनांचे म्हणजे अखिल विश्वाचे कारण शोधण्याच्या

नादी तो लागतो. विश्वाच्या आदिकारणाला ईश्वर असे म्हणतात. परमार्थ म्हणजे ईश्वराचा शोध होय. (उ) परम म्हणजे उत्तम, मुख्य आणि अर्थ म्हणजे द्रव्य, संपत्ती किंवा फल. आपल्या गरजा तृप्त करण्यासाठी माणसाला संपत्ती हवी असते. पण गरजा कितीही भागविल्या तरी त्या संपता संपत नाहीत. म्हणून माणूस खूप खूप संपत्ती मिळविण्याच्या नादी लागतो असे अर्थशास्त्र सांगते. राजापाशी अलोट संपत्ती असते म्हणून सामान्य माणूस त्याला अत्यंत सुखी समजतो. पण या जगातील अशाश्वत संपत्तीने राजाची वासना तृप्त होत नाही, त्याचे मागणे थांबत नाही. याच्या उलट ब्रह्मरूपी शाश्वत संपत्ती कमावणारे संत अत्यंत तृप्त व समाधानी असतात. त्या समाधानापुढे त्यांना राज्याची देखील किंमत राहात नाही. ''परमार्थी तो राज्यधारी परमार्थ नाही तो भिकारी'' असा स्वानुभव श्रीसमर्थांनी अगदी ठासून सांगितला आहे. म्हणून निरतिशय समाधान किंवा आनंद भोगण्यास मिळाल्याने निस्पृहतेच्या किंवा वैराग्याच्या ऐश्वर्यात ऐटीने जीवन जगणे म्हणजे परमार्थ होय. कोणतेही ज्ञान सामर्थ्यसंपन्न असते. म्हणून भगवंताचे ज्ञान होऊन जीवनातील दु:ख नामशेष करणे हेच परमार्थाचे खरे लक्षण होय.

## ||श्रीराम||

**आतां स्तऊं हा परमार्थ। जो साधकांचा निजस्वार्थ। नांतरी समर्थामध्यें समर्थ। योग हा ।।१।।**

आता परमार्थाचे स्तवन करू. हे साधकांचे सर्वोच्च ध्येय आहे. मानवी जीवनात सर्वात श्रेष्ठ असे प्राप्तव्य साध्य करण्याचा हा योग आहे.

**आहे तरी परम सुगम। परि जनासी जाला दुर्गम। कां जयाचें चुकलें वर्म। सत्समागमाकडे[१] ।।२।।**

वास्तविक पाहाता परमार्थ सुलभ आहे. पण संतसान्निध्याचे महत्त्व न कळल्यामुळे लोकांना हा फार दुर्गम झाला आहे.

**नाना साधनाचे उधार[२]। हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार। वेदशास्त्रीं जें सार। तें अनुभवास ये ।।३।।**

इतर नाना प्रकारींची साधने आहेत. पण ती सत्वर प्राप्त होणारी नाहीत. (उधारीची आहेत) येथे मात्र तात्काळ ब्रह्मसाक्षात्कार होतो. वेदशास्त्रातील रहस्य यामुळे अनुभवाला येते.

**आहे तरी चहूंकडे। परी अणुमात्र दृष्टी न पडे। उदास परी येकीकडे। पाहातां दिसेना ।।४।।**

परब्रह्म सर्वत्र आहे पण त्याचे अल्पसे सुद्धा दर्शन होत नाही. ते ब्रह्म पहाण्यासाठी एकान्तात जाऊन पहाण्याचा यत्न केला तरी दृष्टीला पडत नाही. चर्मचक्षूला ब्रह्म अलक्ष्य आहे.

**आकाशमार्गी गुप्त पंथ। जाणती योगिये समर्थ। इतरांस हा गुह्यार्थ। सहसा न कळे ।।५।।**

परमार्थ हा आकाशतत्त्वातून जाण्याचा गुप्त मार्ग आहे. हृदयस्थ ब्रह्मतत्त्वाकडे जाण्याचा हा मार्ग श्रेष्ठ योग्यांना ठाऊक असतो. इतरांना तो पंथ सहसा गवसत नाही.

---

१) चुकले वर्म सत्समागमाकडे-सत्संगती न घडल्यामुळे २) उधार-अनिश्चित

**साराचेंहि निजसार। अखंड अक्षै अपार। नेऊं न सकती तश्कर। कांहीं केल्या ।।६।।**

परमार्थ हे सर्व ज्ञानाचे तात्पर्य, अखंड, अक्षय व अपार आहे. परमार्थ तत्त्व चोराला चोरून नेता येत नाही.

**तयास नाहीं राजभये। अथवा नाहीं अग्निभये। अथवा स्वापदभये। बोलोंच नये ।।७।।**

त्याला राजसत्ता, अग्नी किंवा श्वापदांचे भय मुळीच नाही. असल्या भयाचे नावसुद्धा काढू नये.

**परब्रह्म ते हालवेना। अथवा ठावही चुकेना। काळांतरी चळेना। जेथींचा तेथें ।।८।।**

परमार्थ तत्त्वाला त्याच्या जागेवरून उचलून नेता येत नाही किंवा ते स्वतः सरकत नाही. कितीही काळ गेला तरी ते अचळ व अढळ राहाते.

**ऐसें तें निज ठेवणें। कदापि पालटो नेणें। अथवा नव्हे आदिक उणें। बहुतां काळें ।।९।।**

असा तो आपला प्रत्येकाचा निजठेवा आहे. अनंत काळ गेला तरी तो ठेवा कमी-अधिक होऊ शकत नाही.

**अथवा तें घसवटेना[३]। अथवा अदृश्य होयेना। नातरी पाहाता दिसेनां। गुरुअंजनेंविण ।।१०।।**

किंवा ते निज-ठेवणे झिजत नाही, अदृश्यही होत नाही. पण गुरुने डोळ्यामध्ये अंजन घातल्याशिवाय दिसत नाही. (गुरुकडून ज्ञानदृष्टी मिळावी लागते)

**मागां योगिये समर्थ। त्यांचाहि निजस्वार्थ। यासी बोलिजे परमार्थ। परमगुह्य म्हणौनि ।।११।।**

पूर्वी तपःसामर्थ्याचे जे योगी होऊन गेले. त्यांचेही परमार्थप्राप्ती हेच साध्य होते. हे ध्येय परम गुह्य असल्याने त्याला परमार्थ असे म्हणतात.

**जेंहीं शोधून पाहिला। त्यासी अर्थ सांपडला। येरां असोनि अलभ्य जाला। जन्मोजन्मीं ।।१२।।**

ज्यांनी परमार्थाचा अर्थ शोधून पहाण्याचा प्रयत्न केला त्यांनाच तो परम किंवा श्रेष्ठ अर्थ सापडला. इतरांना मात्र जन्मोजन्मी तो अलभ्य आहे.

**अपूर्वता या परमार्थाची। वार्ता नाहीं जन्ममृत्याची। आणी पदवी सायोज्यतेची। सन्निधचि लाभे ।।१३।।**

या परमार्थाची थोरवी किती म्हणून सांगावी! त्याच्यामुळे जन्ममृत्यूचे नावही ऐकू येणार नाही. सायुज्यमुक्तीची पदवी आपल्यापाशीच सापडते.

**माया विवेकें मावळे। सारासार विचार कळे। परब्रह्म तेंहि निवळे। अंतर्यामीं ।।१४।।**

(आत्मानात्म) विवेकाने माया-निवारण होते. सारासार विचार कळतो आणि अंतःकरणाचे परब्रह्म प्रगट होते.

३) घसवटेंना-झिजेना

**ब्रह्म भासलें उदंड। ब्रह्मीं बुडालें ब्रह्मांड। पंचभूतांचें थोतांड। तुच्छ वाटे ।।१५।।**

ब्रह्माच्या अमर्यादपणाचे आकलन झाले असता ब्रह्मांडा (दृश्यजगता)चा लय होतो. पंचमहाभूतांचे बंड (व्याप) तुच्छ होऊन जाते.

**प्रपंच वाटे लटिका। माया वाटे लापणिका[४]। शुद्ध आत्मा विवेका । अंतरीं आला ।।१६।।**

प्रपंच खोटा वाटतो, माया मिथ्या वाटते, परमार्थाच्या विचारातून शुद्ध आत्मतत्त्व अंतःकरणात प्रगट होते.

**ब्रह्मस्थित बाणतां अंतरी। संदेह गेला ब्रह्मांडाबाहेरी। दृश्याची जुनी जर्जरी। कुहिट जाली[५] ।।१७।।**

अशी ही आत्मसाक्षात्काराची अवस्था प्राप्त झाली म्हणजे सर्व संदेह ब्रह्मांडाबाहेर निघून जातात आणि पंचमहाभूते व त्रिगुण यांची अष्टधा प्रकृतीची जीर्ण झालेली गोधडी कुजून नष्ट होते.

**ऐसा हा परमार्थ। जो करी त्याचा निजस्वार्थ। आतां या समर्थास समर्थ। किती म्हणौनि म्हणावें ।।१८।।**

जो प्रयत्न करील त्याचे स्वहित साध्य करून देणारा असा हा परमार्थ आहे अशा या समर्थ परमार्थाला किती वेळा समर्थ म्हणून त्याची थोरवी गावी?

**या परमार्थाकरितां। ब्रह्मादिकांसि विश्रामता। योगी पावती तन्मयता। परब्रह्मीं ।।१९।।**

ब्रह्मादिकांनाही परमार्थामध्ये विश्रांती लाभते आणि योगी परब्रह्मामध्ये तन्मयावस्थेत जातात.

**परमार्थ सकळांस विसांवा। सिद्ध साधु माहानुभावां। सेखीं सात्विक जड जीवां। सत्संगेंकरुनी ।।२०।।**

परमार्थ हाच सिद्ध, साधू, महात्मे या सर्वांचे विश्रांतीस्थान आहे. अज्ञानी परंतु सात्त्विक असलेल्या लोकांना सत्संगामुळे शेवटी येथेच विसावा मिळतो.

**परमार्थ जन्माचें सार्थक। परमार्थ संसारीं तारक। परमार्थ दाखवी परलोक। धार्मिकासी ।।२१।।**

परमार्थ हे जीवनाचे सार्थक आहे. तो संसारातून तारून नेतो व धार्मिकांना त्याच्यामुळेच मोक्षप्राप्ती होते.

**परमार्थ तापसांसी थार[६]। परमार्थ साधकांसी आधार। परमार्थ दाखवी पार। भवसागराचा ।।२२।।**

परमार्थ तापसी लोकांचा आधार असून साधकांचाही तोच आधार आहे. भवसागराचा पैलतीर त्याच्यामुळेच जीवांना गाठता येतो.

**परमार्थी तो राज्यधारी। परमार्थ नाहीं तो भिकारी। या परमार्थाची सरी[७]। कोणास द्यावी ।।२३।।**

परमार्थप्राप्ती झाली तो खरा राजाच होय. (कारण आता त्याला कोणाकडे काहीही मागावे लागणार नाही.) ज्याला परमार्थ साधत नाही तो भिकारीच होय. (त्याचे जीवनात अपूर्णतेमुळे

४) लापणिका - कल्पनामय ५) कुहिट जाली-विटून गेली ६) थार-आश्रयदाता ७) सरी-बरोबरीची योग्यता

भीक मागावी लागते. परिपूर्ण जीवनासाठी परमार्थ आवश्यक आहे हा भावार्थ) परमार्थाची योग्यता कशालाच नाही.

**अनंत जन्मीचें पुण्य जोडे। तरीच परमार्थ घडे। मुख्य परमात्मा आतुडे। अनुभवासी ।।२४।।**

सुकृत (अनंत जन्मीचे पुण्य) पदरी असेल तरच परमार्थ घडतो आणि मुख्य परमात्मतत्त्वाची अनुभूती लाभते.

**जेणें परमार्थ वोळखिला। तेणें जन्म सार्थक केला। येर तो पापी जन्मला। कुलक्षयाकारणें ।।२५।।**

ज्याने परमात्मप्राप्ती करून घेतली त्याचाच जन्म सार्थकी लागला आणि ज्याने परमात्मा ओळखला नाही तो पापी केवळ कुलाच्या क्षयासाठीच जन्माला आलेला असतो.

**असो भगवत्प्राप्तीविण। करी संसाराचा सीण। त्या मूर्खाचें मुखावलोकन। करूंच नये ।।२६।।**

असो भगवंताची प्राप्ती करून न घेता जो प्रापंचिक उपाधींमध्ये शीणतो त्या मूर्खाचे तोंडदेखील पाहू नये.

**भल्यानें परमार्थी भरावें। शरीर सार्थक करावें। पूर्वजांस उद्धरावें। हरिभक्ती करूनी ।।२७।।**

भल्या माणसाने परमार्थाला लागावे, देहाचे सार्थक करावे आणि हरीभक्ती करून पूर्वजांचाही उद्धार करावा. (परमार्थाने केवळ स्वत:चाच नव्हे तर पूर्वजांचाही उद्धार होतो असा त्याचा थोर महिमा आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे परमार्थस्तवननाम समास नवम।।९।।**

## द. १३-७ : प्रत्ययेविवरण

प्रथम आत्मानात्मविवेक करावा. त्यामध्ये असे प्रत्ययास येईल की, अनात्म अनेक असून आत्मा एकच आहे. अनात्म जड असल्याने आत्मा सर्व जडाला चेतना देतो. सर्व दृश्याला चेतना देणारा तो सर्वात्मा किंवा अंतरात्मा होय. येथपर्यंत सारा चंचळाचा प्रांत आहे. मग सारासार विचार करावा. त्यात सर्व चंचळाचा अर्थात् प्रकृतीचा संपूर्ण निरास होईल आणि साररूप निश्चळ ब्रह्म तेवढे शिल्लक उरेल. दोन्हीमध्ये विचार प्रधान आहे. विचार अर्थाचे वाहन आहे. विचाराने अर्थ निर्माण झाला की, अंतरात्मा त्या अर्थाने भरून जातो. अर्थ जितका सूक्ष्म आणि विशाल तितका अंतरात्मादेखील सूक्ष्म आणि विशाल बनतो. अर्थ नि:संशय असेल तर अंतरात्मा पण नि:संशय बनतो. म्हणून देवाचा शोध करावा, देवाच्या विचाराने अंतरात्मा भारून टाकावा. खरा कर्ता कोण ते विवेकाने ओळखण्यात खरे सुख आहे.

विवेक आणि प्रत्यय यांची महति या समासात व्यक्त झाली असून 'विवेकाचे फळ ते सुख।।' हा त्रिकालाबाधित सिद्धांतही यात मांडला आहे.

## ||श्रीराम||

**निर्मळ निश्चळ निराभास। तयास दृष्टांत आकाश। आकाश म्हणिजे अवकाश। पसरला पैस ।।१।।**

निर्मळ, निश्चल व निराभास असणाऱ्या ब्रह्माला आकाशाचा दृष्टांत दिला जातो. आकाश म्हणजे अवकाश किंवा पसरलेली पोकळी.

**आधीं पैस मग पदार्थ। प्रत्ययें पाहतां यथार्थ। प्रत्ययेंविण पाहतां वेर्थ। सकळ कांहीं ।।२।।**

आधी पोकळी असते मग त्यात पदार्थाचे अस्तित्व प्रगट होणे हे म्हणजे योग्य आहे. कारण त्याचा प्रत्यय येतो. प्रत्यय येत नसेल ते व्यर्थ होय.

**ब्रह्म म्हणिजे तें निश्चळ। आत्मा म्हणिजे तो चंचळ। तयास दृष्टांत केवळ। वायो जाणावा ।।३।।**

ब्रह्म हे (आकाशाप्रमाणे) निश्चल आणि अंतरात्मा हा चंचल आहे. यात आत्म्याला वायूचा दृष्टान्त आहे. आकाशात वायू तसा ब्रह्मामध्ये अंतरात्मा आहे. (या समासामध्ये आत्मा हा शब्द अंतरात्मा या संदर्भामध्ये आहे. १२ व १३ व्या ओव्यात 'अंतरात्मा निर्गुणी संचरे। अध्यात्मश्रवणे।।' असा स्पष्ट उल्लेख आहे.)

**घटाकाश[१] दृष्टांत ब्रह्माचा। घटबिंब दृष्टांत आत्म्याचा। विवरतां अर्थ दोहींचा। भिन्न आहे ।।४।।**

घटाकाश हा दृष्टान्त ब्रह्माला देतात. (घड्यातील आकाश हे जरी घड्याची हालचाल केली तर निश्चल रहाते) ब्रह्म आकाशासारखे निश्चल आहे. समजा घटामध्ये पाणी भरले तर त्यामध्ये आकाशाचे प्रतिबिंब पडते. आता जर घटाची हालचाल केली तर आकाशाचे प्रतिबिंब चंचळ आहे असे वाटते. जाणीवरुप अंतरात्मा त्या प्रतिबिंबाप्रमाणे चंचल आहे. या प्रतिबिंबाचा म्हणजे अंतरात्म्याचा दृष्टान्त समजून घ्यावा ब्रह्म हे निश्चळ तर अंतरात्मा चंचळ कसा हे या दृष्टान्तावरुन समजेल. घटातील पाण्याच्या उपाधीमुळे तो चंचल भासतो. त्या दोघांच्या अर्थाचा विचार केला तर दोहोत भेद आहे.

**भूत म्हणिजे जितुकें जालें। जालें तितुकें निमालें। चंचळ आलें आणी गेलें। ऐसें जाणावें ।।५।।**

जेवढे काही उत्पन्न झाले त्याचे नाव भूत. ते नंतर नाहीसे झाले. याप्रमाणे जे झाले व निमाले त्याला चंचळ असे समजावे.

**अविद्या जड आत्मा चंचळ। जड कर्पूर आत्मा अनळ[२]। दोनी जळोन तत्काळ। विझोन जाती ।।६।।**

अविद्या व तिने निर्माण केलेले कार्य हे जड आहे. अंतरात्मा चंचळ आहे. (यासंबंधी एक दृष्टान्त दिला आहे तो असा) कापूर जड अविद्या आणि अग्नि चंचळ आत्मा आहे. कापूर पेटतो तेव्हा कापूर व अग्नि दोन्ही जळून विझून जातात. त्याचा अर्थ अविद्या नाहिशी होते आणि चंचळ हे निश्चळात विलीन होते. अंतरात्मा हा निश्चळ ब्रह्मात विलीन होतो.

१) ओवी ४ - घटातील आकाश निश्चल असते व घटातील प्रतिबिंब चंचल असते तसे निश्चळ ते ब्रह्म आणि बुद्धिमध्ये प्रतिबिंबित जे चैतन्य होते तो चंचल जीवात्मा होय. २) अनळ-अग्नि

**ब्रह्म आकाश निश्चळ जाती। आत्मा वायो चंचळ जाती। परीक्षवंत परीक्षिती। खरें किं खोटें ।।७।।**

ब्रह्म हे आकाशाप्रमाणे निश्चळ जातीचे आहे तर अंतरात्मा हा वायूप्रमाणे चंचळ जातीचे आहे हे खरे की खोटे याची परीक्षा ज्ञाते परीक्षकच करून प्रत्यय घेतात.

**जड अनेक आत्मा येक। ऐसा आत्मानात्मविवेक। जगा वर्तविता जगन्नायेक। तयास म्हणावें ।।८।।**

जड (अविद्याजन्य) अनेक असून आत्मा एक आहे. (जसे अनेक घटात घटाकाश एकच आहे पण आकाशाची चंचळ प्रतिबिंबे अनेक आहेत) असे जाणणे यालाच आत्मानात्मविवेक म्हणतात. यामध्ये आत्मा (अंतरात्मा) जगाचे व्यवहार चालवितो. (जगाला वर्तवितो) म्हणून त्यास जगन्नायक म्हणावे.

**जड अनात्मा चेतवी आत्मा। सर्वी वर्ते सर्वात्मा। अवघा मिळोन चंचळात्मा। निश्चळ नव्हे ।।९।।**

जड हे अनात्मा असून त्याला चेतना देतो तो अंतरात्मा होय. सर्व जडामध्ये राहून त्याना चेतना देतो तो सर्वात्मा होय. (तथापि) अंतरात्मा व सर्वात्मा जरी झाले तरी ते चंचळच असतात. ते निश्चळ परब्रह्म नव्हेत. (ब्रह्म हे एकमेव आदिअंती निश्चळ असे रहाते)

**निश्चळ तें परब्रह्म। जेथें नाहीं दृश्यभ्रम। विमळ ब्रह्म ते निभ्रम[3]। जैसें तैसें ।।१०।।**

ते परब्रह्म मात्र निश्चळ असून त्याच्या ठिकाणी दृश्यभास नाही. निर्मळ ब्रह्म हे भ्रमशून्य असते ते जसेच्या तसेच राहाते.

**आधीं आत्मानात्मविवेक थोर। मग सारासारविचार। सारासारविचारें संव्हार। प्रकृतीचा ।।११।।**

प्रथम आत्मानात्म विचार खूप करावा. (अनात्मा व अंतरात्मा यांचा प्रथम विवेक करून साधकाने अंतरात्म्यापर्यंत विवेकाने पोहोचावे) त्यानंतर सार व असार विचार करावा या विचाराने दृश्य प्रकृतीचा निरास होतो.

**विचारें प्रकृति संव्हारे। दृश्य अस्तांच वोसरे। अंतरात्मा निर्गुणीं संचरे। अध्यात्मश्रवणें ।।१२।।**

सारासार विचाराने प्रकृतीचा संहार झाला म्हणजे दृश्य विश्व अगदी जागच्या जागी असूनसुद्धा साधकाच्या दृष्टीने ते नाहिसे झाल्याप्रमाणे होते. म्हणजेच विवेकाने त्याचा प्रलय साधतो. आणि अंतरात्मा हा निर्गुण परब्रह्मामध्ये प्रवेश करतो. (चंचल अंतरात्मा निश्चल ब्रह्मामध्ये विलीन होतो.) केवळ अध्यात्मश्रवणामुळे वर दिलेल्या प्रक्रिया घडतात. (अ) प्रकृतीचा संहार होऊन दृश्य सृष्टी अंतर्धान पावणे. (ब) अंतरात्म्याचा निर्गुणात प्रवेश, या विवेक-प्रलयाच्या खुणा अध्यात्मश्रवणाच्या साधनेमुळे घडतात, ही तिची महति होय.

**चढता अर्थ लागला। तरी अंतरात्मा चढतचि गेला। उतरल्या अर्थे उतरला। भूमंडळी ।।१३।।**

अर्थाशी तदाकार होण्याची क्रिया विवेकामुळेच घडते. अध्यात्मनिरुपणाचा अर्थ आकलनात येण्यासाठी विवेक आवश्यक आहे. सूक्ष्म परब्रह्माकडे जाण्याचा चढता अर्थ अंतःकरणात

३) निभ्रम-भ्रमशून्य

प्रकाशित झाला तर अंतरात्मा त्या मार्गाने सूक्ष्माकडे जातो व स्वतः सूक्ष्म बनतो. पण जर सूक्ष्माकडे न जाता स्थूलाकडे जाण्याची दिशा लागली तर उतरत्या दिशेने जमिनीकडे म्हणजे जन्ममृत्यूच्या जगाकडे पोहोचतो.

**अर्थासारिखा आत्मा होतो। जिकडे नेला तिकडे जातो। अनुमानें संदेहीं पडतो। कांहींयेक ।।१४।।**

थोडक्यात म्हणजे अर्थ जसा चढता अगर उतरता समजेल त्याप्रमाणे तो तो परब्रह्माकडे किंवा अधोगतीला न्यावा तिकडे जातो आणि चुकीच्या तर्कामुळे संशयग्रस्तही होतो.

**निसंदेह अर्थ चालिला। तरी आत्मा निसंदेहचि जाला। अनुमानअर्थें जाला। अनुमानरूपी ।।१५।।**

निःसंदेह अर्थ चालला तर तो निःसंशय होतो आणि संशयाचा अर्थ असला तर संदेहात पडतो. (तात्पर्य : अध्यात्मिक ग्रंथाचा अर्थ विवेकशक्तीच्या बळावर ग्रहण केला तरच आपल्याला प्रगति करून घेता येते)

**नवरसिक अर्थ चाले। श्रोते तद्रुपचि जाले। चाटपणें [४] होऊन गेले। चाटचि आवघे ।।१६।।**

नऊ रसाने ओथंबलेले रसाळ विवेचन असेल तर श्रोते तद्रुप होऊन ऐकतात. चावटपणाचेच व्याख्यान झाले तर श्रोते चावट होतात.

**जैसा जैसा घडे संग। तैसे गुह्यराचे रंग[५]। याकारणें उत्तम मार्ग। पाहोन धरावा ।।१७।।**

सरड्याचे रंग जसे संगतीप्रमाणे बदलतात तसेच माणसाच्या अंतरात्म्याचे आहे. म्हणून (सावधगिरीने) माणसाने उत्तम मार्ग शोधावा आणि त्याप्रमाणे वाटचाल करावी. (स्वसंरक्षणासाठी सरड्याला पर्यावरणाप्रमाणे रंग बदलता येतात त्यामुळे त्याची शिकार सहजी होत नाही.)

**उत्तम अन्नें बोलत गेले। तरी मन अन्नाकारचि जालें। लावण्य वनितेचें वर्णिलें। तरी मन तेथेंचि बैसे ।।१८।।**

उत्तम पक्वानाचे वर्णन ऐकून मन अन्नाकार होते, स्त्रियांच्या सौंदर्याचे वर्णन ऐकून त्यातही मन तल्लीन होते.

**पदार्थवर्णन अघवें। किती म्हणोन सांगावें। परंतु अंतरीं समजावें। होये किं नव्हे ।।१९।।**

असे वर्णन कशाकशाचे म्हणून सांगावे. पण हे असे होते किंवा नाही हे आपल्या मनाशीच विचाराने ठरवावे.

**जें जें देखिलें आणि ऐकिलें। तें अंतरीं सदृढ बैसलें। हित अन्हित परीक्षिलें। परीक्षवंतीं ।।२०।।**

आपण जे जे पाहातो आणि ऐकतो ते चित्तामध्ये दृढ होऊन बसते पण विवेकी माणसाने परीक्षण करून कोणते हितकर व अहितकर हे ठरवावे.

**याकारणें सर्व सांडावें। येक देवास धुंडावें। तरीच वर्म पडे ठावें। कांहीयेक ।।२१।।**

आणि म्हणून हित होण्यासाठी अन्य सर्व सोडून द्यावे व निश्चळ देवाचा शोध घ्यावा. असे

४) चाट-मस्त ५) गुह्यरांचे रंग-सरड्याचे रंग

केले तरच काही मर्म ध्यानात येईल. (विवेक आणि संयम यांची महती यासाठीच आहे.)

**नाना सुखें देवें केलीं। लोकें तयास चुकलीं। ऐसीं चुकतांच गेलीं। जन्मवरी ।।२२।।**

देवाने अनेक (विषयजनित) सुखे निर्माण केली आहेत. पण त्यांच्यामागे धावणारे लोक त्या (सुखनिर्मात्या) देवाला विसरतात. आणि जन्मभर चुकाच करीत जीवन जगतात.

**सर्व सांडून शोधा मजला। ऐसें देवचि बोलिला। लोकीं शब्द अमान्य केला। भगवंताचा ।।२३।।**

'सर्व धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज।' सर्व सोडून देऊन माझा शोध घ्या अशा अर्थी भगवंताने (गीतेत) सांगितले आहे. पण लोकांनी देवाचे हे सांगणे अमान्य केले आहे.

**म्हणोन नाना दुःखें भोगिती। सर्वकाळ कष्टी होती। मनीं सुखचि इछिती। परी ते कैंचें ।।२४।।**

म्हणूनच ते नाना दुःखे भोगतात आणि सर्वकाळ दुःखी असतात. मनात मात्र सुखाची इच्छा करतात. पण ते त्यांना कसे मिळणार?

**उदंड सुख जया लागलें[६]। वेडें तपास चुकलें। सुख सुख म्हणतांच मेलें। दुःख भोगितां ।।२५।।**

जो मूर्तिमंत सुखस्वरुप आहे त्या देवाला वेडी माणसे चुकतात आणि सुखाचा जप करीत दुःखे भोगीत मरुन जातात.

**शाहाण्यानें ऐसें न करावें। सुख होये तेंचि करावें। देवासी धुंडित जावें। ब्रह्मांडापरतें ।।२६।।**

शहाण्याने तरी असे करू नये. ज्या कृतीने सुख मिळेल असेच करावे. ब्रह्मांडाच्याही पलीकडील (दृश्य ओलांडून) देवाला शोधावे.

**मुख्य देवचि ठाईं पडिला। मग काये उणें तयाला। लोक वेडे विवेकाला। सांडून जाती ।।२७।।**

मुख्य देवा (परब्रह्मा) चा शोध लागला म्हणजे सुखाला काय तोटा? पण जे लोक या विवेकाचा त्याग करतात ते वेडेच आहेत!

**विवेकाचें फळ तें सुख। अविवेकाचें फळ तें दुःख। यांत मानेल तें अवश्यक। केलें पाहिजे ।।२८।।**

अविवेकामुळे दुःख प्राप्त होते आणि विवेकामुळे सुखप्राप्ती होते यातून आपणाला जे आवडेल ते अवश्य केले पाहिजे.

**कर्तयासी वोळखावें। यास विवेक म्हणावें। विवेक सांडितां व्हावें। परम दुःखी ।।२९।।**

जो खरा कर्ता आहे त्याला ओळखणे याला विवेक हे नाव आहे. विवेकाचा त्याग करावा आणि परम दुःखी व्हावे (विवेक सोडला तर दुःख प्राप्त होते)

**आतां असे हें बोलणें। कर्त्यास वोळखणें। आपलें हित विचक्षणें। चुकों नये ।।३०।।**

आता हे बोलणे पुरे झाले. तात्पर्य मुख्य कर्त्याला ओळखणे यातच आपले कल्याण आहे ही

६) उदंड सुख जया लागले-ज्याच्या ठायी उदंड सुखच आहे.

गोष्ट शहाण्या माणसाने जाणून कल्याण साधण्यात चूक करू नये.

**इति श्री दासबोधे गुरुशिष्यसंवादे प्रत्ययेविवरणनाम समास सप्तम।।७।।**

## द. १९-७ : येत्ननिरूपण

अध्यात्म आणि लोकसंग्रह किंवा परमार्थ आणि समाजसेवा यांच्या परस्परसंबंधाबद्दल श्रीसमर्थांना काय म्हणायचे आहे, हे समजण्यास प्रस्तुत समासाचे सूक्ष्म अध्ययन अवश्य आहे. साऱ्या माणसांचे वर्ग फक्त दोन, (एक) अज्ञानी माणसांचा आणि (दोन) आत्मज्ञानी माणसांचा. अज्ञानी माणसांचे वर्ग फक्त दोन. (एक) वासना तृप्त करण्यासाठी धडपडणाऱ्या बद्धांचा आणि (दोन) वासना नाहीशी करण्यासाठी धडपडणाऱ्या मुमुक्षूंचा व साधकांचा. साधकांचे वर्ग दोन, (एक) समुदायांचा हव्यास असणारे आणि (दोन) समुदायाचा हव्यास नसणारे. प्रत्येक साधकाचे एकच ध्येय असते. सिद्ध बनणे, ज्ञानी होणे, परमात्मस्वरूप बनणे, हे ते ध्येय होय. प्रत्येक ज्ञानी किंवा सिद्ध पुरुष अत्यंत वासनारहित, निरहंकारी, समत्वबुद्धीचा आणि दयावंत असतो. त्याच्या हातून लोककल्याण घडतेच घडते. या मिथ्या जगात केवळ अज्ञानाने आसक्त होऊन नाना प्रकाराची दु:खे भोगणाऱ्या जीवांच्याबद्दल ज्ञानी पुरुषाला करुणा येते. त्या करुणेच्या पोटी तो जीवांच्यावर अनुग्रह करतो. त्याच्या स्वत:च्या ठिकाणी कर्तेपणाचा अभिमान नसतो, कर्मांची व कर्मफलांची आसक्ती नसते आणि कीर्तीची व मानाची यत्किंचित हाव नसते. पण ज्या देहबुद्धीमुळे अज्ञानी जीव दु:खे भोगतात, ती कमी करण्याचा व अखेर नाहीशी करण्याचा मार्ग ज्ञानी पुरुष सतत दाखवीत राहतात. ज्ञानी पुरुषाचा जगाला हाच उपयोग असून त्याच्या हातून हमखास घडणारे लोककल्याण ते हेच होय. प्रत्यक्ष जीवनात स्वार्थाच्या रूपाने माणसाची देहबुद्धी प्रगट होते. म्हणून ज्ञानी पुरुष स्वार्थी माणसांना नि:स्वार्थी बनवण्याची खटपट करतो. नि:स्वार्थी बनण्याचे दोन मार्ग आहेत. (एक) प्रेमाचा मार्ग आणि (दोन) विचाराचा मार्ग. या दोन मार्गांना अनुसरून साधकांचे देखील दोन प्रकार दिसतात. (एक) प्रेमप्रधान साधक आणि (दोन) विचारप्रधान साधक. हे साधक जेव्हा सिद्ध बनतात तेव्हा त्यांच्यामध्ये हा भेद थोड्याफार फरकाने नजरेस पडतो. वास्तविक ज्ञानी पुरुष स्वत: कृतार्थ असतो. त्याचे साध्य त्याच्या पदरात पडलेले असते. तो केवळ प्रारब्धाच्या तंत्राने वागत राहतो. ज्ञानी आणि अज्ञानी यांच्या बाह्यस्वरूपामध्ये काही फरक नसतो. त्यांच्या अंतरंगामध्ये मात्र विलक्षण फरक आढळतो. हा फरक सांभाळून किंवा झाकून ठेवून ज्ञानी पुरुषाला अज्ञानी माणसांना मार्गदर्शन करावे लागते. प्रेमप्रधान ज्ञानी प्रपंचामध्ये आसक्ती असलेल्या अज्ञानी माणसांच्या जीवनात मोकळेपणाने मिसळतो. परंतु त्यांची प्रपंचावरील श्रद्धा भंगणार नाही आणि ते अधिकाधिक नि:स्वार्थी व विशालवृत्तीचे बनत जातील, असेच आपले आचरण व भाषण ठेवतो. विचारप्रधान ज्ञानी एकांतप्रिय असतो, गंभीर प्रकृतीचा असतो. अज्ञानी माणसांमध्ये तो फारसा मिसळत

नाही. तरी पण ग्रंथलेखन, संभाषण आणि ज्ञानोपदेश यांच्या द्वारा त्याचे मार्गदर्शन चालू असते. श्रीसमर्थांचा कटाक्ष असा दिसतो की, ज्ञानी पुरुषाच्या ठिकाणी प्रेम आणि विचार या दोन्हींचे समतोल मिश्रण असलेले उत्तम होय. साधकाने साधनकालामध्ये काही काळ लोकसमुदायात मिसळावे तर काही काल संपूर्ण एकान्तामध्ये जाऊन बसावे, असा त्यांचा उपदेश आहे. असा साधक जेव्हा सिद्ध बनतो तेव्हा ज्ञानानंतर त्याचे प्रारब्ध त्यास तसेच वागायला लावते. अशा प्रेममय आणि विचारप्रधान ज्ञानी पुरुषाच्या हातून जगाचे अधिकाधिक कल्याण घडून येते, यात शंका नाही. भगवंतांनी गीतेत प्रशंसिलेला ज्ञानीभक्त तो हाच होय. हे सगळे मान्य असून देखील ज्ञानी पुरुषाला अमक्या तऱ्हेने वागण्याचा आग्रह कोणी करू शकत नाही. त्याचप्रमाणे, समाजात मोकळेपणाने मिसळून ज्याचे आत्मानुसंधान टिकत नाही त्याने एकांतात राहून आपली साधना सांभाळावी, असे श्रीसमर्थ स्पष्टपणे सांगत आहेत. लोकांतात राहून अनुसंधान सांभाळणे काही सोपे काम नाही, हे साधक जाणतातच.

## ||श्रीराम||

**कथेचें घमंड[१] भरून द्यावें। आणि निरूपणीं विवरावें। उणें पडोंचि नेदावें। कोणीयेकविषीं ।।१।।**

भगवंताची कथा मोठ्या थाटात करावी आणि त्याचबरोबर निरूपणात अध्यात्माचे विवेचनसुद्धा करावे. त्यात कशाचेही न्यून पडू देऊ नये. (दोहोंमध्ये परिपूर्णता असावी)

**भेजणार खालें पडिला[२]। तो भेजणारी जाणितला। नेणता लोक उगाच राहिला। टकमकां पाहात ।।२।।**

कथा/निरुपण करणारा कोठे घसरला तर ते जाणकारांना समजते. अज्ञानी श्रोते उगीच टकमका पहात बसतात.

**उत्तर विलंबी पडिलें। श्रोतयांस कळों आलें। म्हणिजे महत्व उडालें। वक्तयाचें ।।३।।**

श्रोत्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना विलंब लागला म्हणजे श्रोत्यांना वक्त्याचा थिटेपणा क़ळून येतो. त्यामुळे त्याचे महत्त्व निघून जाते.

**थोडें बोलोनी समाधान करणें। रागेजोन तरी मन धरणें। मनुष्य वेधींच लावणें। कोणी येक ।।४।।**

वक्त्याला राग आला तरी श्रोत्याचे मन दुखवू नये (रागात काहीतरी दुरुत्तरे न करता) थोडेसे बोलून त्याचे समाधान करावे. प्रत्येक माणसाचे चित्त आकर्षित करावे.

**सोसवेना चिणचिण केली। तेथें तामसवृत्ती दिसोन आली। आवघी आवडी उडाली। श्रोतयाची ।।५।।**

श्रोत्यांचे बोलणे सहन न झाल्याने क्रोधाने चिणचिण केली तर तेथे तामसीवृत्तीचे प्रदर्शन घडते. आणि वक्त्यावरील प्रेम उडून जाते.

**कोण कोण राजी राखले। कोण कोण मनीं भंगिले। क्षणक्षणां परीक्षिले। पाहिजे लोक ।।६।।**

१) घमंड-बहार २) भेजणार खालें पडिला-वक्ता जर सांगण्यात घसरला

आपणावर कोण प्रसन्न आहेत व कोणाचा मनोभंग झाला आहे याबद्दल क्षणोक्षणी विचार केला पाहिजे. (लोकसंग्रह करणाऱ्यांसाठी हे बहुमोल सूत्र सांगितले आहे)

**शिष्य विकल्पें रान घेतो। गुरु मागें मागें धांवतो। विचार पाहों जातां तो। विकल्पचि अवघा ।।७।।**

शिष्य भलत्या शंकांच्या आडरानात शिरतो. त्याच्या मनात विकल्प असतो आणि गुरु त्याची समजूत घालण्यासाठी आर्जवी वृत्तीने मागे धावतो असे घडले तर गुरु आणि शिष्य दोघेही संदेहाच्या जाळ्यात अडकलेले किंवा विकल्पीच राहातात.

**आशाबद्धी क्रियाहीन। नाहीं च्यातुर्याचें लक्षण। ते महंतीची भणभण। बंद[३] नाहीं ।।८।।**

जो महंत आशाळभूत, आचारहीन व चातुर्यहीन आहे त्याच्या गुरुपणाची फजिती होते. पण तो महंतीची उठाठेव चालूच ठेवतो.

**ऐसें गोसावी हळु पडती[४]। ठाईं ठाईं कष्टी होती। तेथें संगतीचे लोक पावती। सुख कैचें ।।९।।**

अशा प्रकारचे महंत ज्ञानाने थिटे पडतात. त्यामुळे त्यांना दु:खही सोसावे लागते. अशांच्या संगतीमध्ये लोकांना (ज्ञानाचा बोध न झाल्याने) सुख समाधान कसे मिळणार?

**जिकडेतिकडे कीर्ति माजे। सगट लोकांस हव्यास उपजे। लोक राजी राखोन कीजे। सकळ कांहीं ।।१०।।**

याउलट महंत असा असावा की (ज्ञानामुळे) सर्वत्र त्याची कीर्ती पसरावी. सगळ्या लोकांना त्याच्याबद्दल प्रेमादरभाव निर्माण होऊन आवड उत्पन्न व्हावी. लोकांना संतुष्ट ठेवून त्याने सर्वकाही करावे.

**परलोकीं वास करावा। समुदाव उगाच पाहावा। मागण्याचा तगादा न लवावा। कांहीं येक ।।११।।**

ईश्वरानुसंधानाच्या वरच्या पातळीवर त्याने रहावे व लोकांचे निरीक्षण तेथून करावे. कोणाच्या मागे काहीही मागण्याचा तगादा त्याने करू नये. (आशाबद्धता असू नये)

**जिकडे जग तिकडे जगन्नायेक। कळला पाहिजे विवेक। रात्रीदिवस विवेकी लोक। सांभाळीत जाती ।।१२।।**

जिकडे जग तिकडे जगन्नायक हे तत्त्व त्याला ठाऊक असावे. हा विचार समजून विवेकी महंताने सतत लोक सांभाळले पाहिजेत.

**जो जो लोक दृष्टीस पडिला। तो तो नष्ट ऐसा कळला। अवघेच नष्ट, येकला भला । काशावरुनी ।।१३।।**

दिसणारा प्रत्येक मनुष्य वाईट आहे असे महंताला वाटणे योग्य नव्हे. सर्व लोकच जर वाईट असतील तर आपण एकटेच तेवढे भले आहोत हे तरी कशावरुन समजावयाचे?

**वोस मुलकी काये पाहावें। लोकांवेगळें कोठें राहावें। तऱ्हे खोटी, सांडतें घ्यावें । कांहीं येक ।।१४।।**

(लोकांवर रुष्ट होऊन) ओसाड प्रदेशात जाऊन काय करणार तेथे काय पहाणार?

---

३) बंद-मर्यादा ४) हळू पडती-पत नष्ट होते

लोकांना सोडून जाता येत नसते. आपला तऱ्हेवाईकपणा सोडून देऊन थोडे पडते घ्यावे (पण लोकसंग्रहासाठी त्यांना राजी राखावे)

**तस्मात लोकिकीं वर्ततां न ये। त्यास महंती कामा नये। परत्र साधनाचा उपाये। श्रवण करून असावें ।।१५।।**

म्हणून ज्याला लोकांबरोबर वागता येत नाही त्याने महंतीच करू नये. त्याने परमार्थ साधण्याचा उपाय म्हणून श्रवण तेवढे करून रहावे.

**आपणासी बरें पोहतां नये। लोक बुडवावयाचें कोण कार्य। गोडी आवडी वायां जाये। विकल्पचि अवघा ।।१६।।**

आपणास जर नीट पोहता येत नसेल तर आपल्या कासेला धरण्यास सांगून लोकांना बुडविण्याचे कार्य तरी करू नये. यामुळे परस्परातील गोडी निघून जाऊन गैरसमज पसरतो.

**अभ्यासें प्रगट व्हावें। नाहीं तरी झांकोन असावें। प्रगट होऊन नासावें। हें बरें नव्हें ।।१७।।**

अध्यात्मिक साधनेची पूर्ण तयारी झाली असेल तरच प्रगट व्हावे, नाही तर झाकलेल्या स्थितीतच रहावे. लोकांपुढे प्रगट होऊन मग फजितीने अपकीर्ती करून घ्यावी हे योग्य नाही.

**मंद हळुहळु चालतो। चपळ कैसा अटोपतो। अरबी फिरवणार तो। कैसा असावा[५] ।।१८।।**

ज्याला मंद व हळूहळू चालणारा घोडा चालविण्याचेच साधते तर त्याला चपळ घोडा चालविता येणार नाही. अरबी घोड्यावर स्वार होणारा तसाच बळकट असावा लागतो.

**हे धकाधकीचीं कामें। तिक्षण बुद्धीचीं वर्में। भोळ्या भावार्थें संभ्रमें। कैसें घडे ।।१९।।**

ही सारी धकाधकीची कामे असून तीक्षण बुद्धीने मर्म ओळखूनच ती करावी लागतात. नुसत्या भाबड्या श्रद्धेच्या बळावर ती सहजी करता येत नाहीत.

**सेत केलें परी वाहेना[६]। जवार[७] केलें परी फिरेना। जन मेळविलें परी धरेना। अंतर्यामीं ।।२०।।**

शेत केले पण त्याचे धान्य बाजारात वाहून नेले नाही, जवाहिर व्यापाऱ्याचा धंदा काढला पण त्यासाठी भ्रमंती केली नाही, शिष्य समुदाय मिळविला पण अंतर्यामी त्यांची ओळख ठेवून ते सांभाळले नाही तर महंती अयशस्वी ठरते.

**जरी चढती वाढती आवडी उठे। तरी परमार्थ प्रगटे। घसघस करितां विटे। सगट लोकु ।।२१।।**

लोकांमध्ये जर महंताबद्दलचे प्रेम एकसारखे वाढते राहिले तरच त्याचा परमार्थ पंथ वाढतो. लोकांशी चीडचीड केली तर लोकांना त्याच्याबद्दल तिरस्कार निर्माण होतो.

**आपलें लोकांस मानेना। लोकांचें आपणांस मानेना। अवघा विकल्पचि, मना-। समाधान कैंचें ।।२२।।**

ज्या महंताचे लोकांशी पटत नाही व लोकांचे त्याला मानवत नाही तेथे सर्व संशय व

---

५) ओवी १८-मंद घोड्याला चालविणारा चपळ अरबी घोड्याला कसा आवरू शकणार? ६) वाहेना-निगा राखेना ७) जवार-जवाहिराचा व्यापार

गैरसमजाचा गजबजाट होतो. मग तेथे दोघांनाही समाधान कसे वाटणार?

**नासक[८] दीक्षा सिंतरु[९] लोक। तेथें कैंचा असेल विवेक। जेथें बळावला अविवेक। तेथें राहणें खोटें ।।२३।।**

जेथे महंताची साधना बिघडलेली असते आणि जमा झालेले लोक लबाड असतात तेथे विवेकाला स्थानच रहात नाही. अविवेकाचे प्राबल्य असेल तेथे राहाणेच अयोग्य!

**बहुत दिवस श्रम केला। सेवटीं अवघाचिं वेर्थ गेला। आपणास ठाकेना गल्बला। कोणें करावा ।।२४।।**

पुष्कळ दिवस कष्ट करून लोकसंग्रह केला पण तो फुकटच गेला. आपणाला जर असा प्रकार होऊन महंतीची उपाधी पेलता येत नसेल ती कशाला करावी?

**संगीत[१०] चालिला तरी तो व्याप। नाहीं तरी अवघाचि संताप। क्षणक्षणा विक्षेप। किती म्हणौनि सांगावा ।।२५।।**

सुरळीत चालला तरच तो व्याप असतो नाहीतर सारा संतापच ठरतो. प्रत्येक क्षणाला (संघर्षामुळे, कोपामुळे) विघ्ने येतील ती किती म्हणून सांगावी?

**मूर्ख मूर्खपणें भरंगळती। ज्ञाते ज्ञातेपणें कळ्हो करिती। होते दोहींकडे फजीती। लोकांमधें ।।२६।।**

समुदायातील मूर्ख माणसे मूर्खपणाने वागून घसरतात आणि जाणती माणसे अहंकाराने कलह माजवितात आणि मधल्यामध्ये महंत सापडून त्याची दोन्ही बाजूने फजिती होते.

**कारबार आटोपेना करवेना। आणि उगेंहि राहेना। याकारणें सकळ जना। काये म्हणावें ।।२७।।**

ज्याला कार्याचा व्याप आटोपत नाही आणि त्याविना स्वस्थही बसवत नाही अशा माणसास काय म्हणावे? (वास्तविक अशा व्यक्तीने लोकांच्या कच्छपीच लागू नये)

**नासक उपाधीस सोडावें। वय सार्थकीं घालावें। परिभ्रमणें कंठावें। कोठें तरी ।।२८।।**

नासक्या किंवा बिघडलेल्या उपाधीला सोडून द्यावे. (ईश्वरानुसंधानात) जीवनाचे सार्थक करावे व कोठे तरी परिभ्रमण करीत काळ कंठावा.

**परिभ्रमण करीना। दुसऱ्याचें कांहींच सोसीना। तरी मग उदंड यातना। विकल्पाची ।।२९।।**

जो महंत देशात परिभ्रमण करीत नाही (एके जागीच बसून राहातो) तसेच दुसऱ्याचे सुखासाठी झिजत नाही त्याला संशयाच्या अनेक यातना देहबुद्धीमुळे भोगाव्या लागतात.

**आतां हें आपणाचिपासीं। बरें विचारावें आपणासी। अनकूळ पडेल तैसी। वर्तणूक करावी ।।३०।।**

आता हे सगळे बरे-वाईट होणे आपल्यावरच अवलंबून आहे म्हणून आपणच आपल्या मनात याबद्दल विचार करावा आणि स्वहितकर किंवा योग्य अशी वर्तणूक करावी.

(महंताला शहाणे करून त्यांना नाना देशी पाठविण्याचा मोठाच साक्षेप श्रीसमर्थांनी केला. या समासामध्ये महंतांना कशा प्रकारची शिकवण त्यांनी दिली होती ते समजून येते.

८) नासक-भोंदूपणाची ९) सिंतरू-फसविणारे १०) संगीत-सुरळीत

स्वयंमूल्यमापनाची सूत्रे येथे शिष्यवर्गाला सांगितली आहेत. आजच्या काळातही अध्यात्मक्षेत्रातील समाजसेवकांना ती उपयुक्त ठरतील.)

**इति श्रीदासबोधे गुरूशिष्यसंवादे येत्ननिरूपणनाम समास सप्तम।।७।।**

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका ८

**(द. १-९ परमार्थस्तवन, १३-७ प्रत्ययेविवरण, १९-७ येत्ननिरूपण वर आधारित)**

प्र. १ खालील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा.

१) अनंत जन्मींचें पुण्य जोडे। (१-९-२४)

२) कर्तयासी वोळखावें। (१३-७-२९)

३) अभ्यासें प्रगट व्हावें। (१९-७-१७)

प्र. २ श्रीसमर्थांनी परमार्थाची महति द. १-९ मध्ये वर्णन केली आहे, तिच्यामधील काही निवडक मुद्दे दहा ओळीत लिहा.

प्र. ३ खालील ओव्यांचा कल्पनाविस्तार करा.

१) विचारें प्रकृति संव्हारे। दृष्य अस्तांच वोसरे। (१३-७-१२)

२) अवघेच नष्ट; येकला भला-। काशावरूनी। (१९-७-१३)

प्र. ४ जनप्रबोधन करणाऱ्या महंताना खाली दिलेल्या ओव्यात कोणती सूत्रे सांगितली आहेत?

(अ) १९-७-६ (ब) १९-७-८ (क) १९-७-११

प्र. ५ (अ) या महिन्याच्या स्वाध्यायासाठी निवडण्यात आलेल्या समासांपैकी एकावर सुमारे पंधरा मिनिटे विवरण करावयास सांगितले तर आपली तयारी आहे का?

(ब) वरीलपैकी कोणत्या समासाची निवड त्यासाठी कराल? त्यातील पाच मुद्दे एकेका वाक्यात लिहा.

किंवा

(ब) वरील तीन समासात सुभाषितवजा ज्या ओव्या आहेत, असे आपणास वाटते अशा तीन ओव्या लिहा.

# स्वाध्याय ९ वा

## (द. १२ -४,५; १३-१)

यामध्ये विवेक-वैराग्यनिरूपण आत्मनिवेदन आणि आत्मानात्मविवेक निरूपण हे एकूण तीन समास अभ्यासावयाचे आहेत. यातील प्रमुख मुद्दे -

१) जल आणि जलचर यांचे असे ऐक्य किंवा एकात्मता असते त्याप्रमाणे विवेक आणि वैराग्य यांचे नाते असावे. हे घडल्यावर साधक हा आत्मज्ञानाचा अधिकारी होऊ शकतो.

२) आत्मनिवेदन म्हणजे सर्वस्व समर्पण हे मान्य करूनही त्याचे तीन भेद श्रीसमर्थांनी स्पष्ट केले आहेत. ते म्हणजे जड आत्मनिवेदन, चंचल आत्मनिवेदन आणि निश्चल आत्मनिवेदन. या सर्वांची माहिती अभ्यासार्थींना याच स्वाध्यायात द. १२-५ मध्ये होऊ शकेल.

३) आत्मा हे सार; बाकी सर्व असार हा विचार याच स्वाध्यायात द. १३-१ मध्ये आहे. देहाचे चार प्रकार आणि सूक्ष्माचेही चार प्रकार सांगून अशा अष्टदेहाचे निरसन करून ब्रह्मप्राप्ती होते हा मोठाच आध्यात्मिक भाग आपणास अभ्यासावयाचा आहे.

हा स्वाध्याय तत्वज्ञानात्मक असल्याने अभ्यासार्थींना कठीण वाटेल. परंतु विवेकाने पाहिले तर ते सोपे होईल असे आश्वासन सद्गुरु श्रीसमर्थच आपणास देत आहेत...

### द. १२-४ : विवेकवैराग्यनिरूपण

व्यवहारात काय किंवा परमार्थात काय कोणतेही मोठे कार्य सिद्धीस नेण्यास विशिष्ट प्रकारची पात्रता लागते. आत्मज्ञान प्राप्त होण्यास विवेक आणि वैराग्य यांची नितांत आवश्यकता असते. माणूस चालण्यासाठी जसे दोन पाय वापरतो किंवा रथ भरधाव चालण्यास जशी दोन चाके लागतात, त्याचप्रमाणे साधकाची साधना समाधानकारकपणे चालण्यास विवेक आणि वैराग्य दोन्ही समतोलपणे अंगी असणे आवश्यक असते. एकावाचून एक वाया जाते आणि मग धड प्रपंच ना परमार्थ अशी अवस्था होते. आपले ध्येय कोणते, आपली साधना कोणती, प्रपंचाचे स्वरूप काय, जगाचा स्वभाव कसा, स्वरूपानुभवाची लक्षणे कोणती वगैरे प्रश्नांची अगदी स्पष्ट उत्तरे बुद्धीने आकलन करणे, याचे नाव विवेक होय. आपल्या देहासगट सर्व दृश्याची किंमत आत्मज्ञानापेक्षा कमी वाटणे, देहातून सुख घेण्याची प्रवृत्ती क्षीण होणे, हवे-नकोपण शांत होणे, मनाने कोठेही, कोणातही व कशातही गुंतून न राहणे यास वैराग्य म्हणतात. वैराग्याच्या अभावी नुसता विवेक पांगळा होतो तर विवेकाच्या अभावी नुसते वैराग्य दुराग्रही व तर्कदुष्ट बनते. विवेकवैराग्याने माणूस आतून व बाहेरून मोकळा होतो. त्याच्या बोलण्या-चालण्यात यत्किंचित् विरोध आढळत नाही. म्हणून उत्तम लोक त्याचे जीवन बघून अचंबा करतात. उत्तम साधक एक प्रकारे परमार्थाचा प्रचारक असतो. त्यास भगवंतावाचून इतर वासना नसतात. त्याच्या

अंगी वैराग्य बाणलेले असते. त्याचा विवेक आणि धारणा दोन्ही वरच्या दर्जाचे असतात. तो मनापासून भजन करतो. रसाळ हरिकीर्तन करतो. निरूपणात स्वानुभवाचे बोल बोलतो. सारांश, उत्तम विवेक, प्रखर वैराग्य, अनुभवाचे ब्रह्मज्ञान, आचारशीलता आणि परोपकार या गुणांनी संपन्न पुरुष पुष्कळ लोकांना परमार्थाच्या योग्य मार्गावर आणून सोडतो.

**|| श्रीराम ||**

**महद्भाग्य हातास आलें। परी भोगूं नाहीं जाणितलें। तैसें वैराग्य उत्पन्न जालें। परी विवेक नाहीं ।।१।।**

एखाद्याला मोठे भाग्य प्राप्त होते पण त्याचा उपभोग घेण्याचे ज्ञान जर नसेल तर ते भाग्य व्यर्थ जाते. त्याप्रमाणे वैराग्य हे जरी भाग्यच असले तरी विवेकाच्या अभावी ते व्यर्थच होय.

**आदळतें आफळतें। कष्टी होतें दुःखी होतें। ऐकतें देखतें येतें। वैराग्य तेणें ।।२।।**

(घरामध्ये काही कुरबुरींमुळे) आदळआपट झाली, प्रपंचात दुःख किंवा कष्ट प्राप्त झाले किंवा दुसऱ्यांच्या दुःखांच्या किंवा कष्टांच्या हकीगती ऐकल्या किंवा प्रसंग पाहिले तरी माणसाला वैराग्य येऊ शकते.

**नाना प्रपंचाच्या वोढी। नाना संकटें सांकडीं। संसार सांडूनी देशधडी। होये तेणें ।।३।।**

प्रपंचातील ओढाताणी (काही वेळा मानसिक, शारीरिक किंवा आर्थिक) अनेक असतात. नाना प्रकारची संकटे आणि अडचणी येतात. त्यामुळेही वैतागून मनुष्य घर सोडून देतो. देशांतराला जातो.

**तो चिंतेपासून सुटला। पराधेनतेपासूनि पळाला। दुःखत्यागें मोकळा जाला। रोगी जैसा ।।४।।**

एखादा रोगी रोगाच्या तावडीतून सुटून बरा व्हावा त्याप्रमाणे प्रपंचत्यागी मनुष्य चिंतेपासून सुटतो, पराधीनपणातून दूर जातो आणि दुःखातून मुक्त होतो.

**परी तो होऊं नये मोकाट[१]। नष्ट[२] भ्रष्ट आणी चाट। सीमाच नाही सैराट[३]। गुरूं जैसें ।।५।।**

तथापि त्याने एखाद्या भटक्या जनावराप्रमाणे मोकाट, नष्ट, भ्रष्टाचारी आणि चावट होता कामा नये.

**विवेकेविण वैराग्ये केलें। तरी अविवेकें अनर्थी घातलें। अवघें वेर्थचि गेलें। दोहिंकडे ।।६।।**

अंगी विवेक नसताना जर वैराग्य धारण केले तर अविवेकामुळे अनर्थ घडतो आणि प्रपंच किंवा परमार्थ यापैकी काहीच साधत नाही. (विवेकाने केलेला प्रपंचत्याग आणि वैतागाच्या भरामध्ये केलेला गृहत्याग यात जमीन अस्मानाचे अंतर आहे)

**ना प्रपंच ना परमार्थ। अवघें जिणेंचि जालें वेर्थ। अविवेकें अनर्थ। ऐसा केला ।।७।।**

१) मोकाट-नियंत्रणाबाहेर २) नष्ट-उनाड ३) सैराट-अस्ताव्यस्त

धड प्रपंचही नाही व परमार्थही नाही. यामुळे जीवनच व्यर्थ जाते. असा अनर्थ अविवेकामुळे घडतो.

**कां वेर्थचि ज्ञान बडबडिला। परी वैराग्ययोग नाहीं घडला। जैसा कारागृहीं अडकला। पुरुषार्थ सांगे ।।८।।**

एखादा मनुष्य व्यर्थ ज्ञानाची बतावणी करतो. पण त्या ज्ञानाला जर वैराग्याची जोड नसेल तर ते ज्ञान म्हणजे फुकटची बडबडच होय. तुरुंगात अडकलेल्या कैद्याने पराक्रमाच्या गोष्टी कराव्यात तसेच हे घडते.

**वैराग्येंविण ज्ञान। तो वेर्थचि साभिमान। लोभदंभें घोळसून[४]। कासाविस केला ।।९।।**

वैराग्याशिवाय असलेले ज्ञान उगीचच प्रौढीचे (अभिमानाचे) कारण असते. लोभ आणि दांभिकपणा अशा माणसास घोळसून कासावीस करतात.

**स्वान बांधलें तरी भुंके। तैसा स्वार्थमुळें थिंके[५]। पराधीक[६] देखों न सके। साभिमानें ।।१०।।**

एखादे कुत्रे बांधून ठेवले तरी ते भुंकते तसा हा मनुष्य दुसऱ्याचे यश उत्कर्ष पाहून स्वार्थासाठी चरफडत असतो. (दुसऱ्यांचा उत्कर्ष अहंभावामुळे त्याला सहन होत नाही)

**हें येकेंविण येक। तेणें उगाच वाढे शोक। आतां वैराग्य आणि विवेक। योग ऐका ।।११।।**

म्हणून विवेक आणि वैराग्य हे एकएकटेच असतील (त्यांची युती नसेल) तर उगीच शोक मात्र वाढतो. आता विवेकासह वैराग्य असेल तर कसे घडते ते ऐका.

**विवेकें अंतरीं सुटला। वैराग्यें प्रपंच तुटला। अंतर्बाह्य मोकळा जाला। निःसंग योगी ।।१२।।**

विवेकामुळे माणसाचा ‘मी’पणा सुटतो आणि वैराग्यामुळे प्रपंचाचे प्रेम कमी होते. अशा प्रकारे अंतर्बाह्य नि:संग असा योगी निर्माण होतो.

**जैसें मुखें ज्ञान बोले। तैसीच सवें क्रिया चाले। दीक्षा[७] देखोनी चकित जालें। सुचिस्मंत ।।१३।।**

असा महंत जसे बोलतो तसेच त्याचे आचरण असते. त्याची जीवनपद्धती पाहून शुद्धाचरणी सज्जन संतुष्ट होतात.

**आस्था नाहीं त्रैलोक्याची। स्थिति बाणली वैराग्याची। येत्नविवेकधारणेची। सीमा नाहीं ।।१४।।**

वैराग्यामुळे अंगी निस्पृहता आली की त्रैलोक्याबद्दलसुद्धा आस्था तेथे आढळत नाही. विवेकाची चरमसीमा, अथक प्रयत्न आणि नि:स्सीम अशी धारणशक्ती प्राप्त होते.

**संगीत रसाळ हरिकीर्तन। ताळबद्ध तानमान। प्रेमळ आवडीचें भजन। अंतरापासुनी ।।१५।।**

त्याने केलेले कीर्तन तालबद्ध, तानमान सांभाळून केलेले असल्यामुळे अत्यंत रसाळ होते. अंत:करणापासून तो भगवंताचे प्रेमळ भजन करतो.

४) घोळसून-घुसळून ५) थिंके-चरफडे ६) पराधिक्-दुसऱ्याचा उत्कर्ष ७) दीक्षा-आचरण

**तत्काळचि सन्मार्ग लागे। ऐसा अंतरीं विवेक जागे। वग्तृत्व करितां न भंगे। साहित्य[८] प्रत्ययाचें ।।१६।।**

त्याची ती वाणी ऐकून श्रोता सन्मार्गाला लागतो. कारण त्याच्यातील विवेकशक्ती जागृत असते. तो स्वानुभवाच्या आधारेच बोलत असल्याने वक्तृत्वाच्या भरामध्ये साधनमार्ग सुटत नाही.

**सन्मार्गें जगास मिळाला। म्हणिजे जगदीश वोळला । प्रसंग पाहिजे कळला। कोणीयेक ।।१७।।**

सन्मार्ग धरून तो लोकांपुढे उभा राहिल्यामुळे जनता जनार्दन त्याच्यावर संतुष्ट होतो हे खरे असले तरी प्रसंग कसा आहे हे त्याने जाणले पाहिजे. (प्रसंगवेळ पाहून वागण्याचे भान त्याने राखले पाहिजे)

**प्रखर वैराग्य उदासीन। प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान। स्नानसंध्या भगवद्भजन। पुण्यमार्ग ।।१८।।**

जळजळीत वैराग्य व स्वानुभवाचे ब्रह्मज्ञान त्याच्यापाशी असावे. स्नानसंध्या व भगवंताचे भजन हे पुण्यमार्गाचे आचरण त्याने सांभाळले पाहिजे.

**विवेकवैराग्य तें ऐसें। नुस्तें वैराग्य हेंकाडपिसें[९]। शब्दज्ञान येळिलसें[१०]। आपणचि वाटे ।।१९।।**

विवेकयुक्त वैराग्य जेथे असते तेथेच हे आढळते. विवेकाविना वैराग्य हे वेडपट किंवा दुराग्रही असते. नुसते शाब्दिक ज्ञान लोकांना आपोआपच कंटाळवाणे वाटू लागते.

**म्हणौन विवेक आणि वैराग्य। तेंचि जाणिजे महद्भाग्य। रामदास म्हणे योग्य। साधु जाणती ।।२०।।**

विवेक आणि वैराग्य यांची युती असणे हे मोठ्या भाग्याचे लक्षण आहे. खरे साधू असतात त्यांना हे ठाऊक असते, असे रामदास म्हणतात.

(अध्यात्मिक क्षेत्रामध्ये मार्गदर्शनासाठी विवेकयुक्त वैराग्य असेल त्यांनाच मार्गदर्शनाचा खरा अधिकार असतो हे रामदास येथे बजावून सांगत आहेत. नैमित्तिक कारणाने येणारे वैराग्य तकलादू असते. अशा लोकांचे अध्यात्मिक क्षेत्रातील मार्गदर्शन धोकादायी ठरते. तो धोका लोकांनी ओळखला पाहिजे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे विवेकवैराग्यनाम समास चतुर्थ।।४।।**

## द. १२-५ : आत्मनिवेदन

या दृश्य विश्वामध्ये कितीतरी प्रकारचे भेद आढळतात. परंतु ते सगळे अशाश्वत आहेत. मायेचे अष्टदेह निरास केले की, सगळे अशाश्वत विलयास जाते आणि शुद्ध ब्रह्म तेवढे शिल्लक उरते. त्या परब्रह्माचा अनुभव येण्यास आत्मनिवेदन जरूर आहे. त्याचे तीन प्रकार आहेत. (पहिला) मी व माझे सगळे भगवंताचे आहे अशा भावनेने जगात वागणे हे जड आत्मनिवेदन होय. (दुसरा) अंतरात्मा जगदीश सर्व ठिकाणी व्यापून आहे. खरा कर्ता तोच आहे. प्रत्येक जीव त्याचाच अंश आहे. प्रत्येक वस्तूत, घटनेत आणि प्राण्यात (अर्थात् स्वत:मध्येदेखील)

८) साहित्य-वेदांतासारखे साहित्य ९) हेंकाडपिसे-एककल्ली, खुळचट १०) येळीलसे-कंटाळवाणे.

अंतरात्म्याच्या अस्तित्वाची, सत्तेची जाणीव जागी ठेवून वागणे हे चंचल आत्मनिवेदन होय. (तिसरा) मायानिर्मित चंचळ सगळे स्वप्नाकार असून ते दिसत असले तरी खऱ्या अर्थाने नाही. अर्थात् मी देखील नाही. अशा रीतीने मी नाहीसा होऊन निराकार व निश्चल ब्रह्माशी तदाकार होणे यास निश्चळ आत्मनिवेदन म्हणतात. साधकाने जड आत्मनिवेदनापासून आरंभ करून अखेर निश्चळ आत्मनिवेदनामध्ये स्वतः विलीन व्हायचे असते. या समासात प्रारंभी लेखनक्रियेबद्दल मूलभूत विचार मांडला आहे.

## ||श्रीराम||

**रेखेचें [१] गुंडाळें केलें। मात्रुकाक्षरीं[२] शब्द जाले। शब्द मेळऊन चाले। श्लोक गद्य प्रबंद ।।१।।**

वेड्यावाकड्या रेषातूनच अक्षरे तयार होतात. पुढे त्या अक्षरातून शब्द तयार होतात. अनेक शब्द लिहून श्लोक, गद्य, प्रबंध (लिहून) होतात.

**वेदशास्त्रें पुराणें। नाना काव्यें निरूपणें। ग्रंथभेद अनुवादणें। किती म्हणोनि ।।२।।**

वेद, शास्त्रे, पुराणे, नाना प्रकारची काव्ये, निरुपणे असे नाना ग्रंथांचे पुष्कळ भेद होतात. ते सर्व सांगणे शक्य नाही.

**नाना ऋषी नाना मतें। पाहों जातां असंख्यातें। भाषा लिपी जेथ तेथें। काये उणें ।।३।।**

अनेक ऋषींची अनेक मते आहेत. त्यांचीही संख्या बरीच आहे. अनेक भाषा आहेत. त्यांच्या लिप्याही आहेत. त्यामुळे ग्रंथांना वाण नाही. जेथे तेथे भरपूर ग्रंथ आहेत.

**वर्ग[३] ऋचा श्रुति स्मृति। अधे[४] स्वर्ग[५] स्तबक[६] जाती। प्रसंग मानें समास पोथी। बहुधा नामें ।।४।।**

ऋग्वेदातील अध्यायांचे पोटभेद (वर्ग), (ऋग्वेदमंत्र) ऋचा, (उपनिषदे) श्रुती, स्मृती (आधेय) अध्याय, सर्ग, स्तबक (चंपुकाव्याचे भाग), प्रसंग, माने, समास (पोथ्यामधील प्रकरणे), पोथी अशी ग्रंथभेदांची नावे आहेत.

**नाना पदें नाना श्लोक। नाना वीर नाना कडक। नाना साख्या दोहडे अनेक। नामाभिधानें ।।५।।**

नाना पदे, श्लोक, वीर व कडक (हिंदुस्थानी भाषेतील छंद) साक्या, दोहे अशी अनेक नावे आहेत.

**डफगाणें माचिगाणें[७]। दंडिगाणें कथागाणें। नाना मानें नाना जसनें[८]। नाना खेळ ।।६।।**

डफगाणे, ढोलग्याचे गाणे, दिंडी गाणे, कथेतील गाणे इत्यादि गायनप्रकार आहेत. अनेक (जसने) आडकथा अनेक खेळ, असे गाण्यांचे प्रकार आहेत.

**ध्वनि घोष नाद रेखा[९]। चहु वाचामध्यें देखा। वाचारूपेंहि ऐका। नाना भेद ।।७।।**

ध्वनि, घोष, नाद व रेखा हे चारी वाणीत असणारे भेद आहेत. वैखरीमध्येही चार भेद आहेत ते ऐका.

१) रेखेचे-रेषेचे २) मात्रुका क्षरी-कानामात्रा दिल्याने ३) वर्ग - ऋग्वेदातील अध्यायांचे पोटभेद ४) अधे-अध्याय ५) स्वर्ग-काव्याचे भाग ६) स्तबक-पोथीतील प्रकरणाचे नाव ७) माचिगाणे-एक प्रकारचे दिंडीगाणे ८) जसने-आडकथा ९) ओवी ७ प्रथम चरण- प्रथम ध्वनी नंतर घोष. तोच प्रगल्भ होऊन-नाद उत्पन्न होतो-त्या आवाजाची रेषा-लिपीरूपाने उमटते.

**उन्मेष[१०] परा, ध्वनि पश्यंती। नाद मध्यमा, शब्द चौथी। वैखरी पासून उमटती। नाना शब्दरत्नें ।।८।।**

जाणिवेचे मूळ स्फुरण जेथे होते ती परावाचा केवळ स्फूर्तिरूप आहे. पश्यन्ती ही ध्वनिरूप, मध्यमा नादरुप आणि वैखरी ही शब्दरुप आहे. वैखरीतून अनेक शब्द उत्पन्न होतात. प्रत्यक्ष प्रगट होतात.

**अकार उकार मकार। अर्धमात्राचें अंतर। औटमात्रा[११] तदनंतर। बावन मात्रुका ।।९।।**

अकार, उकार, मकार या तीन मात्रा व चंद्रबिंदू ही अर्धीमात्रा मिळून साडेतीन मात्रा (म्हणजे ॐ) व त्यापासून पुढे 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत बावन्न वर्ण निर्माण झाले. (यात १६ स्वर आणि ३६ व्यंजने आहेत.)

**नाना भेद रागज्ञान। नृत्यभेद तानमान। अर्थभेद तत्वज्ञान। विवंचना ।।१०।।**

त्या वर्णापासून नादभेद, रागज्ञान, नर्तनभेद, तानमान (ताल व तान यांचे ज्ञान), अर्थभेद आणि तत्त्वज्ञानाचे विविध विचार हे सारे प्रगट झाले. (शब्दांच्या मूलभूत सहाय्यातूनच यांची निर्मिती झाली हे विसरता येत नाही.)

**तत्वांमध्यें मुख्य तत्व। तें जाणावें शुद्धसत्व। अर्धमात्रा महत्तत्व। मूळमाया ।।११।।**

सर्व तत्त्वांमध्ये मुख्य तत्त्व शुद्धसत्त्व असून त्यालाच अर्धमात्रा, महत्‌तत्त्व किंवा मूळमाया असे म्हणतात. (साडेतीन मात्रांचा तत्त्वांमध्ये 'ॐ' त्यामध्ये अकार तमोगुण, उकार रजोगुण, मकार सत्त्वगुण असून यात मुख्य तत्त्व अर्धमात्रा हा शुद्ध सत्त्वगुण असून त्यालाच मूळमाया अशी संज्ञा आहे.)

**नाना तत्वें लाहान थोरें। मिळोन अष्टहि शरीरें। अष्टधा प्रकृतीचें वारें। निघोन जाते ।।१२।।**

पिंड व ब्रह्मांड यांचे प्रत्येकी चार देह असून त्यांची एकत्रित संख्या आठ होते. पिंडाचे स्थूळ, सूक्ष्म, कारण (अज्ञान) आणि महाकारण (ज्ञान) हे चार देह आहेत तर ब्रह्मांडाचे विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत आणि मूळप्रकृती हे चार देह आहेत. हे देह नाना तत्त्वांचे बनले आहेत. (त्रिगुण आणि पंचमहाभूते ही अष्टधाप्रकृती ही मुख्य तत्त्वे आहेत) अष्टधा प्रकृतीमध्ये जाणीवरुप वायु असतो. तो चांचल्य स्वभावामुळे विराम पावतो.

**वारें नस्तां जें गगन। तैसें परब्रह्म सघन। अष्ट देहाचें निर्शन। करून पाहावें ।।१३।।**

वायु नसताना आकाश एकजिनसी केवळपणाने भासमान होते तसेच परब्रह्मही घनदाट भासते. पिंडब्रह्मांडाच्या अष्टदेहांचे निरसन झाल्यावर परब्रह्म तेवढे उरते हा अनुभव घ्यावा. (द. १० स. ५ याचा संदर्भ येथे आहे)

**ब्रह्मांडपिंडउभार। पिंडब्रह्मांडसंव्हार। दोहिवेगळें सारासार। विमळब्रह्म ।।१४।।**

पिंड ब्रह्मांड यांची उभारणी व संहारणी (किंवा मूळ मायेपासून स्थूल देहापर्यंत अष्टदेह

१०) उन्मेष-स्फूर्ती ११) औटमात्रा-अ, उ, म आणि वरील चंद्रबिंदू मिळून साडेतीन मात्रा

यांचा विचार करून उलट दिशेने त्यांचा निरास करून) यांच्या व्यतिरिक्त जे शिल्लक उरते ते विमलब्रह्म होय. (द. २०-१० याचा संदर्भ)

**पदार्थ जड, आत्मा चंचळ। विमळब्रह्म तें निश्चळ। विवरोन विरे तत्काळ। तद्रूप होये ।।१५।।**

दृश्य पदार्थ पंचभूतात्मक असल्याने ते जड मानले जातात. अंतरात्मा हा चंचल आहे; आणि त्याही पलीकडे निश्चल, शाश्वत असे विमलब्रह्म आहे. यांच्या तिहींच्या संबंधात विवरण करून विमलब्रह्मात तद्रुप व्हावे. (याच आत्मनिवेदनाचे चढते तीन प्रकार आहेत. त्यांची कल्पना पुढे दिली आहे.)

**पदार्थ मनें काया वाचा। मी हा अवघाचि देवाचा। जड आत्मनिवेदनाचा। विचार ऐसा ।।१६।।**

प्रकार १ ला जडआत्मनिवेदन - काया, वाचा, मनेकरुन साऱ्या पदार्थांसह मी सर्वस्वी देवाचा आहे अशी भावना ठेवून जगणे म्हणजे जड आत्मनिवेदन आहे.

**चंचळ कर्ता[१२] तो जगदीश। प्राणीमात्र त्याचा अंश। त्याचा तोचि आपणास-। ठाव नाहीं ।।१७।।**

**चंचळ आत्मनिवेदन। याचें सांगितलें लक्षण। कर्ता देव तो, आपण-। कोठेंचि नाहीं ।।१८।।**

प्रकार २ चंचल आत्मनिवेदन - अंतरात्मा हा दृश्य विश्वाची चालकशक्ती आहे. सर्व प्राणीमात्र त्याचे अंश आहेत. तो अंतरात्माच सर्व सत्तारूप आहे. त्यामुळे आपणास म्हणजे 'मी'पणा बाळगण्यास जागाच नाही. देव हाच कर्ता करविता असल्याने आपण स्वतंत्रपणे कोठेच नसतो असे चंचल आत्मनिवेदनाचे लक्षण सांगितले आहे. (आपल्या कर्तेपणाची भावना मुळीच न ठेवता जगणे हा भावार्थ)

**चंचळ चळे स्वप्नाकार। निश्चळ देव तो निराकार। आत्मनिवेदनाचा प्रकार। जाणिजे ऐसा ।।१९।।**

प्रकार ३ रा निश्चळ निवेदन - चंचल हे स्वप्नाप्रमाणेच क्षणिक असते. त्यामुळे ते अशाश्वत असते. निश्चळ देव हा शाश्वत असून निराकार आहे. निश्चळ आत्मनिवेदनाचा विचार असा आहे.

**ठावचि नाहीं चंचळाचा। तेथें आधीं आपण कैंचा। निश्चळ आत्मनिवेदनाचा। विवेक ऐसा ।।२०।।**

चंचळ मुळातच जर मिथ्या आहे तर तेथे 'मी'पणाने वावरणारा चंचळ जीव असणे संभवतच नाही. म्हणून मी व माझे काहीच नाही. फक्त केवळ निश्चळ परब्रह्म आहे. माझ्या ठिकाणी चंचळाला ठावच नाही. अशा प्रकारचा अनुभव घेणे हे निश्चळ आत्मनिवेदन समजावे. (हे दृश्य विश्व चंचळ आहे असे शास्त्रात म्हटले जाते. ते वास्तविक झालेलेच नाही. फक्त परब्रह्म तेवढेच सत्य आहे अशा अजातवादाच्या पक्क्या जाणिवेत राहाणे हे निश्चळ आत्मनिवेदन होय.)

**तिहिं प्रकारें आपण । नाहीं, नाहीं दुजेपण। आपण नस्तां, मीपण। नाहींच कोठें ।।२१।।**

तिन्ही प्रकारच्या आत्मनिवेदनात आपल्या मीपणास वेगळे स्थान नाही. आपण वेगळेपणाने उरत नसल्याने मीपण कोठेही आढळत नाही.

१२) चंचळ कर्ता-अंतरात्मा

**पाहातां पाहातां अनुमानलें। कळतां कळतां कळों आलें। पाहातां अवघेंचि निवांत जालें। बोलणें आतां ।।२२।।**

विचार करता करता तर्क निघतो आणि समजता समजता समजून पटते. अंतरी निश्चळ ब्रह्माकार होताच आपली वाचा मौन धारण करते. (परब्रह्माचे सत्यस्वरुप शोधण्याचा यत्न सुरू केल्यावर प्रथम थोडीशी कल्पना आली. त्या कल्पनेबद्दल सूक्ष्म विचार सुरू केल्यावर हळूहळू त्याच्या स्वरुपाचे प्रथम थोडेसे आकलन झाले. परंतु नंतर अधिक विचारानंतर त्याचा साक्षात अनुभव आला तेव्हा मात्र मनाची चंचलता संपली. मनःशांती प्राप्त होऊन बोलणेच खुंटले! हा या ओवीचा भावार्थ)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिवेदननाम समास पंचम।।५।।**

## द. १३-१ : आत्मानात्मविवेक

साधकाने आत्मानात्मविवेक करावा. जगात अनंत शरीरधारी प्राणी आहेत. त्यांचे जीवन पाहून विवेक केला तर असे दिसते की, प्राणी म्हणजे देह व आत्मा यांचा संयोग होय. देह दृश्य, जड व अनित्य असतो तर आत्मा अदृश्य, सूक्ष्म व नित्य असतो. आत्म्यावाचून देह प्रेत होतो तर देहावाचून आत्मा अज्ञात राहतो. देहाच्या द्वारा आत्मा अनेक क्रिया घडवून आणतो. शरीराचे, इंद्रियाचे, मनाचे, बुद्धीचे सर्व व्यापार आत्मा घडवून आणतो. चांगले-वाईट सामाजिक प्रसंग आत्मा घडवून आणतो. जसा विद्येमध्ये तसा अविद्येमध्ये तोच आनंदरूप आत्मा हजर असतो. जगात घडणाऱ्या सर्व घडामोडींचे मूळ कारण सूक्ष्म अशा आत्म्यामध्ये आहे, हे ज्ञानी पुरुष ओळखतात. तो आत्मा पिंडामध्ये जीव म्हणून तर ब्रह्मांडामध्ये शिव म्हणून राहतो. त्याच्याहि पलीकडे अर्धनारीनटेश्वर असतो. साधकाने आपली वृत्ती सूक्ष्मात नेता नेता अखेर मूळमायेपर्यंत न्यावी.

### ।। श्रीराम।।

**आत्मानात्मविवेक करावा। करून बरा विवरावा। विवरोन सुदृढ धरावा। जीवामध्यें ।।१।।**

साधकाने आत्मा कोण आणि अनात्मा कोण याचे नीट मनन करावे आणि असे केल्यावर ते अंतःकरणामध्ये दृढ धरावे.

**आत्मा कोण अनात्मा कोण। त्याचें करावें विवरण। तेंचि आतां निरूपण। सावध ऐका ।।२।।**

आत्मा कोण व अनात्मा कोण याचे विवरण आता येथे करीत आहे. ते निरुपण सावधपणे ऐकावे.

**च्यारि खाणी च्यारि वाणी। चौऱ्यासि लक्ष जीवप्राणी। संख्या बोलिली पुराणीं। वर्तती आतां ।।३।।**

चार खाणींच्या (अंडज, स्वेदज, जारज, उद्भिज) व चार वाणींच्या (परा, पश्यंती, मध्यमा,

वैखरी) मिळून ८४ लक्ष जीवयोनी आहेत. अशी संख्या पुराणात सांगितली आहे, व ते वर्णन प्रचलित आहे.

**नाना प्रकारीचीं शरीरें। सृष्टींत दिसती अपारें। तयांमधें निर्धारें। आत्मा कवणु ।।४।।**

सृष्टीमध्ये नाना प्रकारची शरीरे दिसतात त्यांच्यामध्ये आत्मा कोणता (व तो कोणते कार्य करतो) हे निश्चयपूर्वक शोधून काढावे. शरीराला जिवंत ठेवणारी, इंद्रियांना चेतना देणारी, मनाच्या व्यापारांना प्रेरणा देणारी, बुद्धीला विचार करावयास प्रवृत्त करणारी, आणि जीवपणाने नाना सुखदुःखे भोगणारी, उद्वेग, चिंता, माया, ममता अनुभवणारी जी मुख्य चित्कला तो आत्मा होय.

**दृष्टीमधें पाहातो। श्रवणामध्यें ऐकतो। रसनेमध्यें स्वाद घेतो। प्रत्यक्ष आतां ।।५।।**

(तो आत्मा) देहात राहून डोळ्यांनी पाहातो, कानांनी ऐकतो आणि जिभेने पदार्थाची चव प्रत्यक्षपणे घेतो. (याच्या पुढील ओव्यांमध्ये शरीराला जिवंत ठेवून, इंद्रियांना चेतना देणारा, विचाराला प्रवृत्त करणारा आत्मा कोणते कार्य करीत असतो त्याचे समर्पक वर्णन केले आहे. तोच आत्मा पिंडामध्ये जीव व ब्रह्मांडामध्ये शिव म्हणून ओळखला जातो.)

**घ्राणामधें वास घेतो। सर्वांगीं तो स्पर्शतो। वाचेमधें बोलवितो। जाणोनि शब्द ।।६।।**

तो नाकाने वास घेतो, सर्व शरीराला झालेला स्पर्श जाणतो, शब्दाचा अर्थ जाणून घेतो आणि वाचेने शब्द बोलतो.

**सावधान आणि चंचळ। चहूंकडे चळवळ। येंकलाचि चालवी सकळ। इंद्रियेंद्वारां ।।७।।**

तो आत्मा सावध आणि चंचळ असतो तो एकटाच इंद्रियांच्या सहाय्याने शरीराची सर्व चळवळ चालवितो. (आत्म्याच्या सत्तेवरच शरीराचे सारे व्यवहार चालतात)

**पाये चालवी हात हालवी। भृकुटी पालवी[१] डोळा घालवी[२]। संकेतखुणा बोलवी। तोचि आत्मा ।।८।।**

तो पायांनी चालवितो, हात हालवितो, तो भुवयांची हालचाल करतो, डोळे झाकतो, संकेत चिन्हाने मनातील विचार व्यक्त करतो.

**धिटाइ[३] लाजवी खाजवी। खोंकवी वोकवीं थुंकवी। अन्न जेऊन उदक सेवी। तोचि आत्मा ।।९।।**

धीटपणा करतो, लाजवितो, खाजवितो, खोकतो, थुंकावयास लावतो, अन्नसेवन केल्यावर पाणी पिण्यास प्रवृत्त करतो तोच आत्मा.

**मळमूत्र त्याग करी। शरीरमात्र सावरी। प्रवृत्ति निवृत्ति विवरी। तोचि आत्मा ।।१०।।**

तो आत्मा, मळमूत्र विसर्जन करवितो, शरीराचा तोल सावरुन धरतो, प्रवृत्ती व निवृत्ती यांचे विवरण करतो.

**ऐकें देखे हुंगे चाखे। नाना प्रकारें वोळखे। संतोष पावे आणी धाके[४]। तोचि आत्मा ।।११।।**

१) पालवी-ताणतो २) घालवी-मिचकावतो ३) धिटाई-धीट होतो ४) धाके-भितो

ऐकतो, पाहातो, हुंगतो, चाखतो (चव घेतो), अनेक प्रकाराने पदार्थांचे गुणधर्म ओळखतो. आनंदी होतो किंवा धास्ती घेतो तो आत्माच होय.

**आनंद विनोद उदेग[५] चिंता। काया छ्याया[६] माया ममता। जीवित्वें पावे नाना वेथा। तोचि आत्मा ।।१२।।**

आनंद, विनोद, उद्वेग, चिंता यांचे अनुभव घेतो. स्वतःची छायाच असणाऱ्या देहाबद्दल भ्रमाने ममता धरतो. वरील विकारांशी अत्यंत आपुलकीने एकत्व पावून नाना प्रकारच्या व्यथांचा धारक बनतो तोच आत्मा.

**पदार्थाची आस्था धरी। जनीं वाईट बरें करी। आपल्यां राखे पराव्यां मारी। तोचि आत्मा ।।१३।।**

दृश्य पदार्थांची आवड धरतो, लोकांमध्ये बरे किंवा वाईट कर्म करतो, स्वतः आप्तांचे रक्षण करतो व परक्यांना मारतो तोच आत्मा असतो.

**युध्यें होतां दोहिंकडे। नाना शरीरीं वावडे। परस्परें पाडी पडे। तोचि आत्मा ।।१४।।**

युद्ध सुरू झाले असता उभय बाजूंच्या शरीरात तोच वावरतो, आत्माच एकमेकांना पाडतो किंवा पडतो.

**तो येतो जातो देहीं वर्ततो। हासतो रडतो प्रस्तावतो। समर्थ करंटा होतो। व्यापासारिखा ।।१५।।**

तो देहामध्ये येतो, देहातून जातो व देहात रहातो, तो हसतो, रडतो व पश्चात्ताप पावतो. आणि व्यापाप्रमाणे श्रीमंत किंवा भिकारी होतो.

**होतो लंडी[७] होतो बळकट। होतो विद्यावंत होतो धट[८]। न्यायवंत होतो उत्धट। तोचि आत्मा ।।१६।।**

भित्रा, बळकट, विद्वान किंवा मूर्ख होतो. न्यायी किंवा उद्धट होतो तोच आत्मा.

**धीर उदार आणि कृपण। वेडा आणि विचक्षण[९]। उछक[१०] आणि सहिष्ण[११]। तोचि आत्मा ।।१७।।**

धैर्यशाली, उदार, कंजूष, वेडा, शहाणा, उच्छृंखल, सहिष्णू असाही तो होतो.

**विद्या कुविद्या दोहिकडे। आनंदरूप वावडे। जेथें तेथें सर्वांकडे। तोचि आत्मा ।।१८।।**

सुविद्या किंवा कुविद्या या दोन्हीमध्ये आत्मा असतो. आनंदरुपाने तो सर्वत्र वावरतो. जेथे तेथे सर्वांमध्ये असतो तो आत्मा.

**निजे उठे बैसे चाले। धांवे धावडी[१२] डोले तोले। सोइरे धायेरे केले। तोचि आत्मा ।।१९।।**

निजतो, उठतो, बसतो, चालतो, धावतो, धाववितो, डोलतो, तोलतो, सगेसोयरे करतो तो आत्माच होय.

**पोथी वाची अर्थ सांगे। ताळ धरीं गाऊं लागे। वादवेवाद वाउगे। तोचि आत्मा ।।२०।।**

५) उदेग-उद्वेग ६) छ्याया-आत्म्याची छाया-जीवपण ७) लंडी-भ्याड ८) धट-दांडगा ९) विचक्षण-चतुर १०) उछक-उच्छृंखल ११) सहिष्ण-सहिष्णू १२) धावडी-तातडी

पोथी वाचतो, व अर्थ सांगतो, गाण्याला ताल धरतो किंवा गाऊ लागतो, नाहक वादविवाद करतो तो आत्माच.

**आत्मा नस्तां देहांतरीं। मग तें प्रेत सचराचरीं। देहसंगें आत्मा करी। सर्व कांहीं ।।२१।।**

देहामध्ये आत्मा नसेल तर चराचरांमध्ये ते प्रेतच आहे. देहाच्या संगतीने आत्माच सर्व काही करीत असतो.

**येकेंविण येक काये। कामा नये वायां जाये। म्हणोनि हा उपाये। देहयोगें ।।२२।।**

देहाशिवाय आत्मा किंवा आत्म्याशिवाय देह काहीच कामाचा नाही तो व्यर्थ असतो. म्हणून देह व आत्मा यांची युती करून सृष्टिव्यवहार करण्याचा उपाय आहे. (दोन्ही उपयुक्त होण्याचा युती हाच उपाय आहे)

**देह अनित्य आत्मा नित्य। हाचि विवेक नित्यानित्य। अवघें सूक्ष्माचें कृत्य[१३]। जाणती ज्ञानी ।।२३।।**

देह हा अनित्य असून आत्मा नित्य (शाश्वत) आहे. हेच विवेकाने जाणणे म्हणजे नित्यानित्य विवेक होय. सर्व व्यवहार केवळ सूक्ष्म आत्मसत्तेवर चालतात हे ज्ञानी माणसे ओळखतात.

**पिंडी देहधर्ता जीव। ब्रह्मांडीं देहधर्ता शिव। ईश्वरतनुचतुष्टये[१४] सर्व। ईश्वर धर्ता ।।२४।।**

पिंडातील चार देह धारण करणारा आत्मा म्हणजे जीव तर ब्रह्मांडीय चार देह धारण करणारा तो आत्मा शिव (किंवा ईश्वर) होय. (पिंडातील चार देह स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण तर ब्रह्मांडाचे विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूळ माया हे चार देह आहेत.)

**त्रिगुणापर्ता जो ईश्वर। अर्धनारीनटेश्वर। सकळ सृष्टीचा विस्तार। तेथून जाला ।।२५।।**

तो ईश्वर (मूळ माया) त्रिगुणांच्या पलीकडे असून त्याला अर्धनारीनटेश्वर म्हणतात. त्याच्यापासून सर्व विश्वाचा विस्तार झाला आहे.

**बरवें विचारून पाहीं। स्त्री पुरुष तेथें नाहीं। चंचळरूप येतें कांहीं। प्रत्ययासी ।।२६।।**

अर्धनारीनटेश्वर असे म्हटले तरी तेथे स्त्री व पुरुष असा भेद नसतो. हे विचार करून समजून घ्यावे. थोडेसे चंचळपण अनुभवास येते इतकेच.

**मुळीहून सेवटवरी। ब्रह्मादि पिप्लीका[१५] देहधारी । नित्यानित्य विवेक चतुरीं। जाणिजे ऐसा ।।२७।।**

मूळमायेपासून शेवटपर्यंत म्हणजे ब्रह्मादि देवापासून मुंगीपर्यंत जेवढे देहधारी आहेत त्या सर्वांच्या ठिकाणी (देह अनित्य, आत्मा नित्य) हा नित्यानित्य भेद ज्ञात्यांनी पहावा.

**जड तितुकें अनित्य। आणि सूक्ष्म तितुकें नित्य। याहिमध्यें नित्यानित्य। पुढें निरोपिलें ।।२८।।**

---

१३) अवघे सूक्ष्माचे कृत्य। (ओवी क्र. २३) सारासार विचार करण्याचे काम फार सूक्ष्म असते ते सूक्ष्म आत्म्याकडूनच होते. जगातील साऱ्या घटना सूक्ष्म आत्म्याकडूनच घडतात. १४) तनुचतुष्टय-विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूळ प्रकृति १५) पिप्लीका- पिपीलिका, मुंगी.

जड असते ते अनित्य आणि सूक्ष्म ते नित्य हा नियम आहे. त्याच्यामध्येही नित्य काय व अनित्य काय हे पुढे सांगितले आहे.

**स्थूळ सूक्ष्म वोलांडिलें। कारण माहाकारण सांडिलें। विराट हिरण्यगर्भ खंडिलें। विवेकानें ।।२९।।**

पिंडाचे चार देह ओलांडून पुढे ब्रह्मांडाचे तीन देह मागे टाकून चौथा देह जो मूळमाया तेथे नित्यानित्यविवेकाने प्रवृत्ति जाऊन बसली. ती वृत्ती त्या मूळमायेपासूनही सोडवून तेथे निवृत्ती कशी साधावी हे पुढे सांगतो.

**अव्याकृत मूळप्रकृती। तेथें जाऊन बैसली वृत्ती। ते वृत्ति व्हावया निवृत्ति। निरूपण ऐका ।।३०।।**

पिंडातील स्थूळ, सूक्ष्म ओलांडून कारण व महाकारण देहांनाही मागे टाकले आणि विवेकाने ब्रह्मांडातील विराट, हिरण्यगर्भ या दोन देहांचे खंडण विवेकाने केले. त्यानंतर अव्याकृत व मूळप्रकृती या ठिकाणी वृत्ती जाऊन बसली ती नाहिशी होण्यासाठी पुढील निरुपण ऐका. (वृत्तीचीही निवृत्ती होण्यासाठी त्याच्या पलीकडे जाण्यासाठी उपाय पुढील समासात सांगितला आहे.)

**आत्मानात्मविवेक बोलिला। चंचळात्मा प्रत्यया आला। पुढिले समासीं निरोपिला। सारासार विचार ।।३१।।**

याप्रमाणे आत्मानात्मविवेक सांगितला. त्यात अंतरात्मा चंचळरुप असल्याचा प्रत्यय आला. आता पुढल्या समासात सारासारविचार सांगितला आहे.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मानात्मविवेकनाम समास प्रथम ।। १।।**

⁂ ⁂

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका ९

**(द. १२-४ विवेकवैराग्यनिरूपण, १२-५ आत्मनिवेदन, १३-१ आत्मानात्मविवेक वर आधारित)**

प्र. १ पुढील अर्थाच्या ओव्या लिहा.

(१) विवेकाने 'मी'पणा आणि वैराग्याने प्रपंचाची आसक्ती सुटते, अशा प्रकारे बंधनमुक्त होतो तोच निःसंग योगी.

(२) वारा नसताना आकाश जसे केवळपणाने राहते त्याप्रमाणे अष्टदेहांचे निरसन झाल्यावर दाट परब्रह्म उरते, याचा अनुभव पहावा.

(३) अगदी मुंगीपासून ब्रह्मादि देवांपर्यंत सगळे देहधारी आहेत.

प्र. २ संदर्भासह खालील ओव्यांचे स्पष्टीकरण करा.

(अ) तिहींप्रकारें आपण। नाहीं नाहीं दुजेपण।। १२-५-२१

(ब) येकेंवीण येक काये। कामा नये वायां जाये।। १३-१-२२

प्र. ३ ''वैराग्याच्या अभावी विवेक पांगळा होतो तर विवेकाच्या अभावी वैराग्य दुराग्रही असते.'' या विधानाचे स्पष्टीकरण द. १२-४ च्या आधाराने करा.

प्र. ४ (द. १३-१-५ ते २० या ओव्यांच्या आधारे) शरीराच्या संसर्गाने आत्मा कोणत्या क्रिया करतो; त्यांचे वर्णन करा.

प्र. ५ द. १२-४ मध्यें श्रीसमर्थांचे जणू स्वतःचेच प्रतिबिंब आपणास आढळते, अशा दोन ओव्या लिहा.

# स्वाध्याय १० वा

## (द. १-४,५; ८-९)

यात, 'सद्गुरुस्तवन' 'संतस्तवन' आणि 'सिद्धलक्षण' हे तीन समास आपणास अभ्यासावयाचे आहेत. सद्गुरुस्तवन हा इतका गोड समास आहे की तो खरोखर आपण पाठ करावा. जे डोळ्यांना दिसत नाही, शब्दात व्यक्त करता येत नाही असे परमात्मस्वरूप प्रचीतीला आणून देणारे ते सद्गुरु. 'समूळ अज्ञानाचा ठाव। पुसून टाकी।' हे त्यांचे अमोल कार्य. ही गोष्ट अत्यंत अलंकारिक भाषेत श्रीसमर्थांनी येथे सजविली होती.

महाराष्ट्र ही जशी शूरांची तसेच संतांची भूमी आहे. त्याचे वर्णनच 'संतस्तवन' समासात आहे. 'जे त्रैलोकी नाहीं दान। तें करिती संतसज्जन।।' हा ओवीचा चरण आपल्या चिंतनाचा विषय व्हावा.

संत आणि सद्गुरु हे आपणास ओळखता आले पाहिजेत. त्या दृष्टीने 'सिद्धलक्षण' हा समास अभ्यासक्रमात आहे. निर्भयता, निःस्पृहता आणि निःसंदेहावस्था या गुणत्रयींनी अलंकारित ज्या विभूती असतील त्यांना सिद्धावस्था प्राप्त झालेली असते. केवळ जटा, दाढी आणि बाह्यवेष यावरून साधू ओळखू नये. भोंदूपणा करणारे आणि समाजात गुरू 'बाजी' करणारे खूप आढळतात. पण अनेकजण त्यांच्या आहारी जातात! हा धोका अभ्यासार्थींना ओळखता आला पाहिजे...

### द. १-४ : सद्गुरुस्तवन

ईश्वराच्या निश्चळ अंगाचे, ज्ञानमय स्वरूपाचे किंवा गणपतीचे वर्णन झाले. ईश्वराच्या चंचळ अंगाचे, शक्तिमय स्वरूपाचे किंवा शारदेचे वंदन झाले. श्री समर्थ आता श्रीसद्गुरूला वंदन करतात. स्थलकालांच्या मर्यादित वावरणाऱ्या विश्वाला परमात्मा आतबाहेर व्यापून आहे हे खरे, पण तेवढ्याने तो संपत नाही. या विश्वाने जर परमात्मा संपला तर तो अनंत राहणार नाही.

व्यक्ती व विश्व यांना व्यापून तो शिल्लक उरतो. तो किती शिल्लक उरतो हे आजपर्यंत कोणालाच कळले नाही. असे ते कल्पनातीत आणि अनंत परमात्मस्वरूप म्हणजे संतांचा सद्‌गुरु होय. परमात्मा कसा आहे हे माणसाला कधीच सांगता येत नाही; पण त्याचे वर्णन करण्याचा प्रयत्न केल्यावांचून त्याला चैन पडत नाही. दृश्य विश्वामधील सूर्य, समुद्र, आकाश, पृथ्वी इत्यादि अत्यंत विशाल वस्तूंचा दाखला घेऊन मानवी बुद्धी त्या अनंताला कवटाळण्याची खटपट करते. ती धडपड तोकडी पडते. अर्थात परमात्मस्वरूप कसे आहे हे सांगण्याची धडपड करून हार खाल्ल्यावर ''त्याचे वर्णन करता येत नाही हेच त्याचे वर्णन होय'' असे म्हणून थांबावे लागते. या समासात हीच गोष्ट श्रीसमर्थांनी सुंदर रीतीने समजाविली आहे.

मानवी जीवनाला सार्थकता प्राप्त करून देणारे सद्‌गुरु कसे असतात त्याचे वर्णन करणारा अध्यात्मवाङ्मयाला ललामभूत होणारा हा समास आता आपण अभ्यासणार आहोत. जणू श्रीसमर्थांचे स्वरुप-वर्णनच यात आहे, असे श्रीसमर्थ सांप्रदायिकांना वाटते.

## ।। श्रीराम ।।

**आतां सद्‌गुरु वर्णवेना। जेथें माया स्पर्शों सकेना। तें स्वरूप मज अज्ञाना। काय कळे ।।१।।**

ब्रह्मस्वरुपाचे वर्णन करता येत नाही कारण ते मायेच्या कक्षेपलीकडील आहे. त्याप्रमाणेच सद्‌गुरुंचेही वर्णन करणे शक्य नाही. ते स्वरुप माझ्यासारख्या अज्ञानाला कसे कळणार? ('गुरुः साक्षात् परं ब्रह्म' त्यामुळे वर्णन करता येणे अशक्य हा भावार्थ)

**न कळे न कळे नेति नेति। ऐसें बोलतसे श्रुती। तेथें मज मूर्खाची मती। पवाडेल कोठें ।।२।।**

प्रत्यक्ष श्रुतीसुद्धा 'असे नव्हे, असे नव्हे' असे त्या स्वरूपाबद्दल म्हणतात. असे असताना माझ्यासारख्या मूर्खाला त्या स्वरुपाचे आकलन ते काय होणार? व मी ते शब्दात कसे सांगू शकणार? (श्रीसमर्थांनी सामान्य माणसाची भूमिका येथे घेतली आहे)

**मज न कळे हा विचारु। दुऱ्हूनि माझा नमस्कारु। गुरुदेवा पैलपारु। पाववीं मज ।।३।।**

म्हणून मला हा विचार न कळल्यामुळे दुरुनच त्या स्वरुपाला वंदन करून असे म्हणतो की ''गुरुदेवा आपण मला भवसागराच्या पैलतीराला न्यावे.''

**होती स्तवनाची दुराशा[१]। तुटला मायेचा भर्वसा। आतां असाल तैसे असा। सद्‌गुरु स्वामी ।।४।।**

सद्‌गुरुस्तुती करावी ही मला आशा होती पण ती दुराशा ठरली कारण ज्या मायेचा भरवसा धरून ही आशा केली तो भरवसाच चुकीचा ठरला. त्यामुळे 'सद्‌गुरु आता असाल तसे तुम्ही असा' याच शब्दात व्यक्त करतो.

**मायेच्या बळें करीन स्तवन। ऐसें वांछित होतें मन। माया जाली लज्यायमान। काय करूं ।।५।।**

१) दुराशा-अतर्क्याचे तर्काने स्तवन करण्याची ही अयोग्य आशा

(माया म्हणजे प्रत्यक्ष द्वैत पण असे असतानासुद्धा) मायेची मदत घेऊन आपली स्तुती करावी ही इच्छा धरली पण ती माया लाजून मागे सरली. (शब्द कुंठीत झाले) त्यामुळे मला काहीच करणे शक्य झाले नाही.

**नातुडे मुख्य परमात्मा। ह्मणौनि करावी लागे प्रतिमा। तैसा मायायोगें महिमा। वर्णीन सद्गुरुचा ।।६।।**

पण ज्याप्रमाणे मुख्य परमात्म्याचे स्वरुप मानवी बुद्धीला समजू शकत नसल्याने त्याची प्रतिमा करून पूजन केले जाते. त्याप्रमाणेच हे सद्गुरु, आपले स्वरुपाचा महिमा मायेच्या मदतीनेच वर्णन करण्याचा यत्न मी करीन.

**आपल्या भावासारिखा मनीं। देव आठवावा ध्यानीं। तैसा सद्गुरु हा स्तवनीं। स्तऊं आतां ।।७।।**

आपली जशी भावना असेल त्याप्रमाणे देवाच्या मूर्ती निर्माण करून सामान्य मनुष्य त्याचे ध्यान करतो. त्याप्रमाणे आता शब्दांच्या माध्यमातून सद्गुरुचे स्तवन करतो.

**जय जया जि सद्गुरुराजा। विश्वंभरा विश्वबीजा। परमपुरुषा मोक्षध्वजा। दीनबंधु ।।८।।**

हे सद्गुरुराजा, तू विश्वाला भरून उरणारा, विश्वाचे मूळ, मोक्षाची ध्वजा धारण केलेला परमपुरुष असून दीनबंधु आहेस. तुझा जयजयकार असो.

**तुझीयेन अभयंकरें। अनावर माया हे वोसरे। जैसें सूर्यप्रकाशें अंधारें। पळोन जाये ।।९।।**

ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशामुळे अंधार नाहिसा होतो त्याप्रमाणे न आवरणारी ही माया तुमच्या अभय देणाऱ्या हातामुळे विलय पावते.

**आदित्यें अंधकार निवारे। परंतु मागुतें ब्रह्मांड भरे। नीसी जालिया नंतरें। पुन्हां काळोखें ।।१०।।**

सूर्यप्रकाशाने अंधार नष्ट होतो पण सूर्यास्त झाल्यावर पुन्हा अंधाराने ब्रह्मांड भरून जाते व रात्र होते.

**तैसा नव्हे स्वामीराव। करी जन्ममृत्य वाव[२]। समूळ अज्ञानाचा ठाव। पुसून टाकी ।।११।।**

पण आपण स्वामीराजा सूर्याप्रमाणे आहात असे नाही. आपण अज्ञानरुपी अंधाराला समूळ नष्ट करता. जन्म, मृत्यु यांचा ठावठिकाणाच राहात नाही.

**सुवर्णाचें लोहो कांहीं। सर्वथा होणार नाहीं। तैसा गुरुदास संदेहीं। पडोंचि नेणे सर्वथा ।।१२।।**

परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते असे म्हणतात. त्या सोन्याचे पुन्हा लोखंड कधीच होत नाही. जो सद्गुरुंचा दास त्यांच्या कृपेने मुक्त होतो त्याला देहेबुद्धीमुळे निर्माण होणारे संशय कधीच येत नाहीत.

**कां सरिता गंगेसी मिळाली। मिळणी[३] होतां गंगा जाली। मग जरी वेगळी केली। तरी होणार नाहीं सर्वथा ।।१३।।**

एखादी नदी गंगेला जाऊन मिळते तेव्हा ती गंगारुपच होते. मग तिला गंगेपासून वेगळी

२) वाव-नाहीसे ३) मिळणी-संगम

करण्याचा कितीही यत्न केला तरी तो यशस्वी होणार नाही.

**परी ते सरिता मिळणीमागें। वाहाळ मानिजेत जगें। तैसा नव्हे शिष्य वेगें। स्वामीच होये ।।१४।।**

पण संगम होण्यापूर्वी त्या नदीला सामान्य नदी असेच लोक मानतात पण सद्‌गुरुंची कृपा शिष्याला एकदा झाली की तो शिष्य स्वामीच होतो.

**परीस आपणा ऐसें करीना। सुवर्णें लोहो पालटेना। उपदेश करी बहुत जना। अंकित सद्‌गुरुचा ।।१५।।**

परिसाचा स्पर्श झाल्यावर लोखंडाचे सोने होते पण त्या सोन्याचा स्पर्श लोखंडाला झाला तर त्याचे काही सोन्यात रुपांतर होत नाही. परंतु सद्‌गुरुंचा जो शिष्य त्यांच्या कृपेला पात्र झालेला असतो तो अनेकांना ब्रह्मज्ञानाचा उपदेश करतो. (यावरुन परिसाच्या दृष्टान्ताचा उणेपणा व्यक्त होतो)

**शिष्यास गुरुत्व प्राप्त होये। सुवर्णें सुवर्ण करितां न ये। म्हणौनि उपमा न साहे। सद्‌गुरुसी परिसाची ।।१६।।**

सद्‌गुरुच्या कृपेमुळे शिष्याला सद्‌गुरुपदाची प्राप्ती होते. पण परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होत असले तरी त्या सुवर्णाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होत नाही म्हणून सद्‌गुरुंना परिसाची उपमा देणे योग्य नाही.

**उपमे द्यावा सागर। तरी तो अत्यंतचि क्षार। अथवा म्हणों क्षीरसागर। तरी तो नासेल कल्पांतीं ।।१७।।**

सद्‌गुरुंना समुद्राची उपमा द्यावी तर तो खारट असतो. (पण सद्‌गुरु तर अमृतरुप असतात) त्यांना क्षीरसागराची उपमा द्यावी तर तो कल्पान्तकाळी नाश पावतो. (याउलट सद्‌गुरु हे शाश्वत असतात म्हणून ही उपमा उणी पडते)

**उपमे द्यावा जरी मेरु। तरी तो जड पाषाण कठोरु। तैसा नव्हे कीं सद्‌गुरु। कोमळ दिनाचा ।।१८।।**

मेरुची उपमा दिली तर मेरु पर्वत अतिजड, कठोर (पाषाण) आहे. सद्‌गुरु तसे नसून मनाने कोमल आहेत. दीनांचा कळवळा त्यांना येतो.

**उपमे म्हणों गगन। तरी गगनापरीस तें निर्गुण। या कारणें दृष्टांत हीण। सद्‌गुरूस गगनाचा ।।१९।।**

आकाशाची उपमा द्यावी तर आकाशाचा शून्यत्व हा गुण आहे. गुरुरूप हे निर्गुण आहे. म्हणून आकाशाची उपमा सद्‌गुरुंना लागू पडत नाही.

**धीरपणें उपमूं जगती। तरी हेहि खचेल कल्पांतीं। म्हणौन धीरत्वास दृष्टांतीं। हीण वसुंधरा ।।२०।।**

धैर्य (किंवा सोशिकता) यासाठी सद्‌गुरुंना पृथ्वीची उपमा द्यावी तर कल्पान्तकाळी पृथ्वीचा नाश होतो. सद्‌गुरु हे शाश्वत, नित्य आहेत. म्हणून त्यांच्या धैर्यगुणाला पृथ्वीचा दृष्टान्त उणा ठरतो.

**आतां उपमावा गभस्ती। तरी गभस्तीचा[४] प्रकाश किती। शास्त्रें मर्यादा बोलती। सद्‌गुरु अमर्याद ।।२१।।**

४) गभस्ती-सूर्य

आता तेजासाठी सूर्याची उपमा द्यावी तर सूर्याच्या प्रकाशालासुद्धा मर्यादा असल्याचे शास्त्रे सांगतात. (ब्रह्मांडाच्या अनंत अंतरावर सूर्यप्रकाश पोहोचू शकणार नाही) पण सद्‌गुरुंच्या ज्ञानप्रकाशाला मर्यादाच नाही.

**म्हणौनि उपमे उणा दिनकर। सद्‌गुरु ज्ञानप्रकाश थोर। आतां उपमावा फणीवर[५]। तरी तोहि भारवाही ॥२२॥**

म्हणून सूर्य हा उपमा देण्यास कमी पडतो. सद्‌गुरुंचा ज्ञानप्रकाश अतिशय थोर आहे. त्यांना शेषनागाची उपमा द्यावी तर तो भूमीचा भार वाहणारा आहे. (शेषाच्या मस्तकावर पृथ्वीचा भार असल्याचे पुराणात सांगितले आहे)

**आतां उपमें द्यावें जळ। तरी तें काळांतरीं आटेल सकळ। सद्‌गुरुरूप तें निश्चळ। जाणार नाहीं ॥२३॥**

आता जलाची उपमा द्यावी तर ते कालांतरी (प्रलयकाली) सर्व आटते. पण सद्‌गुरुरुप निश्चल व स्थिर असून ते आटणार नाही.

**सद्‌गुरूंसी उपमावें अमृत। तरी अमर[६] धरिती मृत्युपंथ। सद्‌गुरुकृपा यथार्थ। अमर करी ॥२४॥**

अमृताची उपमा द्यावी तर तेच अमृत सेवन करणारे देवही मृत्युपंथ धरतात. पण सद्‌गुरुकृपेने शिष्य खरोखरच (सायुज्यमुक्ती प्राप्त झाल्यामुळे) अमर होतो.

**सद्‌गुरूसीं म्हणावें कल्पतरु। तरी हा कल्पनेतीत विचारु। कल्पवृक्षाचा अंगिकारु। कोण करी ॥२५॥**

कल्पवृक्षाचा दृष्टान्त द्यावा तर तो फक्त आपल्या कल्पनेतील वस्तूच देतो. पण सद्‌गुरु निर्विकल्प असल्याने ते वासनाच नष्ट करतात.

**चिंता मात्र नाहीं मनीं। कोण पुसे चिंतामणी। कामधेनूचीं दुभणीं[७]। निःकामासी न लगती ॥२६॥**

गुरुकृपेने सर्व प्रकारच्या चिंताच नाश पावतात. त्यामुळे तर चिंतामणीला विचारतो कोण? निरीच्छ असलेल्या पुरुषास कामधेनूच्या प्रसन्नतेची गरजच उरत नाही. (या ओवीमध्ये चिंतामणी व कामधेनू यांच्या उपयुक्ततेची मर्यादा सांगितली आहे. चिंतामणी हे रत्न ज्याच्यापाशी असेल त्यांची चिंता नष्ट होते. पण सद्‌गुरुरूपी चिंतामणी ज्याला गवसला असेल त्याची चिंता समूळ नष्ट होते. याचप्रमाणे कामधेनूचा दृष्टान्तही उणा पडतो)

**सद्‌गुरु म्हणों लक्ष्मीवंत। तरी ते लक्ष्मी नाशिवंत। ज्याचे द्वारीं असे तिष्ठत। मोक्षलक्ष्मी ॥२७॥**

गुरुला लक्ष्मीवंत म्हणजे वैभवसंपन्न म्हणावे तर चंचल लक्ष्मी नष्ट होऊ शकते. पण गुरुपाशी मोक्षलक्ष्मी तिष्ठत उभी असल्याने अन्य वैभवाची मातब्बरी ती काय?

**स्वर्गलोक इंद्र संपती[८]। हे काळांतरीं विटंबती। सद्‌गुरुकृपेची प्राप्ती। काळांतरीं चळेना ॥२८॥**

स्वर्गलोक, आणि इंद्रादिक (उदा. कुबेर) हे सुद्धा नाशिवंत आहेत. पण गुरुकृपेमुळे झालेली प्राप्ती सर्वभक्षक काळसुद्धा नष्ट करू शकत नाही.

५) फणीवर-शेष ६) अमर-देव ७) दुभणी-पान्हा, प्रसन्नता ८) संपती-संपत्ति.

**हरीहर ब्रह्मादिक। नाश पावती सकळिक। सर्वदा अविनाश येक। सद्गुरुपद ।।२९।।**

हरिहरब्रह्मा हे देवसुद्धा काळान्तरी नाश पावतात. पण सद्गुरुपद हेच फक्त अविनाशी आहे.

**तयासी उपमा काय द्यावी। नाशिवंत सृष्टी आघवी। पंचभूतिक उठाठेवी। न चले तेथें ।।३०।।**

अशा प्रकारे सर्व पंचभूतिक विश्व नाशिवंत आहे. तेव्हा त्यातील कोणत्याही पदार्थांची/चराचराची उपमा सद्गुरुला लागू पडत नाही म्हणून ते अवर्णनीय, अनुपमेय आहेत.

**म्हणौनि सद्गुरु वर्णवेना। हे गे हेचि माझी वर्णना। अंतरस्थितीचिया खुणा। अंतर्निष्ठ जाणती ।।३१।।**

यास्तव सद्गुरुंचे वर्णन करता येत नाही. सर्व दृष्टान्त थिटे पडतात. त्यांचे वर्णन करता न येणे हेच त्यांचे वर्णन आहे. त्यांच्या कृपेची अनुभूती प्राप्त झाली असेल अशा अंतर्निष्ठांनाच त्या अनुभूतीच्या खुणा ध्यानात येतात. मायेच्या कक्षेला ओलांडून गेलेले परब्रह्मस्वरुप कोणत्याही दृष्टान्ताने समजावून देता येणार नाही. केवळ ज्ञानी महात्म्यांनाच सद्गुरुस्वरुप आकलनात येते हा भावार्थ.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सद्गुरुस्तवननाम समास चतुर्थ।।४।।**

## द. १-५ : संतस्तवन

विज्ञानप्रधान संस्कृतीमध्ये दृश्य विश्वाचे ज्ञान करून घेणाऱ्या आणि देणाऱ्या विज्ञानपंडिताला किंवा शास्त्रज्ञाला समाजातील आदर्श पुरुष मानतात. अध्यात्मप्रधान संस्कृतीमध्ये अदृश्य आत्मस्वरूपाचे ज्ञान करून घेणाऱ्या आणि देणाऱ्या ब्रह्मज्ञानी पुरुषाला किंवा संताला समाजातील आदर्श पुरुष मानतात. आत्मज्ञानी असणारा संत हाच श्रीसमर्थांचा आदर्श पुरुष आहे. सर्वसामान्य माणूस ''मी देहच आहे'' या भूमिकेवर आरूढ होऊन जीवन जगतो. त्याच्या अनुभवाचे क्षेत्र दृश्यापुरते सीमित असते. तो स्वार्थी असतो व वासनातृप्तीच्या मागे लागतो. आत्मज्ञानी माणूस ''मी आत्माच आहे'' या भूमिकेवर आरूढ होऊन जीवन जगतो. त्याच्या अनुभवाचे क्षेत्र दृश्याच्या किंवा स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून अनंताइतके विशाल बनते. म्हणून त्याला ''महात्मा'' म्हणतात. ज्ञानाग्नीमध्ये आपल्या अहंकाराची आहुती देणारा हा महात्मा अत्यंत नि:स्वार्थी असतो. वासना निर्मूळ केल्यामुळे तो पूर्ण समाधानी असतो. त्याची संतोषवृत्ति कोणत्याही परिस्थितीत एकाच पातळीवर राहते. अकारण उपकाराने भरलेले संतजीवन म्हणजे मानवी जीवनातील सर्व शुभ, मंगल आणि अभिजात प्रवृत्तीचे साकार रूप होय. संताची गाठभेट होऊन त्याचा निकट सहवास घडणे यासारखी भाग्यमय घटना नाही. अत्यंत सूक्ष्म, अदृश्य व शाश्वत अशी आत्मवस्तु अनुभवण्याची पात्रता, संगतीला राहिलेल्या माणसांना मुक्त हस्ताने देणे हेच संतांचे जगातील खरे कार्य आहे. आत्मसाक्षात्कार होण्याची

युक्ति सापडणे हीच खरी संतकृपा होय. अशा संतांचे वर्णन श्रीसमर्थ करीत आहेत.

सज्जनसंगती, सत्संग, संतसंग यांची महति अध्यात्मात सर्वत्र आढळते. संत नेमके कोणते ज्ञान समाजात देतात त्याचे मर्मग्राही वर्णन या समासातून कळेल.

**||श्रीराम||**

**आतां वंदीन सज्जन। जे परमार्थाचें अधिष्ठान[१]। जयांचेनि गुह्यज्ञान। प्रगटे जनीं ।।१।।**

परमार्थाचे जे खरे आधारभूत आहेत, ज्यांच्यामुळेच गुप्त असणारे आत्मज्ञान समाजात प्रगट होते अशा संतजनास मी वंदन करतो.

**जे वस्तु[२] परम दुल्लभ। जयेचा अलभ्य लाभ। तेंचि होये सुल्लभ। संतसंगेंकरूनी ।।२।।**

परब्रह्म हे अत्यंत दुर्लभ असून त्याचा लाभ सहजी होणे अशक्य असते. पण संतसंगामुळे ती दुर्लभ वस्तु सुलभ रीतीने मिळते.

**वस्तु प्रगटचि असे। पाहातां कोणासीच न दिसे। नाना साधनीं सायासें। न पडे ठाईं ।।३।।**

वास्तविक पाहिले तर आत्मवस्तु तर प्रगटच आहे पण देहबुद्धीमुळे ती (चर्मचक्षूंना तर) कधीच दिसत नाही. अनेक साधने व सायास केले तरी ती प्राप्त होत नाही.

**जेथें परीक्षवंत ठकले। नांतरी डोळसचि अंध जाले। पाहात असतांचि चुकले। निजवस्तूसी ।।४।।**

हरतऱ्हेची पारख करणारे तज्ज्ञ असतात पण ते आत्मवस्तूच्या बाबतीत फसतात. डोळे असूनसुद्धा (डोळस माणसांना) याबाबतीत आपण अंध असल्याचा अनुभव येतो. स्वत:पाशीच असलेली ही आत्मवस्तु पाहण्यात चूक होते.

**जें दीपाचेनि दिसेना। नाना प्रकाशें गवसेना। नेत्रांजनेंहि वसेना। दृष्टीपुढें ।।५।।**

दीपांच्या प्रकाशाने ती आत्मवस्तू दिसत नाही. नाना प्रकारच्या (तीव्र, सौम्य) प्रकाशाने सापडत नाही. नेत्रांजन घालण्याचा उपाय केला तरी ती दृष्टीस पडत नाही.

**सोळां कळी पूर्ण शशी। दाखऊं शकेना वस्तूसी। तीव्र आदित्य कळारासी[३]। तोहि दाखवीना ।।६।।**

सोळा कलांचा पूर्णचंद्र असो किंवा प्रखर सूर्य सर्व प्रकारच्या कळा (किंवा आधुनिक भाषेतील 'फ्रीक्वेन्सीज') असतानासुद्धा ती वस्तू दाखवू शकत नाही.

**जया सूर्याचेनि प्रकाशें। ऊर्णतंतु[४] तोहि दिसे। नाना सूक्ष्म पदार्थ भासे। अणुरेणादिक ।।७।।**

(भिंतीवर कोळीष्टके करणाऱ्या) कोळ्याच्या अंगातून बाहेर येणारा तंतू बारीक असला तरी सूर्यप्रकाशाने दिसतो इतकेच नव्हे तर अणू-रेणू सारखे सूक्ष्म कणही दिसतात.

**चिरलें वाळाग्र[५] तेंहि प्रकासी। परी तो दाखवीना वस्तूसी। तें जयाचेनि साधकांसी। प्राप्त होये ।।८।।**

१) अधिष्ठान-आश्रय २) वस्तु-ब्रह्म ३) कळारासी-दैदिप्यमान ४) ऊर्णतंतु-कोळिष्टकाचा सूक्ष्म धागा ५) वाळाग्र-केसाचे अग्र

त्याहीपेक्षा केसाच्या टोकाचा छेद घेतला तरीसुद्धा सूर्यप्रकाशात तो दिसू शकतो. पण तो आत्मवस्तू प्रकाशित करून दाखवू शकत नाही. ती वस्तू संतांच्या कृपेने साधकांना प्राप्त होते.

**जेथें आक्षेप आटले। जेथें प्रेत्न प्रस्तावले। जेथें तर्क मंदावले। तर्कितां निजवस्तूसी ।।९।।**

आत्मवस्तूचे प्राप्तीसाठी केलेली अनुमाने संपून जातात, प्रयत्न (स्वतःच) थकून जातात आणि तर्क करण्याचा प्रयत्न केल्यास तर्कही मंदावतो. (अनुमान या शब्दाचा अर्थ संशय असा अध्यात्मात केला जातो. तर अनुमान म्हणजे निष्कर्ष हा सध्याचा अर्थ आहे.)

**वळे विवेकाची वेगडी[६]। पडे शब्दाची बोबडी। जेथें मनाची तांतडी। कामा नये ।।१०।।**

जेथे विवेकाची बेगडी होते म्हणजे तो आकुंचित होतो; निष्प्रभ होतो, जेथे शब्दांची बोबडी वळते, मनाच्या चळवळीचा उपयोग होत नाही असे ते आत्मस्वरुप आहे.

**जो बोलकेपणें विशेष। सहस्र मुखांचा जो शेष। तोहि सिणला निःशेष। वस्तु न संगवे ।।११।।**

पुराणात म्हटले आहे की शेषनागाला सहस्त्रमुखे असून दोन हजार जिव्हा आहेत. त्यामुळे बोलकेपणाच्या बाबतीत तो सर्वश्रेष्ठ आहे. पण तोही आत्मवस्तूचे वर्णन करताना थकून गेला व तिचे वर्णन त्याला करता आले नाही.

**वेदे प्रकाशिलें सर्वही। वेदविरहित कांहीं नाहीं। तो वेद कोणासही। दाखऊं सकेना ।।१२।।**

वेदाने जगामध्ये ज्ञान प्रगट केले. वेदविरहित असे ज्ञानच नाही पण तो वेदही आत्मवस्तू प्रगट करू शकत नाही, कोणासच दाखवू शकत नाही.

**तेचि वस्तु संतसंगें। स्वानुभवें कळों लागे। त्याचा महिमा वचनीं सांगे। ऐसा कवणु ।।१३।।**

पण अशा आत्मवस्तूचा साधकाला संतसंगतीने अनुभव प्राप्त होतो. त्यामुळे या सत्संगाचा महिमा शब्दात सांगू शकेल असा माणूस नाही.

**विचित्र कळा ये मायेची। परी वोळखी न संगवे वस्तूची। मायातीता अनंताची। संत सोये सांगती ।।१४।।**

माया ही अनंत ब्रह्मांडे निर्माण करू शकणारी विचित्र कलेची शक्ती आहे तरी या 'अघटित घटनापटीयसी' मायेला आत्मवस्तूची ओळख सांगता येत नाही. मायातीत ब्रह्माचा अनुभव संतच सांगू शकतात!

**वस्तूसी वर्णिलें नवचे। तेंचि स्वरूप संतांचें। या कारणें वचनाचें। कार्य नाही ।।१५।।**

परब्रह्माच्या स्वरुपाचे वर्णन करता येत नाही. तेच स्वरुप संतांचेही असते. त्यामुळे त्यांच्याही वर्णनासाठी मायेच्या कक्षेतील शब्द कामास येऊ शकत नाहीत. (तथापि संतांचे स्वरुप पुढे वर्णन केले आहे)

**संत आनंदाचें स्थळ। संत सुखचि केवळ। नाना संतोषाचें मूळ। ते हे संत ।।१६।।**

६) वेगडी-गुंडाळी

संत हे आनंदाचे स्थान आहेत. ते केवळ सुखरुप आहेत व नाना प्रकारच्या संतोषाचे मूळ तेच असतात.

**संत विश्रांतीची विश्रांती। संत तृप्तीची निजतृप्ती। नांतरी भक्तीची फळश्रुती। ते हे संत ।।१७।।**

संतांच्या ठायी अखंड विश्रांती व नित्य तृप्तीची अवस्था असते किंवा भक्ती करण्यापासून मिळणारी फलश्रुती संत हे स्वतःच आहेत.

**संत धर्माचें धर्मक्षेत्र। संत स्वरूपाचें सत्पात्र। नांतरी पुण्याची पवित्र। पुण्यभूमी ।।१८।।**

तीर्थक्षेत्र ज्याप्रमाणे धर्म जागृत ठेवते त्याप्रमाणे संतही धर्म जागृत ठेवतात. स्वस्वरुपाची ओळख संतांच्या ठिकाणी होते. संत पुण्याची पुण्यभूमीच आहेत. (त्यांच्याकडून पुण्यच घडते)

**संत समाधीचें मंदिर। संत विवेकाचें भांडार। नातरी बोलिजे माहेर। सायोज्यमुक्तीचें ।।१९।।**

समाधीरुपी देवतेचे मंदिर म्हणजे संतांचा देहच आहे. त्यांच्या ठायी आत्मानात्म विवेकाचे भांडार आहे. सायुज्यमुक्ती माहेरपणासाठी त्यांच्या घरी येते. (ही एक रम्य कल्पना आहे.)

**संत सत्याचा निश्चयो। संत सार्थकाचा जयो। संत प्राप्तीचा समयो[७]। सिद्धरूप ।।२०।।**

संत हे सत्याचा मूर्तिमंत निश्चय म्हणजेच जन्मसाफल्याचे मूर्तिमंत दर्शनच होत. संतांची भेट होणे म्हणजेच आत्मवस्तूची प्राप्ती होण्याची वेळ आपणहून चालत येणे होय.

**मोक्षश्रिया आळंकृत। ऐसे हे संत श्रीमंत। जीव दरिद्री असंख्यात। नृपती केले ।।२१।।**

मोक्षरुपी संपत्तीने नटलेले संत मोठे आगळेच श्रीमंत असतात. असंख्य दरिद्री लोकांना ते राजासारखे श्रीमंत करतात. (मोक्षलक्ष्मीची उधळण संत सामान्य जनांवर करतात हा भावार्थ)

**जे समर्थपणें उदार। जे कां अत्यंत दानशूर। तयांचेनि हा ज्ञानविचार। दिधला न वचे ।।२२।।**

ज्ञानदानामध्ये संत दानशूर असतात. कारण ते अत्यंत उदार असतात. अशा संतांकडून आत्मज्ञान मिळणार नाही असे कसे घडू शकेल? (त्यांच्याकडूनच आत्मज्ञान मिळणे शक्य आहे)

**माहांराजे चक्रवती। जाले आहेत पुढें होती। परंतु कोणी सायोज्यमुक्ती। देणार नाहीं ।।२३।।**

आजवर जगामध्ये पुष्कळ मोठमोठे राजे आणि चक्रवर्ती (सम्राट) होऊन गेले, सध्या आहेत व पुढेही होतील. (ते हरतऱ्हेची दाने देऊही शकतील) पण सायुज्यमुक्ती त्यांच्याकडून मिळू शकणार नाही.

**जें त्रैलोकीं नाहीं दान। तें करिती संतसज्जन। तयां संतांचें महिमान। काय म्हणौनि वर्णावें ।।२४।।**

सायुज्यमुक्तीसारखे दान साऱ्या त्रैलोक्यामध्ये कोणीही करू शकत नाही. ते दान केवळ संतसज्जनच करू शकतात. त्यांची थोरवी किती म्हणून सांगावी!

७) ओवी २० मधील 'संतप्राप्तीचा समयो'-संतांची कृपा होताच सिद्धरूप स्वरूपाचा साक्षात्कार होतो.

**जें त्रैलोक्याहून वेगळें। जें वेदश्रुतीसी नाकळे। तेंचि जयांचेनि वोळे। परब्रह्म अंतरीं ।।२५।।**

वेदश्रुतींनासुद्धा ज्याचे आकलन झाले नाही ते त्रैलोक्यावेगळेच असणारे आत्मज्ञान संतांच्या कृपेने साधकांच्या अंतःकरणात प्रगट होते.

**ऐसी संतांची महिमा। बोलिजे तितुकी उणी उपमा। जयांचेनि मुख्य परमात्मा। प्रगट होये ।।२६।।**

असा हा संतांचा महिमा आहे. तो व्यक्त करण्यास कोणतीही उपमा दिली तरी ती अपूर्ण ठरते! संतांच्यामुळे मुख्य परमात्मा अंतःकरणामध्ये प्रगट होतो. (या समासाच्या प्रस्तावनेमधील पहिल्या दोन ओव्यांमध्ये हेच सांगितले आहे)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे संतस्तवननाम समास पंचम।।५।।**

## द. ८-९ : सिद्धलक्षण

रात्रंदिवस आत्मस्वरूपाचे ध्यान व चिंतन केल्याने साधकाचे मन त्या स्वरूपाने आतबाहेर भरून जाते. अत्यंत सूक्ष्म आत्मस्वरूपाच्या अनुसंधानात सदैव गुंतलेले मन आपोआपच अत्यंत सूक्ष्म बनते. काही कालाने त्यामध्ये आमूलाग्र बदल घडून ते उन्मन होते. उन्मनीमध्ये ज्ञाता व ज्ञेय, द्रष्टा व दृश्य, मी व तू किंवा देव व भक्त हा द्वैतभाव उरत नाही. मग विश्वामधील द्वैत, भेद किंवा दृश्य वस्तूंचा पसारा डोळ्यांपुढे दिसत असूनसुद्धा त्यामध्ये आत्मस्वरूपच दिसते, नव्हे अनुभवास येते. याचा अर्थ असा की, साधकाचे अज्ञान नाहीसे होते व तो बसल्या जागीच ब्रह्मस्वरूप होतो. म्हणून देहबुद्धीचा नाश = आत्मज्ञान = परमात्मस्वरूपाचे ज्ञान = सर्व भूतमात्रांमध्ये आपणच आत्मस्वरूपाने भरून आहोत असा अनुभव. सारांश, सर्व भूतमात्रांच्या ठिकाणी एकच एक आत्मा समत्वाने वावरतो. अशा प्रत्यक्ष अनुभवावर कायम आरूढ होणारा पुरुष खरा सिद्ध होय. त्याची लक्षणे या समासामध्ये वर्णन केली आहेत. खरे सांगायचे तर सिद्धाचे सिद्धपण त्याच्या निर्दोष, निर्मम, निःस्वार्थ, निष्काम, निर्मल, सम आणि अत्यंत पवित्र अशा अंतरंगात असते. ही अवस्था इतकी खाजगी व सूक्ष्म असते की शब्दाने ती सांगता येत नाही. सर्व चराचरामध्ये आत्मरूपाने मीच भरून आहे अशा अवस्थेत ''दुसरा'' शिल्लक उरत नाही. ''दुसरा'' म्हटला की द्वैत येते व ती अवस्था तशी राहात नाही. इतकेच नव्हे तर ''मला ही अवस्था आली'' असेदेखील म्हणता येत नाही. बृहदारण्यक उपनिषदामध्ये याज्ञवल्क्याने सिद्धावस्थेचे असे वर्णन केले आहे - ''यत्र हि द्वैतमिव भवति तदितर इतरं पश्यति....जिघ्रती.... श्रृणोति...विजानाति।... यत्र त्वस्य सर्वम् आत्मैवाभूत तत्केन कं पश्येत्....जिघ्रेत्....श्रृणुयात्.... विजानीयात्। .....विज्ञातारम् अरे केन विजानीयात्। एतावद् अरे खलु अमृतत्त्वम् इति।। अर्थ - द्रष्टा व दृश्य हे द्वैत होते तोपर्यंत द्रष्टा दृश्याला पाहात होता, हुंगीत होता, ऐकत होता आणि ओळखत होता. पण जेव्हा सर्व आत्ममय झाले तेव्हा कोण कोणास पाहणार, हुंगणार, ऐकणार

आणि ओळखणार! जो स्वतःच स्वतःला जाणतो त्याला जाणणारा आणखी कोण आहे? मैत्रेयी, अमर जीवन हे असे आहे.'' अंतर्यामी स्वस्वरूपाशी समरस असून बाहेर साधकाप्रमाणे वर्तन करणारा तो सिद्ध होय. आपण स्वतः उत्तम साधक बनल्यावांचून सिद्धाची अवस्था बरोबर ध्यानात येणे कठीण आहे.

## ||श्रीराम||

स्वाध्याय ६ मध्ये साधकलक्षणे आपण अभ्यासली आहेत. आता त्यापुढील 'सिद्धलक्षणांची अवस्था' आपण येथे पहाणार आहोत.

**अंतरीं गेलियां अमृत। बाह्य काया लखलखीत। अंतरस्थिति बाणतां संत। लक्षणें कैसीं ।।१।।**

अमृत प्राशन केल्यानंतर बाह्य शरीरसुद्धा सतेज होते. त्याप्रमाणे आत्मदर्शन झाले असेल अशा संताची ब्राह्मी अवस्था प्राप्त झाल्यावर लक्षणे कशी असतात?

**जालें आत्मज्ञान बरवें। हें कैसेनि पां जाणावें। म्हणोनि बोलिलीं स्वभावें। साधुलक्षणें ।।२।।**

एखाद्याला शुद्ध आत्मज्ञान झाले असल्याचे कसे ओळखावे? ते समजावे म्हणून पुढे लक्षणे सांगितली आहेत.

**ऐक सिद्धांचें लक्षण। सिद्ध म्हणिजे स्वरूप जाण। तेथें पाहातां वेगळेपण। मुळींच नाहीं ।।३।।**

आता सिद्धांचे लक्षण ऐक. जो ब्रह्मस्वरूप असतो तो सिद्ध जाणावा. सिद्ध आणि ब्रह्मस्वरुप यामध्ये थोडेसुद्धा वेगळेपण नाही.

**स्वरूप होऊन राहिजे। तया नांव सिद्ध बोलिजे। सिद्धस्वरूपींच साजे। सिद्धपण ।।४।।**

जो स्वस्वरुपाकार झालेला असतो त्याला सिद्ध असे म्हणतात. ब्रह्मस्वरुप झालेल्यांना सिद्धपणा शोभून दिसतो.

**वेदशास्त्रीं जें प्रसिद्ध। सस्वरूप स्वतसिद्ध। तयासिच बोलिजे सिद्ध। अन्यथा न घडे ।।५।।**

वेदशास्त्रात असे म्हटले आहे की आत्मस्वरुप हे स्वयंभू आहे. त्या स्वरुपाशी जो तदाकार बनतो त्यालाच सिद्ध म्हणावे. इतरांना तो शब्द लावता येत नाही.

**तथापी बोलों कांहीं येक। साधकास कळाया विवेक। सिद्धलक्षणाचें कौतुक। तें हें ऐसें असे ।।६।।**

तथापि साधकांना त्याबद्दलचा विचार कळावा म्हणून थोडेसे सांगतो. सिद्धपणाच्या लक्षणांचे वर्णन कौतुकाने करतो ते असे आहे.

**अंतरस्थित[१] स्वरूप जाली। पुढें काया कैसी वर्तली। जैसी स्वप्नीची नाथिली। स्वप्नरचना ।।७।।**

अंतरस्थिती स्वस्वरुपाकार झाल्यावर पुढे देहाचे वर्तन कसे होते? तर स्वप्नामध्ये दिसणारे

१) अंतरस्थित-अंतरस्थिती, जाणीव

दृश्य खोटे असले तरी तेवढ्यापुरते तरी खरे वाटते त्याप्रमाणे सिद्धाचा देह जगाचे मिथ्यापण जाणून व्यवहार करीत राहातो.

**तथापी सिद्धांचें लक्षण। कांहीं करूं निरूपण। जेणें बाणे अंतर्खूण। परमार्थाची ।।८।।**

तरीपण सिद्धाच्या लक्षणांचे थोडेसे वर्णन करतो. त्या वर्णनामुळे परमार्थाचे वर्म अंतःकरणात थोडेसे प्रगट होईल.

**सदा स्वरूपानुसंधान। हें मुख्य साधूचें लक्षण। जनीं असोन आपण। जनावेगळा ।।९।।**

सर्वकाळ स्वस्वरुपाचे अनुसंधान असणे हे साधूचे मुख्य लक्षण आहे. तो देहाने जनात वावरला तरी तो सर्वाहून निराळा असतो.

**स्वरूपीं दृष्टी पडतां। तुटोन गेली संसारचिंता। पुढे लागली ममता। निरूपणाची ।।१०।।**

स्वस्वरुपात दृष्टी राहिल्यामुळे त्याला प्रापंचिक चिंता मुळीच रहात नाही आणि निरुपण करण्याची किंवा ऐकण्याची गोडी त्याला लागते.

**हें साधकाचें लक्षण। परी सिद्धाआंगीं असे जाण। सिद्धलक्षण साधकेंविण। बोलोंच नये ।।११।।**

वास्तविक हे साधकाचे लक्षण आहे तरी ते सिद्धाच्या अंगी असते. हे योग्यच आहे. कारण मनुष्य साधक झाल्याविना तो पुढे सिद्ध होऊच शकत नाही.

**बाह्य साधकाचें परी। आणी स्वरूपाकार अंतरीं। सिद्धलक्षण तें चतुरीं। जाणिजे ऐसें ।।१२।।**

म्हणून बाहेरुन जरी तो साधक वाटला तरीपण अंतर्यामी तो ब्रह्मस्वरुपी असतो. हे सिद्धाचे लक्षण चतुरांनी ध्यानात ठेवावे.

**संदेहरहित साधन। तेंचि सिद्धांचें लक्षण। अंतर्बाह्य समाधान। चळेना ऐसें ।।१३।।**

निःसंशय मनाने साधन करणे हे सिद्धलक्षण आहे. त्यांच्या मनाचे समाधान कधीच ढळत नाही. (निःसंदेहावस्था हे पहिले लक्षण)

**अचळ जाली अंतरस्थिती। तेथें चळणास कैंची गती। स्वरूपीं लागतां वृत्ती। स्वरूपची जाली ।।१४।।**

अंतरस्थिती ब्रह्माकार किंवा अचळ झाल्यामुळे त्याचे मन अस्वस्थ कधीच होत नाही. एकदा ब्रह्माकार अंतरस्थिती झाली की ती बदलत नाही.

**मग तो चळतांच[२] अचळ। चंचळपणें निश्चळ। निश्चळ असोन, चंचळ । देह त्याचा ।।१५।।**

मग त्याच्या देहाने हालचाल केली तरी तो अचळच असतो. देह जरी चंचळ झाला तरी तो स्वस्थच असतो. (स्व-स्थित म्हणजे स्वस्थच असतो)

**स्वरूपीं स्वरूपचि जाला। मग तो पडोनिच राहिला। अथवा उठोनि पळाला। तरी चळेना ।।१६।।**

सिद्ध आत्मस्वरुपात अंतर्यामी स्थिर झाला असल्याने त्याचा देह पडूनच राहिला किंवा उठून

२) चळतांच-हालचाल होत असता

पळाला तरी सर्व अवस्थात तो स्थिर असतो.

**येणें कारण अंतरस्थिती। अंतरींच पाहिजे निवृत्ती। अंतर लागलें भगवंतीं। तोचि साधु ।।१७।।**

याचे कारण सिद्धाची अंतरस्थिती हेच होय. अंतरंगातच बाह्य सृष्टीबद्दल निवृत्ती झाली पाहिजे. ज्याची वृत्ती भगवंताकडे लागते तोच साधू होय.

**बाह्य भलतैसें असावें। परी अंतर स्वरूपीं लागावें। लक्षणें दिसती स्वभावें। साधुआंगीं ।।१८।।**

बाहेर देहाची कोणतीही स्थिती असली तरी अंत:करण स्वस्वरुपात विलीन झालेले असावे. म्हणजे (साधकाच्या) अंगी सिद्धलक्षणे आपोआप व्यक्त होतात.

**राजीं बैसतां अवलिळा[३]। आंगीं बाणे राजकळा। स्वरूपीं लागतां जिव्हाळा। लक्षणें बाणती ।।१९।।**

राज्यावर बसणाऱ्याला राजतेज सहजच प्राप्त होते. त्याप्रमाणे ब्रह्मस्वरुपाच्या ठिकाणी अंत:करण आरुढ झाले की सिद्ध लक्षणे अंगी उमटतात.

**येरव्हीं अभ्यास करितां। हाता न चढती सर्वथा। स्वरूपीं राहावें तत्त्वतां। स्वरूप होऊनी ।।२०।।**

एरव्ही त्या लक्षणांचा अभ्यास करून ती प्राप्त होणार नाहीत. म्हणून ब्रह्मस्वरुपाशी तदाकार होऊन तद्रूप व्हावे.

**अभ्यासाचा मुगुटमणी। वृत्ती राहावी निर्गुणीं। संतसंगें निरुपणीं। स्थिती बाणे ।।२१।।**

निर्गुण स्वरुपाचे ठिकाणी वृत्ति स्थिर होणे हा सर्वश्रेष्ठ अभ्यास (अभ्यासाचा मुगुटमणी) आहे. संतसंगतीत सतत श्रवणमनन केले तर ही अवस्था प्राप्त होते.

**ऐसीं लक्षणें बरवीं। स्वरूपाकारें अभ्यासावीं। स्वरूप सोडितां गोसावी। भांबावती[४] ।।२२।।**

या लक्षणांचा अभ्यास तदाकार होऊन करावा. स्वरुपस्थिती सोडल्यावर चांगले साधकही गोंधळून जातात.

**आतां असो हें बोलणें। ऐका साधूचीं लक्षणें। जेणें समाधान बाणे। साधकाआंगीं ।।२३।।**

आता हे बोलणे पुरे. साधूची लक्षणे ऐका. ती ऐकल्यामुळे साधकाच्या अंगी समाधान बाणते.

**स्वरूपीं भरतां कल्पना। तेथे कैंची उरेल कामना। म्हणौनियां साधुजना। कामचि नाहीं ।।२४।।**

साधूच्या कल्पनेमध्ये केवळ ब्रह्मकल्पनाच शिरली असल्यामुळे तेथे कसलीही अन्य कामना कशी राहील? म्हणून साधू निष्काम असतो.

**कल्पिला विषयो हातींचा जावा। तेणें गुणें क्रोध यावा। साधुजनाचा अक्षै[५] ठेवा। जाणार नाहीं ।।२५।।**

एखादा विषय आपण मनात कल्पितो आणि तो हातचा गेला तर क्रोध येतो. पण स्वरुपप्राप्ती हा साधूचा अक्षय ठेवा असतो. तो हातचा जात नाही.

३) अवलिळा-अकस्मात ४) भांबावती-गोंधळून जातात ५) अक्षै-अक्षय

**म्हणोनि ते क्रोधरहित। जाणती स्वरूप संत। नासिवंत हे पदार्थ। सांडुनियां ।।२६।।**

म्हणून साधू क्रोधरहित असतो. सगळे नाशिवंत पदार्थ दूर करून शाश्वत असे स्वस्वरुप साधू जाणतात. (तेथे कामक्रोधादि विकारच नसतात.)

**जेथें नाहीं दुसरी परी। क्रोध यावा कोणावरी। क्रोधरहित सचराचरीं। साधुजन वर्तती ।।२७।।**

जेथे द्वैताचा भावच नाही तेथे रागावणार तरी कोणावर? म्हणून चराचरामध्ये क्रोधरहित जीवन साधू जगतात.

**आपुला आपण स्वानंद। कोणावरी करावा मद। याकारणें वादवेवाद। तुटोन गेला ।।२८।।**

स्वस्वरुपाच्या आनंदामध्ये असलेल्या साधूला दुसऱ्यापाशी गर्व (अहंकार, मद) करण्यास सवडच नसते. त्यामुळे वादविवादाला तेथे स्थानच नसते.

**साधु स्वरूप निर्विकार। तेथें कैंचा तिरस्कार। आपला आपण मत्सर। कोणावरी करावा ।।२९।।**

स्वरुपी विकार नसतात. साधूही स्वस्वरुपाकार झाल्याने तेही निर्विकार असतात. द्वैताची भावनाच नसल्याकारणाने साधू कोणाचाही तिरस्कार करीत नाहीत. त्यांना सर्वत्र आपले आपणच असल्याचे जाणवते मग मत्सर कोणाचा करणार ?

**साधु वस्तु अनायासें। याकारणें मत्सर नसे। मदमत्सराचें पिसें[६]। साधुसी नाहीं ।।३०।।**

साधू सहजी ब्रह्मरुपच झाल्यामुळे त्यांना मत्सर नसतो. मदमत्सराचे वेडेपण साधूंच्या अंगी असत नाही. (किंवा असूच शकत नाही हा आत्मैक्य बुद्धीचा परिणाम आहे.)

**साधु स्वरूप स्वयंभ[७]। तेथें कैंचा असेल दंभ। जेथें द्वैताचा आरंभ। जालाच नाहीं ।।३१।।**

साधू अंतर्यामी स्वस्वरुपाकार झालेला असतो. ही अवस्था सर्वव्यापी, स्वयंभू अशी असते. तेथे द्वैतभावाला वावच नसतो. दुसरा कोणी असेल तरच दंभ दाखविता येतो. पण जेथे अन्य कोणी नसेलच तेथे दंभ असू शकत नाही. म्हणून साधू दांभिक असत नाही.

**जेणें दृश्य केलें विसंच[८]। तयास कैंचा हो प्रपंच। याकारणें निःप्रपंच। साधु जाणावा ।।३२।।**

दृश्य सृष्टीचा निरास केल्यामुळेच साधू स्वरुपाकार होतो. त्यामुळे त्याला प्रपंच कोठला असणार? म्हणून साधूला प्रपंच नसतो.

**अवघें ब्रह्मांड त्याचें घर। पंचभूतिक हा जोजार। मिथ्या जाणोन सत्वर। त्याग केला ।।३३।।**

सगळे ब्रह्मांड हेच साधूचे घर असते. सर्व पंचभूतात्मक प्रकृतीचा पसारा अशाश्वत म्हणून त्याने तिचा सत्वर त्याग केलेला असतो.

**याकारणें लोभ नसे। साधु सदा निर्लोभ असे। जयाची वासना समरसे। शुद्धस्वरूपीं ।।३४।।**

याकारणाने साधूला लोभ नसतो तो निर्लोभ असतो. त्याची वासना शुद्ध ब्रह्मस्वरुपामध्ये

६) पिसे-खूळ ७) स्वयंभ-स्वयंभू ८) विसंच-नाहीसे, नष्ट

समरस झालेली असते.

**आपुला आपण आघवा। स्वार्थ कोणाचा करावा। म्हणोनि साधु तो जाणावा। शोकरहित ।।३५।।**

साधू सर्वत्र आपला आपणच असल्यामुळे त्याने स्वार्थ कशाचा करावा? म्हणून साधू स्वार्थरहित आणि शोकरहित असतो.

**दृश्य सांडून नासिवंत। स्वरूप सेविलें शाश्वत। याकारणें शोकरहित। साधु जाणावा ।।३६।।**

नाशवंत दृश्यसृष्टी ओळखून साधू तिच्यापासून दूर झालेला असतो. तो शाश्वत स्वस्वरुपामध्ये आत्मस्वरुपाचे सेवन करीत असतो. म्हणून तो शोकमुक्त असतो.

**शोकें दुखवावी वृत्ती। तरी ते जाहाली निवृत्ती। म्हणौनि साधु आदिअंतीं। शोकरहित ।।३७।।**

साधूची वृत्तीच निवृत्त झालेली असल्यामुळे दुःखाची वृत्तीच त्याच्या ठायी निर्माण होत नाही. म्हणून तो आरंभापासून अखेरपर्यंत शोकरहित असतो.

**मोहें झळंबावें[९] मन। तरी तें जाहालें उन्मन। याकारणें साधुजन। मोहातीत ।।३८।।**

मोहामुळे मन पछाडले जावे असे साधूच्या बाबतीत कधी होतच नाही. कारण मनाचे उन्मन होऊन ते आत्मस्वरुपी मिळून गेलेले असते. म्हणून साधू मोहाच्या पलिकडे राहतो.

**साधु वस्तु अद्वये। तेथें कैंचें वाटेल भये। परब्रह्म तें निर्भये। तोचि साधु ।।३९।।**

परमात्मस्वरुपात अद्वैत अवस्था असते. दुसरे काही असेल तरच भीती वाटणार ना? परमात्मवस्तू निर्भय असते तसाच साधूही निर्भय असतो.

**याकारणें भयातीत। साधु निर्भय निवांत। सकळांस मांडेल अंत। साधु अनंतरूपी ।।४०।।**

या कारणाने साधू भयातीत असतो व निवान्त असतो. सर्वांचा शेवटी अंत होईल पण साधू अनंतस्वरुपी असतात.

**सत्यस्वरूपें अमर जाला। भये कैंचें वाटेल त्याला। याकारणें साधुजनाला। भयेचि नाहीं ।।४१।।**

साधू सत्यस्वरुपी असतात. त्यामुळे अमर असतात. अमरपणामुळे त्याला कशाची भीतीच नसते. या कारणाने साधू भयापासून अलिप्त असतो.

**जेथें नाहीं द्वंद्वभेद। आपला आपण अभेद। तेथें कैंचा उठेल खेद। देहबुद्धीचा ।।४२।।**

जेथे भेद नाही, आपले आपण अभेद आहोत अशी साधूची अंतरिक अवस्था असल्याने देहबुद्धीजन्य दुःख साधूला असू शकत नाही.

**बुद्धीनें नेमिलें निर्गुणा। त्यास कोणीच नेईना। याकारणें साधुजना। खेदचि नाहीं ।।४३।।**

निर्गुण परब्रह्म हेच शाश्वत असल्याचा साधूंचा निश्चय झालेला असतो. निर्गुण हे कोणी उचलून

९) झळंबावे-पछाडले जावे

नेईल अशी वस्तू नाही. त्यामुळे साधूंना खेद होत नाही.

**आपण येकला ठाईंचा। स्वार्थ करावा कोणाचा। दृश्य नस्तां स्वार्थाचा। ठावचि नाहीं ।।४४।।**

सर्वत्र आपणच भरून राहिलो आहोत असा अनुभव घेणाऱ्या साधूनी स्वार्थ कोणासाठी करावा? दृश्यच नाहिसे झाल्याने स्वार्थाला ठावच राहात नाही.

**साधु आपणचि येक। तेथें कैंचा दुःखशोक। दुजेविण अविवेक। येणार नाहीं ।।४५।।**

साधूना द्वैत ठाऊकच नसते. त्यामुळे दुःख, शोक कसा होणार? द्वैत नसल्यामुळे अविवेक उत्पन्न होत नाही. त्यामुळे दुःख उद्भवतच नाही.

**आशा धरिता परमार्थाची। दुराशा तुटली स्वार्थाची। म्हणोन नैराशता[१०] साधूची। वोळखण ।।४६।।**

परमार्थाची आस धरली की स्वार्थाची दुराशा राहात नाही. म्हणून आशारहितता ही साधू ओळखण्याची खूण आहे.

**मृदपणें जैसें गगन। तैसें साधूचें लक्षण। याकारणें साधुवचन। कठीण नाहीं ।।४७।।**

आकाश ज्याप्रमाणे मृदु असते तसाच साधूचा स्वभाव असतो. साधूचे भाषण कधीच कठोर नसते.

**स्वरूपाचा संयोगीं। स्वरूपचि जाला योगी। याकारणें वीतरागी। निरंतर ।।४८।।**

ब्रह्मस्वरुपाशी एकरुप होण्याचा प्रयत्न करणारा योगी स्वतः ब्रह्मस्वरुपच होतो. तेथे दृश्य पदार्थाला ठावच नाही. त्यांचे आकर्षण नसल्याने योगी अथवा संत अनासक्त असतात.

**स्थिति बाणतां स्वरूपाची। चिंता सोडिली देहाची। याकारणें होणाराची। चिंता नसे ।।४९।।**

स्वस्वरुपाची अवस्था अंगी बाणल्यामुळे देहाच्या संबंधातील काळजी साधूला नसते. त्यामुळे भवितव्याची कसलीही चिंता साधूला नसते.

**स्वरूपीं लागतां बुद्धी। तुटे अवघी उपाधी। याकारणें निरोपाधी। साधुजन ।।५०।।**

स्वस्वरुपाकारात बुद्धीचा लय झाल्यामुळे साधूजनांची सर्व उपाधी संपते. म्हणून साधू निरुपाधिक असतात.

**साधु स्वरूपींच राहे। तेथें संगचि न साहे। म्हणौनि साधु तो न पाहे। मानापमान ।।५१।।**

ब्रह्मस्वरुपात साधू रहात असल्यामुळे त्या ठिकाणी अन्य संगतीच नसते. त्यामुळे देहाचा संबंधही नसल्याने साधू मानापमान जाणत नाही.

**अलक्षास लावी लक्ष। म्हणोन साधु परम दक्ष । वोढूं जाणती कैपक्ष। परमार्थाचा ।।५२।।**

ब्रह्मस्वरुप अलक्ष असतानासुद्धा तेथे लक्ष लावतो. म्हणून साधू अत्यंत तत्पर असतो. परमार्थाचा कैवार कसा घ्यावा हे साधूला उत्तम समजते.

---

१०) नैराशता-आशारहीतता

**स्वरूपीं न साहे मळ। म्हणौन साधु तो निर्मळ। साधु स्वरूपचि केवळ। म्हणोनियां ।।५३।।**

स्वस्वरुपाला कसलाही मळ लागत नाही. त्या स्वरुपाशी समरस झालेला साधू निर्मळ असतो.

**सकळ धर्मामधें धर्म। स्वरूपीं राहाणें हा स्वधर्म। हेंचि जाणिजे मुख्य वर्म। साधुलक्षणाचें ।।५४।।**

सर्व धर्मांमध्ये श्रेष्ठ धर्म म्हणजे स्वस्वरुप होऊन राहाणे हाच होय. साधूंची जी लक्षणे आतापर्यंत सांगितली आहेत. त्या सर्वांचे कारण म्हणजे साधूंचे परब्रह्माशी लीन होणे हेच होय. (लक्षणे हा त्याचा परिणाम होय.)

**धरितां साधूची संगती। आपषाच[११] लागे स्वरूपस्थिती। स्वरूपस्थितीनें बाणती। लक्षणें आंगीं ।।५५।।**

साधू संगती धरल्यामुळे आपोआपच स्वस्वरुपाशी तदाकार होता येते व तेथे तदाकारता झाली की साधूची लक्षणे साधकाच्या अंगी आपोआपच येतात.

**ऐसीं साधूचीं लक्षणें। आंगीं बाणती निरूपणें। परंतु स्वरूपीं राहाणें। निरंतर ।।५६।।**

अशी ही साधूंची लक्षणे निरुपणामुळे अंगी बाणतात. पण त्यासाठी साधकाने सर्वकाळ स्वस्वरुपाच्या संधानात राहाणे अवश्य आहे.

**निरंतर स्वरूपीं राहातां। स्वरूपचि होईजे तत्त्वतां। मग लक्षणें आंगीं बाणतां। वेळ नाहीं ।।५७।।**

निरंतर स्वस्वरुपात राहाण्याचा सराव करणारा साधक स्वरुपाकारच होतो. मग साधू-लक्षणे प्रगट होण्यास वेळ लागत नाही.

**स्वरुपीं राहिल्यां मती। अवगुण अवघेचि सांडती। परंतु यासी सत्संगती। निरूपण पाहिजे ।।५८।।**

स्वरुपामध्ये बुद्धि स्थिरावली म्हणजे सारे अवगुण पालटून जातात. पण त्यासाठी सत्संग आणि निरुपण-श्रवण आवश्यक आहेत.

**सकळ सृष्टीचा ठाईं। अनुभव येकचि नाहीं। तो बोलिजेल सर्वही। पुढिले समासीं ।।५९।।**

जगामध्ये सर्वांना समान अनुभव येत नाहीत. पुढील समासात तो सर्व प्रकार सांगू.

**कोणें स्थितीनें राहाती। कैसा अनुभव पाहाती। रामदास म्हणे श्रोतीं। अवधान देणें ।।६०।।**

लोक कोणत्या स्थितीमध्ये राहातात व त्यांना कशा प्रकारचे अनुभव येतात, हे श्रोत्यांनी लक्ष देऊन ऐकावे असे रामदास म्हणतात. (मतमतांचा जो कल्लोळ दुनियेत आढळतो त्याचे वर्णन पुढील समासात आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सिद्धलक्षणनाम समास नवम।।९।।**

११) आपषाच-आपोआप

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका १० वी

**(द. १-४ सद्‌गुरुस्तवन, १-५ संतस्तवन, ८-९ सिद्धलक्षण वर आधारित)**

प्र. १ अर्थ स्पष्ट करा. (१) आदित्ये अंधकार निवारे। (१-४-१०) (२) जो बोलकेपणें विशेष। (१-५-११) (३) सकळ धर्मांमध्ये धर्म। (८-९-५४)

प्र. २ सद्‌गुरुस्तवन करताना कोणते दृष्टान्त दिले आहेत आणि ते तोकडे पडतात हे कसे स्पष्ट केले आहे? ओवी क्र. १-४-१५ ते २५ च्या आधारे उत्तर लिहा.

प्र. ३ वाणी आणि बुद्धी या शक्तींच्या पलीकडे आत्मवस्तू आहे, हे १-५-९ ते १२ पर्यंत कसे सांगितले आहे?

प्र. ४ संतमहिमा वर्णन करणाऱ्या निवडक ३ ओव्या लिहा.

प्र. ५ सिद्धावस्थेमध्ये प्राप्त होणारी निर्भयता, निःस्पृहता आणि निःसंदेहावस्था लो. टिळकांच्या चरित्रातील कोणत्या प्रसंगात आपणास विशेषत्वाने प्रत्ययास येते! तो प्रसंग थोडक्यात सांगा.

# दासबोध प्रबोध : स्वाध्याय ११ वा

**(द.१८-५,१९-३,१९-४)**

करंटपरीक्षानिरूपण, करंटलक्षणनिरूपण आणि सदेवलक्षणनिरूपण या तीन समासांचा अभ्यास एकत्रित करावयाचा आहे. यातील पहिल्या समासात ग्रंथाची नुसती पारायणे करणे अत्यंत चुकीचे असल्याचे श्रीसमर्थ सांगत आहेत. शब्दांचे अर्थ पहावे, समजल्यानंतरच इतरांना बोध करावा. या समासातील १, २, ८, ९ या ओव्या महत्त्वाच्या आहेत.

करंटलक्षणनिरूपण समासात 'राखावी बहुतांची अंतरें।' 'झिजल्या वाचूनी किर्ति कैंची। मान्यता नव्हे कीं फुकाची।' 'जेथे नाही उत्तम गुण। ते करंटपणाचें लक्षण।' यासारख्या ओव्या अत्यंत अर्थपूर्ण आहेत. प्रथम आपले दुर्गुण आपणास समजले तरच ते नष्ट करून त्यांच्या जागी सद्‌गुणांची स्थापना करता येते. या सिद्धान्ताने दासबोध रचना झाली आहे. तद्वतच 'सदेवलक्षण' निरुपणाचा समास नंतर अभ्यासावयाचा आहे...

## द. १८-५ : करंटपरीक्षानिरूपण

जीवनामध्ये सगळीकडे विचारपूर्वक वागण्याची आवश्यकता फार आहे, ग्रंथाची नुसती पारायणे उपयोगी पडत नाहीत. ग्रंथाचा उत्तम अभ्यास करावा, शब्दांचा अर्थ नीट समजून घ्यावा आणि मग लोकांना तो सांगावा. सर्वांचे अंतःकरण सांभाळावे, नामरूप बाजूस सारून

अंतरात्म्याचा अनुभव घ्यावा आणि अनुभव घेऊन मग बोलावे. असत्य व अन्याय सोडून सत्य व न्यायमार्गाने जावे. दृश्य ओलांडून नि:शब्दाचे मूळ शोधावे. आत्मानात्मविवेक आणि सारासारविचार करावा. अलक्षी लक्ष लावावे. अखेर आत्मनिवेदनाने समाधान पावावे.

## ||श्रीराम||

**धान्य उदंड मोजिलें। परी त्या मापें नाहीं भक्षिलें। विवरल्याविण तैसें जालें। प्राणीमात्रासी ।।१।।**

धान्याच्या ढिगातील धान्य मापाच्या सहाय्याने आपण मोजतो असे उदंड धान्य मोजले तरी मापामध्ये शेवटी काहीच रहात नाही. त्याप्रमाणे मोठाले ग्रंथ जरी वाचले तरी जर माणसाने त्यातील विचार समजून घेतला नाही तर ते ज्ञान व्यर्थच होय.

**पाठ म्हणतां आवरेना। पुसतां कांहींच कळेना। अनुभव पाहातां अनुमाना-। मधें पडे ।।२।।**

एखादा मनुष्य खूप पाठान्तर करतो. तो एकदा पाठ म्हणू लागला की आवरेनासा होतो. पण त्याचा अर्थ विचारला तर त्याला काहीच कळलेले नसते. त्याचा अनुभव विचारला तर संदेहात पडतो. (मग त्या पाठान्तराचा काय उपयोग?)

**शब्दरत्नें परीक्षावीं। प्रत्ययाचीं पाहोन घ्यावीं। येर ते अवघीं सांडावीं। येकीकडे ।।३।।**

ग्रंथ वाचताना त्यातील शब्दांचा अर्थ नीट ध्यानी घ्यावा. त्यात अनुभवसिद्ध अशी वचने असतील तर ती नीट ग्रहण करावी. बाकीचा भाग (उगाच साठवू नये) तो सोडून द्यावा.

**नांवरूप आवघें सांडावें। मग अनुभवास मांडावें। सार असार येकचि करावें। हें मूर्खपण ।।४।।**

नामरुपात्मक भाग टाकून देऊन अनुभव घ्यावा. सार व असार एक करणे हा वेडेपणा आहे. (नामरुप यानी भरलेले दृश्य विश्व असार आहे. अंतरात्मा असार आहे)

**लेखके कुळ समजवावें। किंवा उगेंचि वाचावें। येणें दृष्टांतें समजावें। कोणीतरी ।।५।।**

जो मजकूर लिहिलेला आहे तो लेखकाचाच मजकूर कुळाला समजावून द्यावा. केवळ नुसते वाचून दाखवू नये. हा दृष्टान्त याचसाठी दिला की ग्रंथकाराने लिहिलेला ग्रंथ लोकांना समजावून देताना ग्रंथकाराला अपेक्षित असलेला अर्थच सांगावा. लोकांची दिशाभूल होऊ देऊ नये.

**जेथें नाहीं समजावीस। तेथें आवघी कुसमुस। पुसों जातां वसवस। वक्ता करी ।।६।।**

ज्याला ग्रंथार्थ समजावून देण्याची अक्कल नसते, तेथे श्रोत्यात साराच असंतोष होतो. वक्त्याला कोणी प्रश्न विचारला तर तो वसकन अंगावर येतो. (कारण वक्त्याला ग्रंथार्थ स्वत:लाच कळलेला नसतो.)

**नाना शब्द येकवटिले। प्रचीतीवीण उपाव केले। परी ते अवघेचि वेर्थ गेले। फडप्रसंगीं[२] ।।७।।**

२) फडप्रसंगी-सभेत

वक्त्याला केवळ शब्दज्ञान असले तर ते प्रचीतीवीण केलेल्या उपायाप्रमाणे (औषधउपचाराप्रमाणे) असते. पण सभेच्या वेळी किंवा आणीबाणीच्या प्रसंगी केवळ घोकंपट्टीच्या शब्दांचा उपयोग होत नाही.

**पसेवरी वैरण घातलें। तांतडीनें जातें वोडिलें। तेणें पीठ बारिक आलें। हें तो घडेना ।।८।।**

धान्याचे दळण करताना जात्यामध्ये एकदम पसाभर भसाभस धान्य घातले आणि गडबडीने जाते ओढले तर पीठ बारीक कधीच येणार नाही.

**घांसामागें घांस घातला। आवकाश नाहीं चावायाला। अवघा बोकणा भरिला। पुढें कैसें ।।९।।**

किंवा एखाद्या माणसाने जेवताना तोंडामध्ये भराभर घासामागे घास घातला तर बोकाणा भरेल, चावावयाला जागाच ठेवली नाही तर पुढे कसे होईल? (न चावता गिळलेले अन्न कसे पचणार?)

**ऐका फडनिसीचें[३] लक्षण। विरंग जाऊं नेदी क्षण। समस्तांचें अंतःकर्ण। सांभाळीत जावें ।।१०।।**

(फडनीसाचे) सभानायकाचे मुख्य लक्षण ऐका. जो एकही क्षण विरंग (रिकामा) जाऊ देत नाही. सभेचा बेरंग होऊ नये म्हणून सर्वांची अंतःकरणे तो सांभाळतो.

**सूक्ष्म नामें सुखें घ्यावीं। तितुकीं रूपें वोळखावीं। वोळखोन समजवावीं। श्रोतयांसी ।।११।।**

अध्यात्मातील गहन तत्त्वांची नावे सांगावी पण त्यांचे सूक्ष्म अर्थ महंताला स्वतःला पूर्ण समजलेले असले पाहिजेत; आणि ते अर्थ श्रोत्यांना पटवून देता यावेत. (समिक्षकाने सूक्ष्म अर्थ अभ्यासार्थींना पटवून द्यावे)

**समशा पुरतां सुखी होती। श्रोते अवघे आनंदती। अवघे क्षणक्षणा वंदिती। गोसावियांसी ।।१२।।**

गूढार्थाचे शंकासमाधान केले तर श्रोत्यांना आनंद वाटतो आणि ते सर्व महंताला क्षणोक्षणी वंदन करू लागतात.

**समशा पुरतां वंदिती। समशा न पुरतां निंदिती। गोसावी चिणचिण करिती। कोण्या हिशेबें ।।१३।।**

शंकासमाधान झाले तर श्रोते वंदन करतात. पण समस्येची सोडवणूक झाली नाही तर ते निंदाही करतात. म्हणून वक्त्याने रागाने चिणचिण का बरे करावी?

**शुध सोनें पाहोन घ्यावें। कसीं लाउनी तावावें। श्रवणमननें जाणावें। प्रत्ययासी ।।१४।।**

शुद्ध सोने प्रथम पाहून घ्यावे मग ते कसाला लावून तापवून नीट पारखावे त्याप्रमाणे ज्ञानाची परीक्षा श्रवण, मनन या साधनेने प्रत्यय येईतो करावी. (श्रवण मनन या साधनाने अनुभव घ्यावा)

**वैद्याची प्रचित येना। वेथा परतीं होयेना। आणी रागेजावें जना। कोण्या हिशेबें ।।१५।।**

वैद्याने एखाद्या आजाऱ्याला औषध दिले पण व्यथा नाहिशी झाली नाही तर त्याने लोकांवर

३) फडनिसीचे-हिशेबी कारभाराचे

कोणत्या आधारावर रागवावे? (रोग्याने पथ्यपाणी केले नाही वगैरे आरोप करून वैद्याने आपली लंगडी बाजू सावरण्याचा प्रयत्न का करावा?)

**खोटें कोठेंचि चालेना। खोटें कोणास मानेना। याकारणें अनुमाना। खरें आणावें ।।१६।।**

या जगात खोटे कोठेच चालत नाही. ते कोणालाच रुचत नाही म्हणून खरे असेल त्याचेच प्रतिपादन करावे.

**लिहिणें न येतां व्यापार केला। कांहीं येक दिवस चालिला। पुसता सुरनीस भेटला। तेव्हां खोटें ।।१७।।**

एखाद्याने स्वतःला लिहिता येत नसताना व्यापार केला तर काही दिवस तो चालू शकेलही पण जर हिशेब तपासणारा भेटला तर तेव्हा तो व्यापार फसगतीचा झाल्याचे आढळले.

**सर्व आवघें हिशेबीं ठावें। प्रत्यय साक्षीनें बोलावें। मग सुरनीसें काये करावें। सांगाना कां ।।१८।।**

याउलट स्वतःला हिशेब ठेवण्याची सारी माहिती आहे आणि अनुभवाची समज असल्याने प्रत्यक्ष साक्ष ठेवून व्यवहार समजावून देऊ शकत आहे. अशा वेळी हिशेब तपासनीस काय करू शकेल हे सांगा ना!

**स्वयें आपणचि गुंते। समजावीस कैसी होते। नेणतां कोणीयेक ते। आपदों लागती ।।१९।।**

आपल्या अज्ञानामुळे जो स्वतः गुंत्यात पडतो तो (हिशेब तपासनीसाची) समजूत कशी घालू शकणार? अज्ञानामुळे कोणालाही संकटे प्राप्त होतात.

**बळेंविण युद्धास गेला। तो सर्वस्वें नागवला। शब्द ठेवावा कोणाला। कोण कैसा ।।२०।।**

अंगामध्ये सामर्थ्य नसताना कोणी लढाईला गेला व त्यामुळे त्याची नागवणूक झाली तर त्याबद्दल दुसऱ्यांना दोष कसा देता येईल?

**जें प्रचीतीस आलें खरें। तेंचि घ्यावें अत्यादरें। अनुभवेंविण जें उत्तरें। तें फलकटें जाणावीं ।।२१।।**

म्हणून जे सत्य प्रचीतीला आले आहे तेच आदरपूर्वक स्वीकारावे. अनुभव नसताना बोलणे वा लिहिणे हे फुसके समजले जाते.

**सिकऊं जातां राग चढे। परंतु पुढें आदळ[४] घडे। खोटा निश्चळ तात्काळ उडे। लोकामधें ।।२२।।**

कोणी शिकवू लागले तर राग येतो खरा पण न शिकल्यामुळे पुढे त्याची अद्दल घडते. खोट्या गोष्टी निश्चयाने मांडल्या तरी त्या लोकात खोट्या ठरतात.

**खरें सांडुनि खोटें घेणें। भकाधेस[५] काये उणें। त्रिभुवनी नारायणें। न्याय केला ।।२३।।**

सत्य सोडून देऊन कोणी असत्याची कास धरली तर त्याची फजिती होण्यास कितीसा वेळ लागणार? ईश्वराने जगतात हाच न्याय करून ठेवला आहे.

४) आदळ-अद्दल ५) भकाधेस-फजितीला

**तो न्याय सांडितां सेवटीं। अवघें जगचि लागे पाठीं। जनीं भांडभांडों हिंपुटी। किती व्हावें ।।२४।।**

तो न्यायाचा पक्षच सोडून दिला तर जग पाठीशी लागते आणि लोकांशी भांडताना मनुष्य बेजार होऊन जातो.

**अन्यायें बहुतांस पुरवलें। हें देखिलें ना ऐकिलें। वेडें उगेंचि भरीं भरलें। असत्याचे ।।२५।।**

अन्यायी मनुष्य लोकांना पुरुन उरतो. (किंवा यशस्वी होतो) असे कोणाच्याही पहाण्यात किंवा ऐकण्यात आलेले नाही. पण वेडे लोक उगाचच असत्याचा कैवार घेतात.

**असत्य म्हणिजे तेंचि पाप। सत्य जाणावें स्वरूप। दोहीमधें साक्षप। कोणाचा करावा ।।२६।।**

असत्य हे मूर्तिमंत पाप आहे. तर सत्य हे आत्मस्वरुप आहे. यामध्ये कोणाच्या प्राप्तीसाठी दीर्घोद्योग करावा, याबद्दल विचार करावा.

**मायेमधें बोलणें चालणें साचें। माया नस्तां बोलणें कैंचें। याकारणें निशब्दाचें। मूळ शोधावें ।।२७।।**

मायेच्या साम्राज्यामध्येच माणसाचे बोलणे चालणे वास्तविकपणे चालते. माया जेथे नाही तेथे बोलणेच होऊ शकत नाही. म्हणून नि:शब्दाचे मूळ जे परब्रह्म ते शोधावे.

**वाच्यांश जाणोनी सांडावा। लक्ष्यांश विवरोन घ्यावा। याकारणें निशब्द मुळाचा गोवा[६]। आडळेना ।।२८।।**

बोललेल्या शब्दांचा अर्थ स्वीकारावा आणि शब्द सोडून द्यावे. मग अर्थाबद्दल मनन करावे आणि लक्षांश स्वीकारावा. म्हणजे मग शब्दांच्या पलीकडील परब्रह्माबद्दल गोंधळ मनात राहात नाही. (नि:शब्द = परब्रह्म, गोवा = घोटाळा)

**अष्टधा प्रकृती पूर्वपक्ष। सांडून अलक्षीं लावावें लक्ष। मननसीळ परम दक्ष। तोचि जाणे ।।२९।।**

अष्टधाप्रकृती हा पूर्वपक्ष आहे. तो विवेकाने सोडून द्यावा आणि अलक्ष्य असलेल्या (परब्रह्मा) कडे लक्ष लावावे. जो अत्यंत दक्ष आणि मननशील असेल त्यालाच हे समजेल. (अष्टधाप्रकृती मिथ्या आहे व परब्रह्म सत्य आहे हे जाणत्यानाच समजते.)

**नाना भूस आणि कण। येकचि म्हणणें अप्रमाण। रस चोवडिया, कोण-। शाहाणा सेवी ।।३०।।**

धान्याचे भुसकट आणि धान्य हे एकच समजणे खोटे आहे. रस सोडून देऊन चोयट्या कोणता शहाणा सेवन करील?

**पिंडीं नित्यानित्यविवेक। ब्रह्मांडीं सारासार अनेक। सकळ शोधूनियां, येक । सार घ्यावें ।।३१।।**

पिंडा संबंधाने नित्यानित्य किंवा आत्मानात्मविवेक करावा आणि ब्रह्मांडासाठी सारासारविवेक करावा. अशा रीतीने जे सार (शाश्वत) सापडेल तेच घ्यावे. (पिंडब्रह्मांड दोन्ही असार सोडून सार (ब्रह्म) घ्यावे)

**मायेकरितां कोणीयेक। अन्वय आणि वीतरेक[७]। ते माया नस्तां, विवेक-। कैसा करावा ।।३२।।**

६) गोवा-घोटाळा ७) वीतरेक - व्यतिरेक

माया आहे तोपर्यंत म्हणून तिच्या निरासासाठी अन्वय व व्यतिरेक यांचा विचार करावा लागतो. मायाच जर नसेल तर विवेक कसा करता येईल. (अन्वय म्हणजे एकत्र करणे. उदा. जलबिंदूंचा अन्वय म्हणजे जलाशय वेदान्तानुसार 'द्रष्टा व दृश्य एक आहे' या बोधाला अन्वयबोध म्हणतात. हाच सर्व सिद्धांचा अनुभव आहे. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' ही अन्वयाची अनुभूती आहे. 'अ' असेल तर 'ब' असतो; हा अन्वय आहे. आता व्यतिरेक कशाला म्हणतात तर 'अ' नसेल तर 'ब' ही नसतो हा व्यतिरेक आहे. 'नेति नेति'ही व्यतिरेकाची मांडणी आहे. ब्रह्माचे स्वरुप दर्शविणारी ही भाषा आहे. 'मी स्थूलदेह नाही' 'सूक्ष्म देह मी नाही' 'कारण देहही मी नाही' हा सिद्धावस्थेमध्ये येणारा अनुभव-बोध आहे. त्याला व्यतिरेकबोध व त्यानंतर अन्वयबोध असा क्रम नैसर्गिकपणे असतो. 'प.दा.अ.' अभ्यासार्थींनी वरील वैचारिक मांडणी अधिक समजून घेण्याचा यत्न करावा.)

**तत्वें तत्त्व सर्व शोधावें। महांवाकीं [८] प्रवेशावें। आत्मनिवेदनें पावावें। समाधान ।।३३।।**

एका तत्त्वाने दुसरे अशा रीतीने सर्व तत्त्वांचा शोध घ्यावा. महावाक्यांचा गूढार्थ समजून घ्यावा व शेवटी आत्मनिवेदनाने स्वस्वरुपाचे समाधान प्राप्त करून घ्यावे.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे करंटपरीक्षानिरूपणनाम समास पंचम।।५।।**

## द. १९-३ : करंटलक्षणनिरूपण

श्रीसमर्थांच्या दृष्टीने समाजामध्ये दोन प्रकारची माणसे असतात. भाग्यवान माणसे आणि भाग्यहीन माणसे. दोघांची लक्षणे अर्थातच एकमेकांच्या उलट असतात. पण माणसांचे हे दोन प्रकार सांगताना श्रीसमर्थांनी दोन गोष्टी मोठ्या स्पष्टपणे पुनः पुनः मांडल्या आहेत. (पहिली गोष्ट) विवेकाचा अभाव आणि कष्ट करण्याचा अभाव या दोन कुलक्षणांमुळे माणूस जीवनात भाग्यहीन बनतो. (दुसरी गोष्ट) आज भाग्यहीन असलेला माणूस विवेकसंपन्न होऊन उदंड कष्ट करील तर तो निश्चितपणे भाग्यवान पुरुष बनून जाईल. श्रीसमर्थांना विवेकहीन आणि आळशी माणसाची चीड आहे. असा माणूस सर्व अवगुणांचे माहेरघर असतो. तो स्वतः तर हीन असतोच पण आपल्या संगतीने आणखी इतरांना बिघडवतो. त्याला स्वतः काही शिकण्याची इच्छा नसते. तो लिहिण्या-वाचण्याच्या नादी लागत नाही. त्याचे बोलणे फार कठोर असते. दुसऱ्याचे घ्यावे अशी निरंतर वासना तो करतो. जगात जे निंद्य आहे ते त्याला मनापासून आवडते. चांगल्या लोकांची संगत त्याला भावत नाही. कोणाला तो मानीत नाही, कोणावर विश्वास ठेवीत नाही, आणि कोणाशी सख्य करीत नाही. तो आळशीपणाने आयुष्य घालवतो, उगीच कल्पना करीत बसतो. त्यामुळे अखेर काहीच त्याच्या हाती लागत नाही. अशा रीतीने तो आपणच आपला वैरी बनतो, जगातील दुःखप्रवाहात व्यर्थ वाहात जातो. माणसाने हे अवगुण टाकून उत्तम गुणांचा अभ्यास करावा. त्यामुळे जीवनात हवे तसे यश येते.

८) महावांकीं-माहावाक्यी

## ||श्रीराम||

**सुचित करुनी अंतःकर्ण । ऐका करंटलक्षण । हें त्यागितां सदेवलक्षण। आंगीं बाणे ।।१।।**

अंतःकरण स्थिर करून आता करंट्याची लक्षणे ऐका. त्या लक्षणांचा त्याग केला की भाग्यवंताची लक्षणे आपोआप अंगामध्ये बाणू लागतात.

**पापाकरितां दरिद्र प्राप्त। दरिद्रें होये पापसंचित। ऐसेंचि होत जात। क्षणक्षणां ।।२।।**

पापाचे फळ म्हणून दारिद्र्य प्राप्त होते आणि त्या दारिद्र्यामुळे पाप वाढतच जाते. हे असेच नेहमी घडत जाते.

**याकारणें करंटलक्षणें। ऐकोनी त्यागचि करणें। म्हणिजे कांही येक बाणे। सदेवलक्षण ।।३।।**

म्हणून करंटलक्षणे ऐकावी व त्यांचा त्याग करावा. म्हणजे सदेव लक्षणे अंगी बाणतील.

**करंट्यास आळस आवडे। येत्न कदापी नावडे। त्याची वासना वावडे। अधर्मी सदा ।।४।।**

करंट्याला आळस प्रिय असतो. त्याला प्रयत्न करण्याची आवडच नसते. त्याची वासना अधर्माकडेच धावत असते.

**सदा भ्रमिष्ट निदसुरा। उगेंचि बोले सैरावैरा। कोणीयेकाच्या अंतरा। मानेचिना ।।५।।**

तो सदा भ्रमिष्ट व झोपाळू असतो. उगाचच वावगी बडबड करतो. तो कोणाच्याही अंतःकरणाला मानित नाही.

**लेहों नेणे वाचूं नेणे। सवदासुत[१] घेऊं नेणे। हिशेब कितेब राखों नेणे। धारणा नाहीं ।।६।।**

त्याला लिहिता, वाचता येत नाही. बाजारहाट (देवाणघेवाण किंवा सौदा) करता येत नाही. हिशेब, जमाखर्च ठेवता येत नाही. त्याला धारणाशक्ती नसते.

**हारवी सांडी पाडी फोडी। विसरे चुके नाना खोडी। भल्याचे संगतीची आवडी। कदापी नाहीं ।।७।।**

तो वस्तू हरवतो, सांडतो, पाडतो, फोडतो, गोष्टी विसरतो किंवा चुकतो. अशा नाना प्रकारच्या वाईट सवयी त्याला असतात. त्याला भल्यांची संगत कदापि आवडत नाही.

**चाट[२] गडी मिळविले। कुकर्मी मित्र केले। खट नट येकवटिले। चोरटे पापी ।।८।।**

चावट सोबती मिळवितो. वाईट गोष्टी करण्यासाठी कुकर्मी मित्र जोडतो. दुष्ट (खट), नट (नष्ट), चोरटे, पापी, भोवती गोळा करतो.

**ज्यासीं त्यासीं कळकटा[३]। स्वयें सदाचा चोरटा। परघातकी धाटामोटा[४]। वाटा पाडी ।।९।।**

प्रत्येकाशी तो भांडणे करतो. तो नेहमी चोऱ्या करतो. तो दुसऱ्याचा घात करणारा, (धाटामोटा) आडदांड असून वाटमारी करणारा (वाटा पाडी) अशा प्रकारचा असतो.

१) सवदासुत-बाजारहाट २) चाट-चावट ३) कळकटा-भांडणारा ४) धाटामोटा - धष्टपुष्ट

**दीर्घ सूचना सुचेचिना। न्याय नीति हें रुचेना। परअभिळासीं वासना। निरंतर ।।१०।।**

दूरदर्शीपणाचा विचार त्याला शिवत नाही. न्यायनीती त्याला रुचत नाही. दुसऱ्याच्या सर्वस्वाची त्याला सतत अभिलाषा असते.

**आळसें शरीर पाळिलें। परंतु पोटेंविण गेलें। सुडकें मिळेनासें जालें। पांघराया ।।११।।**

आळसामुळे तो शरीराला कष्ट देत नाही. पण पोटाला अन्न न मिळाल्याने त्याला अधिक त्रास होतो. पांघरण्यास फाटके वस्त्र (सुडके) सुद्धा मिळत नाही.

**आळसें शरीर पाळी। अखंड कुंसी कांडोळी [५]। निद्रेचे पाडी सुकाळीं। आपणासी ।।१२।।**

आळसामुळे शरीर सांभाळणारा तो करंटा कुशी खाजवीत बसतो. झोपेचा सुकाळ त्याच्यापाशी असतो. त्यामुळे सदा झोप घेतो.

**जनासीं मीत्री करीना। कठीण शब्द बोले नाना। मूर्खपणें आवरेना। कोणीयेकासी ।।१३।।**

तो लोकांशी स्नेह संपादन करीत नाही. त्यांना अनेक प्रकारे कठोर शब्द बोलतो आणि स्वतःच्या मूर्खपणाने कोणासही आवरत नाही.

**पवित्र लोकांमधें भिडावे। वोंगळामधें निशंक धांवे। सदा मनापासून भावे। जननिंद्य क्रिया ।।१४।।**

सज्जन लोकांमध्ये जाण्यास त्याला संकोच वाटतो. मात्र घाणेरड्या लोकांमध्ये तो निःशंकपणे धावत जाऊन मिसळतो. त्याला जगात निंद्य गोष्टी करणे मनापासून आवडते.

**तेथें कैंचा परोपकार। केला बहुतांचा संव्हार। पापी अनर्थी अपस्मार[६]। सर्वअबद्धी ।।१५।।**

तेथे कोठला आलाय परोपकार! तो अनेकांचा संहार (किंवा सर्वनाश) मात्र करतो. तो पापी, अनर्थकारी, लहरीपणाने वागणारा व सर्व प्रकारे असंबद्ध वागतो.

**शब्द सांभाळून बोलेना। आवरितां आवरेना। कोणीयेकासी मानेना। बोलणें त्याचें ।।१६।।**

तो शब्द सांभाळून वापरत नाही, लोकांनी आवरण्याचा यत्न केला तरी अनावर असतो. त्याचे बोलणे कोणासही पसंत पडत नाही.

**कोणीयेकास विश्वास नाहीं। कोणीयेकासी सख्य नाहीं। विद्या वैभव कांहींच नाहीं। उगाचि ताठा ।।१७।।**

कोणावरही त्याचा विश्वास नसतो. कोणाशी मैत्री नसते. विद्यावैभव वगैरे काहीच नसताना रिकामा ताठा किंवा गर्व मात्र त्याच्याकडे असतो.

**राखावीं बहुतांची अंतरें। भाग्य येतें तदनंतरें। ऐसीं हे विवेकाचीं उत्तरें। ऐकणार नाहीं ।।१८।।**

अनेक लोकांची मने सांभाळली तर त्यानंतरच भाग्य उदयाला येते. अशा प्रकारची सुवचने विवेकपूर्ण असतात. ती तो ऐकूनही घेत नाही.

५) कांडोळी-खाजवी ६) अपस्मार-पिशाचासारखा

**स्वयें आपणास कळेना। सिकविलें तें ऐकेना। तयासी उपाय नाना। काये करिती ।।१९।।**

त्याला स्वतःला तर काही उमगत नाही. तरीपण लोकांनी काही शिकविले तर तेही ऐकत नाही. अशा माणसावर कोणाचा काही उपायच चालत नाही.

**कल्पना करी उदंड कांहीं। प्राप्तव्य तो कांहींच नाहीं। अखंड पडिला संदेहीं। अनुमानाचे ।।२०।।**

तो मोठमोठी मनोराज्ये करतो. परंतु प्रत्यक्ष त्याच्या हातात काही मिळत नाही. तो कायम संशयाच्या संभ्रमात अडकलेला असतो.

**पुण्यमार्ग सांडिला मनें। पाप झडावें काशानें। निश्चय नाहीं, अनुमानें। नास केला ।।२१।।**

त्याने मनाने पुण्यमार्ग सोडूनच दिलेला असतो. मग पाप कशाने कमी होणार? त्याच्यापाशी कोणताच निश्चय नसतो. केवळ संशयग्रस्त राहून स्वतःचा नाश तो करून घेतो.

**कांहींयेक पुर्तें कळेना। सभेमधें बोलों राहेना। बाष्कळ[७] लबाड ऐसें जना। कळों आलें ।।२२।।**

एखाद्या गोष्टीबद्दल काही ज्ञान नसतानासुद्धा सभेमध्ये काहीतरी बोलल्याविना तो रहात नाही. त्यामुळे तो पोकळ बडबड्या व लबाड असल्याचे लोकांच्या लक्षात येते.

**कांहीं नेमकपण आपुलें। बहुत जनासी कळों आलें। तेंचि मनुष्य मान्य जालें। भूमंडळीं ।।२३।।**

ज्या माणसाचे जीवनात निश्चित (ध्येयाने) वागणे असते ते जेव्हा अनेकांना पुढे कळून येते तेव्हा तो मनुष्य जगामध्ये मान्यता पावतो.

**झिजल्यावांचुनी कीर्ति कैंची। मान्यता नव्हे कीं फुकाची। जिकडे तिकडे होते ची ची। अवलक्षणें ।।२४।।**

लोकांसाठी झिजल्याविना कीर्ती कोणालाही मिळत नसते. लोकमान्यता फुकाफुकी मिळत नाही. अवलक्षणी माणसाची जिकडे तिकडे छीःथू होते.

**भल्याची संगती धरीना। आपणासी शाहाणे करीना। तो आपला आपण वैरी जाणा। स्वहित नेणे ।।२५।।**

जो भल्यांची संगती धरत नाही व स्वतःला शहाणा करीत नाही तो आपला आपणच वैरी समजावा. कारण त्याला स्वहित कशात आहे ते कळत नाही.

**लोकांसी बरें करावें। तें उसिणें सवेंचि घ्यावें। ऐसें जयाच्या जीवें। जाणिजेना ।।२६।।**

लोकांचे आपण कल्याण केले की ते त्याचा मोबदला आपणास लगेच देतात हे त्याच्या मनाला कळत नाही.

**जेथें नाहीं उत्तम गुण। तें करंटपणाचें लक्षण। बहुतांसी न मनें तें अवलक्षण। सहजचि जालें ।।२७।।**

थोडक्यात म्हणजे सद्‌गुण नसणे हे करंटेपणाचे लक्षण आहे असे समजावे. अनेकांना जे आवडत नाही ते साहजिकच अवलक्षण होय.

७) बाष्कळ-असंबद्ध.

**कार्याकारण सकळ कांहीं। कार्येंविण तों कांहींच नाहीं। निकामी तो दुःखप्रवाहीं। वाहातचि गेला ।।२८।।**

कार्याच्या निमित्ताने लोक एकमेकांना मानतात. कार्य केले नाही तर लोक कोणासही विचारत नाहीत. (मान देत नाहीत) जो निकामी किंवा दुसऱ्याच्या कामात मदत करणारा नसतो तो दुःख प्रवाहातच वहात जातो. (दुःखी होतो)

**बहुतांसीं मान्य थोडा। त्याच्या पापासी नाहीं जोडा। निराश्रईं पडे उघडा। जेथ तेथें ।।२९।।**

जो इतरांना आवडत नाही त्याच्या पापाला तुलनाच नसते. त्याला कोणाचा आश्रयच न मिळाल्यामुळे तो जगामध्ये उघडा पडतो.

**याकारणें अवगुण त्यागावे। उत्तम गुण समजोन घ्यावे। तेणें मनासारिखें फावे। सकळ कांहीं ।।३०।।**

म्हणून अवगुणांचा त्याग करावा, उत्तम गुण कोणते आहेत ते समजून घेऊन त्यांचा स्वीकार करावा. त्यायोगे जगामध्ये सर्व काही मनासारखे घडते. मनोकामना पूर्ण होतात.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे करंटलक्षणनिरूपणनाम समास तृतीय।।३।।**

## द. १९-४ : सदेवलक्षणनिरूपण

या समासात श्रीसमर्थ आता भाग्यवान पुरुषाची लक्षणे वर्णन करतात. ग्रंथामध्ये अनेक ठिकाणी अशा पुरुषाचे वर्णन येऊन गेलेले आहे. त्या सर्व वर्णनांमध्ये पुढील सात गुण वारंवार उल्लेखिलेले आढळतात. (एक) अत्यंत मृदु मधुर भाषा. (दोन) सगळ्यांचे अंतर राखणे म्हणजे कोणाच्याही अंतरास धक्का लागेल असे न बोलणे, चालणे किंवा कोणाचेही अंतःकरण न दुखवणे. (तीन) मनापासून अंगी असलेली खरी नम्रता अथवा लीनता. (चार) दुसऱ्याचे उणे पडू न देणे किंवा निःस्वार्थीपणाने दुसऱ्याच्या उपयोगी पडणे किंवा परोपकारात देह झिजवणे. (पाच) अति निःस्पृह आणि निर्वासन असणे. वासना ठेवलीच तर सगळे सुखी असावे एवढीच वासना असणे. (सहा) आत्मज्ञानाचा अत्यंत जिव्हाळा असणे. (सात) अंगी क्षमा आणि शांती असणे. जो माणूस मोठा विद्वान आहे किंवा मुत्सद्दी किंवा वक्ता आहे किंवा जो ऐश्वर्यसंपन्न आहे तो काही खरा भाग्यवान नव्हे. जो बहुतांचा होतो, जो दुसऱ्याच्या दुःखाने दुखावतो, व दुसऱ्याच्या सुखाने सुखावतो, जो सर्वांना हवाहवासा वाटतो, जो अनेक लोकांना सन्मार्गाला लावतो, तो पुरुष श्रीसमर्थांच्या मते भाग्यवान समजावा.

### ।।श्रीराम।।

**मागां बोलिलें करंटलक्षण। तें विवेकें सांडावें संपूर्ण। आतां ऐका सदेवलक्षण[१]। परम सौख्यदायेक ।।१।।**

---

१) सदेवलक्षण-सुदैवी, भाग्यवान

यापूर्वी करंट्याची लक्षणे सांगितली ती विवेकाने संपूर्ण सोडून द्यावी. आता परमसौख्य देणारी भाग्यवंतांची लक्षणे ऐकावी.

**उपजतगुण शरीरीं। परोपकारी नानापरी। आवडे सर्वांचे अंतरीं। सर्वकाळ ॥२॥**

परोपकार करण्यासारखे कितीतरी चांगले गुण त्याच्या अंगी असतात. त्यामुळे असा मनुष्य सर्वांना अंतरापासून आवडतो.

**सुंदर अक्षर लेहों जाणे। चपळ शुद्ध वाचूं जाणे। अर्थांतर सांगों जाणे। सकळ कांहीं ॥३॥**

सुंदर अक्षर लिहिणे, जलद व शुद्ध वाचन, अर्थाचे स्पष्टीकरण चांगले करणे हे सर्व त्याला जमते.

**कोणाचे मनोगत तोडीना। भल्यांची संगती सोडीना। सदेवलक्षण अनुमाना। आणून ठेवी ॥४॥**

तो कोणाचेही मन दुखवीत नाही, भल्यांची संगत सोडत नाही. देवांची (म्हणजेच भाग्यवंतांची) लक्षणे त्याला माहिती असतात. (त्यामुळे त्याचे त्याप्रमाणे वर्तन होते हा भावार्थ)

**तो सकळ जनासी व्हावा। जेथें तेथें नित्य नवा। मूर्खपणें अनुमानगोवा। कांहींच नाहीं ॥५॥**

लोकांना तो हवाहवासा वाटतो. जेथे जाईल तेथे तो नवीनपणाने लोकांना आवडतो. (तो शिळा झाल्यासारखा वाटत नाही) मूर्खपणामुळे होणारा संशयाचा गोंधळ त्याच्याकडे कधीच नसतो.

**नाना उत्तम गुण सत्पात्र। तेचि मनुष्य जगमित्र। प्रगट कीर्ती स्वतंत्र। पराधेन नाहीं ॥६॥**

नाना सद्‌गुणांचे स्थान असल्यामुळे तो सत्पात्र असतो. त्यामुळे तो जगमित्र असतो. त्याची कीर्ती सद्‌गुणांच्या आधारे वाढत रहाते. त्यासाठी त्याला कोणाचा आधार घ्यावा लागत नाही. (कीर्ती परावलंबी नसते स्वयंभू असते)

**राखे सकळांचें अंतर। उदंड करी पाठांतर। नेमस्तपणाचा विसर। पडणार नाहीं ॥७॥**

तो सर्वांची मने सांभाळतो. उदंड पाठान्तर करतो आणि व्यवस्थितपणाच्या वर्तनाचा त्याला विसर पडत नाही. (स्मरणपूर्वक व्यवस्थितपणे वागतो)

**नम्रपणें पुसों जाणे। नेमस्त अर्थ सांगों जाणे। बोलाऐसें वर्तों जाणें। उत्तम क्रिया ॥८॥**

कोणाला काही विचारावयाचे असल्यास नम्र भाषेत विचारतो. अर्थ सुव्यवस्थित सांगतो. बोलल्याप्रमाणे त्याचा आचारही असतो आणि तो सत्क्रिया करतो.

**जो मानला बहुतांसी। कोणी बोलों न शके त्यासी। धगधगीत पुण्यरासी। माहांपुरुष ॥९॥**

तो सर्वांमध्ये लोकप्रिय झाला असल्याने त्याच्याबद्दल कोणी निंदेचे शब्द बोलू शकत नाहीत. तो मोठा तेजस्वी, थोर पुण्यवान पुरुष असतो.

**तो परोपकार करितांचि गेला। पाहिजे तो ज्याला त्याला। मग काये उणें तयाला। भूमंडळीं ॥१०॥**

तो नित्य परोपकार करीत जगत असल्यामुळे सर्वांनाच तो हवा असतो. त्यामुळे जगामध्ये त्याला कशाची कमतरता पडणार?

**बहुत जन वास पाहे। वेळेसी तत्काळ उभा राहे। उणें कोणाचें न साहे। तयां पुरुषासी ।।११।।**

त्याची वाट सर्वजण पाहातात आणि तोही प्रत्येक ठिकाणी येऊन मदत करतो. त्याला कोणाचेही उणे (किंवा अकल्याण) झालेले पहावत नाही.

**चौदा विद्या चौसष्टी कळा। जाणे संगीत गायेनकळा। आत्मविद्येचा जिव्हाळा। उदंड तेथें ।।१२।।**

चौदा विद्या, चौसष्ट कला त्याच्यापाशी असतात. संगीत व गायनकला तो जाणतो. आणि (सर्वात महत्त्वाचे हे की) त्याला अध्यात्मज्ञानाची अतिशय आवड असते.

**सकळांसी नम्र बोलणें। मनोगत राखोन चालणें। अखंड कोणीयेकाचें उणें। पडोंचि नेदी ।।१३।।**

सर्वांशी नम्र भाषेत बोलतो, लोकांचे मनोगत समजून वागतो. तो केव्हाही कोणाचेही उणे पडू देत नाही.

**न्याय नीति भजन मर्यादा। काळ सार्थक करी सदा। दरिद्रपणाची आपदा। तेथें कैंची ।।१४।।**

न्याय, नीती, सांभाळून वागतो. मर्यादा राखतो व भजनपूजनादि करून काळ सार्थकी लावतो. दरिद्रीपणाची संकटे त्याच्यापुढे येतीलच कशी?

**उत्तमगुणें श्रृंघारला। तो बहुतांमधें शोभला। प्रगट प्रतापें उगवला। मार्तंड जैसा ।।१५।।**

अंतरातील उत्तम गुणांनी तो शृंगारलेला असतो. त्यामुळे लोकांमध्ये तो शोभून दिसतो. सूर्याच्या तेजामुळे तो जसा विश्वात प्रकाशतो त्याप्रमाणे हा त्याच्या सर्वख्यात प्रतापामुळे चमकतो.

**जाणता पुरुष असेल जेथें। कळहो कैंचा उठेल तेथें। उत्तम गुणाविषीं रितें। तें प्राणी करंटें ।।१६।।**

असा जाणता पुरुष जेथे असेल तेथे तंटे उत्पन्न कसे होतील? ज्यांच्याकडे असे सद्‌गुण नसतात ते लोक करंटे असतात.

**प्रपंची जाणें राजकारण। परमार्थी साकल्य विवरण। सर्वामधें उत्तम गुण। त्याचा भोक्ता ।।१७।।**

प्रपंचामध्ये राजकारण (किंवा व्यक्तिगत जीवनात व्यवहारचातुर्य) आणि परमार्थामध्ये अध्यात्मविचारांचे (किंवा सारासारविचारांचे) विवरण करणे तो जाणतो. सर्वांमध्ये जे सद्‌गुण असतील त्यांचा जो भोक्ता असतो तो भाग्यवंत असतो.

**मागें येक पुढें येक। ऐसा कदापी नाहीं दंडक। सर्वत्रांसीं अलोलिक। तया पुरुषाची ।।१८।।**

मागे एक व पुढे एक अशी दुटप्पीपणे वागण्याची त्याची प्रथा नसते. त्यामुळे सर्वांना त्याच्याबद्दल धन्यता वाटते. (अपूर्वता वाटते)

**अंतरासी लागेल ढका। ऐसी वर्तणूक करूं नका। जेथें तेथें विवेका। प्रकट करी ।।१९।।**

'दुसऱ्याचे अंतःकरण दुखावेल अशी वर्तणूक करू नका' असा विवेक सर्वत्र तो प्रगट करतो.

**कर्मविधी उपासनाविधी। ज्ञानविधी वैराग्यविधी। विशाळ ज्ञात्रुत्वाची बुद्धी। चळेल कैसी ।।२०।।**

कर्म, उपासना, ज्ञान आणि वैराग्य यांचे विधीवत पालन कसे करावे हे त्याला माहिती असते. जाणतेपणामुळे त्याची व्यापक झालेली बुद्धी कशी चळेल? (किंवा कशी चुकेल?)

**पाहातां अवघे उत्तम गुण। तयास वाईट म्हणेल कोण। जैसा आत्मा संपूर्ण। सर्वां घटीं ।।२१।।**

त्या भाग्यवंतापाशी सर्व सद्गुण आढळल्यामुळे त्याला वाईट कोण म्हणेल? ज्याप्रमाणे आत्मा सर्वांमध्ये भरलेला असतो. तसाच तोही सर्वांच्या हृदयात प्रेमादराने भरून राहिलेला असतो.

**आपल्या कार्यास तत्पर। लोक असती लाहानथोर। तैसाचि करी परोपकार। मनापासुनी ।।२२।।**

लहानमोठी माणसे आपापल्या कार्यात तत्पर असतात. त्याप्रमाणे तो परोपकार करण्यासाठी मनापासून तयार असतो.

**दुसऱ्याच्या दुःखें दुखवे। दुसऱ्याच्या सुखें सुखावे। आवघेचि सुखी असावे। ऐसी वासना ।।२३।।**

तो दुसऱ्यांना दुःख झाले की दुःखी होतो. त्यांच्या सुखात हाही सुखावतो. सर्वजण सुखी रहावेत अशी याची इच्छा (निसर्गतः) असते.

**उदंड मुलें नानापरी। वडिलांचें मन अवघ्यांवरी। तैसी अवघ्यांची चिंता करी। माहांपुरुष ।।२४।।**

नाना तऱ्हेची बरीच मुले असली तरी वडिलांचे सर्वांवरच लक्ष असते. त्याप्रमाणे सर्वांचीच चिंता महापुरुषाला वाटते.

**जयास कोणाचें सोसेना[२]। तयाची निःकांचन वासना। धीकारिल्यां धीकारेना। तोचि माहांपुरुष ।।२५।।**

ज्याला कोणाचेच उणे पडलेले सहन होत नाही, त्याची वासना धनाबद्दल निर्लोभी (अनापेक्षी) असते. ज्याचा कोणी धिक्कार केला तरी तो मनात अढळ राहातो तोच महापुरुष होय.

**मिथ्या शरीर निंदलें। तरी याचें काये गेलें। ज्ञात्यासी आणि जिंतिलें। देहेबुद्धीनें ।।२६।।**

हे शरीरच मिथ्या (लटके) तो मानत असल्याने त्याची कोणी निंदा केली तरी त्यामुळे त्याला त्याचे काही नुकसान वाटत नाही. जो ज्ञानी आहे (तो आत्मबुद्धीचा असतो त्यामुळे) त्याला देहबुद्धीने जिंकले असे कधी होईल काय? (मी आत्माच आहे देह नव्हे अशी भावना पक्की असेल तर देहाच्या निंदेचा स्पर्शच आपणास होणार नाही हा भावार्थ!)

**हें अवघें अवलक्षण। ज्ञाता देहीं विलक्षण । कांहीं तऱ्ही उत्तम गुण। जनीं दाखवावे ।।२७।।**

देहबुद्धी ही अवलक्षणी आहे. (ती करंटपणाची खूणच आहे.) (आत्म)ज्ञानी पुरुष देहधारी असला तरी तो देहातीत असा विलक्षण असतो. माणसाने काहीतरी उत्तमगुण लोकात प्रगट

२) जयास कोणाचे सोसेना-ज्याला कोणाचेही अकल्याण सोसवत नाही

करावेत.

**उत्तम गुणास मनुष्य वेधे। वाईट गुणासी प्राणी खेदे। तीक्षण बुद्धि, लोक साधे-। काये जाणती ।।२८।।**

उत्तम गुणांमुळे माणसे आकर्षित होतात तर वाईट गुणांमुळे त्यांना दुःख होते. सामान्य लोकांना ज्ञानी माणसाच्या तीक्ष्ण बुद्धीची कल्पना कशी येणार?

**लोकीं अत्यंत क्षमा करिती। आलियां लोकांचे प्रचिती। मग ते लोक पाठी राखती। नाना प्रकारीं ।।२९।।**

जाणता मनुष्य अत्यंत क्षमाशील असतो याची प्रचिती लोकांना येते आणि मग ते नाना प्रकारे त्याची पाठराखण करतात. (किंवा त्याचे अनुयायी बनतात. ज्ञाता मनुष्य कधीच चिडचिड करत नाही.)

**बहुतांसी वाटे मी थोर। सर्वमान्य पाहिजे विचार। धीर उदार गंभीर। माहांपुरुष ।।३०।।**

आपणच थोर आहोत असे बहुतेकांना वाटते. पण लोकांनी ज्याला थोर म्हणून मान्यता दिली तोच खरा थोर असतो. महापुरुष हा नेहमी धीरवृत्तीचा, उदार आणि गंभीर असतो.

**जितुके कांहीं उत्तम गुण। तें समर्थांचें लक्षण। अवगुण तें करंटलक्षण। सहजचि जालें ।।३१।।**

जेवढे काही उत्तम गुण आहेत ते समर्थांचे किंवा भाग्यवंताचे लक्षण समजावे. अर्थातच जे सारे अवगुण आहेत ती करंट्याची लक्षणे साहजिकच ठरतात.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सदेवलक्षणनिरूपणनाम समास चतुर्थ।।४।।**

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका ११ वी

**(द. १८-५ करंटपरीक्षा, १९-३ करंटलक्षण, १९-४ सदेव (भाग्यवान) लक्षण वर आधारित)**

प्र. १ खालील अर्थांच्या ओव्या लिहा.

१) फडणीसीचे लक्षण; म्हणजे कालापव्यय न करणे.

२) असत्य म्हणजे पाप, सत्य म्हणजे स्वरूप.

३) पापामुळे दारिद्र्य व दारिद्र्यामुळे पाप सांचते.

४) बहुतांची अंतरे राखली तरच भाग्य येते.

प्र. २ टिपणे लिहा. (कोणतेही दोन)

१) आळसामुळे कोणती हानी होते?

२) दुश्चीत आळसाची रोकडी प्रचीति कोणती?

३) अवघेचि सुखी असावे। ऐसी वासना।

प्र. ३ सदेवाची दहा लक्षणे लिहा.

प्र. ४ प्रत्ययाचे महत्त्व समर्थांनी 'पसेवरी वैरण घातले' इ. ओव्यांनी समजून दिले आहे. त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण करा.

प्र. ५ अध्यात्मिक ग्रंथांची केवळ पारायणे करणे अयोग्य आहे, हे श्रीसमर्थांनी कशाप्रकारे समजाऊन दिले आहे?

❁ ❁

# स्वाध्याय १२ वा

## (द. २०-४,५,८)

'आत्मनिरूपण', 'चत्वार जिन्नस निरूपण' आणि 'देहेक्षेत्रनिरूपण' हे तीन समास एकत्र का अभ्यासावयाचे ते स्पष्ट होणे जरूरीचे आहे.

१) या विश्वातील सर्व घडामोडींचा संचालक केवळ अंतरात्माच आहे. साधकाने त्याचे अनुसंधान ठेवले पाहिजे. २) आपल्या प्रचीतीला येणाऱ्या विश्वाचा विचार करणे फक्त मानवालाच शक्य आहे. अवाढव्य विश्वरचनेबद्दल अहर्निश विचार करावा म्हणजे नरदेहाचे महत्त्व अधिकच वाटू लागते. ३) शरीरासारखे यंत्र अद्‌भुत असून तसले दुसरे कोणतेच यंत्र नाही. जगाची उभारणी कशी झाली याचे विवेकाने चिंतन करावे आणि 'विवेकप्रलयाने' विश्वसंहाराची कल्पना करावी. 'आवाहन विसर्जन। हेंचि भजनाचें लक्षण।'

अशा तीन चढत्या भांजणीच्या कल्पना या तीन समासात आहेत. त्या नीट समजून घेण्याचा प्रयत्न करावा. दासबोध अभ्यास वर्गाचा त्यासाठी फार उपयोग होतो...

### द. २०-४ : आत्मानिरूपण

या विश्वात ज्या सगळ्या घडामोडी चालतात त्या फक्त एका अंतरात्म्याच्या सत्तेने चालतात, हा विचार या समासामधील केंद्रबिंदू आहे. अनंत अंतरात्मा द्रष्टा आहे, सर्वसाक्षी आहे पण तो जाणीवस्वरूप आहे, चैतन्यरूप आहे, त्यालाच जगदीश किंवा जगदीश्वर म्हणतात. त्याची एकट्याची सत्ता सर्व ठिकाणी वाटली आहे, सर्व शरीरांतरी विभागली आहे, म्हणजे एकच अंतरात्मा सर्व देह चालवतो. तो जगाचे व जीवांचे धारण, रक्षण व पोषण करतो. त्याच्या कळेने सृष्टी चालते. तो संपूर्ण ज्ञानमय आहे. जगाच्या घटनेमध्ये आढळणारी संगति आणि व्यवस्था त्याच्या ज्ञानसामर्थ्यामुळे तगून राहतात. मूळसंकल्पच जगामध्ये साकार होत आहे. ज्याच्या पदरी भाग्य असेल त्यालाच त्या अंतरात्म्याचे वास्तविक स्वरूप समजते. साधकाने त्याचे अनुसंधान ठेवण्यास शिकावे. त्याचे अनुसंधान हेच ध्यान होय. त्या ध्यानातूनच त्याचे

ज्ञान उदय पावते. अंतरात्म्याची उपासना करता करता कल्पना नाश पावून प्रचीती येते. देव आणि भक्त एकरूप होतात. म्हणून उपासना ज्ञानस्वरूप बनते, 'मी तोच आहे' हा महाकारण देह होय. अखेर तोही टाकावा म्हणजे अनुभवाची पूर्णता होते. तात्पर्य, आपण मायिक आहोत. सगळे कर्तृत्व भगवंताकडे आहे.

या विश्वातील साऱ्या घडामोडी अंतरात्म्याच्या सत्तेमुळे चालू असतात. याचे चित्रण या समासामध्ये आहे.

## ||श्रीराम||

**सकळ जनास प्रार्थना। उगेंच उदास करावेना। निरूपण आणावें मना। प्रत्ययाचें ।।१।।**

सर्व लोकांना एक प्रार्थना आहे की उगाचच मनात उदास होऊ नका. अनुभवाचे हे निरुपण चित्तामध्ये धरा. (नीट समजावून घ्या)

**प्रत्यये राहिला येकेकडे। आपण धांवतो भलतेकडे। तरी सारासाराचे निवाडे। कैसे होती ।।२।।**

स्वानुभव एका बाजूला राहिला आणि आपण भलतीकडे धावत सुटलो तर सार काय आणि असार काय याचा निवाडा कसा बरे होईल?

**उगिच पाहातां सृष्टी। गल्बला दिसतो दृष्टीं। परी ते राजसत्तेची गोष्टी। वेगळीच ।।३।।**

वरवर पाहिले असता सृष्टीमध्ये आपणास काहीसा गोंधळ दिसतो. पण त्यामागे ईश्वरी सत्ता खरोखरच असते. उदा. व्यवहारामध्येही गोंधळ आढळला तरी राजसत्ता, वेगळी व अदृश्य रुपाने कार्य करीतच असते. (तसेच ईश्वरसत्तेचेही आहे)

**पृथ्वीमधें जितुकीं शरीरें। तितुकी भगवंताचीं घरें। नाना सुखें येणें द्वारें। प्राप्त होती ।।४।।**

पृथ्वीमध्ये जेवढी शरीरे आहेत (त्यामध्ये भगवंतच असल्याने) ती भगवंताची घरेच आहेत. अनेक सुखे त्या शरीराच्या द्वारेच प्राप्त होतात.

**त्याचा महिमा कळेल कोणाला। माता वांटून कृपाळू जाला। प्रत्यक्ष जगदीश जगाला। रक्षितसे ।।५।।**

भगवंताचा महिमा कोणालाही कळलेला नाही. त्याने आपला कृपाळूपणा सर्व मातांना वाटून दिला आहे. अशा प्रकारे (कृपाळूपणाने) तो जगदीशच जगाचे रक्षण करीत आहे.

**सत्ता पृथ्वीमध्यें वांटली। जेथें तेथें विभागली। कळेनें सृष्टि चालिली। भगवंताचे ।।६।।**

भगवंताने आपली सत्ता पृथ्वीवर वाटली आहे; जेथे तेथे ती विभागली गेली आहे आणि त्याच्याच अंशामुळे सृष्टीतील कारभार चालले आहेत. (जेथे तेथे ईश्वरी सत्तेचेच अधिष्ठान त्या त्या प्रमाणात सर्वत्र प्रत्ययाला येते.)

**मूळ जाणत्या पुरुषाची सत्ता[१]। शरीरीं विभागली तत्त्वतां। सकळा कळा चातुर्यता । तेथें वसे ॥७॥**

अंतरात्मा हा मूळ जाणता पुरुष आहे. त्याचीच सत्ता अनेक शरीरात विभागली गेली आहे. सर्व कला व चातुर्य ही अंतरात्म्याच्या सत्तेचीच निशाणी आहे. (त्यामुळेच सृष्टीतील व्यवहार सुरळीत चालू आहेत.)

**सकळ पुराचा ईश। जगामध्यें तो जगदीश। नाना शरीरीं सावकास । करूं लागे ॥८॥**

सर्व देहरुपी नगरींचा जो स्वामी (म्हणजे मूळपुरुष अगर अंतरात्मा) तोच सर्व जगाचा जगदीश आहे. तोच जगातील सर्व शरीरांमध्ये वास्तव्य करतो आणि जगाचे सर्व व्यवहार चालवितो.

**पाहातां सृष्टीची रचना। ते येकाचेन चालेना। येकची चालवीं, नाना । देह धरुनी ॥९॥**

या सृष्टीच्या अगाध रचनेकडे लक्षपूर्वक पाहिले असता ती एकट्याच्याने चालत नाही. पण एकटा अंतरात्मा नाना प्रकारचे देह धारण करून ती चालवितो असे आढळून येते.

**नाहीं उंच नीच विचारलें। नाहीं बरें वाईट पाहिलें। कार्ये चालो ऐसें जालें। भगवंतासी ॥१०॥**

कोणीकडूनही सृष्टीतील व्यवहार सुरळीत चालावे म्हणून त्या अंतरात्म्याने देह निर्माण करताना श्रेष्ठ किंवा कनिष्ठ, बरे किंवा वाईट याबद्दल विचार केला नाही.

**किंवा नेणणें आडवें केलें। किंवा अभ्यासीं घातलें। हें कैसें कैसें केलें। त्याचा तोचि जाणे ॥११॥**

काही जीवांच्या आड अज्ञान घातले तर काही जीवांना अभ्यासू बनविले. हे विश्व त्याने कसे कसे केले हे त्याचे त्यालाच माहिती! (माणसाच्या बुद्धीला याबद्दल जो विस्मय वाटतो त्यातूनच देवशोधनाची साधना तो करू लागतो. ज्ञानोपासनेचे मूळ त्या विस्मयातच आहे.)

**जगदांतरीं अनुसंधान। बरें पाहाणें हेंचि ध्यान। ध्यान आणी तें ज्ञान। येकरूप ॥१२॥**

जगामध्ये ज्या घटना घडतात त्यामागे अंतरात्म्याची सत्ता आहे, तो सर्वांचा चालक आहे ही जाणीव राखणे हेच भगवंताचे अनुसंधान आहे. या अनुसंधानातून ध्यान करणे व त्यातूनच पुढे दृढ ध्यानसाधनेतून ज्ञानप्राप्ती होते. म्हणून ते ध्यान व ज्ञान शेवटी एकरुप आहेत.

**प्राणी संसारास आला। कांही येक शाहाणा जाला। मग तो विवरों लागला। भूमंडळीं ॥१३॥**

माणूस जन्माला येतो त्यानंतर थोडासा शहाणा होतो आणि (जगताबद्दल विस्मय वाटून) विचार करू लागतो.

**प्रगट रामाचें निशाण। आत्माराम ज्ञानघन। विश्वंभर विद्यमान। भाग्यें कळे ॥१४॥**

त्या अंतरात्म्याचे निशाण (किंवा त्याच्या सत्तेची खूण) जगात प्रगट आहे. तो अंतरात्मा ज्ञानमय आहे. तो विश्वाला सांभाळणारा असून त्याचे विश्वातील अस्तित्व सर्वत्र आहे. (तो विद्यमान आहे) पण ही जाणीव होण्यासाठी भाग्य लागते. (त्या भाग्यामुळेच हे ज्ञान होते हा भावार्थ)

१) जाणत्या पुरुषाची सत्ता-अंतरात्म्याची सत्ता

**उपासना धुंडून वासना धरिली। तरी ते लांबतचि गेलीं । महिमा न कळे बोलिली। येथार्थ आहे ।।१५।।**

एखाद्याने उपासनेचा शोध केला पण त्या मार्गाने साधना करताना अन्य काही वासना मनात धरली तर ती वासनाच इतकी लांबत जाते की त्यातच कालक्रमण होऊन जाते व ज्ञानप्राप्ती होत नाही. त्यामुळे त्या अंतरात्म्याचा महिमा अगाध आहे असे म्हणतात ते योग्यच आहे.

**द्रष्टा म्हणिजे पाहाता। साक्षी म्हणिजे जाणता। अनंतरूपी अनंता। वोळखावें ।।१६।।**

द्रष्टा (पाहणारा) व साक्षी म्हणजे जाणणारा अशा त्या अनंतरुपी अनंताला (प्रयत्नाने) ओळखावे.

**संगती असावी भल्यांची। धाटी[२] कथा निरूपणाची। कांहीं येक मनाची। विश्रांती आहे ।।१७।।**

सज्जनांची संगती असावी. कथा निरुपणे श्रवणाची प्रथा ठेवावी. त्यामुळे मनाला थोडीफार विश्रांती मिळते.

**त्याहिमधें प्रत्ययेज्ञान। जाळून टाकिला अनुमान। प्रचितिविण समाधान। पाविजेल कैंचें ।।१८।।**

त्यातील ज्ञान हे प्रत्ययाचे असेल तर संदेहांची जळून राख होते. प्रचिती किंवा ज्ञानानुभव मिळाल्याविना समाधान कसे मिळेल?

**मूळ संकल्प तो हरिसंकल्प। मूळमायेमधील साक्षेप। जगदांतरीं तेंचि रूप। देखिजेतें ।।१९।।**

'एकोऽहं - बहुस्याम' यातील पहिला भाग हरिसंकल्प असून दुसरा भाग ही स्फूर्ती होय. मूळमायेतून तो विश्वव्यापी पसारा झाला त्याचे तेच बीज आहे. ते बीज जगदंतरात पहावे.

**उपासना ज्ञानस्वरूप। ज्ञानीं चौथा देह आरोप। याकारणें सर्व संकल्प। सोडून द्यावा ।।२०।।**

मूळमाया हा ब्रह्मांडाचा चौथा देह व महाकारण देह हा पिंडाचा चौथा देह आहे. तो ज्ञानस्वरुप असून तो उपासनेचा ईश्वर आहे. त्याची उपासना म्हणजे ज्ञानस्वरुपाचीच उपासना असते. पण ही मूळमाया संकल्परुप आहे. परब्रह्मावर तो आरोप आहे. यासाठी साधकाने सर्व संकल्पाचा त्याग करावयास पाहिजे.

**पुढें परब्रह्म विशाळ। गगनासारिखें पोकळ। घन पातळ कोमळ। काये म्हणावें ।।२१।।**

मग साधकापुढे आकाशासारखे विशाल, पोकळ परब्रह्म जिकडे तिकडे अनुभवास येते त्या स्वरुपाला घनदाट म्हणावे की पोकळ किंवा नाजूक कोमल म्हणावे? काय म्हणावे हेच कळेनासे होते.

**उपासना म्हणिजे ज्ञान। ज्ञानें पाविजे निरंजन। योगियांचे समाधान। येणें रितीं ।।२२।।**

उपासना करीत गेल्यास शेवटी आत्मज्ञान होते. त्यामुळे निरंजन परब्रह्माची प्राप्ती होते. त्यामुळे योगीजनास समाधान प्राप्त होते.

---

२) धाटी-सवय

**विचार नेहटूनसा[३] पाहे। तरी उपासना आपणचि आहे। येक जाये, येक राहे। देह धरुनी ॥२३॥**

निश्चयपूर्वक विचार केला असता असे आढळते की जे आपले उपास्य आहे ते आपणच आहोत. उपासक व उपास्य यातील द्वैत उपासनेमुळे नष्ट होते. त्यामुळे उपासक जातो व उपास्य राहातो.

**अखंड ऐसी घालमेली। पूर्वापार होत गेली। आतांहि तैसीच चालिली। उत्पत्ति स्थिति ॥२४॥**

अशी ही उलाढाल पूर्वीपासून होत आली आहे. आतासुद्धा उत्पत्ती व स्थिती अशीच चालली आहे.

**बनावरी बनचरांची सत्ता। जळावरी जळाचरांची सत्ता। भूमंडळीं भूपाळां समस्तां। येणेंचि न्यायें ॥२५॥**

वनावर वनचरांची सत्ता तर जलावर जलचरांची सत्ता चालते. त्याप्रमाणे पृथ्वीवर सगळ्या राजांची सत्ता चालते. (पूर्वीच्या ६, ७ व ८ ओव्यांमध्ये जगावर जगदीशाची सत्ता चालते. त्याच्या सत्तेनेच सर्वत्र कारभार सुरू आहे.)

**सामर्थ्य आहे चळवळेचें। जो जो करील तयाचें। परंतु येथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे ॥२६॥**

जो जो कोणी उद्योग करील त्याला प्रत्येकाला सामर्थ्य प्राप्त होईल. पण त्यांनी आपल्या ठिकाणी भगवंताचे अधिष्ठान आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. (चळवळीपासून सामर्थ्य मिळते पण तेथे ईश्वरी सत्तेचे अधिष्ठान आहे याचे भान असले पाहिजे.)

**कर्ता जगदीश हें तों खरें। परी विभाग आला पृथकाकारें। तेथें अहंतेचें काविरें। बाधिजेना ॥२७॥**

सर्वकर्ता जगदीश आहे पण अहंभावामुळे त्याच्यापासून विभक्तपणाची भावना निर्माण झाल्यामुळे कर्तृत्वाची वाटणी निर्माण झाली. हे जाणून बऱ्या किंवा वाईट कार्यात अहंकाराच्या भुताटकीची बाधा होऊ नये. आपल्या हातून जे कर्म घडते त्याच्या अहंकाराचे वेड जाणत्याला बाधत नाही.

**हरिर्दाता हरिर्भोक्ता। ऐसें चालतें तत्वतां। ये गोष्टीचा आतां। विचार पाहावा ॥२८॥**

भगवंत हा दाता आहे तसाच तोच भोक्ता आहे. ही वस्तुस्थिती आहे. हा विचार नीट चित्तात ठसावा.

**सकळ कर्ता परमेश्वरु। आपला माइक विचारु। जैसें कळेल तैसें करूं। जगदांतरें ॥२९॥**

सर्व घटना परमेश्वरच करतो. आपण मायिक किंवा लटके आहोत. म्हणून जगदांतरात भरलेला परमात्मा जेवढे ज्ञान देईल तेवढेच कर्म समजून करता येईल ते करावे.

**देवायेवढें चपळ नाहीं। ब्रह्मायेवढें निश्चळ नाहीं। पाइरीनें पाइरी चढोन पाहीं। मूळपरियंत ॥३०॥**

देव म्हणजे अंतरात्मा. त्याच्याइतके चपळ कोणी नाही आणि ब्रह्माइतके निश्चळ कोणी

३) नेहटुनसा-लक्षपूर्वक

नाही. विचाराने पायरी पायरी चढत हा विचार मूळापर्यंत पहावा आणि स्वानुभव घ्यावा.

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मानिरूपणनाम समास चतुर्थ।।४।।**

## द. २०-५ : चत्वारजिनसनिरूपण

या जगामध्ये हजारो प्रकारचे देहधारी प्राणी आहेत. त्या सर्व प्राण्यांच्या जीवनात जे आढळत नाही, ते माणसाच्या जीवनात आढळते. मानवी जीवनाची पातळीच काही निराळी आहे. सृष्टीच्या व्यवहारात ईश्वराच्या खालोखाल माणसाने पराक्रम गाजविलेला स्पष्ट दिसतो. माणसाला हे सारे शक्य होते, याचे कारण त्याचा अपूर्व देह होय. म्हणून श्रीसमर्थ तर देहाला मोठे घबाड असे म्हणतात. माणसाला विवेक करण्याची शक्ती आहे. तिचा त्याने भरपूर उपयोग करावा. माणूस जर सतत श्रवणमनन करील तर नर तोच नारायण आहे, असा प्रत्यक्ष अनुभव त्यास येईल. माणसाने विशाल विवेक करून सगळे शोधून पहावे. त्याचे सगळे संदेह नाहीसे होतील. आपल्याला प्रतीत होणाऱ्या विशाल विश्वाचा विचार करणे हाच विशाल विवेक होय. सर्व विश्वाचा शांतपणे विचार केला तर त्यामध्ये फक्त चार जिन्नस आहेत, असे आढळते. (पहिला जिन्नस) सर्वाहून वेगळे आणि आगळे असलेले परब्रह्म. त्याच्या बरोबर कशाचीच तुलना करता येत नाही. ते निर्मळ, निश्चळ, निर्विकार आणि कल्पनेच्या पलीकडे आहे. (दुसरा जिन्नस) अतिशय सूक्ष्म आणि कर्दमरूप असलेली मूळमाया. मूळचे स्फुरण किंवा संकल्प हे तिचे स्वरूप आहे. चौदा नावांनी तिला ओळखतात. ती नावे अशी : चैतन्य, गुणसाम्य, अर्धनारीनटेश्वर, षड्गुणेश्वर, प्रकृतिपुरुष, शिवशक्ती, शुद्ध सत्त्वगुण, गुणक्षोभिणी, सत्त्व, रज, तम, मन, माया आणि अंतरात्मा. अंतरात्मा ज्ञानमय असून सर्व ठिकाणी विभागलेला आहे. (तिसरा जिन्नस) पाच महाभूते. यांच्या ठिकाणी जाणीवेचा अंश थोडा असतो. (चौथा जिन्नस) चार खाणींचे अनंत प्राणी. प्राण्यांच्या ठिकाणी जाणीव अधिक स्पष्टपणे प्रगट झाली आहे. अशा प्रकारचे चार जिन्नस असलेल्या या अवाढव्य विश्वरचनेवर रात्रंदिवस मनन करावे म्हणजे स्वरूपदर्शन घडते.

## ।। श्रीराम।।

**येथून पाहातां तेथवरी। चत्वार जीनस अवधारी। येक चौदा पांच च्यारी। ऐसें आहे[१] ।।१।।**

येथून तेथवर सर्व विश्वरचना पाहिली असता तिच्यामध्ये चारच पदार्थ आहेत ते ऐका. एक निश्चळ ब्रह्म, चौदा मायेची नावे, पंचमहाभूते आणि चार खाणी असे ते पदार्थ आहेत.

१) ओवी १ चा अर्थ- या विश्वरचनेत फक्त चारच पदार्थ आहेत. ते ऐकून ठेवा. एक ब्रह्म, चौदा मायेची नावे (चैतन्य, गुणसाम्य, अर्धनारीनटेश्वर, षडगुणेश्वर, प्रकृती पुरुष, शिवशक्ती, शुद्धसत्त्व, गुणक्षोभिणी, सत्व, रज, तम, मन, माया व अंतरात्मा) पांच महाभूते आणि चार खाणी असे ते पदार्थ आहेत.

**परब्रह्म सकळांहून वेगळें। परब्रह्म सकळांहून आगळें। नाना कल्पनेनिराळें। परब्रह्म तें ।।२।।**

परब्रह्म सर्वांहून निराळे, सर्वात श्रेष्ठ, मानवी कल्पनेपलीकडील एकटे एक आहे.

**परब्रह्माचा विचार। नाना कल्पनेहून पर। निर्मळ निश्चळ निर्विकार। अखंड आहे ।।३।।**

परब्रह्माबद्दलचा विचार आपल्या कल्पनाशक्तीच्या पलीकडील आहे. (शब्दात ते अव्यक्त आहे) ते निर्मळ, निश्चळ, निर्विकार व अखंड आहे.

**परब्रह्मास कांहींच तुळेना। हा येक मुख्य जिनसाना। दुसरा जिनस नाना कल्पना। मूळमाया ।।४।।**

परब्रह्मास उपमा कशाचीच देता येत नाही. हा एक मुख्य जिन्नस व दुसरा जिन्नस म्हणजे अनंत कल्पनारुप माया. हे विश्वरचनेत घटक आहेत.

**नाना सूक्ष्मरूप। सूक्ष्म आणि कर्दमरूप। मुळींच्या संकल्पाचा आरोप। मूळमाया।।५।।**

(आता मूळमायेबद्दल संक्षेपाने सांगतात) मूळ माया ही सूक्ष्म व अनेक सूक्ष्म घटकांचे मिश्रण (कर्दम) आहे. परब्रह्म एकटे होते. त्याच्या ठिकाणी 'एकोऽहं बहुस्याम्' असा संकल्प उठला असेल असा आरोप त्यावर केला जातो. तीच मूळमाया होय. (त्यालाच हरिसंकल्प असेही म्हणतात)

**हरिसंकल्प मुळींचा। आत्माराम सकळांचा। संकेत नामाभिधानाचा। येणें प्रकारें ।।६।।**

हरिसंकल्प मुळात झाला तो सगळ्याचा अंतरात्मा आहे. त्याची चौदा नावे यासाठी दिली आहेत की त्याचे स्वरुप काहीसे समजावे. ती नावे अशी.

**निश्चळीं चंचळ चेतलें। म्हणौनि चैतन्य बोलिलें। गुणसमानत्वें जालें। गुणसाम्य ऐसें ।।७।।**

निश्चळाच्या ठिकाणी चंचळ जागृत झाले म्हणून त्याला चैतन्य असे म्हणतात. त्याच्या ठिकाणी गुणांचे समानत्व असल्यामुळे त्यास 'गुणसाम्य' असे म्हणतात.

**अर्धनारीनटेश्वर। तोचि शड्गुणैश्वर। प्रकृतिपुरुषाचा विचार। शिवशक्ती ।।८।।**

'अर्धनारीनटेश्वर, षड्गुणेश्वर, प्रकृतिपुरुष, शिवशक्ती ही नावे.

**शुद्धसत्वगुणाची मांडणी। अर्धमात्रा गुणक्षोभिणी। पुढें तिही गुणांची करणी। प्रगट जाली ।।९।।**

'शुद्ध सत्त्वरुप गुणकल्पना, अर्धमात्रा असलेली गुणक्षोभिणी, तिच्यातून प्रगट होणारे सत्व, रज, तम हे तीन गुण ही मूळ मायेचीच नावे आहेत.

**मन माया अंतरात्मा। चौदा जिनसांची सीमा। विद्यमान ज्ञानात्मा। इतुके ठाइं ।।१०।।**

मन, माया, अंतरात्मा ही नावे अशी चौदा नावे एकूण आहेत. नित्य अस्तित्वात असणारा तो आदिसंकल्प अशा प्रकारे आपल्या प्रत्ययाला येतो.

**ऐसा दुसरा जिनस। अभिधानें चतुर्दश। आतां तिसरा जिनस। पंच माहाभूतें ।।११।।**

चौदा नावांचा हा घटक म्हणजे दुसरा जिन्नस झाला पंचमहाभूते हा तिसरा घटक किंवा जिन्नस होय.

**येथें पाहातां जाणीव थोडी। आदिअंत हे रोकडी। खाणी निरोपिल्या तांतडी। तो चौथा जिनस ।।१२।।**

पंचभूतांमध्ये जाणीवेचा अंश कमी प्रमाणात प्रत्ययाला येतो. (आधी मूळमायेमध्ये जाणीव असते व नंतर चार खाणींमध्येही जाणीव दिसते. त्याअर्थी पंचभूतांच्या ठिकाणीही ती असली पाहिजे) पूर्वी चार खाणी म्हणून घाईत सांगितले. (अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज या चार खाणी असल्याने शास्त्रात म्हटले आहे.)

**च्यारी खाणी अनंत प्राणी। जाणीवेची जाली दाटणी। च्यारी जिनस येथुनी। संपूर्ण जाले ।।१३।।**

चार खाणींमध्ये अनंत प्रकारचे प्राणी आहेत. त्यांच्यामध्ये विविध प्रकारच्या जाणीवांची गर्दी झाली आहे. असे हे विश्वरचनेचे चार जिन्नस सांगितले आहेत. (१) परब्रह्म (२) माया (३) पंचमहाभूते (४) प्राणी.

**बीज थोडें पेरिजेतें। पुढें त्याचें उदंड होतें। तैसें जालें आत्मयांतें। खाणी वाणी प्रगटतां ।।१४।।**

आपण थोडे धान्याचे बीज पेरतो पण त्याहून उदंड पीक निघते. त्याप्रमाणे चार खाणी चार वाणी प्रगटता अंतरात्म्याची तशीच अवस्था होते. (बीजरुप अंतरात्मा प्राणिमात्रात विस्तारतो)

**ऐसी सत्ता प्रबळली। थोडी सत्तेची उदंड जाली। मनुष्यवेषें सृष्टी भोगिली। नाना प्रकारें ।।१५।।**

अशा प्रकारे ईश्वरी सत्तेची वाढ होऊन खूप विस्तार झाला. अखेर मनुष्य देहामुळे सृष्टीचा उपभोग ती सत्ता अनेक प्रकारे घेऊ शकते.

**प्राणी मारून स्वापद पळे। वरकड[२] त्यास काये कळे। नाना भोग तो निवळे। मनुष्यदेहीं ।।१६।।**

एखादा पशु दुसऱ्या प्राण्याला (सावजाला) मारून पळून जातो. बाकीचे त्याला काही कळत नाही. (खाण्यापिण्यापुरतीच त्याची जाणीव असते) पण अनेक प्रकारचे भोग मनुष्य देहातच घेता येतात.

**नाना शब्द नाना स्पर्श। नाना रूप नाना रस। नाना गंध तें विशेष। नरदेह जाणे ।।१७।।**

शब्द, स्पर्श, रस, रुप, गंध हे पंचविषय असून त्याचे अनेक प्रकार फक्त नरदेहातच कळतात. (पंच विषयांचा नैवेद्य नरदेहामुळे अंतरात्म्याला घडतो.)

**अमोल्य रत्नें नाना वस्त्रें। नाना पानें नाना शस्त्रें। नाना विद्या कळा शास्त्रें। नरदेह जाणे ।।१८।।**

अमूल्य रत्ने, नाना प्रकारची वस्त्रे, नाना प्रकारची वाहने, विविध प्रकारची हत्यारे, अनेक प्रकारच्या विद्या, कला, शास्त्रे ही नरदेहालाच कळतात.

**पृथ्वी सत्तेनें व्यापिली। स्थळोस्थळीं अटोपिली। नाना विद्या कळा केली। नाना धारणा ।।१९।।**

२) वरकड-इतर

अशा प्रकारे ईश्वरी सत्तेने पृथ्वी व्यापली असून तीच सत्ता सर्वत्र भरून राहते. अनेक विद्या, कला, बुद्धीचा आवाका त्या सत्तेवरच अवलंबून आहे.

**दृश्य अवघेंचि पाहावें। स्थानमान सांभाळावें। सारासार विचारावें। नरदेहे जालियां ।।२०।।**

नरदेह प्राप्त झाल्यावर सर्व दृश्य सृष्टी पहावी. आपले मानाचे स्थान सांभाळावे. (मानवाला जीवसृष्टीत्वामध्ये प्रथम दर्जाचे स्थान आहे) आणि एकूण सृष्टीत सार काय व असार काय आहे त्याची विचारणा करावी.

**येहलोक आणी परलोक। नाना प्रकारींचा विवेक। विवेक आणी अविवेक। मनुष्य जाणे ।।२१।।**

इहलोकातील यशप्राप्ती व परलोकासंबंधीचा जाणीवपूर्वक विचार मनुष्यच जाणतो. विवेक आणि अविवेक यांचा जाणकार मानवच आहे.

**नाना पिंडी ब्रह्मांडरचना। नाना मुळींची कल्पना। नाना प्रकारीं धारणा। मनुष्य जाणे ।।२२।।**

नाना प्रकारच्या पिंड रचना, ब्रह्मांड रचना, अनेक प्रकारच्या मूळमायेपासून झालेल्या किंवा मूळमायेसंबंधी कल्पना, धारणा माणूस जाणतो.

**अष्टभोग[३] नवरस। नाना प्रकारींचा विळास। वाच्यांश लक्ष्यांश सारांश। मनुष्य जाणे ।।२३।।**

अन्न, उदक, तांबूल, पुष्प, चंदन, वसन, शय्या व अलंकार हे आठ प्रकारचे भोग (किंवा सुगंध, स्त्री, तांबूल, वस्त्र, गायन, भोजन, शय्या व मादक द्रव्य हेही अष्टभोग) नऊ प्रकारचे रस (श्रृंगार, वीर, करुण, भयानक, हास्य, बीभत्स, अद्‌भुत, रौद्र, शांत हे साहित्यशास्त्रात आहेत), नानाविध विलास, वाच्यांश लक्षांश, सारांश हे मनुष्य जाणतो.

**मनुष्यें सकळांस आळिलें[४]। त्या मनुष्यांस देवें पाळिलें। ऐसें हें अवघें कळलें। नरदेहयोगें ।।२४।।**

मनुष्य इतर सर्व प्राण्यांना ताब्यात ठेवतो आहे. पण त्या मनुष्याला ईश्वराने पाळले आहे हे सारे मानव देहातच कळते.

**नरदेह परम दुल्लभ। येणें घडे अलभ्य लाभ। दुल्लभ तें सुल्लभ। होत आहे ।।२५।।**

मानव देह प्राप्त होणे कठीण असते. याच्या योगाने अलभ्य असा लाभ होतो. जी गोष्ट दुर्लभ आहे. (उदा. आत्मज्ञान) तीसुद्धा सहज प्राप्त होते.

**वरकड देहे हें काबाड। नरदेह मोठें घबाड। परंतु पाहिजे जाड। विवेक रचना ।।२६।।**

मानवेतर देह कष्टदायक आहेत. मानव देह हा आकस्मिक लाभ आहे. पण येथे विशाल विवेक असला पाहिजे. (तरच याचे सार्थक होते)

**येथें जेणें आळस केला। तो सर्वस्वें बुडाला। देव नाहीं ओळखिला। विवेकबळें ।।२७।।**

पण ह्या नरदेहामध्ये येऊनही विवेक बळावर ईश्वर ओळखण्यासाठी प्रयत्न न करता आळस

३) अष्टभोग-अन्न, उदक, तांबुल, पुष्प, चंदन, वसन, शय्या, अलंकार हे आठ भोग ४) आळिले- ताब्यात ठेवले.

केला तर मात्र तो सर्वस्वी नाश पावला असे समजावे.

**नर तोचि नारायेण। जरी प्रत्ययें करी श्रवण। मननशीळ अंतःकर्ण। सर्वकाळ ।।२८।।**

जर सर्वकाळ मननशील अंत:करण ठेवून श्रवण केलेल्या निरुपणाचा प्रत्यय माणसाने घेतला तर तो नराचा नारायण होईल. (म्हणजे देवपद त्याला प्राप्त होईल)

**जेणें स्वयेंचि पोहावें। त्यास कासेस नलगे लावावें। स्वतंत्रपणें शोधावें। सकळ कांहीं ।।२९।।**

ज्याला स्वत: पोहोता येत आहे त्याने दुसऱ्याची कास धरण्याची गरज नसते. त्याप्रमाणे ज्याला स्वतंत्रपणे विचार करता येतो त्याने स्वतंत्रपणे सर्व शोधून पहावे. ('उद्धरेदात्मनात्मानम्' या वचनाची आठवण देणारी ही ओवी आहे.)

**सकळ शोधून राहिला। संदेह कैंचा तयाला। पुढें विचार कैसा जाला। त्याचा तोचि जाणे ।।३०।।**

सगळ्या विश्वाचा (किंवा धर्मग्रंथांचा) जो स्वतंत्रपणे शोध घेईल त्याला कोणताही संदेह राहात नाही. अशी संदेहरहित स्थिती प्राप्त झाल्यावर जी अवस्था येते ती त्याची त्यालाच समजते. (संदेहरहित साधन। तेंचि सिद्धांचे लक्षण। अंतर्बाह्य समाधान चळेना ऐसें।।' ८-९-१३ ती अवस्था प्राप्त होते.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे चत्वारजिनसनाम समास पंचम।।५।।**

## द. २०-८ : देहेक्षेत्रनिरूपण

ब्रह्मदेवाने हा प्रचंड प्रपंचवृक्ष निर्माण केला. त्याची खूप वाढ झाली आणि अखेर त्यास मानवदेहाचे उत्तम फळ आले. या देहामध्ये ज्ञानेंद्रिये आहेत व कर्मेंद्रिये आहेत. इंद्रियांच्या साहाय्याने माणसाला दृश्याचे ज्ञान होते व त्यांमधील भेद कळतो. त्याचप्रमाणे या शरीराच्या सहाय्यावाचून कोणालाही विषयाचा भोग घेता येत नाही. सारांश, या शरीरासारखे दुसरे यंत्र विश्वात नाही. या जगामध्यें सगळी करणी अंतरात्म्याची आहे. सगळ्या देहांमध्ये तोच विभागला आहे. ज्या देहाचे जेवढे सामर्थ्य असते तेवढे कार्य अंतरात्मा त्याच्याकडून घडवून आणतो. ज्या देहाचे सामर्थ्य थोर असते त्यास अवतार म्हणतात. मुळात अभेदच आहे. जीव ऊर्ध्वमुख झाला की, भेद कमी होत जाऊन अखेर नाहीसा होतो. आवाहन आणि विसर्जन हेच भजनाचे लक्षण होय.

विज्ञानयुगामध्ये मानवाने अत्यंत आश्चर्यकारक यंत्रे निर्माण केली आहेत. पण ईश्वराने निर्माण केलेल्या मानवी शरीरासारखे यंत्र विश्वामध्ये अन्य कोणतेही नाही. ''शरीरासारिखें यंत्र। आणीक नाहीं।।' असे श्रीसमर्थ येथे म्हणतात.

## ||श्रीराम||

**विधीप्रपंचतरु[१] वाढला। वाढतां वाढतां विस्तीर्ण जाला। फळें येतां विश्रांती पावला। बहुत प्राणी ||१||**

ब्रह्मदेवाच्या प्रपंचाचा वृक्ष वाढला. वाढता वाढता त्याचा प्रचंड विस्तार झाला. नंतर त्याला फळे आली. (तेव्हा ती चाखून) बहुत प्राण्यांना समाधान मिळाले.

**नाना फळें रसाळें लागलीं। नाना जिनसी गोडीस आलीं। गोडी पाहावया निर्माण केलीं। नाना शरीरें ||२||**

नाना प्रकारची रसाळ फळे आली. (सुखकर असे विषय निर्माण झाले) त्या फळात गोडी निर्माण झाली. ती अनुभवण्यासाठी अनेक प्रकारची शरीरे निर्माण केली.

**निर्माण जाले उत्तम विषये। शरीरेंविण भोगितां नये। म्हणोनि निर्मिला उपाये। नाना शरीरें ||३||**

उत्तम विषय जरी निर्माण झाले तरी त्यांचा उपभोग शरीराशिवाय घेता येत नाही. यासाठी त्यावर उपाय म्हणून देवाने शरीरे उत्पन्न केली.

**ज्ञानइंद्रियें निर्माण केलीं। भिन्न भिन्न गुणाचीं निर्मिलीं। येका शरीरासी लागली। परी वेगळालीं ||४||**

ज्ञानेंद्रिये निर्माण करून भिन्न विषयांचा आस्वाद घेण्याचे गुण त्यात घातले. ही इंद्रिये एकाच शरीरात पण वेगवेगळी आहेत.

**श्रोत्रइद्रिईं शब्द पडिला। त्याचा भेद पाहिजे कळला। ऐसा उपाय निर्माण केला। इंद्रियांमधें ||५||**

कानामध्ये शब्द पडले तर शब्दांचा भेद, सूक्ष्म अर्थ पहाण्याची योजना त्याच्यामागे केली आहे.

**त्वचेइंद्रियें सीतोष्ण भासे। चक्षुइंद्रियें सकळ दिसे। इंद्रियांमधें गुण ऐसे। वेगळाले||६||**

त्वचाइंद्रियांमुळे थंड व उष्ण कळते. डोळ्याने पदार्थ दिसतात. अशा प्रकारे ज्ञानेंद्रियाचे गुण वेगवेगळे आहेत.

**जिव्हेमधें रस चाखणें। घ्राणामधे परिमळ घेणें। इंद्रियांमधें वेगळाल्या गुणें। भेद केले ||७||**

जिभेत रस चाखण्याचा, नाकाने वास घेण्याचा गुण आहे. वेगवेगळ्या गुणांचे आकलन करण्यासाठी इंद्रियांमध्ये असे भेद आहेत.

**वायोपंचकी अंतःकर्णपंचक। मिसळोनि फिरे निशंक। ज्ञानइंद्रियें कर्मइंद्रियें सकळिक। सावकास पाहे ||८||**

वायुपंचकात (प्राण, अपान, उदान, समान व व्यान) अंत:करण पंचक (चित्त, अहंकार, बुध्दी, मन, अंत:करण) मिसळून शरीरामध्ये नि:शंकपणे वावरते. ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रिये यांची कामे सावकाश पहावी.

**कर्मइंद्रियें लागवेगीं[२]। जीव भोगी विषयांलागीं। ऐसा हा उपाये जगीं। ईश्वरें केला ||९||**

कर्मेंद्रियांच्या सहाय्याने जीव हा विषयांचा उपभोग तात्काळ घेऊ शकतो. असा उपाय

१) विधीप्रपंचतरू-ब्रह्मदेवाने निर्मिलेला हा प्रपंचवृक्ष २) लागवेगीं-मदतीने

(निर्मात्याने) ईश्वराने निर्माण केला आहे.

**विषय निर्माण जाले बरवे। शरीरेंविण कैसें भोगावे। नाना शरीराचे गोवे। याकारणें ।।१०।।**

उत्तम विषय जरी उत्पन्न झाले तरी ते शरीराविना भोगता कसे येतील? म्हणून अनेक प्रकारची शरीरे निर्माण झाली.

**अस्तीमांशाचें शरीर। त्यामधें गुणप्रकार। शरीरासारिखें यंत्र। आणीक नाहीं ।।११।।**

वास्तविक शरीर हे हाडे आणि मांस यांचे बनते. पण त्यामध्ये (सत्त्व, रज आणि तम हे) त्रिगुणांचे प्रकार घातले. या मानवी शरीरासारखे दुसरे यंत्रच नाही. (जगात मानवी शरीर हे अद्भुत यंत्र सर्वश्रेष्ठ आहे.)

**ऐसीं शरीरें निर्माण केलीं। विषयभोगें वाढविलीं। लाहानथोर निर्माण जालीं। येणें प्रकारें ।।१२।।**

अशी शरीरे निर्माण केली ती विषयांच्या भोगाने वाढविली. त्यामुळे लहान थोर अशी शरीरे उत्पन्न झाली.

**अस्तिमांशाची शरीरें। निर्माण केलीं जगदेश्वरें। विवेकें गुणविचारें। करूनियां ।।१३।।**

जगदीश्वराने ही हाडामांसाची शरीरे निर्माण केली ती निर्माण करताना विवेकाने त्रिगुणांचा विचार करून त्याला निर्मिले.

**अस्तिमौंशाचा पुतळा। जेणें ज्ञानें सकळ कळा। शरीरभेद वेगळा। ठाईं ठाईं ।।१४।।**

शरीर हा हाडामांसाचा पुतळा खरा पण त्यात ज्ञान/जाणीव ठेवली आहे. त्यामुळे जीव सकल कला प्रवीण होतो. भिन्न शरीरांमध्ये भेद त्यामुळे आढळतो.

**तो भेद कार्याकारण[३]। त्याचा उदंड आहे गुण। सकळ तीक्षण बुद्धीविण। काये कळे ।।१५।।**

शरीरांमध्ये फरक आढळतो त्याला योग्य कारण असते. मुळातील ज्ञान कमी-अधिक असेल त्याप्रमाणे त्या शरीरात कला प्रगट होतात. जगातील व्यवहार सुरळीत चालावेत यासाठी शरीराचा भेद उपयुक्त असतो. त्या भेदामागे काही कार्यकारणभाव असतो. पण हे सर्व तीक्ष्णबुद्धी असेल तरच कळू शकते.

**सकळ करणें ईश्वराला। म्हणोनी भेद निर्माण केला। ऊर्धमुख होतां भेदाला। ठाव कैंचा ।।१६।।**

ईश्वराला सर्व आश्चर्यकारक विश्व करावयाचे आहे. (सृष्टिव्यवहार चालवावयाचे आहेत) म्हणून त्याने शरीरामध्ये भेद उत्पन्न केले आहेत. (पण मूळ वस्तूमध्ये भेद नसतो. आत्मवस्तू एकच असते. पण अष्टधा प्रकृतीमुळे भेद दिसतो.) उर्ध्वमुख होऊन दृष्टी टाकली तर भेदाला वावच नाही. (भेद मायेत आहेत ब्रह्मात नाहीत.)

३) तो भेद कार्याकारण-हा भेद कार्याच्या दृष्टीने अति उपयोगी आहे.

**सृष्टिकर्णी आगत्य भेद। संव्हारें सहजचीं अभेद। भेद अभेद हा संवाद। मायागुणें ।।१७।।**

सृष्टी उत्पन्न करण्यासाठी भेद किंवा विविधता आवश्यक असते. पण तिचा संहार झाला की तेथे आपोआप अभेद असतो. माया आहे तोवरच भेद वा अभेद ही भाषा असते.

**मायेमधें अंतरात्मा। न कळे तयाचा महिमा। जाला चतुर्मुख ब्रह्मा। तोहि संदेहीं पडे ।।१८।।**

मायेमध्ये अंतरात्मा आहे. त्याचा महिमा कळत नाही. खुद्द जगनिर्माता ब्रह्मदेव, ज्याला चार तोंडे असूनही तो सांगू शकत नाही. तो संदेहात पडतो. विश्वनिर्मितीच्या कोड्याबद्दल मानवाने किती विचार केला तरी तर्काची समाधान करणारी उत्तरे मिळू शकत नाहीत.

**पीळ पेंच कडोविकडी। तर्क तीक्षण घडीनें घडी। मनासी होये तांतडी[४]। विवरण करितां ।।१९।।**

अंतरात्म्याचे विवरण करताना हरघडीला पीळ पेच पडतात. कितीही युक्तीप्रयुक्ती केली किंवा तीक्ष्ण बुद्धी वापरली तरीही मनाची तिरपिट होते. (मन पराभूत होते. कल्पनातीत असेल त्याला तर्क उपयोगाचा नसतो.)

**आत्मत्वें [५] लागतें सकळ कांहीं। निरंजनीं हें काहींच नाहीं। येकांतकाळीं समजोन पाही। म्हणिजे बरें ।।२०।।**

अंतरात्म्याचा शोध घेताना सगळ्या उपाधी लागतात. पण निरुपाधिक परब्रह्माच्या ठिकाणी ही यातायात करावी लागत नाही. एकान्तकाळी विचार समजून घेण्याचा प्रयत्न केला म्हणजे बरे (म्हणजे हे ध्यानात येते)

**देहेसामर्थ्यानुसार। सकळ करी जगदेश्वर। थोर सामर्थ्यें अवतार। बोलिजेती ।।२१।।**

प्रत्येक जीवामध्ये अंतरात्मा असतो. 'ममैवांशो जीवलोके' प्रत्येकामध्ये त्याचा अंश असतो. देहाचे सामर्थ्य जेवढे असते तेवढेच कार्य त्याच्याकडून तो करवून घेतो. ज्या देहामध्ये सामर्थ्य अतिशय असते त्याला अवतार म्हणतात.

**शेष कूर्म वऱ्हाव जाले। येवढे देहे विशाळ धरिले। तेणेंकरितां रचना चाले। सकळ सृष्टीची ।।२२।।**

शेष, कूर्म, वराह यांनी महाविशाल देह धारण केले. (त्यामुळे पृथ्वीचा भाग धरला) म्हणून या सर्व सृष्टीची रचना चालली.

**ईश्वरें केवढें सूत्र केलें। सूर्यबिंब धांवाया लाविले। धुकटाकरवीं धरविलें। अगाध पाणी ।।२३।।**

ईश्वराने मोठे आश्चर्य घडविले आहे. त्याने सूर्याला आकाशात धावावयास लावले आहे आणि धुक्यामध्ये पाण्याचा प्रचंड साठा धारण करावयास लावला आहे.

**पर्वताऐसे ढग उचलती। सूर्यबिंबासी अछ्यादिती। तेथें सवेचि वायोचि गती। प्रकट होये ।।२४।।**

पर्वतप्राय ढग आकाशामध्ये चढतात काय आणि ते सूर्याला आच्छादून टाकतात काय! (ही नेहमीचीच घटना आहे. पण त्याबद्दल सामान्य मनुष्य विचार करीत नाही. त्याला विचाराला

४) तांतडी-त्रेधातिरपिट ५) आत्मत्त्वे-आत्मत्त्वाने (मीपणाचे भान असताना)

प्रवृत्त करणाऱ्या या ओव्या आहेत.) लगेच तेथे वायूचा झंझावात सुरू होतो.

**झिडकझिडकुं धांवे वारा। जैसा काळाचा म्हणियारा। ढग मारुनी, दिनकरा । मोकळें करी ।।२५।।**

तो वायू जोरात वाहू लागतो. जणू काही यमाच्या दूताप्रमाणेच तो ढगांना मारून सूर्याला मोकळे करतो.

**बैसती विजांचे तडाखे। प्राणीमात्र अवचिता धाके। गगन कडकडून तडके। स्थळांवरीं ।।२६।।**

ढगांना जणू विजांचे तडाखे देतो. विजांचा एकाएकी कडकडाट सुरू झाल्यावर प्राण्यांच्या मनात धडकी भरते आणि आकाशच जणू कडाडून पृथ्वीवर कोसळल्यासारखे वाटते.

**येहलोकांसी येक वर्म केलें। महद्भूतें [६] महद्भूत आळिलें। सकळां समभागें चालिलें। सृष्टिरचनेसी ।।२७।।**

या लोकी ईश्वराने एक मोठे गूढ (वर्म) करून असे ठेवले आहे की पंचमहाभूतांपैकी एक दुसऱ्याला आटोक्यात आणते. सर्व महाभूतांच्या समसहभागाने पृथ्वीचा कारभार सुसूत्र चालतो.

**ऐसे अनंत भेद आत्मयाचे। सकळ जाणती ऐसें कैंचें। विवरतां विवरतां, मनाचे। फडके होती [७] ।।२८।।**

अशा प्रकारे अंतरात्म्याच्या व्यापाचे अनंत भेद आहेत ते सगळे सर्वांना ध्यानात कसे येणार? त्याबद्दल विचार करता करता अखेर मनाच्या चिंध्याच उडून जातात. (मन हतबल होते. विचारांचा अंत होतो)

**ऐसी माझी उपासना। उपासकीं आणावी मना। अगाध महिमा चतुरानना[८]। काये कळे ।।२९।।**

माझी उपासना ही अशी आहे. तिचा उपासकांनी (साधकांनी) विचार करावा. त्या उपासनेचा महिमा चतुरानना (किंवा ब्रह्मदेवा) ला सुद्धा कळत नाही.

**आवाहन[९] विसर्जन। हे चि भजनाचें लक्षण। सकळ जाणती सज्जन। मी काये सांगों ।।३०।।**

विवेकाने अंतरात्म्याचे आवाहन करणे आणि निरंजन परब्रह्मामध्ये त्याचे विसर्जन करणे हेच भजनाचे लक्षण आहे. संतसज्जन हे जाणतात, मी अधिक काय सांगणार? (ऐहिक व्यवहारामध्ये 'आवाहन' व विसर्जन विधीचा अर्थ प्रथम पाहून आणि नंतर संतसज्जन यांचे 'आवाहन विसर्जन' हे भजनाचे लक्षण कसे असते ते पाहू. १) पूजाविधीमध्ये पूजेसाठी देवाला निमंत्रण केले जाते, याला आवाहन म्हणतात आणि पूजा झाल्यावर देवाला विधीवत मंत्र म्हणून स्वस्थानी पोहोचविले जाते. हे विसर्जन होय. हे सुद्धा ईश्वराच्या भजनाचे लक्षण आहे. पण संतांचे भजनाचे लक्षण और आहे ते असे. २) सर्व दृश्य विश्व अस्तित्वात असतानाच विवेकप्रलय या वैचारिक प्रक्रियेने स्वतःच्या शरीरासह साऱ्या विश्वाचा निरास करून विश्वाच्या अंतर्यामी असलेल्या सर्व भूतात्मक

६) महद्भूते-महाभूताने ७) मनाचे फडके होती-मनाच्या (कल्पनाशक्तीच्या) चिंधड्या होतात. ८) अगाध महिमा चतुरानना। काये कळे।। -ब्रह्मदेवाचे लक्ष सृष्टीमध्येच गुंतल्याने, मनच नष्ट करणाऱ्या अद्वैत उपासनेचा महिमा त्यांच्या ध्यानात येत नाही. ९) आवाहन, विसर्जन-उभारणी व संहारणी (यांचा विवेक करून शाश्वत काय ते ओळखणे) हेच ईश्वरचिंतनाचे मुख्य लक्षण आहे. (संदर्भार्थ १०-५-२८)

अंतरात्म्याचे अस्तित्व बघणे याचे नाव आवाहन आहे. या अंतरात्म्याचा महिमा अनुभवल्यावर त्याच्याशी पलीकडे असलेल्या शून्य अवस्थेचे निरसन करून निर्गुण निराहारी, निर्विकारी परब्रह्मापर्यंत पोहोचणे हे अंतरात्म्याचे विसर्जनच होय. अशा प्रकारच्या 'आवाहन विसर्जना'तून स्वस्वरुपाची अनुभूती घेण्याचे सामर्थ्य व अभ्यास स्वानुभवी संतांना साध्य झालेला असतो. 'ऐसी माझी उपासना। उपासकीं आणावी मना।।' असे येथे श्रीसमर्थांनी सांगितले आहे.)

**इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे देहेक्षेत्रनिरूपणनाम समास अष्टम।।८।।**

*** ***

## दासबोध प्रबोध : प्रश्नपत्रिका १२ वी

**(द. २०-४ आत्मानिरूपण, २०-५ चत्वारजिनस, २०-८ देहेक्षेत्रनिरूपण वर आधारित)**

प्र. १ खालील ओव्यांचा अर्थ स्पष्ट करा.

१) प्रगट रामाचें निशाण। २०-४-१४

२) नर तोचि नारायण। २०-५-२८

३) आवहन विसर्जन। हेंचि भजनाचें लक्षण। २०-८-३०

प्र. २ 'मानवी शरीर' यंत्राचा गौरव श्रीसमर्थांनी द. २०-८ मध्ये कशा प्रकारे केला आहे?

प्र. ३ (अ) विश्वरचनेमधील चार घटक २०-५-१ या ओवीत कसे स्पष्ट केले आहेत?

(ब) 'सामर्थ्य आहे चळवळीचें।' या ओवीचा कल्पनाविस्तार करा.

प्र. ४ द. २०-४-५ मध्ये मातेची महती कशी प्रगट झाली आहे?

प्र. ५ (अ) ''पृथ्वीमध्यें जितुकीं शरीरें। तितुकीं भगवंताचीं घरें।'' याची अनुभूती आली तर दैनंदिन वागण्यात माणसाचे वर्तनात बदल होईल काय?

(ब) प.दा.अ. उपक्रमामुळे 'समर्थ-विचार' समजाऊन घेण्यास आपणास साहाय्य मिळाले का?

(क) दासबोध अभ्यास वर्गाला आपण गेला होतात का? असल्यास केव्हा व कोठे?

(ड) आपल्या या उपक्रमाचा तसेच दासबोध ग्रंथाचा प्रसार वाढावा यासाठी आपण कोणत्या प्रकारे यत्न करू शकाल?

(इ) सार्थ दासबोध आपणाकडे आहे का? 'सज्जनगड' मासिकाचे आपण ग्राहक आहात का?

*** ***

# परिशिष्ट १ ले

(१० व्या स्वाध्यायात प्र. ५ वा :- लो. टिळक यांच्या चरित्रातील कोणत्या प्रसंगात त्यांची निर्भयता, निःस्पृहता आणि निःसंदेहावस्था आपणास प्रत्ययास येते, तो प्रसंग थोडक्यात लिहा.'' या प्रश्नाबद्दल काही अभ्यासार्थींना असे वाटते की दासबोधाच्या अभ्यासक्रमाशी याचा काही संबंध नाही. याबद्दल खुलासा असा की हा प्रश्न द. ८-९ सिद्धलक्षण या समासावर घातला आहे. सिद्धावस्थेत जी लक्षणे आहेत तीच लोकमान्यांच्या चरित्रात आढळतात. सिद्धावस्था प्राप्त झालेली व्यक्ती संपूर्णपणे समाज-विन्मुख होते अशी विकृत कल्पना अभ्यासार्थींमध्ये होऊ नये म्हणून हा प्रश्न विचारला आहे.)

दि. १३-७-१९०८ रोजी लो. टिळक यांच्यावर इंग्रज सरकारने राजद्रोहाचा खटला सुरू केला. मुंबईतील हायकोर्टाच्या वरच्या टॉवरमध्ये त्यांना आणण्यात आले. न्या. दावर यांच्यापुढे इंग्लंडचे बादशहा विरूद्ध बा. गं. टिळक असे खटल्याचे कामकाज सुरू झाले. निकाल काय लागणार हे ठरल्यासारखेच होते. ज्याच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही त्या सम्राटाविरूद्ध लोकमान्य टिळक सात दिवस दररोज आपली बाजू मांडत होते.....शेवटी ज्यूरींनी बहुमताने टिळकांना दोषी ठरविले. त्यानंतर शिक्षा सांगण्यापूर्वी न्या. दावर यांनी टिळकांना विचारले - तुम्हाला काही सांगावयाचे असल्यास सांगा. धीरगंभीर वाणीने टिळक म्हणाले -''ज्यूरींनी मला दोषी ठरवले तर खुशाल ठरवो पण मी गुन्हेगार नाही. आपले उच्च न्यायासन आहे हे मला कबूल आहे. पण जगात आपणापेक्षाही एक उच्च न्यायालय आहे हे आपण लक्षात असू द्यावे. आपणाला मी दोषी वाटत असलो तरी ईश्वरापुढे मी निर्दोष आहे. कदाचित माझ्या शिक्षा भोगण्यानेच माझे कार्य वाढवावयाचे असेल. ईश्वराची तशी इच्छा असेल तर तसेच होऊ द्या.''

शेवटी न्या. दावर यांनी सहा वर्षाचे काळे पाणी व एक हजार रूपये दंड अशी शिक्षा फर्मावली. टिळकांना पहावयास अफाट गर्दी कोर्टाच्या आवाराबाहेर जमली होती. पण पोलिसांनी मागच्या जिन्याने टिळकांना गुपचुप खाली आणले आणि मोटारीतून त्यांना मध्यरात्री आगगाडीत बसविण्यात आले. गाडी सुटली. आपल्या उपरण्याची उशी करून टिळक शांतपणे झोपी गेले असा हा प्रसंग आहे. त्या प्रसंगात लो. टिळकांच्या निर्भयतेचे, निस्पृहतेचे व निःसंदेहावस्थेचे नेमके दर्शन कोठे होते त्याचा विचार अभ्यासार्थींनी करावा व आपला स्वाध्याय तयार करावा.

लोकमान्यांच्या जीवनावर गुणसागर टिळक हे पुस्तक पुणे विद्यार्थी गृहाने प्रसिद्ध केले आहे. श्री. ह. त्र्यं. देसाई हे लेखक आहेत. पूर्णपणे सिद्धावस्थेला पोहोचलेल्या या राजकारणी नेत्याचे चरित्र व सद्‌गुण अभ्यासण्यासाठी अनेक ग्रंथ आजवर प्रसिद्ध झाले आहेत. ते प्रयत्नपूर्वक मिळवावे व स्वाध्याय तयार करावा.

# परिशिष्ट २ रे

'भावार्थ दा. परिचय' पुस्तकामध्ये 'श्री समर्थ संप्रदाय आणि आपण' असे २ रेच परिशिष्ट आहे त्या भागाचीच ही पुरवणी आहे.

आपण प. दा. अ. उपक्रमातून तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर दासबोध ग्रंथावर आपल्या साऱ्या चित्तवृत्ती स्थिरावल्या आहेत. समर्थशिष्या वेणास्वामी (१६२७-१६७८)यांनी दासबोध ग्रंथाची थोरवी श्रीसमर्थांच्या मुखातूनच एकवार प्रत्यक्षपणे वदविल्याचे गिरीधरस्वामींनी समर्थप्रतापात (९,३६,३९) नोंदविले आहे.

'श्रीराम देवार्चन सिद्धचि आहे ।

श्री ग्रंथराज दासबोध सामर्थ्यं सिद्धचि आहे ।

जो जो महंत येथें निश्चयें राहे ।

तो तो लाहे साक्षात्कारू ।। ९-३८ ।।

अशा प्रकारे आत्मसाक्षात्कार घडविणारा दासबोध ग्रंथ हा आपण गुरूस्थानी मानावा. त्या अलौकीक ग्रथांची निर्मीती करणारे श्रीसमर्थ आपले सद्‌गुरू आहेत. सज्जनगड येथे समाधीपाशी दीक्षागुरूंकडून औपचारिक दीक्षा दिली जाते. दररोज किमान एकातरी जपमाळेचा जप आणि दैनंदिन दासबोधाचे वाचन हे व्रतच संप्रदायामध्ये पाळले जाते.

अध्यात्मिक प्रवचानातून ज्ञान देणारे आपले सारे वंदनीय गुरूच आहेत. पण सदगुरूस्थानी श्रीसमर्थच आहेत हा विश्वास अखेरच्या क्षणापर्यंत ठेवावा. या दृष्टीनेच मला 'दासबोधीच लाभेल बोध' हे गीत प. दा. अ. संमेलन कार्यक्रमातून म्हटले जाते. संप्रदायाचा आपण अभिमान धरावा पण तेथे दुराभिमान मात्र नसावा. भिन्न संप्रदायातील भिंती आपणास उंच करावयाच्या नाहीत. 'दासबोध अभ्यास मंडळ' चालविताना हे ध्यानी असावे.

अध्यात्मिक विचारांचा प्रभाव आपल्या आचरणात आढळला पाहीजे. उपासनेला दृढ चालवावे हा संपूर्ण श्लोक म्हणजे श्रीसमर्थांचा आदेशच आहे. दृढ उपासना, सत्कर्मे करणे, सदाचरण, सर्व संतांचा आदर करणे आणि सर्वांना सद्‌विचार देण्यासाठी दासबोध अभ्यासाला प्रवृत्त करावे. शरीरसामर्थ्य कमाविले पाहिजे आणि आरोग्य संपादन करून परोपकारासाठी शरीर झिजविले पाहिजे.

जनी जनार्दन म्हणोनि । जना संतुष्ट करावे ।।

नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।

या कारणें तोषवावी । कोणीतरी काया ।।

# परिशिष्ट ३ रे

## दासबोधाचा सखोल अभ्यास (दा. स. अ.)

दासबोधाचा सखोल अभ्यास (दा. स. अ.) हा परमपूज्य अक्का वेलणकर (१९२२-१९९८) यांचा उपक्रम म्हणूनच ओळखला जातो. प. पू. अक्का प. दा. अ. च्या समीक्षक म्हणून अनेक वर्षे काम करीत होत्या. तसेच १९७८ पासून कित्येक भागवत सप्ताह त्यांनी केले. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही केले. त्यांचा ज्ञानेश्वरी, भावगत, रामायण व दासबोधांचा व्यासंग मोठा होता. त्यांच्या काही अभ्यासार्थीनी प्रबोध झाल्यानंतर काय? हा प्रश्न त्यांचेपुढे उपस्थित केला. त्याचा विचार करून सुरूवातीला दासबोधाच्या काही निवडक समासावर त्यांनी प्रश्न काढले व त्याचा प्रसार पत्रलेखनातूनच झाला. अक्कांनी काढलेले हे प्रश्न सर्वच अभ्यासार्थींना फार आवडले. त्यांनी ते सोडवून समीक्षणासाठी पाठवलेच व त्याचबरोबर असे अधले मधले समास न निवडता प्रथम समासापासून अभ्यास करावा हा विचार झाला व त्याचप्रमाणे त्यांनी सर्व म्हणजेच २०० समासावर अभ्यासपूर्वक स्वाध्याय मालिका तयार केली. हे करीत असताना केवळ अभ्यासार्थीच न घडवता निष्ठावंत आदर्श साधक निर्माण व्हावेत हा त्यांचा दृष्टीकोन होता. दा. स. अ. च्या त्या संयोजकच असल्याने कुणाला प्रवेश द्यावा हे त्या स्वतः पहिल्या स्वाध्यायावरून ठरवत असत. ही प्रवेश पात्रता चाचणीच होती.

प्रत्येक स्वाध्यायात पहिले तीन प्रश्न हे त्या समासावर, एक प्रश्न मनाचा श्लोक तर एक प्रश्न गीतेवर व समर्थचरीत्रावर आधारीत असत. जेणेकरून दासबोधाबरोबर गीता, मनाचे श्लोक व समर्थ चरीत्राचा अभ्यास व्हावा. या उपक्रमात अगदी सुरूवातीपासूनच अभ्यासार्थींचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यांची संख्या जशीजशी वाढू लागली, तसतसे समीक्षकांची जबाबदारी श्रीमती अनुताई देशमुख, श्रीमती नलूताई फाटक, सौ. उज्ज्वलाताई दाबके, सौ. लिलाताई गाडगीळ, श्रीमती रत्नप्रभा जोशी व श्री. वसंतराव जोशी यांचेकडे सोपवली व ती त्यांनी समर्थपणे सांभाळली. लहान रोपट्याचा हळुहळू वृक्ष होत गेला. हे करत असताना अक्कांनी त्याला शिस्त लावली. १९८५ पासून 'दा.स.अ.' अभ्यासार्थींसाठी दरवर्षी शिवथर घळीत साधना सप्ताह सुरू केला. त्यातील उपस्थिती वाढतच जात आहे. या साधना सप्ताहास वंदनीय मामा गांगल (१९२३-१९९९) यांनी सर्वतोपरी सहाय्य करून १९९० मध्ये प्रश्नपत्रिकांचे पूर्वाध व उत्तरार्ध प्रकाशित केले.

अक्कांच्या पश्चात १९९८पासून ही सर्व जबाबदारी नागपूरचे श्री. वसंत कृष्णा तथा तात्या गाडगीळांनी स्विकारली व शिस्तबद्धपणे हा उपक्रम बहरास आणला. साधना सप्ताह हे या अभ्यास उपक्रमाचे एक खास वैशिष्ट्य असून तो पूर्ण करण्याचा आनंद वेगळाच असतो. पुण्याचे श्री. सुहास आगरकर हे मा. तात्यांना मदत करीत असतात. २०१३ पासून दा.स.अ.ची जबाबदारी श्री. सुहास आगरकर यांनी घेतली आहे.

या उपक्रमाने अभ्याससर्थींना दासबोधाची खरी ओळख होण्यास सुरूवात होऊन समर्थ विचारांची गोडी वाढू लागते व एक आदर्श साधक बनण्यास प्रारंभ होतो.

दासबोधाचा सखोल अभ्यास (दा. स. अ.) या उपक्रमांत पत्रद्वारा दासबोध अभ्यासाचा तिसरा स्तर (प्रबोध) पूर्ण केलेल्या २५ते ६५ वयोगटातील अभ्यासार्थींना दरवर्षी **१ जून ते ३० सप्टेंबर** दरम्यान प्रवेश देण्यात येतो. याच काळांत **उपक्रमाबद्दलची माहिती नियमावली इ. मागवणे. म. ऑ. पाठवणे, सादर करणे इत्यादि पत्र व्यवहार करावयाचा आहे.** याकाळाव्यतिरीक्त केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेणे शक्य होणार नाही.

ज्या पात्र अभ्यासार्थींना प्रवेश घ्यायचा आहे. त्यांनी १० रू. (दहा रूपये) ची मनीऑर्डर वरील कालावधीत श्री. सुहास आगरकर, २२ दत्तप्रसाद सोसायटी, १४६७ सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३० यांच्याकडे म. ऑ. फॉर्मच्या खालच्या स्लिपवर ''मी प. दा. अ प्रबोध स्तर पूर्ण केलेला असून २५ ते ६५ या वयोगटातील आहे. मला दासबोधाच्या सखोल अभ्यासाची नियमावली, संदर्भग्रंथाची सूची, व पहिली प्रश्न पत्रिका पाठवावी, ''असे लिहावे. स्लिपच्या मागे स्वतःच्या संपूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. शिवाय याच मजकुराचे वेगळे कार्ड स्वतःच्या पत्यासह पाठवावे. आजकाल म. ऑ. कॉम्प्यूटर माध्यमातून पाठवल्या जातात. आपण भरून दिलेला म. ऑ. फॉर्म मूळ पोस्ट ऑफिसातच राहतो व कॉम्प्यूटर फॉर्म आमच्याकडे येतो ज्यावर म. ऑ. फॉर्मच्या खालच्या स्लिपवरील मजकुर व पत्ता कॉम्प्यूटर मध्ये टाईप केला जात नाही. म्हणून स्वतःचा पत्ता असलेले वेगळे कार्ड पाठवणे आवश्यक आहे.

मात्र उत्तराकरीता पोस्टेज पाठवण्याची गरज नाही. पत्रव्यवहार ज्याचा त्याने करावा. दुसऱ्या करता पत्रव्यवहार करू नये.

पहिली प्रश्नपत्रिका (स्वाध्याय) सोडवून त्याला नियमावली सोबत असलेली प्रवेश पत्रिका सर्व रकाने व्यवस्थित भरून सही करून जोडावी व वरील पत्यावर पाठवावी. मात्र प्रवेश सरसकट मिळणार नाही. पहिला स्वाध्याय स्विकाराई असेल तरच प्रवेश दिला जाईल. स्वाध्यायासोबत समीक्षणासह स्वाध्याय परत पाठवता येईल, इतपत मोठे पाकीट स्वतःचा पत्ता लिहून पुरेसे पोस्टेज लावून पाठवावे. सदर उत्तराचे पाकीट घडी करून घालावयास हरकत नाही. स्विकारलेले स्वाध्यायच समीक्षणासह परत केले जातील.

पहिला स्वाध्याय स्विकारून दासबोधाच्या सखोल अभ्यासामध्ये प्रवेश मिळाल्यावरच प्रश्नपत्रिकांच्या पूर्वार्धाकरता २० रू. (वीस रूपये) ची म. ऑ. वरील पत्यावर पाठवावी. म. ऑ. फॉर्मच्या खालच्या स्लिपवर २ ओळींचा मजकूर व दासबोधाचा सखोल अभ्यासाचा अभ्यासार्थी क्रमांक अवश्य लिहावा. पुस्तक बुक पोस्टाने पाठवले जाईल. पुस्तक पोचल्याचे एका कार्डाने कळवावे.

# नियमावली

१) दा. स. अ. म्हणजे दासबोधाचा सखोल अभ्यास. द. १ स. १ पासून द. २० स १० पर्यंत संपूर्ण दासबोध अभ्यासणे आवश्यक आहे.

२) दासबोधाबरोबर मनोबोध, गीता व समर्थ चरित्र थोडक्यात वाचणे आवश्यक आहे.

३) पत्राद्वारे दासबोध अभ्यास या उपक्रमाचा तिसरा स्तर (प्रबोध) पूर्ण केल्यावरच दा. स. अ. मध्ये भाग घेता येतो. दरवर्षी १ जून ते ३० सप्टेंबर दरम्यान प्रवेश दिला जातो. मात्र पहिला स्वाध्याय स्विकारार्ह असेल तरच प्रवेश दिला जातो.

४) वय २५ ते ६५ या वयोगटातील व्यक्तींना या उपक्रमात भाग घेता येतो. शारीरिक व मानसिक क्षमता पाहून काही निवडक अभ्यासार्थींना प्रवेश देणेची प्रथा आहे.

५) दर महिन्याला कमीत कमी दोन, अधिकाधिक चार स्वाध्याय सोडवता येतात. प्रवेश घेण्याकरीता संचालकाकडे फक्त पहिला एकच स्वाध्याय पाठवायचा असतो. नंतरचे स्वाध्याय नेमून दिलेल्या समीक्षकांकडे पाठवायचे असतात.

६) अपरिहार्य कारणाने ज्या महिन्यात आपण स्वाध्याय सोडवू शकत नाही, त्या महिन्यात कार्डाने समीक्षकांना कारण कळवणे आवश्यक आहे.

७) कारण न कळवता सतत ३ महिने स्वाध्याय सोडवून आला नाही तर नांव कमी केले जाते.

८) उपक्रमांत प्रवेश दिल्यावर समीक्षणासह स्वाध्याय परत पाठवला जातो. त्याकरता परतीच्या उत्तराकरता स्वाध्याय मावेल इतपत मोठे पाकीट, पुरेसे पोस्टेज लावून पाठवावे. प्रवेश दिल्यावर अभ्यासार्थी क्रमांक दिला जातो, प्रवेश नाकारलेले स्वाध्याय आमच्या रेकॉर्डला राहतील. ते परत केले जाणार नाहीत.

९) दासबोध सखोल अभ्यासाचा मूळ उद्देश उत्कट साधना आपले हातून घडून आपण उत्तम साधक व्हावे हा आहे.

१०) दरवर्षी कोजागिरी पौर्णिमेपासून पुढे ७ दिवस शिवथरघळ येथे साधना सप्ताह होतो त्यात अभ्यासार्थींना भाग घेणे आवशक आहे. हे शिबीर नि:शुल्क असते.

११) अभ्यासक्रम पूर्ण झाला की गौरव केला जातो. प्रमाणपत्र मिळत नाही.

१२) अभ्यास सुरू केल्यावर बंद ठेवायचा नाही हे मान्य असेल तरच प्रवेश घ्यावा.

**संपर्कासाठी पत्ता :**

**श्री. सुहास प्रभाकर आगरकर**
फ्लॅट नं. १०३, राजलक्ष्मी सोसायटी,
४२५/२० टि. म. वि. कॉलनी,
गुलटेकडी पुणे -४११०३७
मो. ९४२१०१८२३३


**श्री. वसंत श्रीकृष्ण गाडगीळ**
संचालक, दासबोध सखोल अभ्यास.

## अकरा श्रीमारुती





## अकरा श्रीमारुती स्थलदर्शक नकाशा



## श्रीसमर्थांनी छत्रपतिशिवाजी महाराजांना लिहिलेले पत्र !

"निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु ।
अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥१॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्त्वासी । तुळणा कैंची ॥२॥
नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति ।
पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥३॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत आणि जयवंत । जाणता राजा ॥४॥
आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ ।
सर्वज्ञपणें सुशीळ । सकळां ठायीं ॥५॥
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥६॥
तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट जालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥७॥
देव धर्म गो ब्राह्मण । करावया संरक्षण ।
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ॥९॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र धर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥१०॥
आणीकही धर्मकृत्यें चालती ।
आश्रित होऊनि कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥११॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकां आश्रय जाले । शिवकल्याण राजा ॥१२॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंध विस्मरण जालें । काय नेणूं ॥१३॥
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रती ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळिली पाहिजे ॥१४॥
उदंड राजकारण तटलें । तेणें वित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥१५॥

***

